महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन
विभाग दुसरा

मेरुस्थ आठवणी व अनुभव

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय

खंड २ रा : आत्मपर लेखन

विभाग दुसरा

माझ्या आठवणी व अनुभव

संपादक

गो. मा. पवार

रणधीर शिंदे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय १८-१

पुस्तकाचे नाव : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय
खंड २ रा : आत्मपर लेखन, विभाग दुसरा : माझ्या आठवणी व अनुभव

संपादक : गो. मा. पवार / रणधीर शिंदे

प्रथमावृत्ती : २०१६

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© **प्रकाशकाधीन :**

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

किंमत : रु. २८०/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

माझ्या आठवणी व अनुभव

अध्यक्षांचे निवेदन	एक ते दोन
संपादकीय	तीन ते सतरा
प्रस्तावना- वि. भि. कोलते	एकोणीस ते तीस
आदरांजली- यशवंतराव चव्हाण	एकतीस
' माझ्या आठवणी ' संबंधी- रवींद्र शिंदे	तेहतीस ते पस्तीस
अनुक्रमणिका	अ ते ऊ



महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

जन्म : २३ एप्रिल, १८७३ मृत्यू : २ जानेवारी, १९४४

अध्यक्षांचे निवेदन

स्वातंत्र्यपूर्व काळातील दीडशे वर्षांचा भारत आणि महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय सुधारणांचा आढावा घेतल्यास ठळकपणे पुढील बाबी समोर येतात. ब्रिटिशांनी छोटीमोठी संस्थाने एकतर बर्खास्त केली अथवा मांडलिक म्हणून जखडून ठेवली. यात अपवाद होते बडोदा येथील गायकवाड आणि नेपाळचे नरेश. दोघांशी इस्ट इंडिया कंपनीने केलेले करार मित्रत्वाचे होते. उर्वरित राजे रजवाडे रयतेच्या जीवावर हौस मौज करण्यात आणि सार्वभौम सत्तेचे आपण नम्र मांडलिक आहोत, हे दाखवण्यात मश्गुल होते. ब्रिटिशांनी फोडा नि तोडा नीती अस्त्राने परस्परात दुही लावून हिकमतीने त्यांना जेरीस आणले आणि पुढे दीर्घकाळ मोठ्या प्रमाणात शोषण करत राहिले. भारतभर कमीअधिक हीच स्थिती होती.

या काळात महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, न्या. भांडारकर, गो. ग. आगरकर, महर्षी कर्वे हे शिक्षणातून सामाजिक सुधारणांचा प्रयत्न करत होते. मात्र हे कार्य बहुतांशी उच्चस्तरीय आणि उच्चभ्रू समाजाच्या उन्नतीसाठी होते. या उलट महात्मा जोतीबा फुले यांनी १८५१ साली पुण्यात प्रथमच वंचित अस्पृश्य समाजातील मुला-मुलींसाठी शाळा सुरु करून सामाजिक, सुधारणेची सुरुवात स्वत:पासून केली. शिक्षणातून प्रगती अन् परिवर्तनाचा म. फुले यांचा एकट्याचा प्रयत्न होता. त्या काळात समाजात धर्माच्या आश्रयाने जातीच्या चौकटी बंदिस्त होत्या. सर्वसामान्यांना विद्या मिळत नसल्याने अज्ञानाचे राज होते. ऐपत असलेला मूठभर वर्गातील उंबऱ्यापर्यंत विद्या पोहचल्याने या वर्गाचे सगळीकडे वर्चस्व होते.

समाजातील अस्पृश्य-आदिवासी समजल्या जाणाऱ्या समाजाची स्थिती तर खूपच बिकट होती. समाजातील इतर घटक एक दुसऱ्यांपासून तुटलेले होते. एकजिनसीपणाचा पूर्ण अभाव होता. रानडे-भांडारकर-आगरकर-कर्वे प्रभुतींनी शिक्षणाचा प्रसार-प्रचार करण्यासाठी पुण्यात व इतरत्र शाळा सुरू केल्या; पण त्या शहरी लोकांसाठीच होत्या. इथे शिकणारे उच्चवर्गीयच होते. या पार्श्वभूमीवर प्रथमच महात्मा जोतीबा फुले यांनी शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाची सुरुवात केली. यानंतर महाराजा सयाजीराव गायकवाड या शेतकऱ्याच्या पोराने प्रजाहित लक्षात घेऊन १८८२ साली हुकूम काढून अस्पृश्य आदिवासी मुलांसाठी सरकारी खर्चाने शिकविणे सुरू केले. वंचित वर्गाला सरकारने शिकविणे असा हा जगातील फार मोठा समाज क्रांतिकारक निर्णय होता. रयतेला शिकवून शहाणे करणे ही प्रगती-परिवर्तनाची गुरूकिल्ली आहे, हे ओळखून या राजाने १८९२ साली हिंदुस्थानात प्रथम सक्तीचे प्राथमिक मोफत शिक्षणही सुरू केले. अस्पृश्य कार्यकर्त्यांना शेजारी बसवून भोजन केले. राजवाड्यातील पंगती भेद दूर केला आणि अस्पृश्यता निवारण्याचा हुकूमही काढला. अस्पृश्यांसाठी वैदिक शाळा सुरू केली. ब्राह्मणेतरांचे पुरोहित तयार केले. अस्पृश्यता दूर करणे ज्या काळात अवघड होते. त्या काळात सयाजीराव गायकवाडांनी सामाजिक सुधारणांची सुरुवात स्वत:पासून केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर अस्पृश्यता निवारण आणि बहुजन समाजाच्या प्रबोधनाचे कार्य केले. ज्या काळात अस्पृश्यता दूर करणे अवघड काम होते, त्या काळात धर्मशास्त्राचा अभ्यास करून त्यांनी काम सुरू केले. अभ्यास, लेखन आणि कृती यातून ते काम करू लागले. महर्षी शिंदे यांना विलायतेत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन नंतर त्यांच्या या कार्यात सर्व प्रकारचे सहाय्य सयाजीराव यांनी डोळसपणे केले.

अस्पृश्योद्धाराचे कार्य केलेल्या महात्मा गांधींचे आपणांस स्मरण होते. पण त्यांनी या क्षेत्रात काम सुरू करण्यापूर्वी सयाजीराव गायकवाडांनी बडोद्यात अस्पृश्यांना शिक्षण सुरू केले. या शाळा तपासण्यास महर्षी शिंदे यांना सांगितल्या. महर्षी शिंदे यांची या कामातील तळमळच सयाजीरावांनी ओळखली होती. महर्षी शिंदे यांनी स्पृश्य-अस्पृश्यातील दरी दूर करण्याचा प्रयत्न म्हणून धार्मिक व सामाजिक सुधारणासाठी लेखनातून कृतीतून काम करत होते. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून काम केले. अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदा भरविल्या. काही परिषदांचे अध्यक्ष सयाजीराव गायकवाड होते.

महर्षी शिंदे यांचे अस्पृश्यता निवारण आणि धर्म सुधारणा संबंधीचे महाराष्ट्रातील कार्य आणि त्यांचे प्रबोधनपर लेखन अत्यंत महत्त्वाचे असूनही दुर्लक्षितच राहिले. बहुजन विचारवंतांच्या वाट्याला येणारी उपेक्षाच त्यांच्याही बाबतीत खरी ठरली. महर्षी शिंदे यांची ओळख महाराष्ट्राला करून देण्याचे कार्य गेली काही वर्षे आदरणीय डॉ. गो. मा. पवार यांनी मेहनतीने केल्याने, ते मौलिक विचारधन वाचकांसमोर येत आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र साहित्य प्रकाशित करत आहे. पहिला खंड यापूर्वीच प्रकाशित झाला असून आता 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आत्मपर स्वरूपाचे लेखन' हा दुसरा खंड प्रकाशित होत आहे, याचा आम्हाला आनंद आहे.

बाबा भांड

दिनांक
१३ नोव्हेंबर, २०१५

बाबा भांड
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

संपादकीय....

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे समग्र वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा प्रकल्प साहित्य संस्कृती मंडळाने संकल्पिला असून त्याचा पहिला खंड 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, संशोधन आणि चिंतन', हा प्रसिद्ध झाला आहे. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आत्मपर स्वरूपाचे लेखन', हा दुसरा खंड आता प्रसिद्ध होत आहे.

विठ्ठल रामजी शिंदे हे मराठी साहित्यसृष्टीत अपवादात्मक ठरावेत एवढे वैशिष्ट्यपूर्ण लेखक होत, असे म्हणता येते. त्याचे कारण असे की, ते कृतिवीर असून लेखक होते. वृत्तीने ते धर्मनिष्ठ पुरुष होते त्यांनी आपले आयुष्य उदार धर्म प्रचाराच्या कार्यासाठी वाहून घेतले. त्यांच्या धर्म कल्पनेतूनच उद्‌भूत होणारे अस्पृश्यतानिवारणाचे व अन्य सामाजिक सुधारणेचे कार्य ते प्रत्यक्षात सातत्याने करीत राहिले. म्हणून ते मूलतः कृतिवीर होते. महाराष्ट्र त्यांना कर्मवीर, महर्षी या नावांनी संबोधून त्यांचा गौरवही करीत राहिला. अशा कर्मवीराने केलेली ही साहित्य निर्मिती हा एकप्रकारे, त्यांच्या कार्याचा भाग आहे. म्हणजेच, त्यांच्या उन्नत धर्मविचारांचा व मूल्यनिष्ठेचा आविष्कार त्यांच्या लेखनातूनही होत राहिला. त्यांची वैचारिक भूमिका अथवा जीवनदृष्टी, त्यांनी केलेले कार्य आणि त्यांची साहित्यनिर्मिती यामध्ये कमालीची एकरूपता आहे. म्हणूनच अशा प्रकारच्या धर्मनिष्ठ कर्मवीराने केलेली साहित्यनिर्मिती ही मराठी साहित्य सृष्टीतील अपवादात्मक घटना म्हणावी लागेल. स्वाभाविकपणेच त्यांच्या कार्यातून त्यांच्या वृत्तीचे जे विशेष प्रकट होतात तेच त्यांच्या साहित्यनिर्मितीतूनही प्रकट होतात असे आपणांस दिसून येते.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आत्मपर लेखनामध्ये त्यांनी लिहिलेली 'रोजनिशी' 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मपरस्वरूपाचे लेखन व त्यांनी लिहिलेले 'प्रवासवर्णन' यांचा समावेश होतो. त्यांच्या या तीन प्रकारच्या लेखनाच्या प्रस्तुत खंडात तीन विभागामध्ये समावेश केलेला आहे. या तीनही प्रकरच्या लेखनाचे विशेष प्रारंभी या प्रास्ताविकामध्ये आपण ध्यानात घेऊ.

शिंदे यांनी आपल्या आयुष्याच्या तीन वेगवेगळ्या कालखंडामध्ये रोजनिशी लिहिली आहे. १८९८ साली ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना, १९०१-०३ मध्ये धर्मशिक्षणासाठी ते ऑक्सफर्डला गेले असताना व कायदेभंग केल्यामुळे १९३० साली येरवड्याच्या तुरुंगवासात असताना त्यांनी बऱ्याचशा विस्ताराने रोजनिशी लिहिली. त्यांची ही रोजनिशी मी संपादित करून १९७९ मध्ये सविस्तर प्रस्तावनेसह प्रसिद्ध केली. त्यांनी १९२८ साली ब्राह्म समाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त कलकत्त्यापर्यंत जी सफर केली तिचा वृत्तांत तारीखवार, कथन करणारी रोजनिशी उपलब्ध झाली.

तीन वेगवेगळ्या कालखंडात लिहिलेली शिंदे यांची रोजनिशी त्यावेळच्या आजूबाजूच्या वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे, तशीच ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही प्रत्यय देणारी आहे. शिंदे

यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी. ए. च्या शेवटच्या वर्षात असताना लिहिलेली रोजनिशी ही त्यांची पहिली रोजनिशी व त्यांचे पहिले लेखन होय. २४ मार्च, १८९८ पासून २९ एप्रिल, १८९९ या वर्षभराच्या कालखंडात त्यांनी ही रोजनिशी अधूनमधून लिहिली आहे. शिक्षणासाठी पुण्यात येऊन सहा वर्षाचा कालावधी लोटला होता. शिंदे यांच्या मनाची तयार झालेली उदारमतवादी ठेवण, सर्वसामान्यांच्या हिताची कळकळ व बाह्य भपक्याला न भुलता आंतरिक गुणवत्तेला महत्त्व देण्याची त्यांची वृत्ती यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पुण्याच्या संस्कृतीशी संवाद जुळत नव्हता, असे त्यांच्या या रोजनिशीवरून दिसून येते.

शिंदे यांची १८९८-९९ ची ही रोजनिशी म्हणजे १९ व्या शतकाच्या अगदी अखेरच्या टप्प्यातील पुण्याच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक स्वरूपाच्या संस्थात्मक जीवनावरील भाष्य आहे. हे भाष्य एका विचारी, चौरस दृष्टीच्या, भावनाशील मनाने केलेले आहे याचाही सतत प्रत्यय येतो. प्रस्तुत रोजनिशीत, या भाष्याच्या जोडीने एका रसिक, काव्यात्म, संवदेनशील, रोमँटीक मनाच्या अंत:स्थ हालचालीचा आलेखही आपल्या प्रत्ययास येतो. म्हणून या रोजनिशीचे स्वरूप पाहता, या काळात शिंदे यांच्या मनाची घडण होताना दिसते हे खरे असले तरी, जे प्रगल्भ मन आधीच घडले होते त्याचा आविष्कारही रोजनिशीमधून होताना दिसतो. भावी जीवनात कार्यरूपाने अथवा विचाररूपाने शिंदे यांच्या मनाचा जो आविष्कार झाला, त्याचे सारे कंद येथे पाहावयास मिळतात.

शिंदे यांनी बी. ए. च्या वर्गात असताना लिहिलेल्या रोजनिशीमधून प्रकट होणारी त्यांच्या मनाची प्रगल्भता, बुद्धीचा चौरसपणा जो आपल्याला प्रत्ययाला येतो तो अपवादात्मकच म्हणावा लागेल.

शिंदे यांची 'इंग्लंडमधील रोजनिशी' तुलनेने मोठी आहे व ती दोन वर्षेपर्यंत बऱ्याचशा सातत्याने लिहिलेली आहे. तेथे त्यांना मिळणाऱ्या मोठ्या सुट्या त्यांनी लंडन शहर, इंग्लिश व स्कॉच सरोवरप्रांत, फ्रान्स, स्वित्झर्लंड व इटली या परिसरात घालविला. विविध ठिकाणचा प्रवास त्यांनी जाणीवपूर्वक निरीक्षणासाठी केला. नवी संस्कृती, नवा प्रदेश, वेगवेगळ्या प्रकारचे लोकजीवन आणि विविध प्रकारच्या परोपकारी संस्था त्यांना पाहावयास मिळाल्या. स्वाभाविकपणेच या रोजनिशीला बऱ्याच प्रमाणात माहितीपर स्वरूप आले असले तरी ही माहिती व निरीक्षणे नोंदवतानाही शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये, त्यांचा व्यापक दृष्टिकोन आणि वैशिष्ट्यपूर्ण संवेदनशीलता दिसून येते.

या रोजनिशीच्या कालखंडात शिंदे यांच्या मन:स्थितीतही फरक पडला. त्यांनी आपले जीवित ध्येय निश्चित केले होते. एक प्रकारच्या आत्मविश्वासाने ते वावरत होते. त्यांची मुळातील विनोदवृत्ती खुलली. मनाची आध्यात्मिक बैठक, दीन-दलितांच्या उन्नतीची कळकळ व स्वाभाविक रसिकता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मूळ वैशिष्ट्ये त्यांच्या रोजनिशीतून प्रकट होतात. युरोपची उद्योगप्रधान संस्कृती, लोकशाहीवादी वातावरण ह्या बाबी शिंदे यांना जरूर आवडल्या; मात्र

पाश्चात्त्य संस्कृतीचे त्यांच्यावर यत्किंचितही दडपण पडलेले दिसत नाही. तेथील वास्तव्यात ते फेटा घालून मोकळेपणाने वावरत. त्यांच्या ठिकाणी स्वदेशीचा फाजील आत्माभिमान नव्हता, की पाश्चात्त्य संस्कृतीमुळे निर्माण झालेला न्यूनगंडही नव्हता. युरोपमधील सांस्कृतिक वातावरण, तेथील धर्मसंस्था, सार्वजनिक व कौटुंबिक जीवन, लोककल्याणकारी संस्था इत्यादी विविध अंगांचा या रोजनिशीद्वारा परिचय होतो.

धर्मसंस्थांच्याकडून चाललेले परोपकाराचे कार्य ते सहेतुकपणे पाहत होते. ऑक्सफर्ड येथील वर्कहाऊसचे किंवा कंगालखान्याचे ते बारकाईने वर्णन करतात. अडीचशे म्हातारी, दुबळी अनाथ स्त्री-पुरुष तेथे असतात व त्यांची व्यवस्था कळकळीने चोख ठेवली जाते, इत्यादी वर्णन करून ते उद्‌गारतात. 'संस्था पाहून अत्यंत समाधान वाटले; हा खरा ख्रिस्तीधर्म!' लंडन, मँचेस्टर येथील व अन्य ठिकाणचीही अशा प्रकाराची चालणारी कामे त्यांनी जाणीवपूर्वक पाहिली हिंदुस्थानामध्ये गेल्यानंतर आपण अशाप्रकारचे दु:खनिवारणाचे काम मिशनरी वृत्तीने करावे अशी प्रेरणा त्यांना तेथेच निर्माण झाली.

कोणतेही निरीक्षण करीत असताना ते धार्मिक, सांस्कृतिक व नैतिक अंगाने करतात. केसिक कनव्हेन्शन, ऑक्सफर्ड येथील पदवीदान समारंभ, पॅरिस येथील ऑलिंपिया हे नाटकगृह इत्यादींची त्यांनी केलेली वर्णने वाचून याची प्रचिती येते. त्यांच्या या दृष्टिकोनाबरोबरच यथातथ्य वर्णन करण्याची त्यांची शक्ती किती मोठी आहे व त्यांची संवेदनशीलता किती तरल आहे याची आपणाला कल्पना येते.

पाश्चात्त्य संस्कृतीचा अनेक अंगानी वेधक परिचय करून देणारी शिंदे यांची इंग्लंडमधील रोजनिशी वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल.

महर्षी शिंदे यांची ब्राह्म समाजाच्या शतसावंत्सरिक उत्सवानिमित्त १९२८ साली केलेल्या कलकत्त्यापर्यंतच्या प्रवासाची रोजनिशी अलीकडेच त्यांच्या नातलगाकडून प्राप्त झाली. तिचाही समावेश येथे केला आहे. तिचे यथायोग्य संपादन करून डॉ. रणधीर शिंदे हे ती स्वतंत्रपणाने लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. तसेच या खंडातील रोजनिशी विभागात त्यांच्या प्रस्तावनेचा समावेश केला आहे. महर्षी शिंदे हे ब्राह्मधर्माचे प्रचारक म्हणून मंगलोर येथील आचार्यपद स्वीकारल्यापासून काम करीत होते. कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाच्या निमंत्रणानुसार त्यांनी शतसांवत्सरी-निमित्त हा दौरा पार पाडला. ब्राह्म धर्माचा प्रसार तसेच अस्पृश्य वर्गाची सर्वांगीण सुधारणा हे महर्षी शिंदे यांच्या आस्थेचे, कळकळीचे विषय होते, हे डॉ. रणधीर शिंदे यांनी या रोजनिशीचा परिचय करून देताना एका लेखात (समाज प्रबोधन पत्रिका) सांगितले आहे. ब्राह्मसमाजाची तत्कालीन स्थिती; त्याबद्दलची निरीक्षणे, अस्पृश्य मुलांच्या शाळांना, संस्थांना. गावोगावच्या ब्राह्म समाजाची अवनत अवस्था बघितल्यानंतर महर्षी शिंदे यांना हळहळ वाटते. अस्पृश्यता निवारण कार्याचा तर त्यांना आयुष्यभराचा ध्यास होता. म्हणून गावोगावच्या अस्पृश्यवर्गाची स्थिती, त्यांच्या शाळांची स्थिती ते कळकळीने पाहत होते. इतर रोजनिशीत महर्षी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व वाङ्‌मयीन गुणवत्तेचे ज्याप्रमाणे विशेष प्रकट होतात, तसेच

स्वाभाविकपणे याही रोजनिशीतून प्रकट होतात. आंतरिक मन:स्थिती, बाह्य परिस्थिती, वेगळे वातावरण, घडलेले प्रसंग आणि पाहिलेल्या व्यक्ती या सर्वांचे ते अत्यंत प्रत्ययकारी वर्णन करतात.

येरवड्याच्या तुरूंगातील रोजनिशी ही महर्षी शिंदे यांची सर्वात छोटी व अखेरची रोजनिशी. महात्मा गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना शिक्षा झाली व मे, १९३० पासून पाच महिने येरवड्याच्या तुरुंगात त्यांना राहावे लागले. त्यापैकी शेवटीच्या अडीच महिन्यांच्या कालावधीत ही रोजनिशी त्यांनी लिहिली. (याच कालावधीत तुरूंगामध्ये ते 'माझ्या आठवणी व अनुभव' या आपल्या आत्मचरित्राचेही लेखन करीत होते.)

ही रोजनिशी लिहितेवेळी महर्षी शिंदे यांचे वय सत्तावन्न वर्षाचे होते. अस्पृश्यता निवारण्याच्या कामी भारतभर त्यांनी संस्थापक पातळीवरून प्रयत्न केला होता. सार्वजनिक जीवनात अपमानाचे व मानाचे अनेक प्रसंग अनुभवले होते. या मानापानाच्या पलीकडे जाणारी प्रौढ, शांत, स्थिर अशी त्यांची मनोवृत्ती झालेली होती. महात्मा गांधी यांनी आरंभिलेल्या स्वातंत्र्ययुद्धात धर्मबुद्धीने त्यांनी भाग घेतला होता. या रोजनिशीत शिंदे यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा, तत्त्वचिंतक व काव्यात्म मनाचा व विनोदी वृत्तीचा आधिक्याने प्रत्यय येतो. त्यांच्या मनाची आध्यात्मिक ठेवण व धर्मप्रवणता ही साऱ्यांच्या मुळाशी आहे.

आत्मचरित्र लेखनामुळे आईबापांच्या प्रेमाचा व खेळकर बाल्याचा ते पुन्हा एकदा अनुभव घेत होते. या आठवणींच्या लेखनामुळे ते एका वेगळ्या प्रसन्न आनंदमय वातावरणात गेलेले दिसतात. त्यामुळे रोजनिशीतून त्यांची प्रसन्न वृत्ती प्रकट होते. तुरुंगातील बारीकसारीक अडचणीकडे ते खेळकरपणे, विनोदात्मवृत्तीने बघतात. तुरुंगातही त्यांचे आध्यात्मिक साधना चालूच होते. दर मंगळवारी होणाऱ्या कॅथालिक उपासनेला ते हजर राहत. कधी स्वामी सहजानंद व छोटात्मल गांधी यांच्या समवेत ते धर्मचर्चा करीत असत. कुटुंबाच्या सहवासाला दुरावलेल्या शिंदे यांना तुरुंगातून सुटका कधी होईल याची उत्कंठा लागून राहिली होती. अखेर सुटका झाल्यानंतर शिंदे यांच्या अभिनंदनार्थ पुण्याच्या रे मार्केटात जाहीर सभा झाली. शेवटी माळ घातल्यावर शिंदे म्हणाले, "आता कायदेभंग करून तुरुंगात जाणे इतकी सामान्य गोष्ट झाली आहे, की अशा माळा तुरुंगातून परत आलेल्यांच्या गळ्यात न घालता, त्या माळा अद्यापि तुरुंगात न गेलेल्यांच्या गळ्यात घातलेल्या बऱ्या." हा त्यांचा विनोदही स्वत:कडे मोठेपणा न घेण्याच्या त्यांच्या स्वाभाविक विनम्र वृत्तीतून निर्माण झालेला आहे. रोजनिशीचा हा प्रसन्न शेवट त्यांच्या तुरुंगातील मनोवृत्तीशी अत्यंत सुसंगत आहे.

महर्षी शिंदे यांची ही रोजनिशी वाचताना आपण एक चांगल्या दर्जाची वाङ्मयीन कृती वाचत आहोत असा अनुभव येतो. याचे कारण तीमधून लेखकाच्या प्रगल्भ, असाधारण अशा व्यक्तिमत्त्वाचा आपल्याला प्रत्यय येतो. शिंदे यांची 'फर्ग्युसनमधील रोजनिशी' तसेच 'येरवड्याच्या तुरुंगातील रोजनिशी' महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टीने जशी महत्त्वाची

आहे, तशीच ती वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीनेही मोलाची आहे.

एकंदरीत, मराठी साहित्यात अत्यल्प असणाऱ्या रोजनिशी वाङ्मयात महर्षी शिंदे यांनी विविध काळात रोजनिशी लिहून मोलाची भर घातली आहे.

• •

महर्षी शिंदे यांच्या आत्मपर लेखनाचा दुसरा आविष्कार म्हणजे त्यांनी लिहिलेले 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मचरित्रपर पुस्तक. या ग्रंथाचा पूर्वार्ध १९४० साली प्रसिद्ध झाला व तो संपूर्ण स्वरुपामध्ये प्रथमत: १९५८ साली प्रसिद्ध झाला. प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीचा इतिहास कळण्याच्या दृष्टीने महर्षी शिंदे यांच्या चिरंजिवांचे निवेदन जोडले आहे. आधीच्या आवृत्तीची डॉ. वि. भि. कोलते यांची प्रस्तावना व श्री. यशवंतराव चव्हाण यांची 'आदरांजली' आधीच्या आवृत्तीप्रमाणे येथे समाविष्ट केली आहे.

प्रस्तुत ग्रंथाला स्वत: महर्षी शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' असे शीर्षक दिले असले तरी ती कालानुक्रमे सांगितलेली जीवितकथा असल्याने तिला आत्मचरित्र म्हणणे योग्य ठरते. त्यांचे जीवन सदैव प्रत्यक्ष कार्य करण्यात व्यतीत होत असल्यामुळे निवांतपणे वाङ्मयीन निर्मिती करण्याला त्यांना फुरसद मिळणे शक्य नव्हते. १९३० साली म. गांधींनी सुरू केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला त्याबद्दल त्यांना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली जाऊन येरवड्याच्या तुरुंगात त्यांची रवानगी झाली. दिवसभर त्यांना काथ्या वळण्याचे काम करावे लागत असे. तरी रात्रीच्या वेळी कोठडीतला एकांतवासातला वेळ कसा व्यतीत करावा असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. तेव्हा मनाला विरंगुळा म्हणून त्यांनी आपल्या आयुष्यातील आठवणी लिहावयास प्रारंभ केला.

सुमारे चारशे पृष्ठांच्या या पुस्तकांची पहिली एकशे सात पाने भरतील एवढा मजकूर त्यांनी तुरुंगवासामध्ये असताना लिहिला. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांच्या बालपणाच्या काळाचे चित्रण आले आहे. त्यानंतरच सुमारे तीनशे पृष्ठांचा भाग १९३९ साली शारीरिक विकलतेच्या अवस्थेत आयुष्याच्या अखेरच्या काळामध्ये त्यांनी लिहिलेला आहे.

या आत्मचरित्रपर ग्रंथातील लेखन तीन भागात विभागले असून, पहिल्या भागात विलायतेतील शिक्षणापर्यंतचा वृत्तांत समाविष्ट केलेला आहे. दुसऱ्या भागात १९०३ च्या अखेरीस विलायतेहून आल्यानंतर मुंबई प्रार्थनासमाजाचे प्रचारकार्य सुरू केल्यापासूनचा वृत्तांत आहे. १९०६ मध्ये भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी (डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया) ची स्थापना करून त्यांनी अस्पृश्यतानिवारणाचे जे कार्य केले. त्याचे १९१२ पर्यंतचे वर्णन आले आहे. तिसऱ्या भागामध्ये मिशनचे ठाणे, पुणे येथे हलविल्यानंतर अस्पृश्यतानिवारणाचे केलेले कार्य, राजकारणामधील त्यांचा सहभाग, मंगळूर येथे ब्राह्मसमाजाचे आचार्य म्हणून काम, केरळमधील व्हायकोम सत्याग्रहामधील सहभाग, शेतकरी चळवळीमधील काम व कायदेभंगाच्या चळवळीत घेतलेला भाग आणि तुरुंगवास यांचे वर्णन येते. त्याचप्रमाणे त्यांनी केलेली ब्रह्मदेश यात्रा व

ब्राह्मसमाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त केलेला दौरा या प्रवासाचे वर्णन येते. अखेरीस, स्वतःच्या साहित्यसेवेच्या संबंधी त्यांनी थोडक्यात केलेले निवेदन एवढा भाग समाविष्ट आहे.

शिंदे तुरुंगामध्ये असताना लिहिलेला बालपणीचा व पुणे येथील कॉलेज शिक्षण पूर्ण होईपर्यंतचा भाग एकंदर आत्मचरित्रात फारच हृद्य उतरला आहे. सुरुवातीचा बालपणीचा काळ चित्रित करताना त्यांना अत्यंत प्रिय अशा आठवणीमध्ये ते रमून गेले होते. त्यामुळे त्यांनी समरसून आपले आई-वडील, आजोबा व अन्य कुटुंबीय, सवंगडी, शिक्षक यांचे आणि आपल्या घरातील उदारमतवादी, मोकळ्या वातावरणाचे हृदयंगम चित्र रेखाटले आहे. त्यांच्या बालपणीच्या या काळातच त्यांची पूर्वीची आर्थिक सुस्थिती जाऊन दारिद्र्याची, हलाखीची परिस्थिती आली होती. या कमालीच्या दारिद्र्यातही त्यांच्या आईच्या प्रेमळपणाचा, तिच्या सहनशीलतेचा व आनंदीवृत्तीचा ठसा त्यांच्या मनावर कायमचा उमटला. दारिद्र्याच्या अवस्थेतही तिने मोठ्या समाधानी वृत्तीने आणि कौशल्याने घर सांभाळून मुलांना समाधानी ठेवले याचे हृदयाला हात घालणारे वर्णन त्यांनी केले आहे. "दर दुसरे वर्षी आमच्या आईचे बाळंतपण हे ठरलेलेच असे आणि त्यावेळी मागले मूल काही जिवंत नसे. बाळंतपण, मुलांचा आजार किंवा मरण याखाली माझ्या आईची सर्व शक्ती खचली. तरीपण मुलांचा कंटाळा किंवा संसाराचा तिटकारा किंबहुना दुःखाचा किंवा निराशेचा एक उद्‌गारही कधी आईच्या तोंडातून आमच्या कानावर आला नाही. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी आपल्या माहेरच्या सुखदुःखाच्या गोष्टी रसिकपणाने सांगून आई आमची गोड करमणूक करीत असे. आईच्या गोष्टी व गाणी हाच आमचा मोठा मेवा होता. तिची आनंदी आणि विनोदी वृत्ती हीच आमची विश्रांती होती. तिच्या गोष्टीची आम्हाला पुढे-पुढे चटक लागली. इतकी की, जर भूक लागली असली, स्वयंपाकाला अवकाश असला, किंबहुना भाकरी बरोबर खावयास चांगली भाजी नसली, तर आम्ही आईच्या काठवटीभोवती जमून तिला गोष्टी सांगण्यास लावीत असू. मग तिने आम्हांस अशा प्रेमळ कहाणीत गुंतवावे की स्वयंपाक केव्हा झाला, आम्ही काय खाल्ले की मुळीच काही खाल्ले नाही याचे आम्हास भान राहात नसे." आईच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाचाच त्यांच्या मनावर फार खोलवर परिणाम झाला.

शिंदे यांना लहानपणापासूनच निसर्गाची ओढ होती व आपण निसर्गाला हृदयदान दिले असे सांगतानाही आपण त्यापूर्वीच आईला हृदयदान दिले होते याचा उल्लेख ते करतात. वडिलांचा उदार स्वभाव, शिक्षकांचे प्रेमळ शिकविणे, वडिलांच्या बरोबर वनभोजनास जाणे, सवंगड्यासमवेत चालणारे दांडगाईचे खेळ इत्यादीचे वेधक अशा प्रकारचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. या काळात त्यांनी घरीच केलेले श्रीधर, महिपती वगैरेसारख्या संतकवींच्या पोथ्यांचे वाचन, शाळेमध्ये कालिदासाचे रघुवंश, बाणभट्टाची कादंबरी वगैरेचे केलेले अध्ययन व शाळेत पाश्चात्त्य संस्कृतीचा अनुभव देणारा इंग्रजी साहित्याचा अभ्यास व स्वतंत्रपणे केलेले मराठीमधील अद्‌भूतरम्य, प्रणयप्रधान कादंबऱ्यांचे वाचन अशा विविध संस्कारातून त्यांच्या मनाची घडण कशी घडली याचे उठावदार चित्र त्यांनी रेखाटले आहे. आपल्या सौंदर्योन्मुख वृत्तीचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, "माझ्या घरी जातिभेद नव्हता, तसा माझ्या हृदयात संस्कृतिभेदाचा किंवा पक्षपाताचा कृत्रिमपणाही

नव्हता. सौंदर्य जेथे भेटेल तेथे ऊर्ध्वहस्ताने स्वीकारण्यास मी लहानपणापासून एका पायावर तयार आहे. मग ते इंग्लंडतले असो, की स्वदेशातले असो, शहरातले असो, की खेड्यातले असो, संस्कृत असो, की प्राकृत असो, ते सहज व स्वाभाविक असले की पुरे. मी त्याला बिलगलो असे समजावे."

या पुस्तकाच्या पुढील भागाचे लेखन बराच खंड पडल्यानंतर व शिंदे कंपवाताने आजारी असताना आयुष्याच्या अखेरच्या अवस्थेत केलेले आहे. त्यांच्या आयुष्यातील १९०३ च्या पुढचा काळ हा प्राधान्याने कार्यकाळ आहे. या भागाचे लेखन त्यांनी वर्तमानपत्रातील कात्रणे, अहवाल, स्वत:ची टिपणे सहकाऱ्यांनी मिळवून दिलेली माहिती यांचा आधार घेऊन केलेले आहे. या निवेदनात बराचसा भाग त्यांच्या कामाच्या व चळवळीच्या माहितीचा असा आहे. असे असले तरी ते निवेदन कोरडेपणाने केलेले नाही ; तर एका भावनाप्रधान, धर्मप्रवण व प्रगल्भ व्यक्तीने केलेले हे निवेदन आहे, याचा ठसा वाचकांच्या मनावर उमटतो.

महर्षी शिंदे यांचे हे आत्मचरित्र एका सात्त्विक, निरहंकारी, क्षमाशील वृत्तीच्या पुरुषाने लिहिलेले आहे, असा प्रत्यय वाचकांना सातत्याने येत राहतो. शिंदे यांनी अपूर्व अशा प्रकाराचा स्वार्थत्याग करून धर्मप्रचार करण्याचे व अस्पृश्यतानिवारणाचे कार्य आयुष्यभर केलेले आहे. या कार्यासाठी त्यांनी उपसलेले कष्ट, त्यांना करावा लागलेला संघर्ष, गिळावे लागलेले अपमान याबद्दलची यथायोग्य माहिती ज्यांना असेल त्यांना तर या आत्मचरित्राची थोरवी विशेष पटल्यावाचून राहात नाही. आत्मचरित्र लेखकाने आत्मप्रौढी मिरवू नये, आत्मगौरव करू नये, आत्मसमर्थन करू नये, ही स्वाभाविक अपेक्षा असते. ब्राह्मधर्म प्रचारक या नात्याने, डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना करून कार्य करणारे या नात्याने शिंदे यांचा हिंदुस्थानातील कितीतरी ज्येष्ठ पुढाऱ्यांचा परिचय झालेला होता. आपल्या कामासाठी त्यांनी त्यांचे सहकार्य घेतले होते. डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, मिसेस ॲनी बेझंट, म. गांधी इत्यादी थोर व्यक्तींचा त्यांना जवळून परिचय होता. या थोर विभूतींचा जो थोडाफार उल्लेख येतो तो विशिष्ट तपशील पुरविण्याच्या संदर्भात. वस्तुत: महात्मा गांधीचा त्यांचा विशेष परिचय होता व त्यांच्या वारंवार भेटीगाठी होत असत. मात्र आत्मगौरव वाढेल अशा प्रकारे यांपैकी कोणत्याही व्यक्तीचा उल्लेख आपल्या चरित्रात करण्याचे त्यांनी टाळले आहे, असेच दिसते. संतांप्रमाणे त्यांची आत्मसंकोची वृत्ती होती. १९२३ साली त्यांना पुणे येथे दिलेल्या मानपत्रास त्यांनी जे उत्तर दिले त्यातून त्यांची आत्मसंकोची मनोवृत्ती प्रकट होते. "मनुष्याच्या चरित्रात ज्या कित्येक आपत्ती येतात, त्यातील आपली झालेली अकटोविकट स्तुती आपल्याच कानाने ऐकणे ही एक होय. जेव्हा जेव्हा असे दुर्धर प्रसंग माझ्यावर येतात तेव्हा ते सहन करण्याचा एकच तोडगा माझ्याजवळ आहे. तो हा, की इतर वेळा माझी जी निंदा व अपमान झालेला असतो त्याची मी आठवण करतो आणि स्तुतिनिंदेचे ओझे ब्रह्मार्पण करून मी माझ्या कार्याला मोकळा होतो." मुंबई प्रार्थना समाजातील धुरिणांशी, त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर, म. गांधी यांच्याशी त्यांचे काही बाबतीत मतभेद झाले होते. मात्र आत्मसमर्थनासाठी आपल्या चरित्रात त्यांनी एक ओळही लिहिली नाही. या व्यक्तीचा

जो उल्लेख केलेला असेल तो त्यांचा मोठेपणा लक्षात घेऊन गौरवयुक्त शब्दांतच केलेला आढळतो. अशा उन्नत मनोवृत्तीने लिहिलेले हे आत्मचरित्र वाचकांना उदात्त स्वरूपाचा आनंद देते.

व्यक्तीचे असो, प्रसंगाचे असो किंवा मनोवृत्तीचे असो, प्रत्ययकारी चित्रण करणे हे शिंदे यांच्या लेखनशैलीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. एखाद्या स्थळाचे अथवा वातावरणाचे चित्र हुबेहुब वाटावे अशा प्रकारे शिंदे रेखाटतात. जगन्नाथपुरी येथील जगन्नाथ मंदिराचे, आजूबाजूच्या ओंगळ वातावरणाचे चित्र त्यांनी रेखाटले आहे, तसेच कलकत्ता येथील हुगळी नदीच्या काठी असलेल्या कालिमातेला कोकरांचा बळी देण्याच्या प्रसंगाचे अत्यंत क्रूरपणाचे वर्णन केले आहे. एखाद्या व्यक्तीचे चित्र साक्षात करण्याची क्षमताही त्यांच्या लेखणीत आहे. ब्राह्म समाजाच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त १९२८ साली ते कलकत्त्यास गेले असताना उपासना चालविणाऱ्या रवींद्रनाथ टागोरांचे त्यांना प्रथम दर्शन कसे घडले याचे त्यांनी वर्णन केले आहे. "मी त्यांना प्रथमच पाहिले. चेहरा अत्यंत सुंदर व गंभीर किंचित औदासीन्याची छटा दिसली. प्राचीन ऋषिकाळाची कल्पना मूर्त स्वरूपास आली. वेदी-सर्वस्फूर्त झाली. वेदीभोवतीची मोठमोठी शुभ्र व लाल उत्फुल्ल गुलाबाची फुले विकसित होऊन कविवर्याचे उद्‌गार ऐकण्यास टपलेली होती, असा भास झाला. खाली मान घालून कविवर्यांनी जे आसन घातले ते अर्धातास वर पाहीचनात. आवाज अलगुजासारखा कोमल व हृदयप्रवेशी होता. मग पुढे विरल व अपांग दृष्टीने श्रोतृवृंदाकडे पाहात ते आपले प्रवचन वाचू लागले. त्यावेळी कमलनयन म्हणून काय चीज आहे, ती अनुभवास आली. केशकलापांची शुभ्र शोभा गोधूम कांतीच्या भव्य कपाळावर विलसत होती. पिंगट रंगाचा रेशमी सैल सदरा असून त्यावर त्याच रंगाची चादर पसरली होती. सरळ नासिका, विखुरलेली दाढी, पाणीदार दृष्टिविक्षेप. एकंदरीत एक दैवतच पुढे दिसले." वस्तुनिष्ठ वर्णनाबरोबरच आपल्या मनावर होणाऱ्या परिणामांचेही त्यांनी वर्णन केले आहे. भावस्थितीला अनुरूप असा संस्कृत शब्दांचा काहीशा विपुलतेने उपयोग केला आहे.

व्यक्तिवर्णनाप्रमाणेच संवाद प्रसंगाचेही यथार्थ चित्रण शिंदे करतात. 'लंडन इंडिया सोसायटीत' वयोवृद्ध दादाभाई नौरोजी आपल्याला नातू शोभतील अशा तरुणांना प्रेमळपणे कसे दटावतात हे त्यांनी वर्णिले आहे. डॉ. भांडारकरांसमवेतचा विनोदी प्रसंगही ते रेखाटतात. त्याचप्रमाणे तुरुंगात भेटण्यास आलेले ना. भास्करराव जाधव यांच्या समवेत झालेल्या तणावपूर्ण संवाद प्रसंगाचेही त्यांनी उत्तमप्रकारे चित्रण केले आहे.

विनोदात्म वृत्ती हा महर्षी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक प्रमुख विशेष आहे, व संपूर्ण चरित्रातून किंबहुना त्यांच्या सर्वच लेखनातून तो मंदपणे प्रकट होताना दिसतो. त्यांचा विनोद त्यांच्या समंजस, क्षमाशील वृत्तीतून निर्माण होणारा आहे. नागपुरात शिमग्याच्या वेळचे बीभत्स प्रकार टाळण्यासाठी शिंदे यांनी सभा बोलावली होती. प्रतिकूल असणाऱ्या मंडळींनी त्यांनाच वाटेत अडवून रंगाने न्हाऊ घातले. या प्रसंगाचे ते वर्णन करतात, "मला सायकलवरून खालीदेखील उतरू न देता चौघाधटिंगणांनी मला सायकलवरच रंगस्नान घातले. सर्व कपडेच नव्हे तर शरीरसुद्धा

रंगाने भिजून चिंब झाले. स्नानविधी चालू असता होळीचा अर्वाच्य ध्वनी दुमदुमू लागला. इतक्या थाटात लग्नातसुद्धा माझे स्नान झाले नव्हते ! " स्वत:च्या फजितीचे आणि प्रावात्य प्रसंगाचे या व्याज भारदस्त शैलीत त्यांनी जे वर्णन केले आहे ते त्यांच्या ठिकाणी असलेल्या विनोदात्म वृत्तीमुळेच.

म. शिंदे यांचे हे आत्मचरित्रपर लेखन कृतिवीर असणाऱ्या एका धर्मनिष्ठ पुरुषाचे आहे. संपूर्ण लेखनात त्यांच्या सच्चेपणाचा प्रत्यय येतो. वस्तुनिष्ठतेला कोठेही बाध येऊ न देता त्या प्रसंगाच्या भावनात्मकतेचेही ते वर्णन करतात. आत्मगौरव टाळून स्वत:च्या कार्याचे वर्णन करावयाचे ही कसरत त्यांना संपूर्ण लेखनांमध्ये करावी लागली आहे. धार्मिक व सामाजिक अशा सर्वांगीण परिवर्तनाचा ध्यास, वृत्तीचा नि:स्पृहपणा आणि परखडपणा आत्मसमर्थन व आत्मगौरव यांचा अत्यंत अभाव या नैतिक गुणांच्या जोडीने तरल संवेदनशीलता, उच्च प्रतीची विनोदात्मता आणि भाषेचा सर्जकपणे उपयोग करण्याची क्षमता या गुणविशेषांमुळे त्यांचे हे आत्मचरित्रलेखन श्रेष्ठ दर्जाचे ठरते.

• •

प्रवासवर्णनपर लेखन हाही एक महर्षी शिंदे यांच्या आत्मपरलेखनाचा लक्षणीय असा भाग आहे. बालपणी वडिलांच्याबरोबर निसर्गरम्य ठिकाणी केलेल्या सहलींमुळे व आईने सांगितलेल्या रानावनातल्या गोष्टींमुळे त्यांच्या ठिकाणी बालपणापासूनच निसर्ग सौंदर्याची व वेगवेगळी स्थळे पाहण्याची आवड निर्माण झाली होती. बी. ए. च्या वर्गात असताना त्यांनी कोल्हापूर जवळील पन्हाळगड, विशाळगड या निसर्गरम्य ठिकाणी सहल काढली होती. १९०१-०३ या कालावधीत लिहिलेल्या त्यांच्या इंग्लंडमधील रोजनिशीत पॅरिस, रोम, पाँपी येथे केलेल्या प्रवासाचे उत्तम प्रकारचे वर्णन पाहावयास मिळते. त्याशिवाय त्यांनी मुद्दाम असे लिहिलेले तीस एक प्रवासवर्णनपर लेख आहेत. मुंबई प्रार्थना समाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुबोध पत्रिके'च्या संपादकाच्या विनंतीवरून त्यांनी सुमारे सोळा प्रवासवर्णनपर लेख युरोपमध्ये असताना लिहिले. भारतात आल्यानंतरही त्यांनी केलेल्या प्रवासासंबंधी आवडीने लेख लिहिले आहेत प्रवास करून निसर्गरम्य ठिकाणी ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, शिल्पे बघावी आणि आपण बघितलेले इतरांना कथन करावे, ही महर्षी शिंदे यांच्या ठिकाणची स्वाभाविक उर्मी दिसते.

इंग्लंडपर्यंतच्या जलप्रवासाचे तसेच युरोपमधील मार्सेय, पॅरिस, लंडन ही शहरे, शेक्सपिअर, वर्डस्वर्थ वगैरे प्रतिभावंताशी संबंधित स्थळे, इंग्लंड व स्कॉटलंडमधील सरोवरप्रांत इत्यादीचे वर्णन त्यांनी आपल्या प्रवासवर्णनपर लेखांतून केले आहे. भारतामधील मंगळूर, मुडबिद्री, कारकळ इत्यादी लहानमोठ्या शहरांची वर्णनेही त्यांनी केली आहेत.

या प्रवासवर्णनपर लेखनातून महर्षी शिंदे यांनी अनुभवलेला निसर्ग, ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, शिल्पे त्याचप्रमाणे तेथील सामाजिक, सांस्कृतिक व धर्मविषयक स्थिती इत्यादीबद्दल वर्णन केले आहे. सांस्कृतिक ठिकाणे, निसर्ग आणि लोकस्थिती यांचे निरीक्षण करण्यामध्ये त्यांना विलक्षण आस्था होती. त्यांनी बघितलेला निसर्ग असो, वास्तू अथवा शिल्पे असोत किंवा लोकजीवन असो या सर्वांचे वस्तुनिष्ठ चित्रण ते वेधकपणे करतातच, मात्र त्यांचे हे वर्णन केवळ

वस्तुनिष्ठ स्वरूपाचे केवळ माहिती देणारे असत नाही. बघितलेल्या दृश्याने त्यांच्य अंत:करणामध्ये उदित केलेली भावना, तीमधून निर्माण झालेले चिंतन अथवा वैचारिक स्वरूपाच्या जाणिवा ते प्रकट करतात.

शिंदे यांच्या मनावर निसर्गाचा आध्यात्मिक स्वरूपाचा परिणाम कसा होतो, त्याचप्रमाणे त्यांची वैचारिकता ही किती व्यापक होती हे त्यांच्या १९०३ साली लिहिलेल्या 'जनातून वनात आणि परत' या लेखातून उत्कटपणे जाणवते. त्यांना सुंदर निसर्ग भावतो. मात्र सुधारणेच्या नावाखाली या यंत्रयुगात माणुसकीचे होणारे अवमूल्यन हेही तीव्रपणाने कसे जाणवते याचा प्रत्यय प्रस्तुत लेखावरून येतो. ऑक्सफर्डवरून ते आगगाडीने सुप्रसिद्ध सरोवर प्रांती मिळालेले होते. वाटेत त्यांना लागलेल्या नर्मिंगहॅम, मँचेस्टर अशा दगडी कोळशावर चालणाऱ्या कारखान्याच्या 'ब्लॅककंट्री' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातून जाताना मांडीवरच्या वर्तमानपत्रावर कोळशाची भुकटी कशी साचे व बाहेर पाहिल्यास नुसती गिरण्यांची धुराडी व त्यातून निघणारे धुरांचे कल्लोळ कसे दिसत व घरे, देवळे व झाडी ही कशी सारखीच काळवंडून गेलेली दिसे याचे यथातथ्य वर्णन केले आहे. या वातावरणात अष्टौप्रहर राहणाऱ्या हतभागी मजुरांची काय स्थिती असेल या कल्पनेने त्यांच्या मनामध्ये अनुकंपेची भावना निर्माण होते. प्रगतीची ही काळी खरखरीत बाजू पाहून त्यांचे मन चिंतनमग्न होते. या यंत्रयुगातील तथाकथित सुधारणा ही माणसाची माणुसकी नष्ट करणारी आहे, ही त्यांना जाणीव झाली. यंत्रयुगाबद्दलचा निषेध त्यातून प्रकट होतो.

शिंदे यांना निसर्गातील स्वाभाविक जीवन हेच सुंदर वाटते. म. गांधींच्या प्रमाणेच, शिवाय त्यांच्या काही वर्षे आधी, यंत्रयुगाला महर्षी शिंदे यांचा स्वाभाविक विरोध होता हे जाणवते. पुढे १९०६ साली ते बंगालच्या सफरीत कुचबिहार संस्थानात गेले असताना गावाकडे नजर टाकली असताना केळी पोफळीच्या विस्तीर्ण व सुंदर बनातील झोपड्या बघितल्यानंतर त्यांना वाटते. "आधुनिक सुधारणेच्या प्लेगाला कंटाळून जणू एक संग्रिगेशन कँपच बांधला आहे."

निसर्गरम्य एकांतामध्ये त्यांना उच्च कोटीचा आध्यात्मिक अनुभव येऊ शकतो. सरोवर प्रांती प्रो. कार्पेंटर यांच्याकडे मुक्कामास असता एका रात्री ते बौरोडेल दरीमध्ये शतपावलीस गेले होते. त्यावेळी त्यांना अशा प्रकारची आध्यात्मिक प्रतीती येते, या अवस्थेचे त्यांनी वर्णन केले आहे.

"आनंद होत होता काय आम्हाला ?
सांगवत नाही. काही वेळापूर्वी मात्र झाला होता खरा.
आम्ही काही पाहत होतो काय ?
नव्हतो ! दिसत होते पण काही तरी !
मागितले का नाही ?
छे हो ! काय मागावयाचे ?
जिवाला कसे होत होते ?
मधूनमधून सुस्कारे बाहेर पडत होते !
ते का म्हणून ?
कोणी सांगावे ! काही तरी आतून बाहेर निघत होते.
व काही बाहेरून आत शिरत होते."

चैतन्यरूप परमेश्वरतत्त्वाचा जणू त्यांना साक्षात्कार झाला होता. या प्रकारची आध्यात्मिक प्रतीती बेनलोमंड शिखरावरून अतिभव्य विशाल निसर्गदृश्य बघितल्यानंतरही आल्याचे त्यांनी वर्णन केले आहे.

आध्यात्मिक पातळीवरून पाहणे आणि अनुभव घेणे हा जसा शिंदे यांच्या प्रवासवर्णनपर साहित्याचा एक मुख्य विशेष आहे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणच्या लोकजीवनाचे, तेथील संस्कृतीचे निरीक्षण करणे व त्याचा अर्थ लावणे हाही एक दृष्टिकोन शिंदे यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात आढळतो. लंडन शहराचे त्यांनी केलेले वर्णन देखील लोकजीवनाच्या आणि संस्कृतीच्या मर्मावर नेमके बोट ठेवणारे आहे. लंडन शहराचे वस्तुनिष्ठ स्वरूपाचे वर्णन तर ते करतातच, पण त्यामागे असलेली लोकजीवनातील सांस्कृतिक, नैतिक वैशिष्ट्यही ते हेरतात. छप्पन्न लाख वस्तीचे लंडन शहर बघितल्यावर 'मानवी महासागरात आपण जणू गटांगळ्या खातो आहोत की, काय' असे त्यांना वाटू लागते. कुठल्याही रहदारीच्या रस्त्यावर गेल्याबरोबर स्त्री-पुरुषांच्या लाटांवर लाटा थडकत असल्याचे पाहून 'जगावर मनुष्यप्राणी सवंग झाला आहे असे वाटते ', अशी प्रतिक्रिया ते नोंदवतात.

जमिनीवर धावणाऱ्या विविध वाहनांचे वगैरे वर्णन केल्यावर लंडन शहराच्या जमिनीखालचे ते वर्णन करतात, "लंडनच्या जमिनीत खाली कोठे काय आहे हे सांगवत नाही. विजेच्या दिव्यांच्या तारा, धुराच्या दिव्यांच्या तोट्या, पाण्याचे बंब, मैल्याची गटारे आणि आगगाडीचे बोगदे यांनी सगळी जमीन मधमाश्याच्या पोळ्याप्रमाणे पोखरली आहे. खाली जमिनीत ही नभी तर वरती हवेतून टेलिग्राफ व टेलिफोनचे जाळे पसरले आहे. याप्रमाणे लंडन नावाचे दोनशे-तीनशे चौरस मैल क्षेत्रफळाचे एक सावयवी शरीर आहे."

इंग्लंड हे बोलून चालून व्यापाऱ्यांचे राष्ट्र आहे असे विधान करून येथील व्यापाऱ्यांची तऱ्हा ते वर्णन करतात "माल तर मोहक खराच, पण तो दुकानात मांडून ठेवण्याची ढब त्याहून मोहक. आमच्याकडील दुकानदार आपल्या मालाचे ढीगच्या ढीग दुकानात लपवून ठेवून आपण दाराशी येऊन बसतात. एखाद्यास वाटावे हे जणू रखवालीच करताहेत." मात्र इंग्रजाचा व्यापार केवळ बाह्य भपक्याने वाढलेला नाही. त्यांना गिऱ्हाईकाची कदर असते हे सांगून व्यापारांतील त्याच्या यशाबद्दल ते विधान करतात, "एकंदरीत व्यापार, बुद्धी आणि नीती या तीनही मुख्य तत्त्वांची समान सांगड घालून दीर्घोद्योग व अचाट साहस व निश्चल श्रद्धा यांच्या पायावर या लोकांनी आपल्या व्यापार शास्त्राची इमारत उभारली आहे. म्हणून लंडन शहरास हल्लीचे वैभव आले आहे."

इंग्लंडमधून पाठवलेली प्रवासवर्णने तेथील विविध प्रकारच्या संस्था, लोकोपयोगी कार्ये, वस्तुसंग्रहालये वगैरेबद्दलची माहिती देणारी व बोधप्रद स्वरूपाची आहेत. भारतामधील केलेल्या प्रवासाची वर्णने वेधक व उद्‌बोधक उतरली आहेत. वेगवेगळ्या संस्कृती, धर्म, मानववंशशास्त्र, इतिहास व भाषा यांच्या अध्ययनामुळे त्यांचे हे प्रवासवर्णनपर लेखन अनेक संदर्भांनी अर्थघन

बनले आहे. बंगळूरच्या रस्त्यावर एक फेरी मारली असता तेथे द्राविड, आर्य, मुसलमानी आणि इंग्रजी अशा विविध परंपरांची आणि संस्कृतीची कशी बेमालूम भेसळ होऊन गेल्याचे दिसते याचे चटकदार वर्णन ते करतात. शहरात हिंडत असताना द्राविडी देवळांची पसरट व बोथट शिखरे, ख्रिस्ती चर्चची गॉथिक निमुळती स्पायर्स, मुसलमानी मशिदीचे पांढरेशुभ्र मनोरे या साऱ्यांचे एकच विसंगत चित्र नजरेला दिसते. माणसांतही आर्य-अनार्य वंशाचे चित्रण आणि मुसलमानी-ख्रिस्ती संस्कृतीचा वरकरणी प्रभाव कसा दिसतो, याचेही ते आकर्षक चित्र रेखाटतात. मंगळूर शहराबद्दल लिहिताना युरोपातील अथेन्स, एडिंबरो या सात टेकड्यांवर वसलेल्या शहरापेक्षाही अधिक टेकड्यांवर मंगळूर शहर वसले आहे, हे सांगतात. गोरखनाथांची कोणी मंगळा नावाची दासी होती तिच्यावरून गावाचे नाव पडले, ही दंतकथा ते नमूद करतात. गावाची नावे कशी पडतात याचा व्युत्पत्ती, इतिहास व दंतकथा यांच्याद्वारा शोध घेणे ही शिंदे यांची आवड सर्वच प्रवासवर्णनात दिसून येते. मुडविद्री, कारकळ वगैरे मंगळूर जिल्ह्यातील गावी असलेल्या देवळांचे, वास्तूचे व शिल्पांचे माहितीपूर्ण, उद्‌बोधक असे वर्णन त्यांनी केले आहे. हा मुलूख पावसाळी व रेताडी असल्याने दगडाची उणीव व लाकडाची चंगळ म्हणून या सर्व भागातील देवळाचा अधिक भाग लाकडी आणि फार तर भिंती व खांब तेवढे लॅटराईट म्हणजे ठिसूळ दगडाचेच असावयाचे. छप्पर मात्र सगळीकडे लाकडी दिसून येते. त्याचा घाट इतर प्रांतात कोठेही न आढळणारा व फक्त केरळ देशातच आढळणारा असा आहे. शिवाय नेपाळ, तिबेट व ब्रह्मदेशातील छपरांच्या घाटाशी अगदी तंतोतंत जुळणारा आहे. ही बाब नमूद करून शिल्पशास्त्रज्ञ फर्ग्युसन यांचा तर्क ते सांगतात. नेपाळात पाऊस व लाकूड फार व दगड कमी, ही भौतिक परिस्थिती इकडेही असल्याने एखाद्याच कोपऱ्यात हा प्राचीन अवशेष दिसतो. ही शिल्पकला ईशान्येकडून आलेल्या बौद्ध व जैन मिशनऱ्यांनीच प्राचीन काळी इकडे आणली असावी असे फर्ग्युसनचे मत असल्याचे ते सांगतात. वास्तुशास्त्रामध्ये शिंदे यांना रूची होती हे त्याच्या सगळ्या प्रवासवर्णनातून दिसून येते.

प्रवासवर्णनपर लेखनातूनही शिंदे यांचे उच्च प्रतीचे चिंतन आपल्याला आढळते. कारकळ येथील त्रेचाळीस फूट उंचीचा एकाच दगडातून कोरलेला घुमटाराज नावाचा दिगंबर पुतळा पाहून शिंदे फारच प्रभावित होतात. ते लिहितात, "अगदी नग्न सावयव शरीर, धीरोदात्त व प्रसन्न मुद्रा, साधेपण भरीव सौंदर्य आणि भोवतालचे शांत वातावरणही सर्व पाहून जैन धर्माविषयीच नव्हे, तर शिल्पकाराविषयी देखील अनुकूल अशी पूज्य भावना उत्पन्न होते." शिंदे यांनी इंग्लंड, फान्स, जर्मनी व इटली वगैरे देशांत ऐतिहासिक विभूतीच्या व संतांच्या उठावदार मूर्ती बघितल्या होत्या. पण त्या कोणीही आपल्याला घेरले नाही इतके या घुमटाराजाने का घेरले, याचा ते स्वत:शी विचार करतात. कलकत्त्यातील जनरल औट रॅमचा अश्वारूढ पुतळा त्यांना आठवतो, "सत्तावन्न सालच्या बंडात बंडखोराच्या नरडीचा घोट घेण्यासाठी, चवताळून झेप घेणाऱ्या वाघाप्रमाणे आपल्या घोड्यावरून मागे वळून तलवारीचा वार करीत आहे असा आव या पंचरशी पुतळ्याने दाखविला आहे. तो पाहून क्षणभर अंगावर शहारे उभारतात, पण ते क्षणभरच. लगेच या पाशवी व्यक्तीचे असले उर्मट प्रदर्शन पाहून तिरस्काराच्या लाटा उसळू लागतात. त्या दाबणे जवळ

जवळ अशक्य होऊन जाते. पण घुमटाराज ! तुझ्या कपाळावरील गांभीर्याच्या व हनुवटीवरील माधुर्याच्या रेखा माझ्या काळजात अद्यापि खोल खोलच रूतत आहेत याचे रहस्य काय असेल बरे ?" या प्रकारच्या चिंतनातून ते कलानिर्मितीच्या अंतरंगापर्यंत पोहोचतात. "काव्याचे व कलेचे हृदय म्हणजे पावित्र्य ऊर्फ धर्म हेच होय. हे हृदयच आपल्या अंगाबाहेर टाकून कवीने अथवा शिल्पकाराने कितीही ओढाताण करून अजबसृष्टी निर्माण केली तर ती नुसती आश्चर्यकारक होईल, पण जर जीवाला उद्धारक होणार नाही. आमचे प्राचीन शिल्पकार पुष्कळदा धर्माने झपाटलेले असत म्हणून त्यांच्या हातून अशा सृष्टी निर्माण झाल्या. पाश्चात्त्य शिल्पकार पुष्कळदा भक्तीपेक्षा चातुर्यावर भिस्त ठेवून कामाला लागतात. म्हणून त्याच्या कृतीला तादृश किंमत येत नाही." धर्म हेच कलेचे हृदय होय हे त्यांच्या चिंतनाचे फलित प्रकट होते. महर्षी शिंदे यांच्या प्रवासवर्णनातून दिसून येणारी सूक्ष्म निरीक्षणशक्ती, वास्तवाचे हुबेहुब वर्णन करण्याची क्षमता, अनेकविध शास्त्रांचे नेमकेपणाने दिले जाणारे संदर्भ, त्यांची अनुभव घेण्याची तरल संवेदनशीलता, अनुभव प्रकट करताना दिसून येणारी नर्म विनोदबुद्धी आणि या सर्वांत वरची बाब म्हणजे त्यांची आध्यात्मिकता, या अनेकविध वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या प्रवासवर्णपर लेखनांमध्ये वरच्या दर्जाची वाङ्मयीन गुणवत्ता प्रकर्षाने आविर्भूत होते.

• •

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आत्मपर स्वरूपाच्या लेखनाचे काही विशेष साकल्याने आपण ध्यानात घेऊ. त्यांच्या या आत्मपर स्वरूपाच्या लेखनांमध्ये अत्यंत स्वाभाविकपणे लालित्य, म्हणजेच वाङ्मयीन सौंदर्य निर्माण होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या लेखनातून त्यांच्या प्रगल्भ, उन्नत्त अशा व्यक्तिमत्त्वाचा सच्चपणाने होणारा स्वाभाविक आविष्कार. त्यांच्या मनाची आध्यात्मिक ठेवण जीवनदृष्टीचा व्यापकपणा, त्यांची सत्यनिष्ठा, तरल संवेदनशीलता, काव्यात्मवृत्ती आणि मधुर अशा प्रकारची विनोदवृत्ती हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत, याचा आधीही उल्लेख विवेचनाच्या अनुरोधाने आलेला आहेच. त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार हा त्यांच्या आत्मपर लेखनात वाङ्मयीन सौंदर्य निर्माण करणारा कायमस्वरूपाचा घटक आहे, असे आपल्याला जाणवते.

महर्षी शिंदे यांच्या लेखनामध्ये सौंदर्य अथवा लालित्य निर्माण करणारा महत्त्वाचा दुसरा घटक म्हणजे त्यांचा भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण उपयोग. ते आपली भाषा केवळ संदेशवहनासाठी अथवा निवेदनासाठी वापरीत नाहीत, तर त्याच्या जोडीने ते अधिकचा अर्थ प्रकट करतात. शिंदे यांची भाषा ही या प्रकारचा अधिकचा प्रकट करणारी साहित्यिक भाषा आहे. त्यांची मराठी शैलीची जाण अतिशय प्रगल्भ स्वरूपाची आहे. मॅट्रिकपर्यंतच्या शालेय शिक्षणाच्या काळातच ज्ञानेश्वर, तुकाराम, महिपती, श्रीधर या संतांचे साहित्य मनापासून वाचले होते. भाषेची दृष्टी सदैव अर्थाच्या गाभ्यावर असावी व हा अर्थ प्रकट करीत असताना डोळ्यात न भरणारे अलंकरण असावे अशी त्यांच्या ठिकाणी भाषाविषयक जाण निर्माण झाली होती. शिंदे आपल्या लेखनांतून एखाद्या प्रसंगाचे मनोवृत्तीचे, व्यक्तीचे अथवा स्थळाचे वर्णन करीत असोत, किंवा गहन स्वरूपाचे धर्मचिंतन करीत असोत, भाषेच्या समुचित आणि सर्जक वापरामुळे तो वर्ण्यविषय आपल्या प्रत्ययाला आणून देतात. त्यांच्या शब्दवापराचा विचार केला तरी असे दिसते की, ते अनेकदा

फारसी वा संस्कृत व क्वचित इंग्रजी शब्दांचा सहेतुकपणे उपयोग करतात. परभाषेतील शब्दांचा उपयोग करताना देखील तो अगदी अपरिहार्य आहे असे वाचकाला देखील जाणवते. "चांगल्या गुणाला मात्र ईश्वर कारण आणि वाईटाला मनुष्य कारण, असे म्हणणे म्हणजे ईश्वरावर ही मोठी मेहरबानीच करू पाहणे होय," या वाक्यातील 'मेहेरबानी' या शब्दांने जो आणि जेवढा अर्थ प्रकट होतो तो संस्कृत 'कृपा' शब्दांने प्रकट होऊ शकत नाही. मॅक्समुल्लरच्या धर्मविषयक तत्त्वज्ञानाने ते प्रभावित झाले व त्यांच्या मनावरील नास्तिक्याचे सावट दूर झाले. या संदर्भात वर्णन करताना, 'ते मला नवीनच एक आप्तपुरुष भासू लागले`', असे वर्णन करतात. 'आप्तपुरुष हा हिंदू धर्मपरंपरेत विशिष्ट अर्थ असलेला शब्द येथे अत्यंत समर्पक वाटतो.' 'छबिना', 'ललित' यासारखे जुन्या मराठीतील शब्द योग्य त्या संदर्भात उपयोगात आणून असे शब्द अर्थदृष्ट्या ते पुनरूज्जीवित करतात. नामाप्रमाणेच ते विशेषणांचा मार्मिकपणे उपयोग करतात. 'पुण्यासारख्या वाचाळ' व 'मुंबईसारख्या चवचाळ' शहरांचा संपर्क, आवाज अलगुजासारखा 'कोमल' व 'हृदयप्रवेशी' यासारखी विशेषणे वापरल्याची असंख्य उदाहरणे आहेत.

महर्षी शिंदे केवळ वाङ्मयीन विलास म्हणून अलंकार वापरत नाही तर, यथायोग्य वर्णन करण्यासाठी त्याचप्रमाणे एखाद्या बाबीबद्दलचा आपला अनुकूल वा प्रतिकूल स्वरूपाचा भावनिक दृष्टिकोन प्रकट करण्यासाठी आवश्यक तेथे ते अलंकाराचा उपयोग करतात. त्यांच्या अलंकार उपयोजनांचा एक विशेष असा आहे, की साध्या सरळपणाने उपमान-उपमेयांचा उपयोग करून उपमा-उत्प्रेक्षा यासारखी अलंकार निर्मिती न करता ते अर्धस्फुट रूपकाचा उपयोग करून व्यंगार्थ सुचवितात. 'घरकोंबडे कादंबरीकार' या शब्दयोजनेतील 'घरकोंबडा' हे विशेषण अतिवापरामुळे त्यातील रूपक लक्षात न येता साधे विशेषण बनून गेले आहे. परंतु, शिंदे यांनी कादंबरीकाराचे विशेषण म्हणून 'घरकोंबडा' हे विशेषण वापरल्यामुळे त्यातील व्यंगार्थ पुनरूज्जीवित होतो व जगाचा अनुभव न घेता निव्वळ घरी बसल्या बसल्या केवळ कल्पनेने कादंबऱ्या लिहिणारा असा अर्थ प्रतिकूल भावनिक दृष्टिकोनाबरोबर आपल्या प्रत्ययाला येतो. धर्म या विषयाला वाहिलेले एकही वर्तमानपत्र नाही. हे सांगताना "हल्ली देशात वर्तमानपत्राचा दररोज इतका केर पडतो, पण त्यात धर्माच्या नावाने एक निर्माल्यही आढळत नाही !" असे त्यांनी लिहिले आहे. एखादे वर्तमानपत्र जर धर्मविषयासाठी काढले असते तर ते धर्माला वाहिलेले फूल ठरले असते अशा प्रकारचा गौरवार्थ ते सूचित करतात. सक्तीच्या शिक्षणासाठी पैसा पाहिजे असेल तर दारूचे परवाने देऊन तो मिळविला पाहिजे हे जे १९२० च्या सुमाराला धोरण म्हणून सांगितले त्याचे वर्णन करताना 'शिक्षणाचे मंगळसूत्र दारूच्या बाटलीच्या गळ्यात बांधण्याचा प्रकार' असे त्याचे वर्णन केले आहे. एका मंगल गोष्टीची जोड दुसऱ्या अभद्र गोष्टीशी घालणे असा अर्थ ते प्रतिकूल भावनेसह सूचित करतात. वैचारिक स्वरूपाच्या लेखनातही भावनिकतेचा आशय असलेली कितीतरी विधाने आपल्याला त्यांच्या लेखनात पाहावयास मिळतात.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेखन हे उन्नत धर्मावर नितांत श्रद्धा असलेल्या धर्मनिष्ठाचे लेखन आहे. त्यांचे स्वत:चे जगणे, प्रत्यक्ष कार्य आणि त्यांच्या साहित्यातून प्रकट होणारी वैचारिकता

आणि संवेदनशीलता यांच्यामध्ये एकवाक्यता आहे. सच्चेपणाने जगण्यातून त्यांचे हे लेखन निर्माण झालेले असल्याने स्वाभाविकपणेच त्याला गुणवत्ताही प्राप्त झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रातील अभिनिवेशरहित जाणकार समीक्षक-वाचकांचा जो वर्ग आहे त्याला शिंदे यांचे वाङ्मय फार मोलाचे वाटते. त्यांना शिंदे हे प्रबोधन युगातील आदर्श, विचारवंत लेखक वाटतात. महर्षी शिंदे यांनी संशोधनपर वाङ्मयात, त्याचप्रमाणे वैचारिक स्वरूपाच्या वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. त्यांचे आत्मपर स्वरूपाचे हे ललित साहित्य हेही त्यांच्या जीवनसंबद्ध दृष्टिकोनामुळे, उन्नत प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करणारे असल्यामुळे व आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संवेदनशीलतेने मराठी साहित्याच्या संपन्नतेत भर घालणारे आहे, असे चोखंदळ अभिरुची असणाऱ्या अभिज्ञ वाचकवर्गाचे मत पडते.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर काळात व विशेषत: १९६० नंतर फरक पडलेला दिसत आहे, त्याचप्रमाणे साहित्यविषयक अभिरूचीविषयी योग्यप्रकारचे स्थित्यंतर घडताना दिसत आहे. महाराष्ट्राच्या प्रबोधनयुगात महर्षी शिंदे यांनी सुधारक म्हणून केलेल्या कामगिरीचे महत्त्व उत्तरोत्तर अधिक प्रमाणात जाणवू लागले आहे. जीवनाच्या समग्रतेचा विचार मांडणारे शिंदे यांचा मार्ग हाच खराखुरा सुधारणेचा मार्ग आहे, असे अनेक विचारवंत आज प्रतिपादन करीत आहेत. महर्षी शिंदे यांची सुधारक व विचारवंत म्हणून जशी थोरवी आज पटू लागली आहे, त्याचप्रमाणे एक श्रेष्ठ दर्जाचे आत्मपर ललितसाहित्याचे सर्जनशील लेखक म्हणूनही त्यांची मान्यता उत्तरोत्तर वाढू लागली आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री. मधु मंगेश कर्णिक यांनी तसेच पूर्वाध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी महर्षी शिंदे यांच्या समग्र वाङ्मयाचे संपादन करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली, याबद्दल साहित्य संस्कृती मंडळाच्या या दोन्ही अध्यक्षांचा, तसेच मंडळाचा मी अत्यंत ऋणी आहे.

गो. मा. पवार

रणधीर शिंदे

संपादक

प्रस्तावना....

महर्षी अण्णासाहेब शिंदे यांना मी प्रथम पाहिले ते इ. स. १९३३ मध्ये उमरावतीला आले असताना तेथील ब्रह्मविद्या-मंदिरात त्यांचे एक व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाला मी हजर होतो. त्या वेळी त्यांच्या व्यक्तित्वाचा जो परिणाम माझ्यावर झाला तो विसरणे मला शक्य नाही. त्यांच्या नावाचा व कार्याचा परिचय पूर्वी झालेलाच होता. तशात, मला वाटते, त्यांचे 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक त्या वेळी नुकतेच प्रसिद्ध झालेले होते. ते वाचून त्यांच्या तीव्र तळमळीचा, व्यापक अवलोकनाचा व सूक्ष्म संशोधनाचा ठसा अंत:करणावर आधीच उमटलेला होता. त्यामुळे त्यांना पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची उत्कट इच्छा होती. ब्रह्मविद्या-मंदिरात व्याख्यानासाठी उभी असलेली त्यांची ती मूर्ती पाहून जणु एखादा प्राचीन महर्षी आपल्याला आशीर्वाद देण्यासाठी आपल्यासमोर उभा आहे असे वाटले. एकंदर देहयष्टी धिप्पाड, वर्ण काळा, चेहऱ्यावरील भाव शांत, जणु शून्य संशोधन करीत असलेले डोळे, या सर्वांना भव्यता प्राप्त करून देणारे मानेवर रुळणारे पांढरे शुभ्र केस व दाढी यामुळे अंत:करणाला समाधान वाटले. त्यांच्या भाषणाच्या शांत लयीमुळे आणि विशेषत: त्यातील उन्नत विचारांमुळे ते अधिक वाढले. त्यांचे भाषण शेवटपर्यंत मी अत्यंत शांतपणे ऐकले, व्याख्यानानंतर, त्यांची ओळख करून घ्यावी म्हणून विनीत भावाने मी त्यांच्या जवळपास जाऊन उभाही राहिलो. तथापि, त्यांच्याबरोबर इतर काही सज्जन बोलत राहिल्यामुळे मला त्यांची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची संधी त्या दिवशी मिळाली नाही.... आणि माझ्या दुर्दैवाने, पुढे ही कधी तो योग जुळून आला नाही याची मला आता राहून राहून खंत वाटते.

*

महर्षी शिंदे यांचे नाव निघाले की आणखी एका प्रसंगाचे स्मरण होऊन मला वारंवार खंत वाटते - तोही प्रसंग उमरावती येथे आणि ब्रह्मविद्या-मंदिरातच घडून आला. तारीख २ जानेवारी, १९४४ रोजी अण्णासाहेबांनी आपली इहलोकची यात्रा संपवली, ही बातमी प्रसिद्ध होताच मनाला फार दु:ख झाले, त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एखादी शोकसभा भरवली जाणे आवश्यक होते. उमरावती येथील प्रतिष्ठित पुढाऱ्यांकडून या बाबतीत काही हालचाल होईल अशी अपेक्षा मी करीत होतो. पण दोन तीन दिवस उलटून गेले तरी तसा योग जुळून येण्याची काही लक्षणे दिसेनात, जणु शिंदे यांना उमरावतीतील पुढारी पूर्णपणे विसरून गेले होते. एके दिवशी श्री. गवई यांची गाठ पडली. भेट होता क्षणीच त्यांनीही माझ्या मनातील विचार बोलून दाखविले. त्यानंतर त्यांनीच पुढाकार घेऊन ब्रह्मविद्या-मंदिरात (या वेळी त्याला जोशी सभागृह हे नाव देण्यात आले होते.) एक शोकसभा घेतली. पण त्या सभेला पुरते वीस-पंचवीसही लोक नव्हते. अर्थात् शोकसभेचा कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडला हे खरे. तथापि, ते एकंदर दृश्य पाहून मनाला वाईट वाटल्याखेरीज राहिले नाही.

*

या उपेक्षेची मीमांसा अनेक दृष्टीने करता येईल, याची मला जाणीव आहे. तसे पाहिले तर खुद्द अण्णासाहेबांनीच म्हटल्याप्रमाणे त्यांची धडाधडीची सार्वजनिक कामगिरी सुमारे १९३३ च्या

अखेरीस संपली. त्यानंतरची ११ वर्षे जवळजवळ शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्याप्रमाणे त्यांची स्थिती होती. या कालावधीत सामान्य लोक त्यांचे नाव आणि कामगिरीही विसरले असल्यास ते कित्येकांना स्वाभाविक वाटेल. एखादा कार्यकर्ता आपल्या सार्वजनिक कर्तृत्वाने जोपर्यंत जनतेसमोर एकसारखा चमकत असतो तोपर्यंत लोकही त्याची वाहवा करीत असतात; आणि कर्तव्याच्या क्षेत्रातून थोडा काळ का असेना तो दूर होताच त्याला ते विसरतातही लवकर. काळाच्या हातातील विस्मृतीच्या कुंचल्याने मोठमोठ्यांच्या जीवनचित्रावर हात फिरवले जात असल्याचे आपण एरवी पाहात नाही काय ? तशात आण्णासाहेबांनी उभी हयात ज्या कार्यात घालविली ते अस्पृश्योद्धाराचे कार्य स्पृश्य आणि त्यातूनही वरिष्ठ वर्णांना मनापासून रुचण्यासारखे होते असे नाही. त्या अस्पृश्यांसाठी त्यांनी जीवाचे रान केले, खुद्द त्यांच्यातच राजकारणाचे नवीन वारे शिरले आणि म्हणून तेही जिथे आण्णासाहेबांची उपेक्षा करू लागले होते तेथे इतरांच्याकडून अधिक सहानुभूतीची अपेक्षा कशी करता येईल तशात त्यांच्या मुख्य कार्यक्षेत्रापासून उमरावती किती दूर! आण्णांच्या भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची शाखा उमरावतीस होती हे खरे, पण अस्पृश्यवर्गातील नवीन राजकारणाच्या झंझावातामुळे ती जवळजवळ मोडून पडल्यासारखीच होती. अशा स्थितीत उमरावती येथे भरविलेल्या शोकसभेचे करुणास्पद दृश्य पाहून खरे म्हटले तर कुणीही एवढे काही मनाला लावून घेता कामा नये!

ही स्थिती फक्त उमरावती-नागपूरकडचीच आहे असे नाही, मुंबई-पुण्याकडचीही हीच स्थिती आहे. पुण्या-मुंबईला कदाचित् त्या वेळी मोठमोठ्या शोकसभा झाल्या असतील आणि त्यादिवशी अनेकांनी आण्णासाहेबांवर स्तुतीसुमने उधळली असतील - पण त्यानंतर ? सर्वत्र सामसूम! ज्या मराठा समाजात ते जन्मले तो त्यांच्याविषयी उदासीन आहे, ज्या दलित समाजासाठी त्यांनर आपले आयुष्य वेचले त्याला त्यांचे आज महत्त्व कळत नाही, आणि राजकारणात ब्राह्मणेतर पक्षाशी सूत न ठेवता ज्या राष्ट्रीय पक्षाला ते मिळाले त्यांच्या महाराष्ट्रीय वारसदारांनी सोयीस्कर रीतिने त्यांची उपेक्षा चालविली आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रात अण्णासाहेबांची कामगिरी अगदीच उपेक्षणीय आहे असे नाही ; पण खास पुण्यात भरणाऱ्या साहित्य-संमेलनाच्या व्यासपीठावरून जेथे अति सामान्य व्यक्तींच्या चोपड्यांचा आवर्जून गौरव केला जातो. तेथे अण्णासाहेबांचा किंवा त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा नुसता उल्लेखही होत नाही असा प्रत्यक्ष अनुभव आहे. इतक्या थोड्या कालावधीत अण्णासाहेबांना महाराष्ट्राच्या उपेक्षित मानकऱ्यांत जाऊन बसण्याचे भाग्य लाभलेले पाहून आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. तथापि उपेक्षेचे हे वातावरण अगदी सर्वत्र पसरलेले आहे असे नाही. व्यापक सहानुभूतीच्या काही दूरदर्शी पुरुषांनी ही उणीव भरून काढलेली आहे यात शंका नाही. महाराष्ट्र-राष्ट्रभाषा-सभेच्या दिनदर्शिकेत २ जानेवारीचा दिवस 'महर्षी शिंदे स्मृतीदिन ' म्हणून निर्देशिलेला आहे. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी त्यांना १९४८ मध्ये आपली आदरांजली वाहिली आहे. महाराष्ट्राने श्री. शिंदे यांच्या केलेल्या उपेक्षेसंबंधीचे त्यांचे विवेचन येथे उद्धृत करण्यास हरकत नाही. ते म्हणतात--

"विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे हे महाराष्ट्राचे एक उपेक्षित मानकरीच म्हटले पाहिजेत. पुण्याचे एक व्यासंगी प्राध्यापक गं. बा. सरदार यांनी 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी'

म्हणून एक पुस्तक लिहिले आहे, त्यात त्यांनी चिपळूणकरांपूर्वी होऊन गेलेल्या भाऊ महाजन, विष्णुबुवा ब्रह्मचारी इत्यादि थोर कार्यकर्त्यांची माहिती देऊन महाराष्ट्र या कार्यकर्त्यांना बहुतांशी कसा विसरला आहे, हे दाखवून दिले आहे. ही विसरण्याची क्रिया चिपळूणकरांपूर्वीच्या लोकांनीच फक्त आचरून दाखविली आणि त्यानंतर मात्र आपण जागृत आणि स्मरणशील बनलो, अशातली गोष्ट नाही. आपला महाराष्ट्रीयांचा तोच स्वभाव कायम आहे. आपण गुणांचे पूजक नाही; व्यक्तीचे पूजक आहो, एकाद्या व्यक्तीच्या मागे आम्ही लागलो म्हणजे तिला आभाळापर्यंत उंच चढवतो, तिच्या पायावर लोटांगणे घेतो, तिला जयजयकाराने गुदमरवून सोडतो, तिच्या मूर्ती स्थापून तिची विटंबना करतो, आणि ज्यांचे गुण आपणाला खरोखरी अनुसरण्यासारखे असतात. अशा इतर अनेक थोर कार्यकर्त्यांना आपण विसरतो; इतके की त्यांचे नामोनिशाण देखील शिल्लक ठेवीत नाही. आमच्या राष्ट्रीय मूर्खपणाची ही एक खूण आहे...."

अशा स्थितीत प्रा. बनहट्टी यांनी अण्णासाहेबांचे पुण्यस्मरण करण्यात मनाचे मोठेपण दाखविले हे केव्हाही त्यांना भूषणावह होय. गेल्या जानेवारीत 'महाराष्ट्रचा एक कर्मवीर' म्हणून अग्रलेख लिहून ' मराठ्या ' चे संपादक आचार्य अत्रे यांनीही त्यांचे पुण्य-स्मरण महाराष्ट्राला करून दिले. अशी चिन्हे तुरळक असली तरी अनास्थेचे व उपेक्षेचे जौळ दूर सारण्याला त्यांची मदत होते हे खरे आहे. असा एक मोठा हृद्य प्रसंग माझ्या अनुभवला आला होता तो येथे सांगणे अप्रासंगिक होणार नाही. दोन तीन वर्षापूर्वी एक तरुण गृहस्थ माझ्या भेटीला आले कै. शिंदे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यासंबंधी त्यांनी माझ्याजवळ गोष्ट काढताचा मला सानंद आश्चर्य वाटले. मी आस्थापूर्वक चौकशी केल्यावर मला कळले की, हे तरुण गृहस्थ म्हणजे नागपूर येथील प्रसिद्ध अस्पृश्य पुढारी कै. किसन फागूजी बंदसोडे यांचे चिरंजीव होत. कै. बंदसोडे हे नागपूर येथील भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे एक अत्यंत निष्ठावंत कार्यकर्ते होते. १९४४ मध्ये नागपुरला मी बदलून आल्यावर त्यांच्याशी माझा परिचय झाला. त्यांच्या भाषणातून अण्णासाहेबांच्याविषयी जो नितांत आदर व्यक्त होत होता त्यामुळे माझे अंत:करण भरून आले होते!

कोणी म्हणतील की, "अण्णासाहेबांविषयीच्या उपेक्षेची इतक्या विस्ताराने चर्चा करण्याचे कारणही नाही. स्वत: अण्णासाहेब यशापयशाच्या कल्पनांच्या पलीकडे गेलेले कर्मवीर होते. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न' या वृत्तीने ते आचरण करीत. 'माझ्या कामात यश मिळाले नाही. यशाची मला आकांक्षाच नव्हती. यशाची मला नीट व्याख्याचच करता येत नाही, तर मी त्यांची इच्छा तरी कशी करू?' असे त्यांनीच म्हटलेले आहे. त्यांच्या स्थितप्रज्ञतेचा हा पुरावाच नाही काय?" हे म्हणणे किंचित् खरे असले तरी या उद्‌गारातून त्यांचे हळूवार मानवी अंत:करण व्यक्त होत आहे असे मला वाटते. आपल्याला आलेल्या अनुभवांचे सार सांगताना ते म्हणतात, "माझ्या कामात माझ्या साथीदारांचा, इतरांचा, फार काय ज्यांच्यासाठी मी घरदारही कमी समजून ती ती कामे करीत होतो त्यांचाही माझ्यासंबंधी गैरसमज, दुराग्रह, नव्हे उघड विरोधही झाला. हाच माझ्या अनुभवाचा कठीणपणा किंवा दारूणपणा होय. ह्यामुळे माझ्या मनाची शांती

ढासळली आणि अकाली बहुतेक स्वीकृत कामातून मी विराम पावलो." हे निराश झालेल्या अंत:करणाचे उद्‌गार आहेत यात शंकाच नाही. या उद्‌गारांची थोडी मीमांसा या ठिकाणी करणे अप्रासंगिक होणार नाही.

अण्णासाहेबांच्या जीवितातील सर्वातिशायित्वाने उठून दिसणारे महत्त्वाचे कार्य कोणते हा प्रश्न सामान्य जनतेला विचारला तर 'अस्पृश्यांची उन्नती' असेच उत्तर बहुतेक देतील. पण खुद्द आण्णांना हा प्रश्न घातला तर ते काय म्हणतील ? त्यांचेच उद्‌गार पहा; "..... मात्र धर्माचा प्रचार ह्या माझ्या अस्सल कामातून मी विराम पावणे शक्यच नाही; कारण मी धर्माचा स्वीकार केला हे खरे नसून, धर्मानेच माझा स्वीकार केला. अशी माझी समजूत असल्यामुळे ह्या शरीरातून विराम पावेपर्यंत तरी धर्मान मला पछाडले आहेच व पुढेही तो मला अंतरणार नाही ही मला अशा आहे " या उद्‌गारावरून अण्णासाहेब 'धर्माचा प्रचार' हे आपले 'अस्सल काम' मानीत होते असे दिसून येईल. त्या मानाने त्यांची इतर कार्ये दुय्यम ठरतात. या दृष्टीने पाहता त्यांनी अंगीकारलेले अस्पृश्योद्धाराचे कार्यही दुय्यम ठरते. पण लौकिक दृष्टीने तर तेच त्यांचे जीवितकार्य होय. तेव्हा याचा समन्वय कसा करावयाचा ? मला वाटते, याचे उत्तर असे देता येईल की, अण्णासाहेबांनी चालविलेले अस्पृश्योद्धाराचे कार्य त्यांच्या अंत:करणातील धार्मिक वृत्तीतून निर्माण झाले होते. धर्मभावना हा मूळ पाया आणि अस्पृश्योद्धाराचे कार्य ही त्यावर उभारलेली इमारत होय. माझे हे म्हणणे सत्याला अगदीच सोडून नाही. १९१२ मध्ये त्यांच्या मित्राने त्यांचे जे एक त्रोटक चारित्र लिहिले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, "हीन मानलेले लोक हे आपले बंधु आहेत, ही भावना अंत:करणात दृढ करून घेऊन ते जे काम करीत आहेत त्याचा पाया धर्म हाच आहे. त्यांच्या शाळातून धर्मशिक्षण देण्यात येते, भजन होते, उपासना होतात व सद्धर्माची गोडी लावण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न होत असतात [१]" "मिशनचे कार्य धर्माच्या पायावरच चालावयाचे होते [२]" असे खुद्द अण्णासाहेबांनीही स्पष्ट केले आहे. हा धार्मिक पाया ब्राह्मधर्माचा होता अशी काहींनी समजूत करून घेतलेली दिसते, पण ते बरोबर नाही. अण्णासाहेबांनी प्रार्थना-समाजात सामील होऊन ब्राह्मधर्माचा प्रचार चालविला होता हे खरे आहे. तथापि, अस्पृश्योद्धाराचे कार्य करताना या अस्पृश्यांना ब्राह्मधर्मात ओढण्याचा त्यांचा मुळी सुद्धा हेतू नव्हता. "मिशनचे कार्य धर्माच्या पायावरच चालवावयाचे होते" असे सांगून अण्णासाहेब लागलीच स्पष्ट करतात "मात्र, अस्पृश्यवर्गातून समाजाला सभासद मिळावे असा हेतू समाजाने कधीच बाळगला नाही आणि तशी तक्रारही कधी कोणी बाहेरच्यांनी केली नाही." असे असले तरी त्यांच्या कार्याविषयी असे गैरसमज होत होते असे दिसून येते. अण्णासाहेब शिंदे यांच्याप्रमाणे अस्पृश्योद्धाराचे कार्य करणारे कै. प्रा. माटे हे आपल्या 'चित्रपटात' लिहितात, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कामाची काय पद्धती आहे, याचे मी बारकाईने अवलोकन केले..... इतक्या दिवसानंतर सुद्धा लिहिताना मला कसेचेच वाटते; पण लिहावयास हवे म्हणून लिहितो की, शिंदे यांचे ब्रह्मसमाजी धोरण व त्यास अनुसरून त्यांनी घातलेली कामाची पद्धती मला आवडेना. जनसेवा करावयास किंवा विचाराला औदार्य प्राप्त

१. विठ्ठल रामजी शिंदे यांचे लेख, व्याख्याने आणि उपदेश.

२. माझ्या आठवणीत व अनुभव, पा. २६४.

करून घेण्याला आपल्या जुन्या धर्माच्या पोटात पुरेसा वाव आहे, असे मला वाटे व जर ही अस्पृश्य प्रजा हिंदू धर्मांची, तर आपण चळवळ सुद्धा पूर्वकालीन विचार-धनाच्या ऐपतीवरच चालवावी असे वाटे, मूर्तिपूजेला ब्रह्मसमाजात कोठेही स्थान नाही म्हणून अस्पृश्यांच्या प्रश्नातील देवालय-प्रवेश हा जो भाग त्या बाबतीत आपल्या तत्त्वाशी बेइमान न होता शिंदे यांना चळवळ करता येण्यासारखी नाही, असे मला वाटे" (पा. २१८) प्रा. माटे यांच्या या मतांचा समाचार घेण्याचे हे स्थळ नाही. पण शिंदे यांच्या कार्याविषयी सूक्ष्म गैरसमज कसे करून घेण्यात येत होते याचे उदाहरण म्हणून ही वाक्ये उद्धृत केली आहेत. मला वाटते अशा प्रकारच्या गैरसमजांमुळेच, आपले कार्य अशस्वी झाले असे अण्णासाहेबांना वाटत असावे.

वस्तुतः अण्णांचे कार्य अयशस्वी झाले असे मला वाटत नाही. यासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की, अशा सुधारणांच्या कार्याकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहावयास पाहिजे, सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा ही अशी गोष्ट आहे की, जी पूर्णतेला कधीच पोचणे शक्य नाही. जग नेहमी बदलत असते आणि या बदलत्या जगात नवीन नवीन विचारांचे वारे सदैव खेळत असते. ज्या सुधारणा आज आपण मोठ्या हिरिरीने करून पाहतो त्यांना कालांतराने फारसा अर्थ राहात नाही. कारण त्या बाबतीतली समाजाची विचारसरणीच बदलेली असते. उदाहरण म्हणून हेच पाहा ना की, ज्या देवालय-प्रवेशाच्या प्रश्नाच्या अभिनिवेशाने आपल्या कार्याचा नवीन मांड मांडणे माटे यांना आवश्यक वाटले त्या प्रश्नाकडे आजचे अस्पृश्य पुढारी ढुंकूनही पाहायला तयार नाहीत. पण म्हणून अस्पृश्यांना देवालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी ज्या सुधारकांनी पूर्वी जीवापाड श्रम केले त्यांच्या कार्याचे महत्त्व कमी होत नाही. त्यांच्या प्रयत्नामुळे समाजाचे किंचित् हृदयपरिवर्तन झालेले असले तरी त्यांना पुष्कळच यश आले असेच समजले पाहिजे. या दृष्टीने पाहता अण्णासाहेबांचे कार्य सफल झाले असेच म्हणावे लागेल. अस्पृश्योद्धाराचे कार्य हा अण्णांच्या कार्याचा मेरुमणी आहे. त्यांनी हे कार्य केवळ पुण्यामुंबईत किंवा महाराष्ट्रात नाही तर भारतभर पसरवले. या प्रश्नाकडे भारताच्या सर्व प्रांतातील विचारवंतांचे लक्ष वेधले आणि शक्य त्या रीतीने त्या त्या ठिकाणी प्रत्यक्ष कार्याला सुरूवातही केली अण्णासाहेबांचे हे यश मला वाटते वादातीत आहे. त्यांच्या मागून आलेल्या व्यक्तींनी हे कार्य कदाचित् अधिक चांगल्या रीतीने केले असेल; पण त्यांच्या कार्याची भूमिका अण्णांनी तयार करून ठेवली होती हे विसरता येत नाही. अण्णांच्या पूर्वी निरनिराळ्या प्रांतात या कार्याला सुरूवात झालेली होती. या प्रयत्नांचा इतिहास त्यांनी स्वतःच या पुस्तकाच्या १० व्या प्रकरणात सांगितला आहे. या कार्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून देण्याचे कार्य अण्णासाहेबांचे आहे. भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी (The Depressed Classe's Mission Society, India) ही मंडळी स्थापन करून तिच्याद्वारा महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ, मद्रास इत्यादि प्रांतात त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक महत्त्वाचे होय. पण माझ्या दृष्टीने अण्णासाहेबांच्या कार्याचे महत्त्व आणखी एका गोष्टीत आहे. ती गोष्ट म्हणजे त्यांनी अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाला प्राप्त करून दिलेले राष्ट्रीय स्वरूप ही होय. या कार्याला सुरूवात केल्यानंतर लवकरच त्यांच्या लक्षात आले की, राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेने हे कार्य हाती घेतल्यावाचून ते तडीस जाणे शक्य नाही. त्या दृष्टीने त्यांनी वारंवार प्रयत्नही केले. पण हा धार्मिक प्रश्न असल्यामुळे राष्ट्रसभेला

तो आपल्या कार्यक्रमात स्वीकारावासा वाटेना. शेवटी कलकत्ता येथे राष्ट्रसभेचे अधिवेशन भरले असताना अध्यक्ष ॲनी बेझंटच्या सहानुभूतीमुळे अण्णासाहेबांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांच्या आग्रहावरून अस्पृश्यता-निवारणाचा ठराव काँग्रेसच्या कार्यक्रमात घेण्यात आला व पासही झाला. नंतर नागपूर येथील अधिवेशनात तर महात्मा गांधीनी त्या विषयाची कड घेऊन तयाला राष्ट्रीय प्रश्न करून सोडण्याचे श्रेय घेतले. अर्थात् त्यांच्या या यशामागे अण्णासाहेबांच्या तपश्चर्येची पुण्याई होती हे विसरता कामा नसे. यानंतर लवकरच अण्णासाहेबांनी भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची धुरा अस्पृश्यातूनच निर्माण झालेल्या पुढाऱ्यांच्या खांद्यावर सोपवली. मला वाटते की, अस्पृश्यतेच्या प्रश्नाला राष्ट्रीय स्वरूप देण्याच्या कार्याप्रमाणे अण्णासाहेबांचे हेही कार्य फार महत्त्वाचे आहे. ज्यांच्या उन्नतीसाठी आपण प्रयत्न करायचे तेच लोक स्वतःची उन्नती करून घेण्यासाठी पुढे आलेले पाहण्यापेक्षा अधिक मोठे यश कोणते असणार ? पण असे असूनही आपल्या अंगीकृत कार्यातच आपणाला यश मिळाले नाही असे अण्णासाहेबांना वाटत होते याचे कारण अस्पृश्योद्धाराचा प्रश्न केवळ राष्ट्रीय करून सोडण्याने किंवा तो अस्पृश्यांच्या हाती सोपविल्याने कायमचा सुटला असे होत नाही. शिवाय ज्या धार्मिक पायावरून त्यांनी या प्रश्नाला हात घातला होता त्यासंबंधी मोठमोठ्यांनीही गैरसमज करून घेतल्यामुळे व संस्था-संचालनात नेहमी अनुभवाला येणाऱ्या मतभेद, पूर्वग्रह, विरोध इत्यादिकांमुळे अण्णाला यश आले नाही असे अण्णासाहेबांना वाटत असले पाहिजे हे स्पष्ट दिसते. या एकंदर कार्यात आपणाला आलेले अनुभव आपल्या मनःशांतीसाठी अण्णासाहेबांनी या ग्रंथात लिहिले आहेत. केशवसुतांनी म्हटले आहे की---

अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा
पिता बुडाशी गाळ दिसे
त्या अनुभव हे नाव असे !
फेकून द्या तो जगावरी
अमृत होऊ तो कुणा तरी !

या उक्तीप्रमाणे जणु पुढच्यांना अमृत प्राप्त करून देण्यासाठी अण्णासाहेबांनी आपल्या आयुष्यातील दुःखाच्या पेल्यातील बुडाशी असलेला हा अनुभवाचा गाळ एकत्रीत करून तो जनतेच्या हाती दिला आहे.

*

त्यांनी स्वतः मात्र अशी इतरांना अमृत प्राप्त करून देण्याची भूमिका घेतलेली नाही. प्रस्तुत आठवणी त्यांनी स्वतःच्या करमणुकीसाठी लिहिल्या आहेत, इतरांच्या करमणुकीसाठी नाहीत; आणि बोधासाठी तर नाहीतच नाहीत. अनेक एक थोर पुरुषांनी तुरुंगात असताना आत्मचरित्रे किंवा आठवणी लिहून काढलेल्या आढळतात. तसेच अण्णांच्याही बाबतीत घडले आहे. एकांतवासाला आणि चिंतनाला अनेक कार्यकर्त्यांना दुसरी जागा आढळत नाही. कारण, बाहेर असताना प्रत्यक्ष कार्यात ते गढून गेलेले असतात, आणि तुरुंगातील एकांतवासात आपल्या गतायुष्यातील सुखदुःखाच्या

आठवणीहून अधिक हृद्य ते काय असणार ? स्मृती नसती तर जगातली अर्धी अधिक दु:खे नाहीशी झाली असती असे गडकऱ्यांच्या एका पात्राने म्हटले आहे. हे एका दृष्टीने खरे असले तरी स्मृती आहे, म्हणूनच आयुष्याला गोडी आलेली आहे हेही खरे आहे. जुन्या आठवणी काढून मनुष्य स्वत:ची करमणूक करून घेऊ शकतो. तुरुंगातील दु:सह जीवन सुसह्य करण्यासाठी कार्यकर्त्यांचा हा एक विरंगुळा आहे. अण्णासाहेबांनीही याच हेतूने ह्या आठवणी लिहिल्या आहेत. आपल्या गत आयुष्यातील आठवणी तुरुंगात लिहून काढल्या म्हणजे त्याला आत्मचरित्राचे स्वरूप येते. पण आत्मचरित्रे व आठवणी यांची स्वरूपे काही बाबतीत भिन्न असतात. आत्मचरित्राचा संबंध सर्वस्वी लेखकाच्या जीवनाशी असतो, आठवणी अथवा स्मृतिचित्रे ही लेखकाची स्वत:ची त्याप्रमाणे इतरांचीही असू शकतात. आत्मचरित्राचा नायक लेखक स्वत:च असतो, आठवणीने लेखकाप्रमाणे इतरानांही तितकेच महत्त्वाचे स्थान असते, यामुळेच रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई केदार इत्यादिनी लिहिलेल्या आठवणीत त्यांच्या स्वत:पेक्षाही क्वचित् त्यांच्या पतींना अधिक महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. दुसरे असे की, आत्मचरित्रात ज्याप्रमाणे काल आणि कलादृष्ट्या सुसंगती राखावी लागते तशी ती आठवणीत राखावी लागत नाही, किंवा राखलीच पाहिजे असे नाही. आठवणींचे स्वरूप सुटे असू शकते. आत्मचरित्रकार हा आपल्या आयुष्यातील घटना सुसूत्र रीतीने सांगताना त्या घटनांच्या मागची आपली मानसिक पार्श्वभूमी मांडून दाखवितो. त्यामुळे आत्मचरित्रात आत्मविश्लेषण भरपूर झालेले आढळते. आठवणी लिहितांना अशा आत्मविश्लेषणाला वाव नसतो असे नाही; तथापि त्यांच्या सुटेपणामुळे ते नेहमी शक्य होतेच असे नाही.

अण्णासाहेब शिंदे यांनी आत्मचरित्रलेखनाचा प्रयत्न केलेला नाही तर आपल्या आठवणी व अनुभव नमूद केलेले आहेत; आणि याची त्यांना चांगली जाणीव आहे. आठवणी सांगताना मनुष्य आपल्या पूर्वायुष्यात अधिक रंगून जातो. उलट आत्मचरित्रकार बहुधा आपल्या निकटतम उत्तरायुष्यातील घडामोडी अधिक समरसतेने आणि खुलासेवार सांगतो. अण्णासाहेबांच्या या आठवणीत त्यांच्या आयुष्याचा पूर्वकाल जसा चित्रीत झालेला आहे तसा उत्तरकाल नाही. किंबहुना भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीतून त्यांनी आपले अंग काढून घेतल्यानंतरचा त्यांच्या जीवनाचा फारच थोडा वृत्तांत या आठवणीत आलेला आहे. त्या मानाने त्यांचे बालपण, शिक्षण, आरंभीची धर्मसेवा आणि भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचा वृत्तांत यांना सविस्तर स्थान मिळालेले आहे. त्यातही आपल्या बाळपणाचा वृत्तांत अण्णासाहेबांनी विशेष खुलासेवार---इतकेच नाही तर समरसतेने व सहृदयतेने---लिहिलेला आहे. आपल्या मातुश्रींच्या आठवणी सांगताना, 'या सर्व करुण रसाने भरलेल्या नाटकात मुख्य नायिकेचे पात्र माझी आई साध्वी यमुनाबाई ही होय' (पृ. १८) असे जेव्हा ते सांगतात तेव्हा या सहृदयतेचा चटका लावणारा प्रत्यय येतो. जुन्या आठवणी काढीत असताना त्या सर्व जशाच्या तशा आठवतात. असे नाही, आणि त्यामुळे 'हे आता मला आठवत नाही' असे लिहिण्याची पाळी लेखकावर येते. अण्णासाहेबांच्या बाबतीतही अनेकदा असे झालेले आढळते (पृ. ९३, ९६, ९७, १४० इत्यादि). सत्यकथनाच्या दृष्टीने यात त्यांचा प्रांजलपणा दिसून येतो. सत्यकथन हा चरित्रवाङ्मयाचा आत्मा होय. याविषयी लेखकाला जितकी काळजी व सावधानता बाळगणे शक्य होईल तेवढी थोडीच असते. अशा स्थितीत विस्मृत प्रसंग कल्पनेने

रचून आत्मचरित्राची किंवा आठवणींची कादंबरी करण्यापेक्षा आपल्या विस्मरणाची नोंद करण्यातच अधिक औचित्य असते. अण्णासाहेबांनी ते पाळण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला दिसतो आणि त्यामुळे त्यांच्या या लेखनाला प्रामाणिकपणा आलेला आहे. आपल्या आठवणी लिहून काढीत असताना क्वचित् लेखकाच्या ठिकाणी गर्व किंवा आढ्यता येणे स्वाभाविक ठरेल! तथापि, या दोषाचा स्पर्श या ग्रंथाला झालेला आढळत नाही. याला कारण अण्णासाहेबांची शालीन आणि नम्र वृत्ती. लहानपणाची संस्मरणे देताना खेळातील आणि अभ्यासातील आपली हुशारी नुसती नमूद करणे निराळे आणि ती आढ्यतेने सांगणे निराळे. ही आढ्यता अण्णांच्या स्वभावातच नसल्यामुळे त्यांच्या निवेदनातही आलेली नाही. क्वचित आपल्याविषयीची इतरांची मते त्यांनी नमूद केली आहेत हे खरे. पण ती जशी गौरवाची आहेत तशी निंदेचीही आहेत. मँचेस्टर कॉलेजातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयी लिहिलेली दोन पद्ये किंवा तेथील अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेले दोन दाखले उद्धृत करण्यात केवळ वस्तुस्थितीचे निवेदन आहे; आत्मस्तुतीचा अहंकार किंवा आनंद नाही 'लोकमताचे हेलकावे' या प्रकरणात आपणाला मिळालेल्या मानपत्राची यादी दिली हेही खरे आहे. पण त्यातील आपल्या स्तुतीचा मजकूर त्यानी उद्धृत केला नाही. उलट आपल्यावर वेळोवेळी होणाऱ्या प्रतिकूल टिकेतील दोन पत्रे व एक उतारा त्यांनी विस्ताराने दिला आहे. यावरून त्यांच्या वृत्तीवर चांगला प्रकाश पडतो. किंबहुना ह्या सगळ्या आठवणी वाचीत असताना एका सात्विक सत्पुरुषाचे विनम्र निवेदन आपण वाचीत असल्याचा प्रत्यय पदोपदी येतो.

तसे पाहिले तर खुद्द अण्णासाहेबांनीच लिहिल्याप्रमाणे आपल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यात पुढे पुढे त्यांना आपल्या साक्षीदारांपासून, इतकेच नव्हे तर 'ज्यांच्यासाठी घरदारही कमी समजून' ते ती कार्ये करीत होते, त्या अस्पृश्यबंधूंपासूनही बराच त्रास सोसावा लागला. इतका की त्यामुळे त्यांची मनःशांती ढळली व त्यामुळे त्या कार्यातून ते अकाली निवृत्त झाले. एखाद्या आत्मकेंद्रीत लेखकाने 'गैरसमज, दुराग्रह व विरोध' यांचे हे प्रसंग घोळून घोळून सांगितले असते व त्यातील आपल्या भूमिकेचे समर्थनही केले असते. अण्णासाहेबांनी असे काहीही केलेले नाही. यात त्यांच्या स्वभावाचे सार आलेले आहे. यामुळे या आठवणींना एका दृष्टीने वैगुण्य आलेले आहे असेही म्हणता येईल. आपल्या सामाजिक कार्यामध्ये आलेले सगळ्या प्रकारचे बरेवाईट अनुभव आत्मचरित्रपर आठवणी सांगणाऱ्या लेखकाने अवश्य नमूद करून ठेवायला पाहिजेत. त्यावरून समाजसेवकांना मार्गदर्शन तर लाभतेच, पण शिवाय मानवी स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान करून घेण्याला मदत होते. अण्णासाहेबासारख्या स्वभावतःच सात्विक पुरुषाची मनःशांती ढळण्याला कारणीभूत झालेले हे प्रसंग तितकेच दुःखदायक असले पाहिजेत; आणि मनात आणले असते तर त्यांना ते सरसतेने रंगवून वाचकांची सहानुभूती आपल्याकडे सहज खेचून घेता आली असती. पण अण्णासाहेब या मोहाला बळी पडले नाहीत. त्यांनी आपली लेखणी त्यापासून अत्यंत संयमाने अलिप्त ठेवली आहे! याच्या उलट दृश्य पाहावयाचे असेत तर वाचकांनी कोल्हटकरांचे 'आत्मवृत्त' वाचावे. आपल्या सान्निध्यात आलेल्या व्यक्तीवर खवचटपणाने व कुत्सितपणाने केलेल्या आरोपांनी बरबटलेले दुसरे आत्मचरित्र मराठीत क्वचित् सापडेल. तथापि, यातही आत्मचरित्रकाराच्या मनोवृत्तीवर व स्वभावविशेषावर अप्रत्यक्षपणे प्रकाश पडतो हे नाकारता येत नाही. अण्णासाहेबांचा प्रकृतिधर्म

अगदी निराळा असल्यामुळे ते आत्मसमर्थनाच्या भानगडीत फारसे पडले नाहीत. मग इतरांवर दोषारोपण करीत सुटणे तर दूरच राहिले. वादांच्या बाबतीतील आपण कितीही तिऱ्हाईतपणे निकाल दिला तरी तो दोन्ही पक्षास मान्य होणार नाही म्हणून तो त्यांनी देण्याचेही टाळले आहे. क्वचित् त्या त्या व्यक्तीशी असलेले आपले मतभेद त्यांनी नमूद केलेले आहेत हे खरे; पण ते अत्यंत सौम्यपणाने आणि प्रांजळ वृत्तीने. त्यामुळे त्यांच्या या आठवणीत प्रसन्नतेचे वातावरण सर्वत्र पसरलेले आढळते.

प्रार्थनासामाजाच्याद्वारे ब्राह्मधर्माचा प्रचार आणि अस्पृश्यतानिवारण ही अण्णासाहेबांच्या कार्याची दोन महत्त्वाची अंगे होत. पहिल्या कार्याच्या निमित्तानेच त्यांना परदेशात जाऊन अध्ययनाची संधी मिळाली आणि नंतरही त्याचसाठी त्यांनी भरतखंडभर प्रवास केला. या परिभ्रमणात त्यांना आलेल्या अनुभवांनी धर्ममूलक समतेचा त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला आणि त्यांच्या सहानुभूतीचे क्षेत्र विस्तारले. त्यातच त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचे बीजारोपण होऊन त्याचे रोपटे वाढीस लागले व ते भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीच्या वृक्षात परिणत झाले त्यांच्या या संस्थेचा इतिहास हा या आठवणींचा महत्त्वाचा भाग होय. हा इतिहास हा या आठवणींचा महत्त्वाचा भाग होय. हा इतिहास सध्याच्या नवीन पिढीस माहीत होणे आवश्यक होते. विशेषत: अस्पृश्यवर्गातील तरुणांनी तो वाचणे जरूर आहे. आता या वर्गाने आपल्या उन्नतीचे कार्य स्वत:च हाती घेतलेले आहे ही संतोषाची गोष्ट असली तरी ते करीत असताना त्यांच्या समोर पूर्वीच्या प्रयत्नांचा इतिहास असणे आवश्यक आहे. म्हणजे आपण आणि आपले पुढारी कुणाच्या खंद्यावर उभे आहोत याची त्यांना कल्पना येईल व त्यामुळे स्पृश्यवर्गातील जुन्या कार्यकर्त्यांविषयी या तरुण पिढीच्या बोलण्यातून क्वचित् जी अवहेलनाची भाषा ऐकू येते ती कमी होण्याला मदत होईल. स्पृश्य वर्गातील अस्पृश्योद्धारकांचे कार्य हे स्थूलमानाने धार्मिक समतेच्या पायावर आधारलेले मुख्यत: शैक्षणिक व सामाजिक स्वरूपाचे होते. नंतर हळूहळू त्याला राजकारणाचा व अर्थकारणाचा रंग चढू लागला. हा रंग देण्यासाठी अस्पृश्यवर्गातूनच नवीन पुढारी पुढे येऊ लागले व त्यांनी या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर उचलली. हे खरे असले तरी त्यांच्यात शैक्षणिक जागृती करण्याला पूर्वीच्या स्पृश्य पुढाऱ्यांनी आपल्या जिवाचे रान केलेले आहे हे आजच्या अस्पृश्य तरुणांनी विसरता कामा नये. शैक्षणिक जागृती हा आर्थिक व राजकीय जागृतीचा पाया होय. तो ज्यांनी आपल्या रक्ताचे पाणी करून भरला अशा व्यक्तीस अण्णासाहेबांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम अस्पृश्यांच्या घरात शिक्षणाची ज्योत पेटवली. ती आपल्या हातात घेऊन केवळ महाराष्ट्रात नाही तर भरतवर्षभर अण्णासाहेबांनी ज्ञानाचे असंख्य दिवे लावले. हे अण्णासाहेबांचे कार्य राष्ट्रीय स्वरूपाचे होते. ते करण्यासाठी ते स्वत:च नाही तर त्यांचे सर्व कुटुंब अविश्रांत खपले. त्यांचे आईवडील व भाऊबहिणी या सर्वांनी त्यांनी या कामी लावले. त्यांच्या वृद्ध मातापितरांप्रमाणेच त्यांच्या भगिनी जनाक्का यांची या बाबतीतील कामगिरी केवळ अद्वितीय आहे. एक स्त्री, तशात विधवा झालेली, शिक्षणाचा फारसा गंध नाही, पण आपल्या वडील बंधूने स्वीकारलेल्या या सेवाकार्यात तिने आपले संपूर्ण जीवन ओतले हे या ग्रंथातून पाहिले म्हणजे या त्यागमूर्तीसमोर ज्याला नम्र व्हावेसे वाटणार नाही असा वाचक विरळच आढळेल! आपल्या

आईवडिलांची अण्णासाहेबांनी काढलेली चित्रे अत्यंत चित्तवेधक आहेत. ती पाहून जुन्या पिढीतीतल असूनही अत्यंत प्रगतीपर विचारांच्या या पतिपत्नीविषयी मनात नितांत आदर निर्माण होतो. अण्णासाहेबांच्या स्वभावाची काही वैशिष्ट्ये त्यांनी आपल्या आईवडिलांच्या स्वभावातून कशी उचलली याचेही त्यावरून सम्यक् दर्शन होते.

धर्मभावनेचे उदारतेचे व समाजसेवेचे धडे त्यांना आपल्या मातापित्याकडूनच अप्रत्यक्षपणे मिळालेले होते. त्यांचाच विकास त्यांच्या जीवनात झालेला आढळतो. लहानपणी अंगी बाणलेल्या कणखरपणामुळे नंतरच्या आयुष्यातील अनेक आपत्तींना आणि विरोधांना ते यशस्वीपणे तोंड देऊ शकले. अण्णासाहेब हे हाडाचे सुधारक होते. हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यासाठी त्यांनी जसे अविश्रांत श्रम केले तसेच इतर अन्याय्य रूढींच्या निर्दलनासाठीही केले. जातिभेद, क्षुद्र दैवतांची उपासना, स्त्रियांची होणारी विटंबना, होळीतील बीभत्स प्रकार—धर्माच्या नावाखाली चालू असलेल्या या अन्यायांच्या विरुद्ध अण्णासाहेबांनी सुधारणेचे शस्त्र उपसले होते. देवदासी, मुरळी या संस्था म्हणजे धार्मिक वेश्यागारे होत. ती नष्ट करून या दुर्दैवी स्त्रियांना सभ्य समाजात आणून सोडण्याचे कार्य कितीही उदारपणाचे असले तरी धर्माची अफू प्यालेल्यांच्या डोळ्यांवर ते न येणे अशक्य होते. अण्णासाहेबांवर मारेकरी घालण्यालाही या लोकांनी कमी केले नाही. 'शिंद्यांची सर्कस' म्हणून व्यंगचित्र काढून आणि 'आधुनिक काळातील महान् कलिपुरुष' म्हणून त्यांचा निषेध करून त्यांची अवहेलना करण्याचाही प्रयत्न काही समाजपुंगवानी आणि धर्ममार्तंडांनी केला. पण निंदा, अवहेलना, प्राणांतिक आपत्ती इत्यादींना तोंड देऊन आपले कार्य अण्णांनी पुढे चालू ठेवले. त्यांच्या अंगी लहानपणापासून असलेल्या कणखरपणाचा व स्पार्टन सहिष्णुतेचा हा परिणाम होय. या बाबतीत विधायक कार्य करण्यावरच त्यांचा भर विशेष होता. मुलांप्रमाणे मुलींनाही सक्तीचे शिक्षण चालू करण्याविषयी त्यांनी केलेली चळवळ त्यांच्या विधायक कार्यकर्तृत्वाचीच द्योतक होय. या कामात लो. टिळकांसारख्या राष्ट्रपुरुषाकडून त्यांना विरोध व्हावा हे दुर्दैव होय. त्यांच्या विरोधाला तोंड देऊनही अण्णासाहेबांनी आपले कार्य चालूच ठेवले.

ही सर्व कार्ये अण्णासाहेबांनी निरपेक्ष वृत्तीने केली ही महत्त्वाची गोष्ट होय. त्यांचे जीवित जणू आर्पित जीवित होते. आपल्या कार्यासाठी त्यांनी आपणहून गरिबी पत्करली होती. प्रार्थनासमाजात काम करीत असताना काय किंवा भारतीय निराश्रित साहाय्यक मंडळीचे काम करीत असताना काय त्यांचा दारिद्र्य-मित्र त्यांच्या सोबतीला नेहमी असे. त्यामुळे प्रपंचाची काळजी ही जी त्यांची चौथी सख्खी बहीण, तिने त्यांना कधीच सोडले नाही. ते व त्यांचे सहकारी यांना कित्येकदा आपल्या भुकेच्या वेदना कशा तरी शमवाव्या लागत. ज्या दारिद्र्याशी झगडत त्यांनी उच्च शिक्षण घ्यावे लागले त्याच्याशीच झगडत झगडत त्यांना आपली सेवाकार्ये पार पाडावी लागली. वस्तुतः बडोदेसरकारचा त्यांना केव्हाही आश्रय मिळण्यासारखा होता. अनेकदा महाराजांनी त्यांना बोलावले होते, पण त्यांनी त्यांना विनम्रपणे नकार दिला. यातच त्यांच्या तळमळीच्या समाजसेवेचे सार आले!

अण्णासाहेब हे सुधारक असले तरी राष्ट्रीय वृत्तीचे होते हा त्यांचा आणखी एक महत्त्वाचा विशेष होय. रानडे-भांडारकर-चंदावरकर यांच्यासारख्यांच्या सान्निध्यात राहूनही त्यांनी आपली ही राष्ट्रीय वृत्ती कधी लुप्त होऊ दिली नाही. लोकमान्य टिळकांना १९०७ मध्ये कारावासाची जबर

शिक्षा झाल्यानंतर आपल्या साप्ताहिक उपासनेत त्यांच्याबद्दल प्रार्थना करण्यात तर अण्णासाहेबांची ही राजकीय वृत्ती दिसू येते. पण त्याबद्दल स्पष्टीकरण विचारणाऱ्या गुरुजनांना त्यांनी दिलेल्या उत्तरातही तो दिसून येते. 'मी केवळ मराठ्यांसाठी नाही-सर्वांसाठी आहे' असे म्हणणाऱ्या अण्णासाहेबांनी १९२० च्या निवडणुकीच्यावेळी ब्राह्मणेतर पक्षात सामील न होता स्वतंत्र बहुजन पक्ष स्थापन केला याचेही कारण तेच आहे. १९३० मध्ये तर महात्मा गांधींच्या सत्याग्रह-संग्रामात उडी घेऊन त्यांनी ६ महिन्यांचा कारावासही सोसला. जेथे-बंधूंना राष्ट्रीय सभेकडे वळविण्याला अप्रत्यक्षपणे अण्णासाहेब कारणीभूत झालेले आहेत. ही गोष्ट आजच्या राजकारणाच्या दृष्टीने लक्षात घेतली म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचे व दूरदृष्टीचे कौतुक करावे तितके थोडेच होईल असे वाटते!

हा सर्व चित्रपट अण्णासाहेबांनी आपल्या आठवणीत रेखाटला आहे. त्यातील रंग अत्यंत सौम्य आहेत. अहंकाराचा किंवा दर्पाचा भडक रंग त्यात कुठेही आढळणार नाही. सर्व चित्रपट पाहून मन कसे प्रसन्न होते. अण्णासाहेबांच्या लेखणीतून उतरलेल्या ह्या आठवणी त्यांच्या स्वभावातील सात्विकतेचा रस घेऊन जशा उतरल्या आहेत, तशाच त्यांच्या अध्ययनाचा, संशोधनाचा व संस्कृतीचा परिपाक घेऊनही उतरल्या आहेत. अण्णासाहेबांचे संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषेचे आणि वाङ्मयाचे ज्ञान फार चांगले होते याचा प्रत्यय या ग्रंथात पदोपदी येतो. विशेषतः मराठी व संस्कृत कवींच्या काव्यातील प्रसंगोचित वचने विवेचनाच्या ओघात आलेली वाचताच त्यांच्या लेखनाच्या अभिजात शैलीचा प्रत्यय येतो. मधूनमधून त्यांनी केलेली वर्णनेही त्यांच्या काव्यात्मक वृत्तीची साक्ष देतात. डुभी येथील ब्रह्मपुत्रेच्या विराट दर्शनाने हेलावलेल्या त्यांच्या अंतःकरणातून बाहेर पडलेले धन्यतेचे उद्‌गार वाचले म्हणजे याची कल्पना येईल. भारतीय आर्य भाषांप्रमाणेच द्राविड भाषांशीही त्यांचा चांगला परिचय होता. कानडी ही तर जवळजवळ त्यांची मातृभाषाच, तिचा त्यांच्या लेखणीला झालेला संस्कार अधून-मधून या ग्रंथात आढळतो. अण्णासाहेबांचे एकंदर लिहिणे सुबोध असूनही सफाईदार आहे. वाक्यरचनेच्या साधेपणाचे सौंदर्य तीत सर्वत्र पसरलेले आढळते. प्रत्यक्ष विधायक कार्याने अशी त्यांनी जनतेची सेवा केली आहे तशी वाणीने आणि लेखणीनेही केलेली आहे. इंग्लंडमधून शिक्षण घेऊन परत आल्यापासून ब्राह्मधर्माच्या प्रचारासाठी आणि समाजसुधारणेच्या कार्यासाठी भारतभर प्रवास करून त्यांनी हजारो व्याख्याने देऊन श्रोत्यांची मने जिंकली आहेत आणि त्यांना विचारप्रवृत्त केले आहे. प्रार्थना-समाजाच्या आणि अन्य व्यासपीठावरून चालविलेल्या उपासनांच्या प्रसंगी धीरगंभीर वाणीने उपदेशामृताचे सिंचन करून अनेकांच्या अंतःकरणात सात्विक भावनांचे अंकूर त्यांनी निर्माण केले आहेत. या आध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यात आपली लेखणीही त्यांनी सतत चालवली आहे. श्री. बी. बी. केसरकर यांना संपादिलेले त्यांचे 'लेख, व्याख्याने आणि उपदेश' वाचले म्हणजे त्यांची चांगली कल्पना येईल. त्यातील प्रवास वृत्तातून त्यांच्या रमणीय लेखन-शैलीचे सौंदर्य जसे पाहावयास मिळते तसेच त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचे व जागृत सामाजिक मनाचेही ज्ञान होते. त्यांचे हे 'सर्व लेख व व्याख्याने.... वाचनींय असून त्यातील कित्येक व्याख्याने विवेकास जागृत करणारी आहेत. मन त्रस्त झाले असेल तेव्हा अगर विश्रांतीच्यावेळी ह्या पुस्तकात प्रसिद्ध झालेली रा. शिंदे यांची केवळ विलायतेहून लिहिलेली पत्रे जे कोणी वाचतील त्यास रा. शिंदे यांचे निरीक्षण सामर्थ्य, कल्पकता, भाषेतील काव्य व रस अवलोकून समाधान वाटल्यावाचून राहणार नाही ' असे श्री. द्वा. गो. वैद्य यांनी आपल्या प्रार्थना समाजाच्या इतिहासात म्हटले आहे ते अगदी यथार्थ वाटते.

यातील 'बहिष्कृत भारत' या अण्णासाहेबांच्या लेखाने त्या काळी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यातील विवेचनाच्या बीजातूनच 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न ' ह्या ग्रंथाचा वृक्ष निर्माण झाला आहे. हा ग्रंथ म्हणजे अण्णासाहेबांच्या एतद्विषयक सूक्ष्म व सखोल अध्ययनाचा, संशोधनाचा व चिंतनाचा उत्कृष्ट परिपाक होय. अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा त्यांनी किती मूलगामी आणि शास्त्रशुद्ध विचार केला होता याची या ग्रंथावरून उत्तम कल्पना येते. अस्पृश्यतेची संस्था केवळ भारतीय आहे असे नाही तर भारताबाहेर ब्रह्मदेशादी राष्ट्रातही तीचा व्याप आहे. तिच्या निर्मितीचा आणि विकासाचा इतिहास प्रथम खंडात देऊन दुसऱ्या खंडात अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या अंगोपांगाचा त्यांनी विचार केलेला आहे. अस्पृश्य म्हणून समजल्या जाणाऱ्या भिन्न प्रांतीय जातींच्या नावांचा भाषाशास्त्राच्या साह्याने त्यांनी जो इतिहास शोधला आहे तो त्यांच्या कुशाग्र बुद्धीचा द्योतक आहे. तौलनिक भाषाशास्त्राची अण्णासाहेबांना विशेष आवड होती. या विषयावर त्यांनी काही ठिकाणी व्याख्याने दिल्याचा उल्लेख या आठवणीतच आलेला आहे. 'कानडी-मराठी संबंध ' 'कोकणी व मराठी संबंध ' इत्यादी विषयांवरील त्यांचे निबंध त्यांच्या या तौलनिक अध्ययनातून बाहेर पडलेले स्पष्ट दिसतात. मराठी भाषा ही महाराष्ट्रीयपासून निर्माण झालेली नसून ती मगध देशातून बंगाल, ओरिसा, तेलंगण, वऱ्हाड व कर्नाटक या प्रांतातून प्रवास करीत असलेली एक निराळीच भाषा आहे, हा त्यांचा विचार भाषाशास्त्रज्ञांनी सूक्ष्मपणे तपासून पाहण्याच्या योग्यतेचा आहे. मराठ्यांच्या पूर्वपीठिकेचाही त्यांनी भाषाशास्त्राच्या दृष्टीने 'रत्नाकरा ' त विचार केलेला होता. या सर्व लेखात भाषाशास्त्राच्या आधाराने अण्णासाहेबांनी मांडलेले काही ऐतिहासिक प्रश्न पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. याच पद्धतीने अस्पृश्य जातींच्या नावांची मीमांसा करून हा वर्ग मुळात बराच उन्नत, सुसंस्कृत आणि पराक्रमी असला पाहिजे असा निष्कर्ष त्यांनी काढलेला आहे, तो इतिहासाच्या आणि अस्पृश्योद्धाराविषयक चळवळीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा वाटतो. अस्पृश्यांच्या पूर्वपीठिकेविषयी मनुस्मृतीने केलेली मीमांसा निराधार आणि अनैतिहासिक असल्याचेही त्यांनी साधार व सडेतोड रीतिने प्रतिपादन केलेले आहे. इतिहास, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण इत्यादी अनेक दृष्टींनी या प्रश्नाकडे इतक्या सूक्ष्मपणे पाहणारे विचारवंत भारतात अण्णासाहेबांव्यतिरिक्त दुसरे क्वचितच आढळतील. सर्व अस्पृश्य बंधूनी अभ्यासण्याच्या योग्यतेचा असा हा मौलिक ग्रंथ आहे. सर्व भारतीय भाषातून त्याची भाषांतरे झाली पाहिजेत असे मला वाटते. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे या विषयाचा पूर्वार्ध होय. अण्णासाहेब यांचा उत्तरार्ध लिहिणार होते. त्यात दलित समाजाच्या उद्धाराचा व अस्पृश्यता निवारणाचा इतिहास व उपाय यांचा अंतर्भाव व्हावयाचा होता. अण्णासाहेबांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोशातील आपल्या लेखात हा भाग संक्षिप्त रूपाने दिला आहे, हे खरे; पण तो सर्व वृत्तांत त्यांच्या अनुभवी लेखणीतून सविस्तर बाहेर पडणे अवश्य होते. तसे होऊ शकले नाही याबद्दल आता हळहळ वाटणे स्वाभाविक आहे. पण त्याला इलाज काय ?

अण्णासाहेबांच्या चरित्राची आणि चारित्र्याची, स्वभावाची आणि कार्याची माहिती करून देणाऱ्या या आठवणी त्यांनी स्वतःच्या विरंगुळ्यासाठी लिहिल्या असल्या तरी त्यापासून आपणा सर्वांना उत्तम मार्गदर्शन लाभणार आहे. तेव्हा आता अधिक न लिहिता या आठवणी वाचण्याची वाचकांना विनंती करतो.

वि. भि. कोलते

आदरांजली....

महर्षी विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांचे पुनर्मुद्रित केलेले आत्मचरित्र ' माझ्या आठवणी व अनुभव ' हे मी वाचले. ज्यांनी आपले संबंध आयुष्य सर्वस्वी समाजसेवेसाठी व अस्पृश्योद्धारासाठी वाहिले अशा या थोर पुरुषाच्या आयुष्यातील या पुस्तकात ग्रथित केलेल्या आठवणी वाचल्यानंतर त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून आपले कार्य आत्यंतिक निष्ठेने व तळमळीने सतत करीत राहणे हा गुण असामान्य व्यक्तींच्या चरित्रात आपणास प्रामुख्याने आढळतो. महर्षी शिंदे यांच्या चरित्रात आपणांस याचे प्रत्यंतर येते. लहानपणाची गरिबी, त्यात अनेक कौटुंबिक आपत्तीची भर असे असूनही स्वाभिमान न दुखवता जेवढी मदत मिळेल तिच्यावर त्यांनी आपले शिक्षण पुरे केले. त्यांच्या दारूण परिस्थितीचा व प्रेमळ मातापित्यांच्या धार्मिक प्रवृत्तीचा त्यांच्या मनावर जो परिणाम झाला त्यामधूनच त्यांना धार्मिक शिक्षण घेण्याची प्रेरणा झाली व ऑक्सफर्ड येथे हे शिक्षण घेऊन परत आल्यावर त्यांनी धर्मप्रचाराचे काम हाती घेतले. या कार्यातूनच पुढे त्यांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या महान कार्याचा उदय झाला.

त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा परिपोष त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास विश्वधर्मापासून सुरुवात होऊन समाजसुधारणा, समाजसेवा वा राष्ट्रोद्धार अशा टप्प्यांनी झाला.

तत्कालीन महाराष्ट्रात ज्या ज्या समाजसुधारणेच्या चळवळी झाल्या त्यात महर्षी शिंद्यांचे प्रामुख्याने अंग होते. परंतु त्यांच्या आयुष्यातील अत्यंत मौलिक कार्य म्हणजे अस्पृश्यांची त्यांनी केलेली महान सेवा. आपले सर्व जीवन त्यांनी कार्यासाठी वेचले, जातीनिरपेक्ष व धर्मनिरपेक्ष बुद्धीने त्यांनी हे कार्य सतत केले. तत्कालीन सरकारचीही या कार्यात त्यांनी सहानुभूती मिळविली. एवढेच नव्हे तर सतत प्रयत्न करून राष्ट्रीय सभेलाही हे कार्य हाती घेण्यास त्यांनी प्रवृत्त केले. या कार्याचा पुढे महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली प्रचंड वृक्ष फोफावला.

महर्षी शिंद्यांनी आपल्या हयातीत केलेली धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय क्षेत्रातील कामगिरी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात अद्वितीय गणली जाईल. इतक्या निरपेक्ष, निरलस व तळमळीने काम करणाऱ्या एका थोर समाजसेवकाच्या चरित्राचा आदर्श तरुण पिढीपुढे सतत रहावा व त्यापासून त्यांना शक्ती व स्फूर्ती मिळावी अशी इच्छा व्यक्त करून ह्या चरित्राच्या रूपाने मराठी वाङ्मयातील बहुमोल ठेवा वाचकांच्या हाती दिल्याबद्दल महर्षींच्या चिरंजीवांना मी धन्यवाद देतो.

यशवंतराव चव्हाण

' माझ्या आठवणी ' संबंधी....

परमुलुखांत नोकरी करीत असता मी १९३९ चे सुमारास रजेनिमित्त पुण्यात घरी आलो असता सहज माझ्या हाती वडिलांच्या हस्ताक्षरात लिहिलेली जाडजूड वही लागताच मी तीबद्दल कुतूहलाने त्यांना प्रश्न केला. त्यावर त्यांनी स्वतः १९३० साली कायदेभंगाच्या चळवळीत तुरुंगात असताना लिहिलेल्या त्या स्वतःच्या आठवणी आहेत असे सांगितले. तीर्थरूप त्या वेळी साठीच्या पलिकडे गेलेले, तशात त्यांना मधुमेहाचा विकार आणि त्यामुळेच त्यांच्या दोन्ही हातांना कंपवायूची बाधा झालेली. अशा स्थितीत भर म्हणून की काय दृष्टी मंद होऊन त्यांना अजिबात वाचता येत नव्हते. हे सर्व ठाऊक असताही मी त्यांना सहज विचारले, "या आठवणीत तुम्ही भर घालून संपूर्ण आत्मचरित्रच का लिहित नाही ?" तो अण्णांनी या माझ्या म्हणण्याला उत्तरच दिले नाही; पण मी तेवढ्याने काही गप्प बसणार नव्हतो. एकसारखा पाठपुरावा करून मी त्यांना त्याबाबत बोलावयास लावलेच. परंतु वार्धक्याने जर्जर झालेल्या निरुत्साही मनःस्थितीतलेच ते निराशाजनक उत्तर होते. पण मी आपला हेका न सोडताच सुचविले की, 'आत्मचरित्रासंबंधीची जी काही सामुग्री असेल ती मी मिळवितो. ती तुम्हास वाचून दाखवितो. आठवणीचे धागेदोरे जुळवून आपण आत्मचरित्राचे कथन तेवढे करावे, म्हणजे लिहिण्याचे काम मी स्वतः करीन ' या कामाला बराच कालावधी लागणार असल्याची वडिलांना खात्री होतीच. तेव्हा त्यांनी मला प्रश्न केला " हे सर्व काम काही एक-दोन महिन्याचे नाही. त्याला किती तरी महिने लागतील ! तेव्हा तू नोकरी सांभाळून हे सारे कसे करणार ? शिवाय माझे आत्मचरित्र लोकांसमोर पुस्तकरूपाने यावे अस मलाच मुळातून वाटत नाही. आणि आता तर मी इतका थकलेला आहे की, तू सांगितलेली सूचना पाळून देखील कथन करण्याचे श्रम माझ्याच्याने होतील असे वाटत नाही. दुसरी गोष्ट अशी की, कथन काही नियमितपणे होईल म्हणावे तर तेही नाही. माझी प्रकृती, माझी मनःस्थिती, मनाचा एक विशिष्ट कल या गोष्टी जमेस धरता हे काम सुतराम् कसे पार पडेल याची मोठीच वानवा आहे. तेव्हा तू आपला हेका सोडून नोकरीवर जा पाहू कसा !"

मी ऐकले नाही. निमूठपणे मी सामुग्री जमवली आणि वडिलांच्या इच्छेविरूद्ध बिनपगारी दीर्घकालाची सुट्टी घेऊन आत्मचरित्राचा पूर्वार्ध संपवला. आत्मचरित्राचा पूर्वार्ध पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेला पाहताच दुसऱ्या भागाची तयारी देखील अशाच परिस्थितीत मी करून टाकली. पूर्वार्ध छापून प्रसिद्ध करण्याचे काम माझे मित्र श्री. जयवंतराव जगताप यांनी आपल्या 'वत्सला साहित्य प्रकाशन ' संस्थेतर्फे पुरे केले; पण दुसऱ्या भागांचे हस्तलिखित तयार करून त्यांना १९४१ च्या आरंभी दिले असताही छपाईच्या कामात त्यांच्याकडून कारणपरत्वे दिरंगाई झाली. पुढे १९४४ साली वडिलांच्या निधनानंतर त्यांनी छपाईचे काम धूमधडाक्याने सुरू केले. समग्र आत्मचरित्र वडिलांच्या हयातीत प्रसिद्ध होण्यासारखे असताना जयवंतरावांनी बुद्धिपुरःसर चालढकल केली आणि त्यांच्या निधनाला अवघा आठवडा लोटतो न लोटतो तोच पुस्तकप्रसिद्धीबाबत वर्तमानपत्रातून अगाऊ जाहिरात करून धमाल उडवण्याचा जो उपक्रम आरंभला त्यावरून त्यांच्या व्यवहारी वृत्तीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. वडिलांना आपल्या हयातीत, आपल्या डोळ्यांनी समग्र

चरित्राचे प्रकाशन पुस्तकरूपाने पाहावे हाच ऐक हेतू मनात बाळगून मी आटोकाट प्रयत्न केले असता त्यांच्या निधनानंतर पुस्तकाचे प्रकाशन होण्यात मला तरी विशेष उत्साह वाटत नव्हता. बरे, इतके असताही पुस्तक हस्तलिखिताबरहुकुम तरी प्रसिद्ध करावयाचे, ते सोडून जयवंतरावांनी त्यात जी बेसुमार काटछाट चालवली त्यामुळे मी चकितच झालो. हस्तलिखितातील पॅरेच्या पॅरेच नव्हे, तर आठ-आठ दहा-दहा पाने अनावश्यक, नीरस आणि कंटाळवाणा मजकूर या सबबीखाली काढून टाकण्यास जेव्हा जयवंतरावांनी आरंभ केला, तेव्हा नाइलाजाने मला त्यांना विरोध करावा लागला. परिणाम असा झाला की, जयवंतरावानीच हस्तलिखिताचे सर्व भाग माझ्यापुढे टाकून म्हटले की, "हे बाड उचला अन् चालू लागा. माझ्याखेरीज दुसरा कोणीही हे काम करीत किंवा कसे हे तुम्हाला कळून येईल !" एक शब्दही न उच्चारता मी पुढ्यात टाकलेले बाड उचलून घरी आणले. वडिलांच्या पश्चात् हस्तलिखितात कसलीही काटछाट करण्याचा अधिकार प्रकाशकाला बिलकूल नाही, हे परोपरीने सांगूनही जेव्हा निरुपाय झाला तेव्हाच मला हा मार्ग पत्करावा लागाला. काही का असेना, पुस्तकाचा पूर्वार्ध तरी वडिलांच्या नजरेस पडला यातच मी समाधान मानून होतो. परंतु वडिलांच्या कार्याच्या दृष्टीने उत्तरार्ध अत्यंत महत्त्वाचा होता, आणि तो प्रसिद्ध झालेला त्यांनी पाहिला असता तर माझे घोडे गंगेत न्हाले असते.

तीर्थरूपांच्या तोंडून होत असलेल्या आत्मचरित्राचे कथन करताना मी दोनच गोष्टीवर त्यांचे विचार काय आहेत हे जाणून घेतले, त्या गोष्टी म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद आणि त्यांनी केलेले सामाजिक कार्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद हा इंग्रजांनी आपल्या भेदनीतीला पूरक म्हणून उपस्थित केला असल्याने तो सर्वस्वी त्याज्य आहे असे वडिलांचे स्पष्ट मत होते. हिंदू-मुसलमान वादाप्रमाणे हा वाद देखील देशाच्या एकजुटीला बाधक आहे असे त्यांचे ठाम मत होते. शिवाय जातिभेदावर आधारलेला पक्ष केव्हाही चिरस्थायी असू शकत नाही याची ग्वाही त्यांना मनोमन पटल्याने त्यांनी ह्या वादापासून स्वतःला सुरुवातीपासूनच अलिप्त ठेवले होते आणि केवळ या एकाच कारणामुळे ब्राह्मणेतरवादीय व्यक्ती त्यांची उपेक्षा करीत, तर सनातनी जातीयवादी उच्चवर्गीय त्यांच्याकडे साशंकतेने पाहात. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी उघड होती. एक मात्र खरे की विचारवंत व्यक्ती, मग ती कोठल्याही जातीची असली तरी वडिलांच्या कार्याबद्दल कळकळ व आत्मीयता दर्शवल्यावाचून राहात नसे, ह्याची सत्यता खालील गोष्टीवरून दिसून येईल. ती, अण्णांच्या वाङ्मयीन गुणांचे चीज व त्यांच्या सामाजिक कार्याबद्दलचा सहानुभूतिपूर्वक विचार जसा उच्चवर्गीयांनी केला तसाच ब्राह्मणेतर वर्गातल्या श्रीमंत सयाजीराव किंवा कै. शाहु महाराज यांनी देखील केलेला आहे हे आत्मचरित्राचे वाचन करताना आढळून येईल.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांना स्वतःला स्वतःच्या कार्याबाबत म्हणावी तशी परिपूर्तता आली नसल्याचे वाटत होते. याचे कारण सांगताना त्यांनी मजजवळ उद्‌गार काढले ते असे, या कामाला पैसा हे काही कारण नव्हते. पैशापेक्षा आत्मीय जाणिवेने काम करण्याची उणीव हेच एक महत्त्वाचे कारण आहे. डिप्रेस्ड क्लासेस मिशन या संस्थेला माझ्या मनासारखी ऊर्जितावस्था आली नाही याला पैसा हे कारण बिलकूल नसून आंतरीक तळमळीने, स्वार्थत्यागी वृत्तीने काम करण्याची उणीव हेच एक मोठे कारण आहे."

सुशिक्षित व सुसंस्कृत वर्गीयांकडून जे काही घेण्यासारखे आहे, ते अवश्य घ्यावे आणि आपला उद्धार करून घ्यावा, असे न करता केवळ रूढ कल्पना उराशी बाळगून त्यांच्याबद्दलचा मत्सरग्रस्त पूर्वग्रह मनात उगाळीत बसून काही आपला कार्यभाग होणारा नाही, ही गोष्ट जशी मागासलेल्या वर्गीयांनी अंमलात आणावयाची आहे तशीच उच्चवर्गीयांनी देखील आपला अहंभाव विसरून मागासलेल्या वर्गीयांकडे तुच्छतेने न पाहता त्यांना आपल्यात वागवूनच घ्यावे हे परिणामी हितकर होणार आहे असे ते नेहमीच म्हणत असत.

बऱ्याच काळानंतर आत्मचरित्राचे समग्र प्रकाशन करण्याचा जो योग आलेला आहे तो समाजाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. हा योग घडवून आणण्याचे कार्य जयवंतराव जगतापानंतर श्री. ग. ल. ठोकळ यांनी ज्या धडाडीने केले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन मीच काय पण ती. अण्णासाहेबांबद्दल आस्था बाळगणारी महाराष्ट्रातली कोणतीही विचारवंत व्यक्ती यथोचित केल्याविना राहणार नाही.

पुणे, ता. २ फेब्रुवारी, १९५८ **रवींद्र विठ्ठल शिंदे**

अनुक्रमणिका

प्रकरण	भाग पहिला	[१ - १४०]
पहिले	**माझे आजोबा**	१-४
	पहिल्या आठवणी – चंद्रोजीराव – एक हिकमत – बसप्पा अथणी – बेहिशेबी उधारी – लष्करी पेशा – माझा जन्म – एक स्वप्न – जनाक्का.	
दुसरे	**माझी आजी**	५-९
	संताबाई – पोरकट चोरी – यल्लमाची यात्रा – अंबाबाईची यात्रा – कठीण नवस – शाकाहार – अंतकालचे वेड.	
तिसरे	**आजोळ**	१०-१३
	कृष्णराव काळे – पतिव्रता गंगाबाई – आमचा तोरा – आजीचे घर – सावलीतील तुळस - माझे मामा.	
चौथे	**माझे बाबा**	१४-१७
	जन्म (अदमासे) १८३५ : मृत्यू २७ जून, १९१० – पांढरपेशी शिक्षण – ब्राह्मणी वळण - कडक स्वभाव – बाबांची रसवंती – विठोबाचा सप्ताह – बबलादीचे स्वामी.	
पाचवे	**माझी आई**	१८-२४
	जन्म (अदमासे) १८४० : मृत्यु ८ फेब्रवारी, १९१० – बाबांचे लग्न – यमुनाबाई - सासुरवास - आमचा रयतावा – हालअपेष्टा – तान्याक्का – जनाक्का – आमचा वाडा - आईच्या गोष्टी –आत्मसंतोष – वाशांचे सरपण – करवीरची यात्रा.	
सहावे	**आमची लग्ने**	२५-२७
	तीन लग्ने – सालंकृत कन्यादान – व्याह्यांचा धिंगाणा – केळवण – आसंगीचे वऱ्हाड - पेंढारधाड.	
सातवे	**वडील भावाचा मृत्यू**	२८-३१
	नवीन टप्पा – बंधू एकनाथ – चुणचुणीतपणा – चिमुकली स्कॉलरशीप – तुकारामाचा संसार.	
आठवे	**खडतर पाच वर्षे**	३२-३४
	स्वभावदोष – संस्थांनी नोकरी – व्यसनी विराप्पा – बबलादिचे सिद्ध – स्वभावातील पालट.	
नववे	**बालपण**	३५-३७
	जन्म – एक आपत्ती – पहिला लळा – धाडसी तांडेल – सवयीचा परिणाम – १८७७ चा दुष्काळ – चोरटे दान.	

दहावे **माझे प्राथमिक शिक्षण** ३८-४०

धूळपाटी – मौजीबंधन – अक्काची माया – माझा हट्ट.

अकरावे **माझा हायस्कूलचा काळ** ४१-४४

शिक्षकवर्ग – विषयांची गोडी – ग्रहणशीलता – इंग्रजी अभ्यास – सकृतदर्शनी प्रेम – मराठी अभ्यास – संस्कृत अभ्यास – रसिकता.

बारावे **माझे सोबती** ४५-४८

माझी भावंडे – माणूसघाणेपणा – गोड देखावा – मित्रमंडळ – मुक्तद्वार वाडा – नवीन भरणा.

तेरावे **माझे खेळ** ४९-५२

सोंगट्यांचा खेळ – एक मल्लयुद्ध – पटाईत वृत्ती – 'किर्र' खेळ – सूरपारंब्या सूरपाट्या - आमचा कंपू – चित्रकला – कारागिरी – आमचे कारखाने.

चौदावे **माझ्या खोड्या** ५३-५७

आग्रहीपणा – गांवढळ खोड – रामतीर्थ – विंचवाशी खेळ – सहिष्णूता – विक्षिप्तपणा - शर्यत – विशेष करामत.

पंधरावे **काही सवयी आणि वागणूक** ५८-६१

पेहराव – साधी राहणी – स्नान – अखंड सहवास – गुळ्ळव्वा – घरकामाची लहर – अव्यवहारीपणा – बाजारातील शोभा.

सोळावे **माझ्या एकांत सहली** ६२-६३

एकांतातील सहली – पहिला ठसा – वनभोजन.

सतरावे **माझे वाचन** ६४-६५

खाजगी वाचन – कादंबरी वाचन – वाचनाचे वेड – पोथीवाचन – धार्मिक पंथ.

अठरावे **पोरवयातील माझी धर्मभावना** ६६-७१

प्रस्ताव – स्पष्टोक्ती – बागुलबोवा – पहिली धर्मभावना – धर्माची गोडी – ताईबाईचे प्रस्थ - सूडाची कल्पना – यथासांग पूजा – मारुतीची पूजा – गाड्याची पूजा – भिंतीवरील थाप.

एकोणीसावे **मूर्तिपूजा** ७२-७७

देव्हारा – पूजेचा उत्साह – आध्यात्मिकता – शिवलिंगपूजा – शिव व विष्णु – पुराणिकाचा थाट – गोड फरक – भक्ती व यश – अधिक स्फोट – साधुसमागम – जटाधारी गोसावी - इतर वैरागी – योग्य पारख.

विसावे **भावी सामाजिक सुधारणेची तयारी** ७८-८३

भावंडांची नावे – मातापित्यांचे ऋण – पवित्र वातावरण – मुलींचे शिक्षण – स्वभाव – लक्षणे – अभेद भाव – मुसलमान स्नेही – शुद्ध तत्त्वे – सहृदयता – इतराजी.

अनुक्रमणिका

एकविसावे **कॉलेज प्रवेश** ८४-८६

गं. भा. म्हस्के – स्कॉलरशीप – फर्ग्युसन कॉलेज – प्रि. आगरकर.

बाविसावे **प्रीव्हियसचे वर्ष** ८७-९१

कॉलेजचा पसारा – व्याख्यानपद्धती – मॅग्नाचार्टा – लाजाळू वृत्ती – पेच प्रसंग – तिघेजण - कॉलेज खर्च – काटकसर – पैशांची टंचाई – डॉ. शेळके – सौ. बहिणाबाई.

तेविसावे **इंटरमिजिएटचे वर्ष** ९२-१०२

उलटा प्रकार – गाढवी सवाष्णी – कंगाल स्थिती – जनाक्काचा छळ – बाळमित्र रा. शासने - स्वयंपाकव्रत – चैतन्यशून्यता – बौद्धिक विकास – नास्तिकपणा – चर्चामंडळ – पशुपणा - कडेवाला मित्र – खाद्यक्रम – व्यायामाची इर्षा – आजार – दु:खानंद – मुक्तता – सुधारकी हेतू – पंडिता रमाबाई – प्रो. कर्वे – मिस मेरी भोर – कावेबाजपणा – रे. डॉ. संडरलंड - प्रपंचाची काळजी – जादा मदत.

चोविसावे **पदवीग्रहण** १०३-११०

सवलत – डेक्कन कॉलेज – निकाल – पिळवणूक – प्रो. मॅक्समुल्लर – रा. कळसकर - प्रार्थनासमाज – परिचय – सभासद दीक्षा – पहिली उपासना – रा. सुकथनकर – रा. मोती बुलासा – अटींचा खुलासा – व्यत्यय – दयाळू महाराज – आश्वासन.

पंचविसावे **विहंगमावलोकन** १११-११२

हेतू – कॉलेजातील सुट्ट्या.

सव्विसावे **माझे बिऱ्हाड** ११३-११४

डॉ. ग्रेडन – भाड्याची जागा – पिअर्सन – व्यक्तित्व.

सत्ताविसावे **मँचेस्टर कॉलेज** ११५-११७

अध्यापक वर्ग – पूर्व व पश्चिम – धर्मपरिवार – निबंध व प्रयोग – चहापान – उपासक.

अट्ठाविसावे **खेळकर वृत्ती** ११८-१२०

टोयोसाकी – मलूल हिंदी – इव्हर्ट – मर्कटलीला – पॉझ मॅगेझिन.

एकोणतिसावे **काही टिपणे** १२१-१३४

युनिटेरियन समाज – साधनसभा – नाताळची पहिली सुट्टी – मिस मॅनिंग – दादाभाई नौरोजी - एक जागृतीतले स्वप्न – रे. चार्लस व्हायसे – शेरलॉक होम्स – Domestic Mission - Postal Mission (पोस्टल मिशन) – संडे स्कूल असोसिएशन साउथ प्लेस नैतिक समाज – पॅरिस - बॉने मोरी – प्रो. रेव्हील – मोस्यु रोज – बॉई बॉला – परे ला शाज - रॉबिन्सन – गुड फ्रायडे - मॅडोमासील ड्युगा – व्हर्सायचा राजवाडा – ऑगस्ट डि कॉम - राममोहन रॉय – १९०२ ची ईस्टर सुट्टी – 'ए' गार्डन – नाताळची सुट्टी – मिसेस मॅक्समुल्लर - बोटींच्या शर्यती – ऑक्सफर्ड - पदवीदान समारंभ.

तिसावे **परत प्रवास** १३५-१४०

शेवटचा निरोप – एक अडचण – ॲम्स्टरडॅमचा खर्च – ॲम्स्टरडॅमची परिषद – व्होलंदाम - कलोन कॅथेड्रल – मोझेसचा पुतळा – नेपल्स – पाँपी – स्वागत – परिशिष्ट १ – मँचेस्टर कॉलेजचे दोन दाखले.

प्रकरण **भाग दुसरा** **[१४१ - २५८]**

पहिले **धर्मसेवा** १४३-१५२

माझी मनोरचना – दोन पक्ष – प्रयोगाचे नाविन्य – पद्धतीचे भेद – माझ्या वेळीची परिस्थिती - नाताळातील धामधूम – बंगलोर – मद्रास – मद्रासचे तिखट – जगन्नाथपुरी – राममोहन रायची आई – माघोत्सव – महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर – कालीमाता.

दुसरे **मुंबईतील स्थानिक कार्यक्रम** १५३-१५६

पोस्टल मिशन – उदार धर्मग्रंथ वाचनवर्ग – तरुण ब्राह्म संघ – घरची स्थिती – जमखंडीचा दौरा – सामाजिक प्रकोप – मुधोळ.

तिसरे **काठेवाडचा दौरा** १५७-१६०

काठेवाडचा दौरा – गिरनार – मियागाव – राममोहन आश्रम.

चौथे **स्थानिक कार्य** १६१-१६३

प्रेमळ गोतावळा – क्रांती – उपासनापद्धती – सुलभ संगीत.

पाचवे **घरच्या अडचणी** १६४-१६५

चंद्राक्का – रात्रीची शाळा – नियमांची गडबड.

सहावे **दौरा** १६६-१६७

नाशिक – एक पंढरीमाहात्म्य – तातडीची तार – उदार धर्म वाचनवर्ग.

सातवे **स्थानिक समाज** १६८-१७५

सातारा समाज – अहमदनगर समाज – सोनईची चळवळ – इंदूर – मांडवगड – नवसारी - सोनगड – बडोदे – मराठ्यांकडून स्वागत – मंगळूर – समाजाची स्थापना प्रेमाचे भांडण - बिल्लवांची गृहस्थिती – पनवेल – कोल्हापूर.

आठवे **भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद** १७६-१९२

ब्राह्मसंघ – मुंबई – काशी – तीन पक्ष – बांकीपूर – मोघीर – भागलपूर– काठीहार – पूर्णिया – कुचबिहार – मंदिर – डुब्री – मैमनसिंग – डाक्का – कलकत्ता सुरत – मद्रास लाहोर – मातोश्रींचा अंत – अलाहाबाद – कलकत्ता – बांकीपूर – कराची – मदतीचे आश्वासन – महायुद्ध.

नववे **ब्राह्मधर्मसूची ग्रंथ** १९३-१९५

प्रकाशन.

दहावे **विविध प्रयत्न** १९६-२०३

पूर्वोतिहास – महात्मा ज्योतिबा फुले – बाबू शशिपाद बंदोपाध्यायजी (बानर्जी) – मुंबईतील एक प्रयत्न – सयाजीराव महाराज – थिऑसोफिकल सोसायटी – के. रंगराव – ब्रिटीश सरकार आणि ख्रिस्ती मिशने.

अकरावे **भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळाची स्थापना** २०४-२१०

पूर्वतयारी – लोकजागृती – अंत्यज आणि एकूण हिंदू यांची प्रांतनिहाय संख्या – तिरपगडा - स्थापना – मंडळीची पहिली कार्यकारी समिती – त्रेवार्षिक अहवाल.

बारावे **सामान्य विचार** २११-२१३

दोन पद्धती – प्रचारकांचे दोन प्रकार – कार्याची घटना – पहिले कार्यवाहक.

तेरावे **कार्याची सुरुवात** २१४-२२२

निराश्रित सेवासदन – पहिली शाळा – हेतू व कार्य – समाचार – सोमवंशीय मित्रसमाज - अनुभवाचा फायदा – मातेचा लळा – आणखी काही प्रयोग – प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी - विद्यार्थी वसतिगृह – मोफत दवाखाना – शाळाखाते.

चौदावे **मिशनची घटना** २२३-२२८

मिशनची घटना – पुणे शाखा – मदतीसाठी जलसा – पहिला बक्षिस समारंभ – पुण्याचा पाठिंबा – मुरळी प्रतिबंधक सभा – मेघवृष्टीने प्रचार – वसतिगृहाची स्थापना – चंदावरकर यांचा दौरा – वेड्यांचे इस्पितळ.

पंधरावे **निधीची योजना** २२९-२४४

निधीची टंचाई – संस्थापनेचा दिनसमारंभ – रुपीफंड – तांदूळ फंड – कापड फंड व पेटी फंड – औद्योगिक शिक्षण – वाडिया ट्रस्टींची मदत.

सोळावे **महाराष्ट्र परिषद** २४५-२५०

मिशनच्या परिषदा – परिषदेची तयारी – पुढाऱ्यांचा मेळावा – कार्याचे क्षेत्र – भाषणे – स्त्रियांची सभा – दोन विघ्ने – अपूर्व कामगिरी – उदार देणगी.

सतरावे **अंतर्बाह्य खळबळ** २५१-२५८

एक प्रश्न – माझी स्थिती – टिळकांस शिक्षा – एक काहूर – दुष्ट वार्ता – शिष्टमंडळ - गौरवपूर्ण उल्लेख – मिशनचा बक्षिससमारंभ – संशयाचे निराकरण – कठीण परीक्षा – मातापित्यांचा अंत – मातापित्यांचे कार्य.

प्रकरण	भाग तिसरा	[२५९ - ३९४]
पहिले	**आयुष्यातील परिवर्तन**	२६१-२६३
	जन्मपत्रिका – ता. २३ एप्रिल, १८७३ जन्मकाल – परिवर्तने १ ते ७ -- ए. के. मुदलियार - कार्यवाहकांची फेरव्यवस्था.	
दुसरे	**अहल्याश्रमाची तयारी**	२६४-२६५
	लेडी विलिंग्डन – आश्रमासाठी जागा – शिष्टमंडळ.	
तिसरे	**नागपूर व हुबळी शाखा**	२६६-२६९
	नागपूर शाखा – हुबळी शाखा – मांगांची वसाहत.	
चौथे	**राजकारणाची सुरूवात**	२७०-२७६
	लखनौ पॅक्ट – राष्ट्रीय ऐक्याची चळवळ -- मराठा राष्ट्रीय संघ -- दुही -- न्या. मू. चंदावरकर -- ना. म. जोशी – विजापूर येथील धर्मकार्य – महार परिषद.	
पाचवे	**अस्पृश्यतानिवारक संघ**	२७७-२८१
	मिसेस् बेझंट – काँग्रेसचा ठराव – अस्पृश्यतानिवारक परिषद – प्रमुख ठराव – व्यंगचित्र - सही नाही – लोणावळे येथील परिषद – नागपूरचे शिष्टमंडळ – रंगपंचमीचा अनुभव.	
सहावे	**हिंदुस्थान सरकारास सूचना**	२८२-२८३
	निराळ्या शाळा.	
सातवे	**बंगलोर शाखा**	२८४-२८७
	कृ. गो. पाताडे – तामिळ प्रांतातील दौरा – बॅ. जॉर्ज – ख्रिस्त्यांचा कावा – रेडा आणि माणूस.	
आठवे	**इमारतींची योजना**	२८८-२९०
	गट १ ला – गट २ रा – तान्याक्काचा मृत्यू – चिमुकला बळी.	
नववे	**निवडणूक**	२९१-२९४
	कार्यपद्धती – १ ला, शेतकरी वर्ग – २ रा, शिपाई वर्ग – ३ रा, शिक्षकवर्ग – ४ था, उदमी - ५ वा, दुकानदार – ६ वा, मजूरवर्ग – ७ वा, अस्पृश्यवर्ग – ८ वा, स्त्रीवर्ग – छत्रपतींचे पत्र - भवानी पेठेतील मारामारी.	
दहावे	**दुष्काळ व इतर कामे**	२९५-३००
	दुष्काळाची आपत्ती – होलिकासंमेलन – सक्तीचे शिक्षण – मद्यपान बंदी – मुरळी – जिवावरचा प्रसंग – इन्फ्लूएंझा.	
अकरावे	**दुसऱ्या गटाची तयारी**	३०१-३०७
	अस्पृशोद्धारक मंडळी -- आक्षेपास उत्तर -- असहकार -- टिळकांचे मत -- गांधींचे मत - नागपूर परिषद.	

बारावे **निवेदन** ३०८-३१०

प्रचारकांच्या बदल्या – निवेदन.

तेरावे **पुनर्घटना** ३११-३१३

अधिकारसंन्यास – पाचवे परिवर्तन.

चौदावे **ट्रस्टींचा गोंधळ** ३१४-३१६

गुप्त कारस्थान – अहल्याश्रमाचे उद्‌घाटन.

पंधरावे **कार्यवाहकांची निवेदने** ३१७-३२५

सर्वांशी समानतेची वागणूक – राष्ट्रीय कार्याची तळमळ – सहकाऱ्यांशी बंधुत्वाचे वर्तन - साहाय्यकारी.

सोळावे **लोकमताचे हेलकावे** ३२६-३२९

लोकमताचे हेलकावे.

सतरावे **सुट्या आठवणी** ३३०-३३४

लाला लजपतराय – सय्यद आणि शिंदे – म्हैसूरच्या राजवाड्यात – धारचे महाराज – गोंडलचे महाराज – घेडोने माटे घेडोन माटे – थूंगावची परिषद – मालाडचा लांडगा – भोकरवाडीतील गाढवी – बंड्या माकड – मुडबीक्षिचा डॉ. ह्यूम – ना. आगाखान.

अठरावे **मंगलोर ब्राह्मसमाज** ३३५-३३७

ड्रॉ. ड्रमंड – मंगलोरचे स्वागत – राजकारणाचे वावडे.

एकोणिसावे **व्हायकोम सत्याग्रह** ३३८-३४१

साधू शिवप्रसाद – व्हायकोम सत्याग्रहाची धामधूम – दिवा व राघवैय्या – मुंबई कॉनिकलमधील तार – नंबुद्री व नायर.

विसावे **बिल्लवांची तक्रार** ३४२-३४३

दहाजणांची तक्रार – दि. ब. बंगेरा.

एकविसावे **कौटुंबिक उपासना मंडळ** ३४४-३५१

विनंतीपत्र – जिजाई ऊर्फ अवलाई – अवलाईची नवलाई – फटका – जुनी श्रद्धा व नवीन सुधारणा यांचा संवाद – वार्षिकोत्सव.

बावीसावे **ब्रह्मदेशाची यात्रा** ३५२-३६२

'मी बौद्ध आहे' – उ कोडण्णा – जिवंत माशांची विक्री – टॉ सिन को : मृतमांस – महादेवराव मांडे – मनुहा – थैली – श्वे डगून पॅगोडा – सगाईन टेकड्या – महाशिव चाँग - भिक्षुणी मठ - श्वे जिन् आणि तु धम्म – चार वर्ग – हाडांचा सांगाडा – उपोसथ – प्राथमिक शिक्षण – तादना बँ – सामाजिक चालीरीती व बायकांचा दर्जा – फोंजी ब्यान : एका भिक्क्षूची अंत्येष्ठी – ब्रह्मी विवाह.

तेवीसावे **शेतकरी चळवळ** ३६३-३६६

अध्यक्षीय भाषण – संस्थानातील स्थिती – दुहेरी व्यवस्था – सारावाढ.

चोवीसावे **ब्राह्मसमाजाचा शतसांवत्सरिक उत्सव** ३६७-३६८

कविसम्राट टागोर – सामाजिक प्रश्न.

पंचविसावे **पूर्व बंगालची सफर** ३६९-३७३

बंगाल्यांतील महापूर – एक कोनशिलासमारंभ – राममोहन रॉयचे स्वप्न – चित्तागाँग – हेमलताबाई - हा पहा ब्राह्मधर्माचा विजय – नोआखली – माझे बंगालीत भाषण – उल्हास दत्त – अभयाश्रम.

सव्विसावे **हिमाचल-निवास** ३७४-३७७

कर्सिआँग – घूम – दार्जिलिंग बाह्मसमाज – कांचनगंगा – केशवचंद्र सेनांची कन्या – पाटणा-बुद्ध गया – विष्णूपद – काशी – बनारस हिंदू युनिव्हर्सिटी – एक नमुनेदार विवाह.

सत्ताविसावे **सत्याग्रह व तुरुंगवास** ३७८-३८७

दौरा – दुसरा दौरा – तिसरा दौरा – माझी अटक – भास्करराव जाधव – तुरुंगातील दिनचर्या - तुरुंगातील कामे – आमांश व गाउटचा आजार – तुरुंगातील धर्माचरण – स्थलांतर – ॲडव्हायझरी कमिटी – मुक्तता – बडोद्याच्या सफरी – ६ वे परिवर्तन.

अठ्ठाविसावे **साहित्यसेवा** ३८८-३९४

पुणेरी पेशव्यांची कामगिरी – कानडी मराठी संबंध – भागवतधर्माचा विकास – पाच भागवत – मराठ्यांची पूर्वपीठीका – साहित्यसंमेलने – समारोप.

१

माझे आजोबा

पहिल्या आठवणी : माझ्या घराण्यातील मी पाहिलेला सर्वात वडील मनुष्य म्हणजे माझे आजे बसवंतराव. त्यांचे मेहुणे व्यंकटराव (व्यंकप्पा) हे माझ्या आजीचे सख्खे भाऊ, हे माझ्या आजीपेक्षा मोठे होते. पण हे आजोबांपेक्षा लहान की मोठे हे मला ठाऊक नाही. हे आमच्या आजोबांच्या आश्रयाखाली आमचेच घरी राहात असत. त्यांची मला फारच अंधुक आठवण आहे. आमचे घरी एक मोठा, काळा, म्हातारा, पाठाळ बैल यल्लमादेवीला वाहिलेला (कंठाळीचा बैल) होता. त्यावरून त्याला कठल्या बैल असे नाव होते. त्याचेवर ओझे लादून व्यंकप्पा आमचे मळ्यातून रोज घरी येत. हीच माझ्या आयुष्यातील अगदी पहिली आठवण होय. व्यंकप्पा फार सात्विक, साधे व सहनशील होते. आमचे आजे बसवंतराव नेहमी त्यांची चेष्टा करीत व तिकडे केवळ दुर्लक्ष करून व्यंकप्पा केव्हा तरी गंभीरपणाने उत्तर देत. ह्या वेळी मी फार तर तीन किंवा चार वर्षांचा असेन.

माझ्या जन्मभूमीचा गाव जमखंडी. हा कृष्णा नदीचे दक्षिणेस ४।। मैलावर, विजापूरचे पश्चिमेस ३६ मैलावर व कुडची (एस्. एम्. आर्.) स्टेशनपासून ३३ मैलावर आहे. विजापूरपैकी लिंगायत तेली जातीच्या देसायांचा हा मूळ गाव. पटवर्धनांनी त्यांच्यापासून हा प्रांत जिंकून घेतला.

अप्पा दप्तरदार नावाचे एक श्रीमंत ब्राह्मण ग्रहस्थ जमखंडीचे यजमान रावसाहेब (गोपाळराव) पटवर्धनांचे वेळी होते. त्यांचा आश्रय आमच्या आजोबास असावा. त्यांचा मळा जमखंडीचे पूर्वेस आलगूरच्या वाटेवर दोन मैलावर होता. तो आमच्या आजोबाकडे पुष्कळ वर्षे लागवडीस होता. आमचे रहाते घराची जागाही ह्या दप्तरदारानीच दिली असे मी ऐकत होतो. पण माझ्या जन्मापूर्वी हा जुना संबंध आधीच पुष्कळ वर्षे तुटलेला असावा. हा मळा मात्र माझे जन्माचे वेळीही आमचेकडेच होता. ह्या मळ्याला 'अप्पांचा मळा ' असे माझ्या लहानपणी म्हणत असत. आता तो अगदी उद्ध्वस्त झाला आहे.

चंद्रोजीराव : आजोबांचे वडील चंद्रोजीराव हे लढाईत मारले जाऊन त्यांच्या सर्व घराण्याचा नाश झाला! ते विजापूरपैकी सुरापूरचे राहणारे. ही लढाई परशुराम भाऊ पटवर्धन ह्यांनी जिंकली, असे इतिहासकार खरेशास्त्री ह्यांनी एका केसरीचे अंकात लिहिले आहे. चंद्रोजीराव शिंदे हे जर सुरापूरचे जहागिरदार असतील तर हे शक्य आहे. पण ते आता कळण्यास मार्ग नाही. सौंदत्ती येथे १२ व्या शतकात शिंदे घराण्याचे राज्य होते. त्या घराण्यातील कोणी पुरुष सुरापूरचा जहागिरदार असल्यास चंद्रोजीरावाचा संबंध शोधून काढण्यास जागा आहे. पण माझे वडील जिवंत असताना मला आपल्या वंशावळीचा शोध करण्याचा विचारही सुचला नाही. आता तर गोष्टी फारच जुन्या झाल्या!

माझे आजोबा एका नदीचे काठी अगदी लहानपणी पोरके आढळले. ही नदी कृष्णा असावी. पुढे त्यांना जमखंडीचे देसायांनी पाळले. कारण पोर पाणीदार व होतकरू होते. देसाई हे लिंगायत असल्याने त्यांनी या मुलाला लिंगायत होण्याला सांगितले. हा तर मराठा मांस खाणारा, म्हणून हे धर्मांतर न आवडून तो देसायांच्या घरांतून निघून वर सांगितलेल्या दतरदाराचा मळा करून स्वतंत्र राहु लागला असावा.

आमचे घरी त्या वेळी फक्त आमच्या आजोबांना व बाबांना मराठी येत होते. बाबांचे मराठी शिक्षण मुलकीत मराठी भाषेत त्या वेळचे मानाने उत्तम झाले होते. आजोबांना लिहता वाचता येत होते. असे मला वाटत नाही. कारण मी त्यांना वाचताना कधी पाहिले नाही. ते फार पाणीदार व कर्तृत्ववान् पुरुष होते. शरीर सडपातळ, उंच, वर्ण चांगला, गोरा, डोळे लाल, भुवया कोरलेल्या, अशी एकंदर उठावदार आकृती होती, त्यांचा पोशाख अस्सल दरबारी मराठेशाहीचा होता. तंगदार पांढरी विजार, घोळदार अंगरखा, पांढरी बिनपळीची बत्ती, मिशा झुपकेदार, शुभ्र, लांब व ताट, एकंदर रूबाब मनात भरण्यासारखा होता. पुरुष हिकमती व विनोदी होता.

एक हिकमत : ह्या बद्दलची एक गोष्ट आमची आई सांगत असे. ती अशी—आजोबा एकदा प्रवासाला गेले असता एका घरी उतरण्यास जागा मागू लागले; पण त्या घरची बाई मोठी खाष्ट होती. तरी तेथेच उतरण्याचा आजोबानी निश्चय केला. नाही होय म्हणताना बाईने गोठ्यात जागा दिली. सायंकाळी बाईने आपल्या मुलास न्हाऊ घालून पाळण्यात निजिवले. एक झोका देऊन बाई आत कामास गेली; पण मूल काही रडण्याचे थांबेना. बाई झोके देऊन जाई, पण मुलाने केवळ आकांत मांडला. पुन्हा बाई मुलास हातात घेई, आजारी व गोंजारी, पण जशी जशी ती त्यास रंजविण्यास इकडे तिकडे खालवर करी, तसतसे ते पोर अधिकच चरफडू लागले. शेवटी बाई घाबरून आजोबांकडे मुलास काही उपचार सुचल्यास तो करण्याकरिता दीनपणाने आली. आजोबांनी मुलास मांडीवर घेऊन त्याचे पोटावरून व पाठीवरून हात फिरविला, तोच मूल स्वस्थ झाले व हसू खेळू लागले. हा चमत्कार पाहून बाईला फारच आश्चर्य वाटले व आनंद झाला. ती आजोबांच्या पाया पडू लागली. तिने लगेच घरात चांगलीशी जागा देऊन आजोबास दोन दिवस सत्काराने मेजवानी दिली.

आजोबांची करामत अगदी साधी होती. न्हालेल्या मुलाला पाळण्यात घालून बाई आत गेल्यावर, आजोबा पाळण्याजवळ जाऊन मुलाच्या कुल्यात अगदी नाजूक जागी एका सराट्याचा लहानसा काटा खोवून ठेवून आल्याने मुलाची तळमळ उडाली होती. जेव्हा बाईने मूल आजोबांच्या मांडीवर दिले, तेव्हा आजोबांनी मुलाचे पाठीवरून हात फिरवीत असता बाईची नजर चूकवून तो सराट्याचा काटा काढून घेतला. मग मूल कशाला रडते! बाईला मात्र आजोबा मोटे अवलिया वाटले.

बसप्पा अथणी : बसप्पा अथणी नावाचा एक श्रीमंत लिंगायत वाणी गृहस्थ माझ्या बाबांचा मोठा मित्र होता. त्याला व्यापारात खोट आल्याने दिवाळे निघण्याची पाळी आली. म्हणून तो जंगलात फांस लावून आत्महत्या करण्यास निघाला असता, माझे वडील रामजीबाबा यांनी त्यास आडविले व धीर देऊन घरी आणले. आमचे घरातील नगद हजारो रुपये व आमचे आईचे

पुरली होती. पुढे हत्यारांचा कायदा झाल्याने ही हत्यारे तशीच पुरलेली राहिली. आजोबा वारल्यावर मी इंग्रजी शाळेत असताना माझ्या वडिलांनी आमच्या वाड्याच्या एका जुन्या भागाची जमीन उकरून ही हत्यारे पाहिली. तलवारी व कट्यारी अगदी गंजून निकामी झाल्या होत्या. ढाली वगैरेचे लोखंडी खिळे गंजलेले सापडले. त्या हत्यारात बंदुकी अजिबात नव्हत्या.

आजोबांविषयी एक आख्यायिका आमची आई सांगे. ती अशी की, एकदा आजोबांनी गोसाव्याचे सोंग घेऊन काही महत्त्वाचे कागदपत्र व टपाल दुसरीकडे लांबचा प्रवास करून पोचविले. शिवाय आजोबांच्या लष्करी साहसाच्या, तरुणपणच्या काही गोष्टी आम्हाला आम्ही लहान असताना सांगून आई आमची करमणूक करीत असे.

शेवटी शेवटी आजोबांना वृद्धपणामुळे अगदी दिसेनासे झाले. ते आपल्या खोलीतून बाहेर सोप्यात जेथे माझा पाळणा बांधलेला असे तिथे भिंतीला टेकून माझा पाळणा हालवीत बसत. मला थोडे थोडे समजत असे. मी त्यांचा लाडका होतो. मला साखरफुटाणे व साखरेतले काजू आजोबा खावयास देत. म्हणून मी नेहमी त्यांच्या आजूबाजूला लाडीगोडी करीत असे. त्यावेळी मला ते काही तरी मजेदार गोष्टी व बालगीते शिकवीत.

माझा जन्म : आजोबा सुमारे १८७८-७९ इसवीत वारले असावे, असा माझा तर्क आहे. त्या वेळी माझ्या बाबांनी संस्थानची नोकरी सोडली, असे आई म्हणत होती. मी. इ. स. १८७३ मध्ये एप्रिल महिन्याचे २३ तारखेला जन्मला, असा माझ्या जन्मपत्रिकेत उल्लेख आहे.

एक स्वप्न : ह्या वेळची एक गोष्ट आठवते. तिजवरून आजोबांचा मी किती लाडका होतो हे दिसते. आजोबा वारण्याचे सुमारास मला देवी काढल्या होत्या. त्या वेळी मी ५ किंवा ६ वर्षांचा होतो; अद्यापि शाळेत जात नव्हतो. देवी टोचल्याने माझे दंड सुजले होते. आजोबांच्या मृत्यूमुळे घराणे शोकात होते. माझ्या दंडावरील जखमांची हयगय होऊन ते सुजून त्यात किडे पडलेले कोणी पाहिलेच नव्हते. दहावे दिवशी दसपिंडीच्या विधीकरिता आम्ही घरातील सर्व मंडळी कृष्णा नदीवर जाणार होतो. आदले दिवशी रात्रभर माझा हात दुखून मला झोप कशी ती आली नव्हती. माझी आई दिवसा नेहमी कामात असे. तिला गाढ झोप लागली होती. तिला स्वप्न पडले. त्यात आजोबा माझ्या पाळण्याजवळ मला कुरवाळीत म्हणाले, "पकुल्या, तुझ्या दंडात किडे पडले असून तुझ्याकडे लेकाचे कुणीच पाहात नाही की रे !" हे वाक्य ऐकून आई जागी होऊन मला पाळण्यात पाहू लागली, तो माझ्या दंडात किडे बुजबुजत असलेले दिसले. तिने लगेच बाबांना जागे केले. नंतर उन्ह पाण्याने माझे दंड धुऊन त्यात टरपेंटाईन घातल्यावर सर्व किडे बाहेर येऊन माझे हात हलके झाले. दुसरे दिवशी सकाळी आईचे स्वप्नाबद्दल आश्चर्य करीत सर्व मंडळी नदीवर दसपिंडाच्या विधीला गेली. मीही त्यांच्यात होतो.

जनाक्का : आजोबा वारण्यापूर्वी १-२ महिने माझी बहीण जनाक्का जन्मली होती. आजोबांना मुळीच दिसत नव्हते. ते एक दिवस पाळण्याजवळ येऊन तान्ह्या जनाक्काला हाताने चाचपून पाहू लागले आणि उद्‌गारले, "हां! बिद्री कासव्वाने अदाळ." जमखंडीपैकी बिद्री नावाचा एक पेठ्याचा गाव आहे. तेथील कासव्वा (काशीबाई) नावाची एक ब्राह्मणाची बाई आजोबांच्या ओळखीची असे. ती फार लठ्ठ असे. जनाक्का लहानपणी जास्त बाळशामुळे लठ्ठ असे; म्हणून ती कासव्वाप्रमाणे आहे. असा आजोबांचा बोलण्याचा आशय होता.

●●●

२

माझी आजी

संताबाई : जमखंडीचे आग्नेयीस मुधोळचे बाजूला निंगनूर (लिंगन + ऊर = लिंगाचे गाव) नावाचे देसायांचे एक खेडे आहे. ही माझ्या आजीची व तिचा भाऊ व्यंकप्पा ह्यांची जन्मभूमी. आमच्या घराण्याची म्हणजे बसवंतरावांची कुलदेवता तुळजापूरची अंबाबाई. तेथील भोपे भाऊराव कदम हे आमचे आश्रित, त्यांच्या वहीत आजोबांचे नाव बसवंतराव आणि आजीचे संताबाई असे आहे. असे मला स्वतः भाऊराव कदम ह्यांनी सांगितले. पण ह्या कानडी मुलखांत आमच्या आजाआजीला लोक बसप्पा व सत्यव्वा असे म्हणत. माझ्या आजीचा स्वभाव करारी व काही अंशी तामसी होता. तिची माहेराकडील कुलदेवता सौंदत्तीची यल्लमा होती. हा संबंध सौंदत्तीच्या शिंदे घराण्याकडे जातो. तुळजापूरची अंबाबाई ही खरी अस्सल मराठ्यांची देवता. आमच्या देव्हाऱ्यावर ह्या दोन्ही देवता असत; पण आजी धार्मिक व आग्रही असल्यामुळे घरी यल्लमाचे प्रस्थच फार असे, तरी भाऊराव कदम आपला हक्क गाजविण्यात वरचेवर येतच.

आजी वर्णाने काळी, रूपाने राकट, पण संसारात शहाणी, फार उद्योगी व कर्तृत्ववान् होती. तिचे माहेर फार गरीब दिसते. एरव्ही तिचा भाऊ आमचे घरी का राहाता ? इतकेच नव्हे तर त्याचा एकुलता एक मुलगा शिद्दु आमच्याच घरी लहानाचा मोठा झाला. शिद्दु हे नाव कर्नाटकी मराठ्यात असते. एकंदरीत बसवंतरावांचा विवाह त्यांच्या आपत्काली झालेला दिसतो. त्यांचा स्वभाव विनोदी व सहिष्णू असल्यामुळे घरगुती बाबी त्यांनी बहुतेक आजीकडेच सोपविल्या होत्या. आजी कष्टाळू व कर्तृत्ववान् असल्यामुळे शेतवाडी, घर, देवधर्म वगैरे सर्वच कारभार स्वतः पाहात असे. आमचे आजोबा फारसे धार्मिक दिसले नाहीत. एकंदरीत आजोबांत मराठ्यांची व आजीत कर्नाटक्यांची लक्षणे भरपूर दिसत. आजी खेडवळ व राकट कुणबाऊ, तर आजोबा नागरिक, दरबारी व गुलहौशी दिसत. पोरकेपणामुळे व जमखंडी संस्थान ब्राह्मणी पडल्यामुळे बिचाऱ्या बसवंतरावांचा खानदानीपणा बराच खाली उतरला.

पुढे त्यांचे एकुलते एक चिरंजीव, माझे वडील रामजीबाबा ह्यांनी आपल्या सुशिक्षणाने आणि आपल्या खंबीर लेखणीच्या जोरावर आमचा खानदानीपणा पुन्हा वर उचलला, तथापि, पुढे तलवारीचे दिवस अजिबात गेल्यामुळे आमच्या घराण्यातल्या जुन्या मराठमोळ्याला ब्राह्मणी तऱ्हा व कारकुनी वळण लागले.

आजोबांचे मागून १/२ वर्षांनी आजी वारली. पण तिच्या फारशा गोष्टी मला आठवत नाहीत. ह्याचे कारण तिचा मला फार लळा नव्हता व ती नेहमी शेताच्या व घराच्या कामात गुंतलेली असे. तिचा स्वभावही प्रेमळ नव्हता. ती घरी शेताचा कापूस आल्यावर तो वटून त्याचे सूत स्वतः कातून

ते कोष्ट्याला देऊन लुगडी विणवून घेत असे. पुढे आम्हाला गरिबी आल्यावर माझी आईही सूत कातून प्रपंच कसा तरी भागवत असे.

पोरकट चोरी : दूधदुभते करण्यात आजी फार वाकब असे. घरच्या दुभत्याचे लोणी कढवून एक गाडगे भरून सुंदर साजुक तूप फडताळात आजीने एकदा ठेविले होते. माझ्या बाबांची एकुलती एक बहीण अंबाबाई तेव्हा आमचे घरीच दुष्काळामुळे राहात असे. भागूबाई नावाची तिची मुलगी, माझा वडीलबंधु भाऊराव आणि मी खेळगडी असू, लहानपणी मी मोठा गोडघाशा, खादाड व चोरटा होतो. घरी गोडधड झाले की आजीने व आईने काही जपून व कोठे तरी दूर ठेविले असले, तरी त्यांच्यामागे ते हुडकून चोरून खाण्यात माझा हातखंडा होता. एकदा आई, आजी व आत्या (तिला आम्ही अक्का म्हणत असू.) ह्या तिघी पाणी आणावयास विहिरीवर गेल्या होत्या. त्या येण्याच्या आत आम्ही तिघांनी ताज्या तुपाच्या मडक्यावर हल्ला केला. मडक्यातून तूप भरलेले वरवर थिजले होते. पण खाली अद्याप पातळ होते. ते आम्हा चोरांना कळले नाही आम्ही घाईत मडके ताटात पालथे केले. तेव्हा भसकन सगळेच तूप पडून उष्टे झाले. आजी तर इकडे येण्याची वेळ झाली. ताटातील तूप काही आम्हा तिघांनाही संपेना. ओटावर, पोटावर, हातावर, कोपरापर्यंत तुपाचे ओघळ पडलेले असा आमचा देखावा पाहण्यासारखा होता. आजी, आई व आत्या तिघी आत आल्या, तेव्हा ताज्या तुपाचा घमघमाट सुटला होता. त्यांनी आमचे ध्यान पाहिल्याबरोबर आम्हाला मुद्देमालासकट पकडले. मग काय ? आम्ही एकमेकावर चोरीचा आरोप ठेवू लागलो. एकाने हुडकुन काढले, दुसऱ्याने खिडकी उघडली व तिसऱ्याने मडके पालथे केले. अशा प्रकारे खरे पाहता सगळेच गुन्हेगार व सगळ्यांचेच हात व तोंडे तुपाने बरबटलेली त्या तिघांनी पाहिली. एकंदरीत ह्या जिवंत चित्राचे जे त्यांना दृश्य दिसले त्यातच त्या तिघी गुंग झाल्यामुळे आम्ही सुटून पळालो.

यल्लमाची यात्रा : सौंदत्तीची यल्लमा ही आमच्या आजीची कुलदेवता, ह्या देवीची भक्ती आजी मोठ्या निष्ठेने करी. तिने ह्या देवीची ताळी देव्हाऱ्यात ठेविली होती. पंढरपूरची जशी माळ तशी ही सौंदत्तीची ताळी—एक सोन्याची सॉव्हरीनसारखी ताळी (पुतळी), नंतर तांबड्या पोवळ्याचे व पांढरे मणी ओवलेली ही ताळी असे. उपास करणे, लिंब नेसणे, दंडवत घेणे, सौंदत्तीच्या डोंगरातील प्रसिद्ध क्षेत्राची यात्रा करणे वगैरे गोष्टीत आजीचा करारी स्वभाव दिसे. मार्गशीर्ष पौर्णिमेला दरवर्षी ह्या यात्रेला जमखंडी येथील यल्लमाची मूर्ती तिचे पुजारी सौंदत्तीला घेऊन जात. हिला जगाची यल्लमा म्हणत. जग म्हणजे एक मोठी ३/४ फुट व्यासाची, वाटोळी, १।।-२ फूट खोल अशी बांबूची परडी असे. तिच्यात यल्लमाचा रुप्याचा भव्य मुखवटा ठेवून तिला खाली मोठे लुगडे नेसवून सजावट करीत. ह्या यात्रेबरोबर जमखंडीच्या आजूबाजूचे २००।४०० स्त्री-पुरुष कोणी गाड्यातून, कोणी बैल-घोड्यांवरून तर कोणी पायी चालत जात. ही यात्रा आटोपून परत आल्यावर एकदम देवळात न जाता जमखंडी गावाबाहेर दक्षिणेकडे कट्टेगिरी म्हणून एक तलाव आहे. त्याच्याजवळ ही सर्व यात्रा उतरत असे. गावातील सर्व भक्तमंडळीने देवीस नैवेद्य न्यावयाचा असतो. मग रात्री मिरवणूक काढून थाटाने मूर्ती देवळात आणीत, गोड खावयास व मौज पहावयाला

सन १८५७ चे नंतर जमखंडीच्या संस्थानिकावर बंडात सामील झाल्याचा वहीम आला होता. तो खोटा ठरावा. म्हणून ह्याच देवतेला आजीने सात मैल दंडवत घालण्याचा नवस करून तो पार पाडला. सुदैवाने जमखंडीकरांचा प्रत्यक्ष संबंध शाबीत झाला नाही. म्हणून काही दिवस बेळगावच्या किल्ल्यात ठेवून, त्यांना परत गादीवर आणून बसविण्यात आले. त्यांचा विश्वासू मसलतदार छोटूसिंग या एका बाणेदार रजपुताने सर्व कारभार आपल्या अंगावर घेतल्याने त्याला मात्र जमखंडी येथे इंग्रज सरकारने फाशी दिले. जमखंडी शहराच्या उत्तरेस कृष्णा नदीचे वाटेवर छोटुसिंगाचे थडगे आहे. हा नवसास पावतो, अशी भोळ्या लोकांची समजूत आहे.

कुंभारहाळ येथे लक्ष्मण नावाचा एक धनगराच्या जातीचा देवर्षी राहात असे. त्याच्या दर्शनाला आमचे वडील मंडळी जात असत.

शिवाय ताईबाई नावाची एक देवता कर्नाटकात पुजली जाते. ही कदाचित् शितळामाता असावी. हिला "येळ मक्कळ ताई" (सात मुलांची माता) असे कानडीत म्हणत. आमच्या वाड्यातील गोठ्यात, एका कोनाड्यात ह्या देवीच्या नावाने एक तिकोनी धोंडा शेंदुर फासून बसविला होता. आमच्या वडिलांना देवी आल्या होत्या त्यातून ते वाचले, म्हणून आमच्या आजीने ही स्थापिली असल्यास न कळे, आमचे बाबा एकुलते एक पुत्र म्हणून हे शक्य आहे. ह्या ताईबाईला दरवर्षी एक आठखुरी मेंढीचा बळी लागत असे. आठखुरी मेंढी दिल्याने आपली मुले सुखी राहतात, अशी समजूत दिसते. त्या दिवशी आमचे घरी मांसाचे जेवणाची मोठी समाराधना होत असे. ही प्रथा मला समजू लागल्यावर माझ्या सांगण्यावरून बंद करण्यात आली.

ह्या शिवाय आमच्या आजाआजीच्या देवता दुसऱ्या विशेष दिसल्या नाहीत. हे सर्व धर्माचरण आमच्या आजीचेच होते. आजोबा आपले तिचे लाड पुरवित असत. आजीनंतर ह्या सर्व देवीदेवतांची श्रद्धा आमच्या घराण्यातून लवकरच नामशेष झाली.

बाबा त्या काळचे सुशिक्षित असल्याने असल्या देवतांवर त्यांची धार्मिक वृत्ती तृप्त होणे शक्य नव्हते. त्यांनी पुढे पंढरपूरचा संप्रदाय पत्करला. ते पंढरपूरच्या वारीला जात होते, पण त्यांनी माळ मात्र घातली नाही. जमखंडीच्या यजमानाजवळ त्यांचे वजन असल्याने त्यांच्या वजनाने आपल्या वाड्याजवळ त्यांनी विठोबाचे एक लहानसे देऊळ बांधविले. त्याला विठोबाचा मठ म्हणत.

शाकाहार : आमची आजी शाकाहारी होती. यल्लमा देवीला मांसाचा नैवेद्य चालत नाही. ही तेलंगणातल्या रड्डी लोकांची देवता. कर्नाटकातले रड्डी व दक्षिण महाराष्ट्रातील मराठे हे एकाच जातीचे असावेत, असे माझे मत मी शास्त्रदृष्ट्या सिद्ध केले आहे. हे तेलंगी रड्डी वैष्णवही आहेत. त्यामुळे ते शाकाहारी बनले, ते व्यंकटेशाचेही उपासक आहेत. आजीच्या भावाचे नाव व्यंकप्पा होते. ह्यावरूनही हाच समज दुणावतो. आमच्या आईच्या माहेरची माणसेही शाकाहारी होती. पंढरपूरच्या वारकरी संप्रदायामुळे आणि आमच्या बाबांची वहिवाट ब्राह्मणमंडळीत फार असल्यामुळे, केवळ आमच्या आजोबांशिवाय आमचे घरी मांसाहारी कोणीच नव्हते. अशा परिस्थितीत ताईबाईचा

३

आजोळ

येथवर माझ्या बाबांच्या व त्यांच्या आईबापांच्या आठवणी झाल्या. आता माझ्या आईच्या आईबापांच्या आठवणीकडे वळू.

कृष्णराव काळे : जमखंडीच्या पूर्वेस ६ मैलावर आलगूर म्हणून कृष्णाकाठी एक खेडेगाव आहे. हे माझ्या आईचे माहेर. माझ्या आईचे नाव यमुनाबाई तिच्या आईचे नाव गंगाबाई व बापाचे नाव कृष्णराव काळे असे होते. गुडघीच्या रोगाने त्यांचा एक पाय गुडघ्यात अगदी वाकडा झाला. त्यामुळे ते तरुणपणीच कायमचे लंगडे झाले होते. म्हणून त्यांना गावात कुंट कृष्णाप्पा म्हणजे लंगडा कृष्णराव असे म्हणत असत. जमखंडी संस्थानात खेड्यातील सर्व लोक कानडीच बोलतात. मराठी कोणालाच येत नाही. माझ्या आजाआजीला मराठी बोलता येत होते. आजापेक्षा आजीला जास्त चांगले येत असे.

पतिव्रता गंगाबाई : वसंतराव मराठी तर संताबाई जशी कानडी, तशी गंगाबाई मराठी तर कृष्णराव कानडी असे हे जोडपे होते. गंगाबाई गोरी होती. कृष्णराव अगदी काळे होते. इकडे वसंतराव गोरे, तर संताबाई काळी होती. बाबांचे घराणे सुखवस्तु, वजनदार होते आणि आईचे गरीब होते. तरी कृष्णरावांचा आलगुरात चांगला दरारा होता, तो त्यांच्या प्रामाणिकपणामुळे होता. गुडघीच्या रोगाने ते वर्षभर अंथरूणावर खिळलेले होते. गंगाबाईने त्यांची अतिशय प्रेमाने व श्रद्धेने रात्रंदिवस शुश्रुषा केली. त्या वेळी माझी आई ५/६ वर्षांची व तिचा भाऊ सोमा नावाचा १/२ वर्षाचा होता. आलगूरचे कुळकर्णी गोंविदाप्पा नावाचे वैष्णव ब्राह्मण मोठे देवमाणूस होते. त्यांची पत्नी सरस्वतीबाई, वडील बंधु बाबासाहेब व एकंदरीत सर्व घराणे अगदी बाळबोध, प्रेमळ व प्रामाणिक असे, कृष्णरावांना या घराण्याचा मोठा आश्रय होता. कृष्णरावांचे या घराण्यात त्यांच्या प्रामाणिकपणामुळे मोठे वजनही होते. एक वर्षाच्या आजारात आमची आजी नेहमी अंथरूणाला धरून बसलेली राहिल्यामुळे चूल आणि मुलाचा सर्व जोजार (भार) माझ्या आईवरच पडला. तेवढ्या लहान वयातही तिने तो बिनबोभाट चालविला. या लहानपणाच्या हालाने आमच्या आईला पुढे सहिष्णुतेचे व दक्षतेचे चांगलेच वळण लागले. माझ्या आईचा सारा जन्मच सहन करण्यात गेला. ते सामर्थ्य तिने लहानपणीच माहेरी मिळविले होते. माझी आजी व तिची नमुनेदार मुलगी माझी आई ही दोन माणसे साऱ्या आलगूर गावाला पातिव्रत्याचा व हिंदु स्त्रियेच्या चांगुलपणाचा एक अनुपम नमुनाच वाटत होता. अद्याप त्यांचे नाव काढले, तर त्यांची माहिती असणारांपैकी न गहिवरणारे माणूस त्या गावात सापडणार नाही.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड -२ रा ~~~

४

माझे बाबा

[जन्म (अदमासे) १८३५ : मृत्यू २७ जून १९१०]

आजे बसवंतराव यांना दोनच अपत्ये. वडील मुलगा माझे बाबा रामजीबाबा आणि धाकटी बहीण, माझी आत्या (आम्ही तिला अक्का म्हणत असू) अंबाबाई. माझ्या बाबांचे रूप व स्वभाव बहुतेक माझ्या आजीचे वळवणावर गेले होते. शेतकऱ्यांचे पोर, निसर्गाचे मांडीवरच खेळून वाढलेले. लहानपणी ते खोडकर होते. तथापि पुढे कोणा एका शास्त्रीबुवांच्या जवळ ते लिहावयाला व हिशेब ठेवायला त्या वेळच्या मानाने फारच उत्तम प्रकारे शिकले. ह्याचे श्रेय आजोबाला, बाबांच्या तैलबुद्धीला किंवा त्या शास्त्रीबुवांच्या चांगुलपणाला द्यावे हे ठरविण्याला आता मार्ग नाही. कारकुनी शिक्षणात तर बाबांचा जमखंडीत नंबर पहिला होता! त्यांचे मोडी अक्षर म्हणजे मोत्याचे दाणे! माझ्या वेळेला बाबा तर मुलांना कित्ते घालून देत. जमाखर्चात जमखंडी दरबारात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. मामुली शिक्षण संपल्यावर संस्थानात बिद्री नावाचा एक पेट्याचा गाव आहे. तेथे त्यांना प्रथम शिक्षकाची नोकरी लागली. त्या वेळी ब्राह्मणी संस्थानांत ह्या मराठ्याच्या मुलाला शिक्षकाची नोकरी मिळाली ही सामान्य गोष्ट नव्हती. ही शाळा सरकारीच असली पाहिजे. एरवी हा खाऊनपिऊन सुखी अशा मराठ्याचा एकुलता एक लाडका मुलगा, खासगी शाळा काढावयाला जमखंडी हा राजधानीचा गाव सोडून बिद्रीसारख्या पेठ्यात का गेला असता? ह्या सर्व गोष्टीत त्या शास्त्रीबुवांचे काही अंग आहे. त्या ब्राह्मणाचे लक्ष ओढून घेण्यासारखे काही विशेष पाणी बाबांत असले पाहिजे. हे पाणी आमच्या आजोबांकडून आले असावे. ते मजमध्ये किती आले, हे ठरविणे माझे काम नव्हे.

पांढरपेशी शिक्षण : नुसते कारकुनी शिक्षणच नव्हे, तर धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र वगैरे सांस्कृतिक विषयांची तांत्रिक माहिती बाबांना बरीच होती, हे मला समजू लागल्यापासून माझे नजरेस येऊ लागले. त्यांना संस्कृत येत नव्हते, तरी मराठीतील संस्कृत तत्सम शब्दांचे कठीण अर्थ त्यांना समजत असत. इतके त्यांचे प्राकृत पोथ्यांचे वाचन झाले होते. त्या काळच्या प्राकृत पौराणिक सर्व पोथ्यांचा व मूलस्तंभ पंचांगे वगैरे शास्त्रीय वाङ्मयाचाही संग्रह त्यांनी चांगला केला होता. ह्यावरून त्यांची वाङमयभक्ती दिसते. माझ्या लहानपणी एक शास्त्री पुराण सांगावयाला आमचे घरी नेहमी येत. ह्यावरून गुणी माणसांची संभावना करून खानदानी लौकिक राखण्याची बाबांची प्रवृत्ती चांगली दिसते. त्यांचा हात सढळ होता, किंबहुना ते बेहिशेबी मराठा होते असे म्हटले तरी चालेल. कारकुनी हिशेबात ते कोणालाही हार न जाणारे असता संसारातील काटकसरीने ते फार मागासलेले होते हे मोठे आश्चर्य! सर्व जातीतील संभावित माणसांचा त्यांना स्नेह व लळा होता.

तेही त्यांनी १५-१६ वर्षे मागितले नाहीत. पुढे आमच्या घरी आम्ही दारिद्र्याच्या भयंकर यातना सोशीत असताना ही तसलमात परत मागण्याच्या याद्या कितीदा तरी श्रीमंत आप्पासाहेबांकडे केलेल्या मी पाहिल्या ; पण कवडीही परत मिळाली नाही.

तरुणपणी बाबांच्या हातात चार पैसे खेळत, म्हणून त्यांनी प्रथम प्रथम ऐषआराम केला. पण त्यांचा धर्माकडे स्वाभाविक असलेला ओढा बळावला, विशेषतः पंढरपूरच्या वारकरी पंथाचा त्यांना फारच नाद लागला. प्रथमपासून त्यांचा स्वभाव प्रेमळ, श्रद्धाळू, उदार आणि करारी असे. त्यांच्या प्रामाणिकपणाचा किंबहुना सर्वच आमच्या घराण्याच्या प्रामाणिकपणाचा लौकिक जमखंडी संस्थानात गाजत होता.

बाबांची रसवंती : मी अगदी लहान असताना बाबांच्या मित्रांपेकी म्हातारबा सुतार, बसाप्पा अथणी (लिंगायत) आणि बापू जामदार (मराठे) हे वरचेवर घरी येत. नंतर मी थोडा मोठा झाल्यावर सटवप्पा सुतार आणि पांडाप्पा टर्की (ब्राह्मण वारकरी) हे येत असत. पण बाबा काही फारसे कोणाचे घरी जात नसत. आमच्या वाड्यात सोप्याच्या उजव्या बाजूस एक चारपाच फुट लांबरुंद, स्वच्छ व प्रशस्त चुनेगच्ची कट्टा असे. ह्याला आम्ही तुळशीकट्टा म्हणत असू. कारण पूर्वी येथे तुळशीवृंदावन होते. ह्या कट्ट्यावर बाबा मी आपला ते आपल्या मित्रांशी बोलत बसत. मी आपला तेथे घुटमळत असावयाचा. कारण बाबांचे संभाषण मला आवडत असे. मला वाटते माझे अंगी जर काही वक्तृत्व आले असेल तर त्याचे प्रथम बीजारोपण बाबांच्या अकृत्रिम, साध्या व जोमदार रसवंतीने केले असावे. रूपाने, रंगाने व स्वभावाने मी अगदी बाबांचे वळणावरचा आहे. असे मला लोक म्हणत असत.

जमखंडीस पंढरपूरचा भजनी संप्रदाय वाढविण्याच्या कामी बाबांचा पुढाकार होता. नरसप्पा नावाचे एक रजपूत गृहस्थ फार सात्विक होते. मी त्यांना कधी पाहिले नाही. ते जमखंडीस हा पंथ काढण्यात मुख्य होते. असे मी ऐकले होते.

विठोबाचा सप्ताह : आमचे घराजवळ ' आप्पासाहेबांची विहीर' म्हणून एक पिण्याच्या पाण्याची मोठी विस्तीर्ण व खोल विहीर आहे. तिचे काठी सटवाप्पा सुताराचे घर व सुतारीचा कारखाना आहे आणि त्याचे समोर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस विठोबाचा मठ आहे. फाल्गुन वद्य द्वितीयेपासून (ही श्री तुकारामबोवांची पुण्यतिथी) तो पुढच्या षष्ठीअखेर (ही श्री एकनाथस्वामींची पुण्यतिथी) पाच दिवस आणि त्यापूर्वी व नंतरचे दोन दिवस असा दरवर्षी त्या मठात भजनाचा मोठा सप्ताह साजरा केला जात असे, सात दिवस वीणा रात्रंदिवस खाली ठेवायचाच नसतो. दररोज काकड आरती, शेजारती सकाळ संध्याकाळ होई. त्या वेळी मोठी गर्दी जमे. ३०-४० नियमित टाळकरी लंबगोलात उभे राहात. मध्ये वीणेकरी उभे राहात. दोहो बाजूस या गोलाचे शेवटी दोन मृदुंग्ये उभे असत. आरतीचे वेळी भजनाच्या सोहळ्याला फार रंग येई. बीजेच्या व षष्ठीच्या आरतीचा थाट मोठा होई. कुरमुरे, नारळ व बत्तासे ह्यांनी भरलेली खिरापतीची ताटे ऐकणारे स्त्रीपुरुष आणीत. आरतीचे वेळी गुलाल उधळला जाई. बुका, उदकाड्या, कापूर यांचा घमघमाट सुटे. टाळकऱ्यात मुले उभी राहात. त्यात मी व माझा मोठा भाऊही असू. वीणेकरी हरीबा

५

माझी आई

[जन्म (अदमासे) १८४० : मृत्यू ८ फेब्रुवारी १९१०]

येथवर आठवणी लिहून कोणाचीच जन्माची किंवा मृत्यूची तिथी, महिना अगर निदान वर्ष तरी मी का लिहिले नाही याचे कारण मला माहीत नाही. माझ्या बाबांचा चौकसपणा, सुसंस्कृतपणा इतका होता की, त्यांनी आमच्या घरच्या पुरोहितांकडून घरच्या सर्व मुलांच्या जन्मपत्रिका ज्योतिष शास्त्रान्वये वर्तवून ठेविल्या आहेत. सुदैवाने तेवढ्या तरी आम्ही अद्यापि जपून ठेवल्या आहेत. मी मोठा झाल्यावर मला आपली जन्मभूमी बदलावी लागली. इतकेच नव्हे तर मी एवढी मोठी परीक्षा इतक्या मागल्या काळात पास होऊनही आपल्या संसारात लक्ष न घालता आजन्म दारिद्र्याचे व्रत घेतले. त्यामुळे व्यवहारात मी बाबांपेक्षाही अधिक नालायक व निष्काळजी ठरलो. बाबांनी कर्जाखाली खानदानी घालविली तर त्यांच्यापेक्षा सुशिक्षितपणाचा कांदा त्या मी ती कधीच मिळविली नाही, किंबहुना खानदानीने राहण्याला मी अपात्र ठरलो. तशात काही वर्षे मुंबईत व नंतर पुण्यात नेहमी बदलणाऱ्या भाड्याचे घरात राहावे लागल्यामुळे बाबांच्या पोथीपुस्तकांची व कागदपत्रांची मी अक्षम्य हयगय केली आणि दैवहत असा मी आता आठवणी लिहीत बसलो आहे! फार काय पण मी माझा स्वतःचा पत्रव्यवहारही जपून ठेवला नाही. ही चूक मला खेद देत आहे.

बाबांचे लग्न : माझी आई आलगूर या गावी जन्मली. ती आपल्या आईबापाची बहुतेक पहिलीच मुलगी असावी असे तिच्या बोलण्यावरून दिसते. नंतर काही मुलानंतर आता हयात असलेले आमचे मामा रामजीबाबा व शेवटची मुलगी आमची मावशी तानूबाई ही होय. आमच्या आईची पहिली मुलगी बाळाबाई हिचेपेक्षा माझा मामा रामजी हा लहान असावा असे दिसते. सोमा मुलगा अगदी लहान असताना आलगूरचे आजोबा एक वर्ष गुडघी रोगाने आजारी पडले. त्या आजारात चूल व मूल याची सर्व जबाबदारी माझ्या अगदी लहान असलेल्या आईवर पडली. आईचे लग्न ह्या आजारापूर्वी झाले की मागाहून झाले हे कळत नाही. आमच्या घरची स्थिती जर चांगली होती आणि माझे बाबा जर शिकलेले व हुशार होते तर माझ्या आजोबांनी अशा गरीब व लंगड्या मनुष्याशी सोयरीक का केली बरे ? यावरून वाटते की, माझ्या आईबाबांचे लग्न अगदी लहानपणी-म्हणजे माझ्या बाबांच्या शिक्षणापूर्वी झाले असेल. म्हणजे माझी आई सात वर्षाची व बाबा बारा वर्षाचे असतील. हा सर्व केवळ अजमासच आहे. या अजमासाला आणखी एक कारण आहे. माझे बाबा लहानपणी फार खोडकर असत. विशेषतः त्यांना झाडावर चढण्याचा नाद असे. माझ्या आजोबांचे मळ्यात एक मोठे केवड्याचे झाड होते. केवडा काढावयास जाऊन बाबा लहानपणी

सासुरवास : माझ्या आईच्या अंगी ही दैवी पात्रता येण्याला तीन प्रकारचे टाकीचे घाव तिला अगदी लहानपणापासून तो अगदी मरणाचे दारापर्यंत, जवळजवळ ७० वर्षे सोसावे लागले. प्रथम माहेरच्या दारिद्र्यामुळे आणि बाप लंगडा व आई कर्तृत्वहीन असल्यामुळे माझ्या आईचे झालेले हाल, दुसरे तिला परकीयांचे म्हणजे वैष्णव ब्राह्मणांचे लागलेले वळण आणि तिसरे तिला झालेला कठीण सासुरवास, तिसरा जो सासुरवास त्याच्या गोष्टी आईने आमच्या लहानपणी ज्या उठता-बसता सांगितल्या त्या ऐकून आमचे कोवळे हृदय करपत होते. आमच्या आजीचा-संताबाईचा-स्वभाव खाष्ट होता. ती फार क्रूर होती अशातला प्रकार नव्हता; पण अगदी हेकट, सहानुभूतिशुन्य आणि पक्षपाती होती. तिला दोनच मुले होती व त्यातल्या त्यात तिचे प्रेम तिच्या मुलीवर, अंबाबाईवर जास्त होते. गरिबीमुळे ही मुलगी आमच्या घरीच राहात असल्यामुळे सासूच्या कहरात नणंदेची भर पडत असे. त्यामुळे ती सुनेला मरेमरेतो राबवी.

आमचा रयतावा : आमचे घरी रयतावा मोठा होता. दावणीत औताचे आठ बैल तर असतच ; शिवाय गाई, म्हशी आणि वासरांचे खिल्लार असे. आजी रानात गड्यांच्या बरोबर सर्व काम स्वतः करी. तिचा भाऊ व्यंकप्पाही राबत असेच. माझ्या आईला मात्र शेतात जावे लागत नसे. पण घरकामाचा बोजा लहानपणापासून एकटीवरच पडे. नणंद होती तिचा उपयोग चहाड्या सांगण्यापुरताच. आजोबा, आजी, बाबा, नणंद, अंबाबाई, केव्हा केव्हा तिचा नवराही, व्यंकप्पा, त्याचा मुलगा शिद्दु, आम्ही दोन तीन मुले, अंबाबाईची मुलगी भागूबाई, दोन चार गडी माणसे व याशिवाय अतिथी, बैरागी, पाहुणे इतका हा नेहमीचा राब! सकाळी चार वाजल्यापासून दळणाची घरघर सात वाजेपर्यंत चाले. मग विहिरीतून पाणी आणणे, स्वयंपाक, भांडी, धुणे, जेवण होते न होते तोच सूत कातणे, मग इतक्या बैलांच्या शेणाच्या गोवऱ्या करणे. शिवाय रात्रीचा स्वयंपाक. श्रीमंत आप्पासाहेबांचे राहाणे जमखंडीहून १।। मैलावर डोंगरात रामतीर्थ नावाचे ठिकाणी असे. ते काम आटोपून यावायाला रात्री ११।१२ वाजत. तोपर्यंतही घरचे काम आटपत नसे. बाबा कामावरून लौकर येत नसत. पुन्हा भल्या सकाळी दळणाला उठावे लागत असे. बाबांचे आणि आजोबांचे वैभव असता तरुण सुनेला इतके काम का? तर त्या काळची साधी आणि कष्टाळू राहाणी आणि विशेषतः आजीचा हेकटपणा. आजोबांना हा सासुरवास आवडत नसे. पण नित्याची कटकट करणेही त्यांच्या सुखवस्तु स्वभावाला पटत नसे. नशीब आईचे !

हालअपेष्टा : आईला नुसता कामाचा भार नसे. तिला एकदा जी अगदी लहानपणी सासरी आणली होती ती माहेर ६ मैलावर असूनही २-४ वर्षात एकदाही तेथे पाठविण्याची मारामार पडू लागली. कारण माहेरची माणसे गरीब, आईचे बाळंतपण करण्यासही असमर्थ. घरात वस्त्रांलकारांची रेलचेल असूनही सुनेला ते घरात घालून तिचे कौतुक करण्याची सहृदयता आजीत नसे. इतकेच नव्हे तर आपल्या लाडक्या मुलीला तितकेच दागिने नाहीत म्हणून काही अंशी मत्सरही आड येत असावा. हिंदु सासुरवासाची नाजूक कारणे इतकी आहेत की, जुन्या वळणातील सर्व लोकांनासुद्धा त्यांची मीमांसा करता येत नसे. आमच्या बाबांचाही स्वभाव फार रागीट असे. मुले होऊ लागेपर्यंत एक प्रकारचा जाच व मुले होऊ लागल्यावर तो एक दुसराच भार. आमच्या आईला एकंदर वीस मुले झाली (एक खंडीभर अशी म्हण आहे.) त्यापैकी एकाच वेळी पाचाहून जास्त केव्हाच नव्हती.

स्वभाव शांत व सहनशील असल्याने आम्हा दोघांनाही तिच्या रागाचा धाक मुळीच वाटत नसे. पण बाबांचा, नुसता त्यांच्या नावाचाही आम्हास जबर धाक असे. ते घरी असेतोपर्यंत त्यांच्यासमोर उभे राहण्याचीही आम्हाला छाती होत नसे. ते बाहेर गेले की, ताबडतोब आमच्या धांगडधिंग्याला सुरुवात होई. माझा मोठा भाऊ माझ्या आईसारखा शांत व मवाळ होता. तो आमच्यात फारसा मिसळत नसे. धाकटी तान्याक्का थोडी मोठी झाल्यावर आमच्याबरोबर खेळावयास येई. पण ती फारच भोळसर असल्यामुळे आम्ही सांगू ते ते ती मुकाट्याने करी. माझा मोठा भाऊ इ. स. १८८५ साली पावसाळ्यात पटकीच्या रोगाने वारला. त्या वेळी गावात ही साथ बरीच होती. म्हणून जमखंडीच्या गावकऱ्यांनी मरीआईची मोठी यात्रा केली. त्या वेळी कित्येक रेडे, पुष्कळशी बकरी व कोंबड्यांची तर गणतीच नाही, इतक्या प्राण्यांचा वध झाला !

आमचा वाडा : इतकी मुले लहानपणी वारण्याचे कारण आमच्या वाड्याची आरोग्याच्या दृष्टीने परिस्थिती वाईट होती. आमचे घराचे पच्छिमेला लागून एक मोठे तळे होते. त्याच्या खालच्या सखल भागात आमचा वाडा असे. सांडपाणी जाण्याला कोठे वावच नव्हता. दक्षिणेलाही आमच्या घराचे मागे उंचवटाच होता. स्वयंपाकघरात एक न्हाणी होती व बाहेर सोप्याचे खाली मोठ्या दरवाजाला लागुनच एक दुसरी न्हाणी होती. पण दोनही न्हाण्यांचे सांडपाणी दोनचार हातावर जमिनीतच जिरत असे. अर्ध्या घरात अंधार, ओल व कोंदट हवा असे. मोठा मुख्य दरवाजा उत्तरेकडे तोंड करून होता व त्याच्या आत थोडे अंगण व थोडी पडवी होती. हवा आणि उजेड यावयाला काय ती एवढीच वाट होती. दक्षिणेच्या बाजूला तीन खिडक्या होत्या. त्या लहान होत्या व त्या बाजूला गावचे लोक शौचास बसत. म्हणून त्या आम्हाला झाकाव्या लागत. उजेडाला साणी राखली होती. त्यातून दोन प्रहरी ऊन पडे. पण हवा येणे शक्य नसे. आरोग्याचे दृष्टीने हे घर अतिशय वाईट असे. मोठ्या दाराच्या पुढे सुमारे एक एकराचे अंगण असे. त्यात उकिरडे, कडब्याच्या गंजी, गोवऱ्याचे हुडवे, शेणाचे ढिगारे असत. वायव्य कोनास एक पेवाचा पायखाना असे. त्याचा उपसाही वेळेवर होत नसे. एवढेच बरे होते की, आमच्या वाड्याच्या दक्षिण, पश्चिम व उत्तर बाजूने बऱ्याचं अंतरापर्यंत दुसऱ्या कोणाचेही घरे नसत. पश्चिमेच्या बाजूला तर मोठे विस्तीर्ण तळे (लक्कनकेरी नावाचे) आणि त्याच्या पश्चिमेस मोठा डोंगर होता. आमचा वाडा गावाच्या पश्चिम हद्दीवरचा शेवटचा होता. वाड्याबाहेर जरी मोकळी हवा मुबलक होती. तरी आतली स्थिती अपायकारक होती. बाळंतपणात बाळंतिणीचे खोलीतच एक खड्डा खणून त्यातच बाळंतिणीला १०-१२ दिवस न्हाऊ घालीत. अशा स्थितीत इतकी मुले लहानपणीच वारली हे आश्चर्य नसून आम्ही ५-७ जण कसे वाचलो हेच आश्चर्य होय !

आईच्या गोष्टी : दर दुसरे वर्षी आमच्या आईचे बाळंतपण हे ठरलेलेच असे आणि त्या वेळी मागले मूल काही जिवंत नसे. बाळंतपण, मुलांचा आजार किंवा मरण याखाली माझ्या आईची सर्व शक्ती खचली, तरी पण मुलांचा कंटाळा किंवा संसाराचा-तिटकारा-किंबहुना दु:खाचा किंवा निराशेचा एक उद्‌गारही कधी आईच्या तोंडातून आमच्या कानांवर आला नाही. उलट दारिद्र्याच्या असह्य वेदना, नवऱ्याचा रागीट स्वभाव व मुलांचा जोजार सोसूनही आम्हा लहानग्यांना नेहमी

मुले व आई हेच पंचायत आत्मसंतोषाचे दिव्य आगर होते. आमच्या भोवतालचे भंगुर वैभव कसे पार नाहीसे झाले याचे एकच हृदयद्रावक उदाहरण सांगतो. आमच्या राहात्या घरातील माया तर सर्व गेलीच; पण आमच्या बाहेरच्या विस्तीर्ण अंगणात चौफेर कुळवाडी होती. म्हणजे भोवताली खोल्यातून गरीब भाडोत्री कुटुंबे राहात असत. त्यांच्यापासून बाबा काही भाडे घेत असतील, असे मला वाटत नाही. कारण त्या वेळी घराला भाडे घेणे लाजीरवाणे गोष्ट समजत. हळूहळू ही सर्व कुळे परागंदा झाली. त्यांच्या धाबीवजा खोल्यांच्या दुरुस्तीचा त्राण आमच्यात उरला नाही. स्वतः आमच्या जळणाची पंचायत पडू लागली. मग काय विचारता! या पडक्या खोल्यांच्या मोठ्या तुळया व वासे आम्ही सोळा वर्षात सरपण करून जाळले. 'विठू वासे आण ' म्हणून आईने सांगण्याचा अवकाश, की एका हाताने शेंडी व दुसऱ्या हाताने लंगोटीचे शेपूट ओढीत मी वासे ओढावयाला धावलोच ! पांडवप्रतापांतील द्रौपदीवस्त्रहरणाचे चित्र मी पोथीतून पाहिलेच होते. दुःशासनाचा आविर्भाव आणून मी आमच्या जुन्या वाड्यातील अंगणाचे बाजूच्या धाब्याचे वासे ओढीत असे आणि मोठ्या फुशारकीने आईला जळण नेऊन देत असे.

करवीरची यात्रा : घराचे आणि संसाराचे काही होवो, बाबांच्या देवदेवतेमध्ये व भजनपूजनात काही खंड पडला नाही. आजी वारल्यावर दोनतीन वर्षांनी बाबांना दत्ताच्या उपासनेचा नाद लागला. घरी श्रीगुरुचरित्राच्या पोथींचे पारायण चाललेले. बाहेरची भाविक मंडळी ऐकावयास येत व बाब मोठ्या खड्या आवाजात पोथी वाचून अर्थ सांगत. जमखंडीत काण्णव आळीत एक दत्ताचे देऊळ आहे. तेथे बाबा सायंकाळी भजनाला जात. त्याच वेळी नरसोबाच्या वाडीची आणि कोल्हापूरच्या यात्रेची टूम निघाली. त्या वेळी आमच्या घरचे गाडीबैल, गडीमाणसे होती. बाबा, आई, आम्ही चार भावंडे, एखादे पाचवे तान्हे मूल, शिवाय चिऊबाई नावाची काण्णव आळीतील एक विधवा ब्राह्मणाची बाई (ही आमच्या घरची पुरोहित चंद्रभट डेंगरे यांची बहीण होती) व आमच्या तुकाराम नावाचा मराठा गडी इतकेजण आमच्या स्वतःच्या गाडीतून कोल्हापूरचे महालक्ष्मीचे यात्रेस निघाले. वाटेत अथणी, शेडबाळ, कागवाड, कुरुंदवाड, मिरज, सांगली, हातकणंगले वगैरे लहानमोठी गावे आम्ही पाहिली व नरसोबाच्या वाडीत श्रीदत्ताची यात्रा केली.

एका ब्राह्मणाची घरी उतरून आम्ही देवाचा नैवेद्य व ब्राह्मणभोजन केले. कोल्हापुरास गावाबाहेर पूर्वेकडे एकवेरीचे देऊळ आहे. त्याच्या ओवरीत आम्ही तीन दिवस उतरलो होतो. कोल्हापूरचे राजधानीचे वैभव, अंबाबाईचे भव्य देऊळ, त्याचे महाद्वार, कोल्हापुरातील पाण्याचे नळांना लावलेली सुंदर गायमुखे, रंकाळे व पदमाळे हे तलाव या साऱ्यांचा मनावर चांगला ठसा उमटला. एकवेरी देवळातील अंगणात एक मोठा विस्तीर्ण चबुतरा आहे. त्यावर खेळत असता तेथील एका मुलीशी भांडण होऊन माझी मारामारी झाली. "विठ्या, तू कोठे गेलास तरी तुझी आगळीक काही थांबत नाही ना रे!" असे म्हणून आईने मला त्या वेळी मारामारीतून सोडविले.

येथपर्यंत माझ्या पूर्वजांचा वृत्तान्त संपला. येथून पुढे माझ्या स्वतःच्या पिढीचा वृत्तान्त सुरू होत आहे.

●●●

६

आमची लग्ने

तीन लग्ने : माझा भाऊ, मी आणि माझी धाकटी बहीण ह्या तीन भावंडांची लग्ने एकाच वेळी जमखंडीत बाबांनी केली. बहुतकरून ही लग्ने कोल्हापूरच्या यात्रेनंतर इ. स. १८८२ च्या सुमारास मे महिन्यात (वैशाखात) झाली असावी. सालाची खात्री नाही. १८८२ हे साल नक्की असेल तर माझे वय त्या वेळी ९ वर्षाचे, भाऊचे १४ वर्षाचे आणि बहिणीचे ४ वर्षाचे होते. ही लग्ने करण्यात बाबांचा फार अव्यवहारीपणा व अविचार दिसतो. माझ्या भावाचे वय फार तर शोभण्यासारखे होते ; पण माझे वय व माझ्या बहिणीचे वय अगदीच अक्षम्य होते. वधूची पारख म्हणावी तर माझ्या भावाची वधू फार तर ५-६ वर्षांची होती. ती जमखंडीतील नातलगांची होती. माझी वधू माझ्या आत्या अंबाबाई हिची सर्वात धाकटी मुलगी, ही पुरी एक वर्षाची तरी होती की नव्हती ह्याची शंकाच आहे. आई तर म्हणत होती की, ती सहा महिन्यांची होती. लग्नाचे वेळी तिला नीट बसताहि येत नव्हते. तीन लग्ने एका वेळी करू नयेत अशी आमच्या आईची समजूत होती. पण तिचे कोण ऐकतो ? मला आपली मुलगी द्यावी असा माझ्या आत्येचा आग्रह होता. मी तिचा फार लाडका होतो. माझा वडील भाऊ १३-१४ वर्षांचा झाला म्हणून त्या वेळचे समजुतीप्रमाणे तो लग्नाला योग्य झाला होता. तशात आमच्या घरात बऱ्याच वर्षात लग्नकार्य होण्याचा प्रसंग आला नव्हता. त्या वेळी जरी आमच्या घराण्याला पूर्ण दारिद्र्य आले नव्हते, तरी कर्ज काढल्याशिवाय लग्न होणे शक्य नव्हते. लग्नाचे वेळी घरातील जे काही दागिने उरले होते, तेही पण गहाण ठेवणे शक्य नव्हते. म्हणून बाबांनी आमचा वाडा गहाण ठेवून प्रथम कर्ज काढले. ते चिंतोपंत भिडे ह्या नावाच्या त्यांच्या एका मित्राकडून अस्सल मुद्दल ५०० रुपयांचे होते. धान्य वगैरे घरचे असावे.

सालंकृत कन्यादान : ह्या तिन्ही लग्नाचा खर्च बाबांच्याच अंगावर पडला. कारण माझ्या भावाचा सासरा हा गरीबच होता. माझा सासरा रामजी माने हा दुष्काळात आमचेकडेच होता. तेव्हा ही दोन्ही लग्ने आमच्याच खर्चाने करावी लागली. माझ्या बहिणीचे सालंकृत कन्यादान केले. तिचे सासरचे घराणे आसंगीचे चांगले खाऊनपिऊन सुखी होते. तरी सर्व खर्च बाबांनी कर्ज काढून केला. यावरून आमचे बाबांचे जवळ जरी स्वतःची फारसी माया उरली नव्हती. तरी त्यांची पत बरी होती म्हणावयाची. आसंगीचे व्याही गोपाळबाबा कामते नावाचे सभ्य गृहस्थ आणि समजूतदार रयत होते. पण वराला लिहितावाचता येत नव्हते. सुखवस्तु बापाचा तो एकुलता एक लाडका मुलगा होता. त्याचे वय माझ्याइतकेच म्हणजे ८-९ वर्षांचे होते. नाव कृष्णराव होते. गोपाळरावांची बायको द्वारकाबाई ही स्वभावाने खाष्ट व मत्सरी होती. या लग्नाचे वेळी माझे आईचे पायाला नारू होऊन ती फार आजारी होती. मुख्य वरमाई अशी आजारी, घर दुसरे कोणी कर्ते वडील माणूस

नाही. अशा वेळी ही लग्ने बाबांनी कर्ज काढून उभारली! ब्राह्मणाला दक्षिणा देऊन मुहूर्त व लग्नपत्रिका वर्तविली असेल. पण यापैकी एकही स्थळ माझ्या आईला मान्य नव्हते.

व्याह्यांचा धिंगाणा : लग्नसमारंभात आईची हेळसांड झाली. आमच्या बाहेरच्या विस्तीर्ण अंगणात मोठा मांडव घातला होता. अर्थात् याच मांडवात माझ्या बहिणीचे लग्न लोकरीतीप्रमाणे आमचे घरी झाले. पण माझ्या आत्येची घरची गरिबी फार म्हणून माझेही लग्न यात मांडवात झाले आणि तीन लग्ने एकाच मांडवात करून नयेत म्हणून माझ्या भावाचे लग्न मात्र त्याच्या सासऱ्याच्या घरी झाले. पण जेवणाखाण्याचा सर्व खर्च बाबांचा. खर्च आमचा पण देखरेखीला आमचेकडेचे कोणी नसल्यामुळे एकंदर लग्नसमारंभात चार दिवस एकसारखी अंदाधुंदी चालली होती. मी लहानपणी फार खेळकर होतो. हळदी लागल्यावर नवऱ्या मुलाने बाहेर जाऊ नये, असे असता मी लग्नाचे वेळी तळ्यावर खेळत होतो. तेथून मला धरून आणिले. माझ्या बायकोला तर पाळण्यातून आणून माझेच मांडीवर बसविले. ती माझी आतेबहीण असल्यामुळे पूर्वीपासून माझा तिचा लळा होताच. लाजावयाचे कसे ते आम्ही शिकावयाचे पुढेच होते. सर्व खर्च आम्ही करून व्याह्यांनी म्हणजे माझ्या व माझ्या भावाच्या सासऱ्यांनी बाबांना लग्नात फार त्रास दिला. वरपक्षाने हिणवावयाचे ते उलट वधूपक्षांचीच कारवाई फार चालली. शेवटी गावजेवणाचे दिवशी रात्री बारा वाजता पाने पडली. पण काही तरी भांडण काढून जेवावयाला आलेली बरीच मंडळी पानावरून अभद्रध्वनी काढीत निघून गेली. ही हकीकत माझी आई पुढे किती दिवस तरी सांगून आमची करमणूक करीत असे.

केळवण : आमची ही तिन्ही लग्ने सायंकाळी गोरज मुहूर्तावर झाली. लग्नसमारंभ ४-५ दिवस यथासांग झाला. हळदी, रुखवत, रासन्हाणी, अक्षता, लग्नानंतरचे नवरानवरीचे खेळ, नवऱ्याला बागेत नेणे वगैरे सर्व सोहळे झाले. लग्नात केळवणासाठी इतक्या घरी जेवणास जावे लागले की, मला फारच कंटाळा आला होता. सर्व ओळखीची माणसे एकाच दिवशी जेवणास बोलावणार. मग जेवण कसचे होते! नुसता भात किंवा शेवयाचे ताट पुढे ठेविले की त्यावरचा गूळ किंवा साखरेला थोडा हात लावला की झाले जेवण ! आणि प्रत्येक घरी वाजंत्री लावून जावयाचे असे, मी अगदी बेजारून गेलो.

आसंगीचे वऱ्हाड : याप्रमाणे हा लग्नाचा धांगडधिंगाणा संपल्यावर आम्ही सर्व माझ्या बहिणीच्या सासुरवाडीला म्हणजे आसंगी गावाला निघालो. हे खेडे जमखंडीच्या पश्चिमेस कुडची स्टेशनच्या वाटेवर ११ मैलावर आहे. सुमारे चार पाच गाड्यांच्या भरतीचे वऱ्हाड निघाले. आमचेबरोबर आमचे आलगुरचे मामा रामजीबाबा हे होते. फक्त बाबा आणि आई मात्र आली नाहीत. कारण कन्यादान केले असता कन्येच्या घरी आईबापांनी कन्येला मुले होईपर्यंत अन्नग्रहण करावयाचे नसते. आसंगीचे व्याह्याची शेती मोठी व घरही प्रशस्त होते. रात्रीच्या वेळी आम्ही गावात प्रवेश केला. आमची थाटाने वरात निघाली. दारूकाम वगैरे चांगला थाट झाला.

पेंढारधाड : आसंगीस नदी आहे. नदीवर व विहिरीत पोहणे, यथेच्छ जेवणे आणि रस्त्यातून धिंगाणा घालणे हाच काय तो आमचा कार्यक्रम होता. बरोबर आमचे आईबाबा नव्हते. मग व्याह्यांच्या घरी आम्हाला कोण दाबात ठेवणार? आमच्या धुडगुशीला ताळच उरला नाही.

७

वडील भावाचा मृत्यू

१८८५ साली मी १२ वर्षांचा झालो. माझा भाऊ १७-१८ वर्षांचा झाला होता. ह्या सालाच्या आरंभी माझी मराठी ५वी इयत्ता संपून मी इंग्रजी पहिल्या यत्तेत हायस्कुलात गेलो. एव्हापासून माझ्या आयुष्यातील एक नवीन टप्पा सुरू झाला. माझे बाळपण संपले आणि विद्यार्थीदशेला प्रारंभ झाला म्हणावयाचा.

नवीन टप्पा : मराठी शाळेत माझा गणित व भाषा वगैरे अभ्यास त्या वेळच्या शिक्षणाच्या मानाने बरा होता. मराठी शाळेचे हेडमास्तर विष्णुपंत गवंडे फार कडक होते. तरी माझी तरतरी पाहून ते मजवर प्रेम करीत असत. चौथ्या इयत्तेत अंताजीपंत पोंक्षे नावाचे मास्तर होते. तेही प्रेम करीत असत. त्यावेळी ब्राह्मणेतरांची मुले सरकारी शाळेत फारच कमी असत, त्यामुळे व मी हुषार म्हणून कोणीही माझे कौतुकच करीत. पण दुसऱ्या इयत्तेत असताना दत्तोपंत बेडेकर नावाचा एक मास्तर फार तिरसट असे. त्याने एके दिवशी मला अतिशय मारले, त्यामुळे मांडीतून रक्त येत असताना मी घरी आलो. हे पाहून माझे बाबा शाळेत गेले व त्यांनी त्या मारकट मास्तराचा खरपूस समाचार घेतला. त्यामुळे पुढे सगळ्याच मास्तरांवर दाब बसला. माझ्या वडील भावाची प्रगती मात्र शाळेत मुळीच होईना. बाबांनी त्याला नेहमी बोलण्याचे व मारण्याचे हे एक कारण होते.

इंग्रजी शाळेच्या अभ्यासात इंग्रजी शब्द पाठ करण्याचा व विशेषतः त्यांच्या स्पेलिंगचा मला भारी कंटाळा येई. इतका की त्यामुळे मला इंग्रजी शाळा नकोशी वाटू लागली. आबा म्हैसकर नावाचा एक ब्राह्मण मास्तर पहिल्या इयत्तेवर होता. तो स्पेलिंग नुसते पाठ करावयाला लावी. घरी किंवा शाळेत मला मदत करावयास कोणीच नव्हते.

ह्या वेळी आमच्या घरी एक अरिष्ट घडले. इ.स. १८८५ मध्ये जमखंडीत पटकीचा उपद्रव सुरू झाला आणि अगदी सुरूवातीलाच माझा तरुण भाऊ १-२ दिवसच आजारी पडून एकदम वारला. तो शांत व समजूतदार होता. म्हणून शेजाऱ्यांना व नातलगांना माझ्यापेक्षा तोच जास्त आवडत असे. बाबा त्याच्यावर राग करीत, म्हणून आईला तो अधिक आवडत असे. तो असा एकाएकी वारल्यामुळे आईला व बाबांना एकदम फारच मोठा धक्का बसला. आईने तर पुढे ५-६ वर्षे अतिशय शोक केला.

बंधु एकनाथ : माझा भाऊ वारल्यावर सुमारे पाच वर्षे आम्ही अत्यंत भयंकर दारिद्र्याचे हाल सोसले. इ स. १८८५ च्या डिसेंबर महिन्यात माझा धाकटा भाऊ एकनाथ हा जन्मला. ह्यापुढची, माझी धाकटी बहीण मुक्ताबाई हिच्या पाठीवरची मुले जन्मतःच फार अशक्त जन्मली.

तर भयंकर दारिद्र्य असे. माझ्या चिमुकल्या स्कॉलरशिपचीच घरी मोठी मदत होत असे. त्या वेळी जमखंडीत मोठी स्वस्ताई असे. एक रुपयाला १६ पायल्या धान्य झालेले मला आठवते. मग माझ्या चिमुकल्या स्कॉलरशिपकडे माझ्या आईचे डोळे लागून राहात. ह्यात नवल काय! इतकी जरी स्वस्ताई होती, तरी आमचे घरी उत्पन्न नसल्याने आई आम्हा चार मुलांचे, बाबांचे व आपले प्राण कसे राखीत असे ते आईला किंवा देवालाच ठावे! अर्थात तिला बाजारातले वाईट व स्वस्त धान्य व तसलाच भाजीपाला आणावा लागे. पुष्कळ वेळा पेवात बरेच दिवस ठेवूल बिघडलेले जोंधळे बाजारात विकावयास येत. ते फार स्वस्त म्हणून आई नेमके तेच आणी, त्याचा वास वाईट येई, पण आम्ही मुले त्याच्याच भाकरी गोड करून खात असू. कारण गोडी धान्यात नसून आमच्या आईच्या हातात असे. असल्या दाण्यांची भाकरी, तसल्याच तुरीच्या डाळीचे वरण व तांबड्या मिरच्यांची चटणी हे तीन पदार्थ आम्हाला बासुंदीपुरीसारखे गोड लागत. आमचे लक्ष अन्नाकडे जाऊ नये, म्हणून आई आपल्या माहेरच्या लहानपणाच्या व सासरच्या करुणास्पद कहाण्या सांगत असे. त्या आमच्या काळजात इतक्या खोल जात की, आमचे जेवण आटपून आमचे हात वाळले तरी आम्हाला भान राहात नसे.

पुष्कळ वेळा हे कदान्नही आम्हाला पुरेसे मिळत नसे. वालूबाई नावाची एक कुणबीण पूर्वी आमची स्थिती बरी असताना आमचे घरी कामाला होती. पुढे आम्हाला अशी भयंकर स्थिती प्राप्त झाल्यावर त्या प्रामाणिक बाईला आम्हा बाळांचा कळवळा येऊन, कोठले तरी फार दिवसांचे शिळे तुकडे आणून तिने हळूच झाकून आईला आणून द्यावे. मग आईने ते ताकात अगर वरणात अगर दोन्ही नसल्यास नुसते पाण्यात भिजवून आमचेसाठी ठेवावे. आम्ही सर्व मुले शाळेतून भूक, भूक करीत आल्यावर तेच पक्वान्न खावे आणि पुढे किती तरी वेळ नुसती बोटेच चाटीत बसावे, आमचा हा अल्पसंतोषीपणा पाहून आईने आम्हाला न कळत आसवे गाळावी आणि अशा आनंदात आपली भूक विसरावी!

तुकारामाचा संसार : इतके झाले, तरी आईने कधी कोणाची मजुरी केली नाही, की कोणाचे दारी चिमूटभर मीठ मागण्यासाठी उभी राहिली नाही. तिच्या आईप्रमाणे तीही उंबरठ्याच्या आतच राही. बाजारहाट, हिशेब वगैरे सर्व आईलाच करावे लागे. वाणी, माळणी, तेलणी, गवळणी आईची कदर ओळखून असत. त्या सढळ हाताने माप देत व पैशाची कधीही जिकीर करीत नसत. एकंदरीत आमचा संसार अगदी तुकारामबोवाच्या वळणावर चालला होता. फरक इतकाच की, तुकारामाच्या मुलांना मराठी तरी लिहिता येत होते की नाही शंका आहे. पण मी मात्र हायस्कूलमध्ये पहिला नंबर होतो. इतकेच नव्हे तर माझ्या बहिणीही मुलींच्या शाळेत लिहिणे, वाचणे, कशिदा काढणे वगैरे शिकत होत्या. दारिद्र्याने पाठ पुरविली, तरी आमच्या घराण्याचा रुबाब काही कमी झाला नाही किंवा चालत असलेल्या धार्मिक व सामाजिक परंपरेत खंड पडला नाही. एकादशी, शिवरात्री, हरतालिका, गौरी-गणपती, रानसठवाई या क्षुद्र देवतांचीही समजूत माझे आई व बाबा करावयास कधीच चुकले नाहीत. मग नवरात्रात समारंभ चुकत नसत हे सांगावयास नको. या समारंभात आमच्या घरचा पुरोहित तम्मणभट्ट डेंगरे, निदान त्याच्या घरचा कोणी लहान मुलगा

८

खडतर पाच वर्षे

(१८८५-१८९०)

स्वभावदोष : येथपर्यंत घरातील दारिद्र्याच्या मी ज्या आठवणी दिल्या त्या केवळ माझ्या बाबांच्या व विशेषतः आईच्या स्वभावाचे वर्णन करण्यासाठी दिल्या. त्यांच्या स्वभावातील दोष दाखविण्यासाठी नव्हे. ह्या दारिद्र्याचे कारण माझ्या बाबांचा आळशी स्वभाव असेल, पण कोणत्याही प्रकारची कोणाची फसवणूक किंवा अप्रामाणिकपणामुळे त्यांच्या उत्पन्नामध्ये आलेला तोटा हे नव्हते. आता ह्यापुढेही काही आठवणी द्यावयाच्या. त्यात बाबांच्या स्वभावातील काही दोष दिसतील. पण ते त्यांचे दोष नसून-निदान दोष दाखविण्याचा माझा हेतु मुळीच नसून-माझ्या आईच्या स्वभावातला दैवी चांगुलपणा दाखविण्यासाठीच केवळ त्या आठवणी मी देत आहे. माझ्या आईच्या सहिष्णूतेची पारख करण्याकरिता व आम्हा मुलांच्या भावी शिक्षणाकरिता देवाने आम्हाला दारिद्र्य हा मित्र दिला. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. पण त्याही पुढे आम्हा मुलांची नसली तरी आमच्या आईची पारख करण्याकरिता आम्हावर जे दुर्धर संकट आले, त्याबद्दल काय म्हणावे हे समजत नाही. ते संकट म्हणजे माझ्या बाबांना नशा करण्याचे व्यसन लागले हे होय! बाबांना प्रथम गांजा ओढण्याचे व नंतर काही दिवसांनी दारू पिण्याचे व्यसन लागले!

संस्थानी नोकरी : बाबा त्यांचे लहानपणापासून सुखात व लाडात वाढलेले, पैशाचा लोभ त्यांच्यामध्ये मुळीच नव्हता, लोभाचा इतका अभाव की त्यामुळे त्यांना पैशाची योग्य किंमतही कळत नव्हती, असे म्हटले तरी चालेल, त्यांचे शिक्षण बैठे आणि पांढरपेशी होते. ही स्थिती त्यांचे अर्धे वय म्हणजे जवळजवळ ते चाळीस वर्षांचे होईपर्यंत चालून मग त्यांना दारिद्र्य आल्यान पुढे त्यांच्या स्वभावात व धंद्यात फरक पडणे कठीण झाले. जमखंडीचे यजमानांशी ते भांडून आपण होऊनच घरी बसले होते व त्यावर यजमानांनी दोनतीनदा बोलाविले तरी ते गेले नाहीत. मला समजू लागल्यावर ते म्हणत असलेले मला आठवते की, आपण कोणता धंदा नोकरीशिवाय केला नाही व आता नोकरीही जमखंडीच्या यजमानांशिवाय दुसरीकडे करावयाची नाही आणि हा आग्रह-मग तो बरा असो की वाईट असो-त्यांनी सोळा वर्षे चालविला. माझ्या जन्माचे सुमारास म्हणजे इ. सन १८७३ चे सुमारास त्यांनी नोकरी सोडली. पुढे सोळा वर्षांनी त्यांचा हा करारी आग्रह पाहून यजमान श्रीमंत आप्पासाहेबांनी आपणच इ. सन १८९० चे सुमारास त्यांना स्टोअरकीपरचे (हिशेबी) विश्वासचे काम दिले. पण दरमहा पगार दहा रुपये होता. १६ वर्षे घरी अभिमानाने बसलेल्या नोकराला पुन्हा बोलावल्याबद्दल आप्पासाहेबांचे आभार मानायचे की इतक्या जुन्या अनुभवी

संबंध जडला. हा इ. सन १८८९ साली जडला असावा. इ. सन १८९० मध्ये बाबांना नोकरी लागली. हे स्वामी उघड उघड अभेद-मार्गी असत, म्हणजे जातिभेद पाळीत नसत. ते कोणाची पर्वा करीत नसत व निःस्पृह आणि धुंद असत. ते दारू पीत व मांस खात. तुळजापूरची देवी आमची कुळदेवता. तिला मांसाचा नैवेद्य जरूर लागतो. तुळजापूरचे भोपे भाऊराव कदम आमचेकडे भिक्षेला आले की हा नैवेद्य होत असे. शिवाय एक रामदासी ब्राह्मण संन्यासी येत. ते तर दारू व मांस दोन्हीही घेत. अशा अनेकांच्या संगतीत बाबांना दारूचीही चटक लागली व मांसाचा प्रघात आमचे घरात पडला असावा. तरी पण आमच्या दारिद्र्यामुळे त्यांचे हे व्यसन अनावर होऊ शकले नाही, हे आमच्या दारिद्र्यमित्राचे आम्हावर मोठे उपकराच!

स्वभावातील पालट : प्रथम प्रथम बबलादीच्या सिद्धावर माझीही चांगली श्रद्धा होती. ते घरी आले की, त्यांची पूजा आमचे घरी होत असे, चहूकडून सर्व जातीचे भक्त येत. स्वामी तुळशी-कट्ट्यावर बसत व आम्ही ताटात कापूर ठेवून आरती म्हणत ओवाळावयाचे व त्यांच्या पायावर फुले घालावयाची हीच काय ती त्यांची साधी पूजा होती. आरती झाल्यावर भक्त लोक दारूच्या बाटल्या त्यांचेपुढे ठेवीत आणि आशीर्वाद मागत. ती दारू सर्वजण पीत, त्यात मोठा वाटा ह्या सिद्धाचा असे. दारुच्या निशेत सिद्धाच्या तोंडून जी भविष्यवाक्ये निघत ती खरी होत, अशी भक्तांची समजूत असे. ही आरती करीत असताना मीच ताट ओवाळीत असे व कानडीतील त्यांच्या संप्रदायाच्या आरत्या व इतरही चांगली पदे मी नीट चालीवर म्हणत असे. शाळेतला माझा चांगला अभ्यास. माझी श्रद्धा व निर्व्याज वर्तन वगैरेमुळे मीही त्या सर्व साधूंना आवडत असे. पण पुढे माझी इंग्रजी हायस्कुलातील मॅट्रिकची परीक्षा पास होऊन मी कॉलेजात जाऊन पुणे-मुंबईकडचे मला नवे वळण लागल्यावर त्या प्रांती लोकांत सिद्धांपेक्षा माझीच प्रसिद्धी होऊ लागली. तेव्हा मात्र ही सिद्धमंडळी मला पाहून चपापू लागली. मी मोठा विद्वान होईन, हे त्यांच्या तोंडचे कानडी भविष्य मी कित्येक वेळा प्रत्यक्ष ऐकले होते. मॅट्रिक क्लासमध्ये असतानाच मला या सिद्धांच्या लीला आवडेनाशा झाल्या होत्या. बाबांवरही माझ्या सर्व वर्तनाचा दाब बसून हे बंड आमच्या घरातून अजिबात बंद झाले. इतकेच नव्हे तर पुढे नोकरी लागल्यावर बाबांच्या भांबावलेल्या मनाला काही व्यापार मिळाल्यामुळे म्हणा किंवा माझ्यामुळे म्हणा त्यांची नशाबाजी अगदी बंद झाली! इ. सन १८९१ चे डिसेंबरात माझी मॅट्रिकची परीक्षा झाली आणि माझ्यातच नव्हे तर माझ्या घराण्यातही मोठाच पालट झाला!

●●●

९

बालपण

जन्म : आता माझ्यासंबंधीच्या आठवणीकडे वळतो. मी इ. स. १८७३ एप्रिल ता. २३ (शके १७९५ चैत्र वद्य एकादशी) बुधवारी दोन प्रहरी ११ वाजता जन्मलो. बाबांनी माझी जन्मपत्रिका इतर सर्व मुलांप्रमाणे रीतसर ज्योतिषाकडून वर्तवून ठेविली आहे. त्या जन्मपत्रिकेची भाषा अर्धवट संस्कृत व अर्धवट मराठी, पण दोन्ही अशुद्ध त्यामुळे ह्या ज्योतिषीबुवांचे भाषेचेच नव्हे तर ज्योतिषाचेही ज्ञान तुटपुंजेच दिसते. त्यात मी अमुक होईन, तमुक होईन, म्हणून ज्या माझ्या भावी गुणांची लांब माळ ओविली आहे, ती वाचून अद्यापि मला मौज वाटते. अर्थात् हे भविष्य अशा काही साधारण मोघम भाषेत आहे की, गोळाबेरजेत ते कोणालाही लागू पडावे. लहानपणी मला वाचायला व लिहायला आल्यावर माझ्या पत्रिकेतील मी मोठा विद्वान व लोकप्रिय होणार हे भविष्य वाचून मला मोठी फुशारकी वाटे. अगदी बालपणी माझ्या अंगात बाळसे चांगले असे. आता जरी मी काळा आहे, तरी बांध्याने व चेहऱ्याने मी लहान वयात फार आकर्षक होतो, असे आई मला सांगे. माझा वडील भाऊ मजपेक्षा रंगाने उजळ, रूपाने जास्त चांगला आणि स्वभावाने शांत होता. तरी माझ्या बाळशाची व तरतरीपणाची छाप पाहणारावर माझ्या इतर भावंडांपेक्षा अधिक बसे. दादाभाई डॉक्टर नावाचा कोणी एक दरबारचा पारशी नोकर बाबांच्या परिचयाचा होता. तो पारशी तर मजवर फार लुब्ध होता. रस्त्यात कोठेही भेटला तरी जवळ येऊन तो माझे बरेचसे मुके घेऊन मला बेजार करी, असे आई मला सांगत असे.

एक आपत्ती : तेव्हा मी फार तर सव्वा-दीड वर्षाचा असेन, माझे कानात सोन्याचे सुंदर झुबे घातले होते. त्याच्या भोवताली लहान मोत्ये लावली होती. हा दागिना साधाच, परंतु मला फार शोभे. तो घालताना कान टोचावा लागला. त्यात काही तरी कमीजास्त होऊन माझे कानाला जखम झाली. डावा कान सुजून त्यात पू झाला. आजीला वाटले की, मला कोणाची तरी दृष्ट झाली. योग्य उपाय न होता दृष्टीबद्दल बऱ्याच वस्तु ओवाळून टाकण्यात आल्या. शेवटी कानाचा लोंबता भाग कुजून तुटलेसा झाला. एके दिवशी मला न्हाऊ घालीत असताना तो भाग तुटून झुब्यासह खाली पडला. मग काय विचारता! आजी, आई आणि आत्या ह्यांनी आकांत मांडला, तेव्हा आजोबा जिवंत होते. हा प्रसंग आठवण्याइतका मी मोठा झालो नव्हतो.

पहिला लळा : तिसऱ्या वर्षापासून मी थोडे थोडे बोबडे बोलू लागलो असेन. अगदी पहिल्या पानावर लिहिलेली माझी आठवण तिसऱ्या वर्षातली असावी. मला पहिला लळा आजीचा, बाबांचा किंवा आईचा नसून माझ्या आजोबांचा बसवंतरावांचाच होता. हिंदू घरात असे होणे

साहजिक होते. नवरा-बायको तरुण असतात. मुलाचा आजा-आजी असेतोपर्यंत त्यांच्यासमोर आपल्या मुलांचे कौतुक आपणच करण्यास त्यांना लाज वाटते. घरकामामुळे त्यांना फुरसतही मिळत नसते. आजा-आजी म्हातारी असतात. त्यांना काम नसते. मुलांचा मोह त्यांनाच जास्त असतो.

धाडशी तांडेल : आजी कष्टाळू व कडक असल्याने मी नेहमी आजोबांच्याच भोवती असे. त्यामुळे माझ्या मनावरचे अगदी पहिले ठसे आजोबांनीच उठविले. मला अद्यापि चांगले आठवते. आमच्या घराच्या सोप्यात माझा पाळणा बांधलेला असे. मला त्यात बसवून नेहमीप्रमाणे तो आडवा न हलविता उभा हालवीत. असा पाळणा हालू लागला म्हणजे मी नावेत बसल्याप्रमाणे खालवर हेलकावे खाई. अशा हालणाऱ्या पाळण्याला मी नावच म्हणत असे. आजोबा आपल्या ठरलेल्या जागी सोप्यात बसून माझे लाड पुरविण्यासाठी पाळणा उभा हालवीत. पाळणा जोरात हलू लागला म्हणजे मोठ्या धाडसी तांडेलाप्रमाणे मी स्वतःला मोठा धन्य मानीत असे. भावी इर्षेचे हे पहिले धडेच नव्हेत काय ? आजोबा त्या वेळी वार्धक्यमुळे आंधळे होते. माझ्या तोंडावरची विजयशाली नावाड्याची विजयश्री जरी त्यांच्या चर्मचक्षूंना दिसत नव्हती, तरी ती कल्पनाचक्षूने निरखून ते मला उत्तेजन देत. त्या वेळी ते एक बालगीत म्हणत, त्याचे ध्रुवपद हे असे- " माझे पकुले कसे खेळते! माझे छकुले कसे खेळते!" ते ऐकून मला धन्यता वाटे!

सवयीचा परिणाम : माझ्या बाबांचे नाव रामजी, आजोबा व आजी त्यांना 'रामा' अशी हाक मारीत. तीऐकून मीही बाबांना 'रामा' व आईला 'यमुना' अशा नावानीच बोलावीत असे. कौतुकामुळे काही दिवस वडील मंडळीनी तिकडे लक्ष दिले नाही. मी तीनचार वर्षांचा झालो तरी अशीचच नावे घेऊ लागलो. आजोबांनी मला बाबा व आई अशा हाका मारण्यास सांगावे, पण तसे म्हणण्यास मला मोठी लाज वाटत असे! एक दिवस दाराआड उभा राहून मी 'बाबा' अशी हाक मारली व लाजून आत पळून गेलो. सर्वत्र हशा पिकला. तेव्हा तर मला या नवीन नावाची जास्तच लाज वाटायला लागली. माझ्या बाबांना व आईलाही आपल्या वडिलांसमोर ह्या नावांनी हाका मारून घेण्याचे आवडेना! हा सवयीचा परिणाम!

१८७७ चा दुष्काळ : मी चार वर्षांचा झालो त्या वेळी, म्हणजे इ. स. १८७७ साली दक्षिणेत भयंकर दुष्काळ पडला होता. तेव्हा चार शेरांची धारण होती असे म्हणतात. पण त्या वेळी आमच्या घरात आबादीआबाद होती. आमच्या मळ्यात मक्याचे पीक फार माजले होते. मक्यची कणसे आमचे घरात रचावयास जागा पुरेना. ही कणसे शिजवून खाणे आम्हाला आवडत असे. कणसे खाऊन आम्ही भुरकुंडे बाहेर फेकून देत असू. ती पटकन् उचलून भिकारी लोक फोडून त्यांचा कोंडा खात. एकदा तर हा कोंडा न पचल्यामुळे एक भिकारी ओकला आणि त्याचा ओकच दुसऱ्या भिकाऱ्याने आधाशीपणाने खाल्ला. हे मी स्वतः डोळ्यांनी पाहिले. पण मी इतका लहान होतो की, दुष्काळ म्हणजे काय याची मला कल्पना नव्हती. आम्ही कणसे अर्धवट खाऊन टाकीत असू. म्हणून दारी भिकाऱ्यांची गर्दी जमे. पण त्यात करुणेपेक्षा कौतुकच जास्त असे.

चोरटे दान : आमचे आजोबा एका ठोकळ्यात एक शेरभर दाणे घालून कट्ट्यावर आलेल्या भिकाऱ्याला एकेक मूठ भिक्षा घालण्यासाठी सकाळी बसत असत. त्यांना नीट दिसत

१०

माझे प्राथमिक शिक्षण

धूळपाटी : मी ५ किंवा ६ वर्षाचा झालो असता माझे आजोबा बसवंतराव वारले. तेव्हापासून ११ वर्षांचा होईपर्यंतची, म्हणजे इ.स. १८७९ पासून १८८४ पर्यंतची ५ वर्षे ही माझ्या प्राथमिक शिक्षणाची होती. मला प्रथम एक गावठी शाळेत घालण्यात आले होते. हल्ली जमखंडीत ज्या घरात रा. सदाशिवराव पेंडसे वकील राहात आहेत, तेथे ही खाजगी शाळा होती. पंतोजींचे नाव हरिपंत फडके किंवा असेच काहीसे होते. ह्या शाळेत फक्त लिहिणे लिहिणे, वाचणे, मोडी अक्षर वळविणे, हस्तलिखिते वाचणे, हिशोब करणे वगैरे केवळ व्यावहारिक साधे विषय होते. त्या वेळी संस्थानात सरकारी शाळा होत्या की नव्हत्या हे माहीत नाही. असल्याच तर मला या गावठी शाळेत का ठेवले ते कळत नाही. निदान इंग्रजी शाळा तरी त्या पूर्वकाळी नसावी. शाळा खात्याची घटना त्या वेळी नुकतीच चालली असावी. या गावठी शाळेत मी प्रथम माझी धुळाक्षरे कशी शिकलो ते आठवते. एक लाकडी फळी सुमारे दीड हात लांब व एक वीत रुंद असे. तिला आम्ही पाटी म्हणत असू. वेळूची एक बारीक लेखणी असे. तिने या पसरलेल्या धुळीत आम्ही धुळाक्षरे कोरीत असू. म्हणूनच मुळाक्षरांना धुळाक्षरे हे नाव पडले आहे. ह्या वेळी दगडी स्लेटींचा प्रचार जमखंडीस दिसत नव्हता. मला शाळेत घालण्याचा मुहूर्तसमारंभ झाला. चैत्री पाडवा, दसरा, पंचमी आणि अक्षय्यतृतीया हे साडेतीन शुभमुहूर्त गणले जातात. कोणत्याही गोष्टीस सुरूवात करावयाची ती ह्या मुहूर्तावर करतात. रा. बाळा काणे या नावाचा एक ब्राह्मण खाजगी शिक्षकाचा धंदा करीत असे. माझ्या वडिलांनी त्याला घरी बोलावून आणून माझ्या शिक्षणाच्या आरंभाचा एक लहानसा विधी करविला. सोप्यात दोन पाट मांडून मला व काणेमास्तरांना समोरासमोर बसवून मध्यंतरी ही धूळपाटी ठेवून तिची पूजा करण्यात आली. नंतर शिक्षकांनी माझा हात धरून पहिला धडा **'श्रीगणेशाय नमः'** माझ्याकडून गिरविला. माझ्या वडील भावाचा हा विधी मला आठवत नाही. माझ्या पाठीवर ८-१० मुले जरी झाली तरी ती बाळपणीच वारली. जनाक्का व तान्याक्का ह्या मुली होत्या व एकनाथ हा शाळेत जाण्याइतका मोठा होईपर्यंत युगांतरच झाले होते. म्हणून हा विधी पुन्हा कधी आमचे घरी झाला नाही.

मौजीबंधन : बाबांना धार्मिक विधी-समारंभाची श्रद्धा होती व आपल्या घरी पुरोहितास आणवून सर्व संस्कार यथासांग करावेत, असे त्यांना पूर्वीपासून वळण लागलेले होते. आमची लग्ने होण्यापूर्वी माझ्या भावाची व माझी विधीपूर्वक मुंज करण्यात आली. ह्यावरून आमचे घराणे क्षत्रिय होते, अशी भावना आमच्या बाबांमध्ये विशेष होती असे दिसते. वरील दोन्ही उपनयनसमारंभाच्या वेळी आजोबा जिवंत नव्हते. मुंजीच्या वेळी आजीही जिवंत नसावी. आमचे लग्नानंतरही एकदोनदा

अक्काचे मजवर इतके प्रेम होते, तरी काही फारसा तिचेकडे जात नसे. कारण मी तिकडे गेलो की, "धोंडीचा नवरा आला" असा गलबला त्या आळीतील पोरे आणि थोरही करीत. ते ऐकणे मला आवडत नसे. तरी मुख्य सणाचे प्रसंगी जावे लागत असे. दसऱ्याच्या दिवशी सोने वाटावयाला, संक्रांतीचे दिवशी तिळगूळ द्यावयाला जाणे भागच होते. दसऱ्याचे दिवशी गेलो म्हणजे अक्काच्या देव्हाऱ्यावरच्या साऱ्या कडाकण्या मी खाऊन फस्त करीत असे. ती तर मी केव्हा येऊन त्या खाईन ह्याची वाटच पाहात बसे.

माझा हट्ट : एकदा अक्का कोंकटणूरच्या यल्लामाच्या यात्रेला निघाली होती. त्यावेळी मी फार तर ४।५ वर्षाचा असेन. अक्का आमचे घरी निरोप घ्यावयाला आली होती. ती जाऊ लागली तेव्हा तिचेबरोबर यात्रेला जाण्याचा मी हट्ट घेतला. काही केल्या हा हट्ट मी सोडीना. बाहेर रस्त्यापर्यंत मी रडत तिचे मागे लागलो. तिने मला उचलून खांद्यावर घेतले व परत घरी आणून ती मला सोडू लागली. त्या वेळी मी इतका अनावर झालो की, खांद्यावर बसल्या बसल्या मी मोठ्या आवेशाने पाय झाडला, तो तिच्या पुढच्या दाताला लागून वरचे दोन्ही दात तात्काळ पडले आणि अक्काचे तोंड रक्तबंबाळ झाले. तरी बिचारीला राग आला नाही. उलट ही गोष्ट बाबांना न कळू देण्याची खबरदारी घेण्याविषयी तिने आईची गयावया केली.

●●●

११

माझा हायस्कूलचा काळ

(१८८५-१८९१ अखेर)

ही सात वर्षे माझ्या आयुष्यातील महत्त्वाची होती. इ. स. १८८५ च्या पावसाळ्याचे आरंभी माझा वडील भाऊ वारल्यामुळे माझ्या भावंडात मीच वडील झालो आणि माझ्या स्वभावात एकदम विलक्षण फरक पडला! बाळपणाचा हूडपणा कमी होऊन मी गंभीर, विचारी व अभ्यासी बनलो. आईबाबांचा शोक, घरची झपाट्याने खालावत चाललेली सांपत्तिक स्थिती, माझ्या आईला वरचेवर झालेल्या मुलांचे बाळंतपणातले मृत्यू आणि बाबांचा हताश उदासीनपणा ह्यांचा परिणाम मजवर दिवसेंदिवस अधिकाधिक घडत चालला. ह्यावेळी मला ११ वे वर्ष संपून १२ वे नुकतेच लागले होते.

शिक्षकवर्ग : जमखंडी हा लहान संस्थांनी गाव. त्या वेळी संस्थानचे उत्पन्न ४-५ लाखांचे असावे. शहराची वस्ती १५ हजारांची. शाळा खात्याची स्थापना नुकतीच झाली असावी. अशा ठिकाणचे हायस्कूल कोणत्या दर्जाचे असावे ह्याची कल्पना सहज होते. मी हायस्कूलात गेलो तेव्हा ते हायस्कूल झाले नव्हते. फार तर पाच इयत्ता असतील. रा. त्रिंबकराव खांडेकर ह्यांना पुण्याहून हेडमास्तरचे जागेवर आणिले होते. त्यांची स्वतःची मॅट्रिकची तरी परीक्षा झाली असेल की नाही हे मला माहीत नाही. पण त्यांचा स्वभाव सुशील, नीतिमान्, नेमस्त, गंभीर आणि करारी होता. नवीन इंग्रजी शिकलेल्यांचा उथळपणा त्यांच्यात मुळीच नव्हता. जमखंडी गावात व दरबारात त्यांच्या ह्या स्वभावामुळे लोक व स्वतः यजमानही वचकून होते. असिस्टंट शिक्षकात विशेष कोणी म्हणण्यासारखे शिकलेले किंवा फारसे बुद्धिमान नव्हते. मी पाचव्या इयत्तेत गेल्यावर शाळेचा दर्जा वाढून त्याच वर्षी वरील वर्गातील बाहेरील पदवीधारक शिक्षक आणावे लागले. मी सहाव्या इयत्तेत गेल्यावर जमखंडीच्या शाळेतून मुले प्रथमच मॅट्रिकच्या परीक्षेस पाठविण्यात आली. तिसऱ्या वर्षी आम्हा चौघांना जमखंडी हायस्कुलातून पाठविण्यात आले. त्याच सुमारास आमच्या शाळेला हायस्कूलचा दर्जा प्राप्त झाला. सहाव्या इयत्तेत रा. वासुदेवराव चिरमुले, बी. ए. हे पहिले पदवीधर नवीन नेमण्यात आले. रसायनशास्त्राच्या प्रयोगांचेही काही सामान शाळेला मिळाले. एकंदरीत आताप्रमाणे त्या वेळी तशा मागासलेल्या प्रांतात इंग्रजी शिक्षणाचा दर्जा असावा तसा नव्हता. आगगाडी (सदर्न मराठा रेल्वे) मी पाचव्या इयत्तेत जाईपर्यंत झाली नसावी.

विषयांची गोडी : पहिल्या वर्षी इंग्रजी हा विषय मला नवा असल्यामुळे व शिक्षक चांगला सहानुभूतीचा नसल्यामुळे मला ते वर्ष फार जड गेले. पण दुसऱ्या वर्षापासून मला इंग्रजी भाषेची व शाळेतील इतर सर्व सर्वसामान्य विषयांची गोडी लागली. तेव्हापासून शिक्षक जरी विद्वान् नव्हते

तरी सहानुभूतीने शिकविणारे मिळाले. माझी हुशारी पाहून ते माझे कौतुक करू लागल्यामुळे मला उत्तेजन मिळाले Nothing succeeds like success (यशासारखे यशस्वी काहीच नाही.) ही इंग्रजी म्हण मला तेव्हा जरी माहीत नव्हती, तरी तिचा अनुभव मला जास्त जास्त येऊ लागला. मराठी शाळेत असताना आम्ही वर्गात जमिनीवर बसत असू. तरटाच्या लांब पट्ट्या हातरावयाला असत. इंग्रजी शाळेत आम्हाला बाकावर बसावयास मिळाले. मागे टेकावयाला उंच व जाड उतरत्या पाटीची मेजे (डेस्क्स) असत. शाळेची इमारत शहराच्या मध्यभागी, भर बाजारात उंच अशा जोत्यावर, टुमदार व मनात भरण्याजोगी होती. मराठी शाळेत सकाळ संध्याकाळ दोन वेळा जावे लागत असे. इंग्रजी शाळेत दोन प्रहरी ११ पासून सायंकाळी ५ पर्यंत एकदाच जावे लागे. मे महिन्याची लांब सुट्टी मिळे. मराठी शाळेच्या शिक्षकांचे पंतोजीपणाचे मुख्य लक्षण म्हणजे त्यांच्या हातातील वेताची एक लांब छडी आणि तिचे केवळ मास्तरांच्या लहरीप्रमाणे आमच्यावर होणारे उदार प्रयोग ! इंग्रजी शाळेत हा प्रकार बदलला. एकंदरीत मी एका नवीन जीवनप्रवाहात पडल्याप्रमाणे वाटले.

ग्रहणशीलता : इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत आम्हाला जुन्या काळची इंग्रजी क्रमिक पुस्तके म्हणजे ' हॉवर्ड ' ची मालिका. आताच्या आकर्षक रीडर्सप्रमाणे त्यात चित्रे वगैरे काही नव्हती. तरी तिसऱ्या इयत्तेपासून इंग्रजी राहाटीचे धडे वाचावयाला मिळत. त्यामुळे ग्रहणशील बुद्धीच्या माझ्या डोळ्यापुढे एका नवजीवनाचे नव्या रंगाचे पडदे दिसू लागले. इंग्रजी शेतीचे वर्णन, इंग्रजी झाडाझुडपांची नावे, इंग्रजी खेडी, इंग्रजी कुंपणावरील निरनिराळ्या जंगली वेली, फुले वगैरे नवीन देखावे मला नीवन हर्ष देऊ लागले. त्यामुळे मल धडे आवडू लागले. विषय आवडला म्हणजे तो सुलभ होतो. इतकेच नव्हे तर परिणामकारकही होतो. तिसऱ्या इयत्तेचे शिक्षक रा. आप्पा काळे हे होते. त्यांच्या शिकवणीत एकपट रसिकता असली तरी ती माझ्या हृदयात चेंडूप्रमाणे उशी घेऊन द्विगुणीत व चौगुणित होई. अशा रीतीने शिक्षकाच्या सहानुभूतीला शिष्याच्या ग्रहणशीलतेची जोड मिळत चालली.

इंग्रजी अभ्यास : मी चौथ्या इयत्तेत गेलो, तर माझे आवडीचे शिक्षक आप्पा काळेही चौथ्या वर्गावर शिक्षक झाले. इंग्रजी पुस्तक ' सँडफर्ड अँड मर्टन ' हे लावण्यात आले. ते मला फार आवडले. विचार नवीन व उदार, भाषा बालबोध, मधून मधून इंग्रजी पोषाखांची चित्रे, इंग्रजी राहणीची व वनश्रीची शब्दचित्रे आणि छायाचित्रे ह्यांमुळे इंग्रजी राहणीविषयी कुतूहलता दिवसेंदिवस वाढू लागली. इतकी की पुढे मी मोठा झाल्यावर दैववशात् इंग्लंडातील उत्तमोउत्तम विश्वविद्यालयात, ऑक्सफर्ड येथे दोन वर्षे राहावयास मिळाले, तेव्हा तेथील खेड्यापाड्यात जाऊन, शेतात, कुंपणात फिरून मी जे देखावे पाहिले व अनुभव घेतला त्याची पूर्वस्वप्नेचे जणु मला माझ्या जमखंडीसारख्या खेडवळ शाळेतील क्रमिक पुस्तके वाचीत असताना पडत होती. पाचव्या इयत्तेत ' लँबस् टेलस् ' हे पुस्तक लावले होते. त्यात कविकुलगुरु शेक्सपियर्सची भेट झाली. शिकविण्यास ठाकूर नावाचे पुणेरी शिक्षक होते. सहाव्या इयत्तेत ' रीडिंगज् फ्रॉम दि स्पेक्टेटर ' हे पुस्तक चिरमुले ह्यांनी शिकविले. हे तर ग्रॅज्युएट-बी. ए. होते. यात ॲडिसन्च्या खऱ्या बालबोध इंग्रजीचा व ताज्या विचारांचा मासला कळला. अशा रीतीने माझ्या हृदयात इंग्रजी भाषेची नव्हे, तर संस्कृतीच्याही पक्षपाताची बीजे इतक्या कोवळेपणातच रुजू लागली.

गोठ्यात गाईचे शेण काढीत असताना तोंडात तंबाकूचा बार भरून त्याच्या मधून मधून पिचकाऱ्या मारीत कधी कधी इकडे तिकडे फिरत आम्हाला रघुवंशातील श्लोक सांगत. बाणाची कादंबरी त्यांनी आम्हाला अशी शिकवली की, ती त्यांची हसत मुद्रा, सूक्ष्म विनोद, प्रेमळ बोल मला अद्यापि आठवतात. अच्छोद सरोवरावरील शिवालयातील महाश्वेतेच्या संगीत भजनासारख्या देखाव्याचे वर्णन करण्याची पाळी आली की, गणेशशास्त्र्यांच्या स्वाभाविक रसिकतेला पाझर फुटे, शृंगार, वीर, करुणादि नऊ रसांचे अभ्यंगस्नान आम्हाला घडे. ॲडिसनचे ' सर रॉजर डी कॉव्हरले ' वाचीत असताना जो मी इंग्लंडातील खेड्यातील देखाव्यात रमे. तोच एकदम दीड हजार वर्षांपूर्वीच्या श्रीहर्षाचे चरित्र शास्त्रीबोवांच्या मुखातून ऐकताना मागील भारतीय वैभवाच्या शिखरावर भ्रमण करू लागे. आणि ही स्थळ-कालांतरे करणारा मी त्या वेळी १७-१८ वर्षाचाच होतो !

रसिकता : गणित असो वा शास्त्र असो, भाषा असो वा व्याकरण असो, परकीय इंग्रजी असो व मृत संस्कृत असो की मातृभाषा चालू मराठी असो, माझी गती सारखीच अकुंठितपणे चाले. सर्व हायस्कूलच्या अभ्यासक्रमात मला अभ्यासाचे श्रम म्हणून कधी भासलेच नाहीत. ह्याचे कारण माझ्या बुद्धीचे तेज नसून (मी बुद्धीने साधारणच आहे) केवळ माझ्या हृदयाची निर्मळ रसिकताच होय, हे मला येथे नमूद करावयाचे आहे. ही रसिकता मला शाळेपेक्षा घरातच अधिक, गुरूंपेक्षा माझ्या आई-बापांकडूनच जास्त मिळाली हे खास. माझ्या घरी जातिभेद नव्हता, तसा माझ्या हृदयात संस्कृतिभेदाचा किंवा पक्षपाताचा कृत्रिमपणाही नव्हता. सौंदर्य जेथे भेटेल तेथे ऊर्ध्वहस्ताने स्वीकारण्यास मी लहानपणापासून एका पायावर तयार आहे. मग ते इंग्लंडातले असो की स्वदेशातले असो, शहरातले असो की खेड्यातले असो, संस्कृत असो की प्राकृत असो, ते सहज व स्वाभाविक असले की पुरे. मी त्याला बिलगलोच म्हणून समजावे. ह्या माझ्या मुग्ध शृंगारी स्वभावामुळे, केवळ कपटी व्यवहाराच्या दृष्टीने पाहता प्रपंचात माझे बऱ्याच अंशी नुकसान झाले आहे आणि काहीजणांमध्ये मजसंबंधी दुराग्रही पसरला आहे, तरी पण ' स्वभावो दुरतिक्रमः ' ह्या न्यायाने मी आपला माझ्याच चालीने चाललो आहे, ही चाल मी हायस्कूलातच नव्हे तर अगदी माझ्या पाळण्यातच किंबहुना माझ्या मातृगर्भातच शिकलो असेन.

●●●

१२

माझे सोबती

हायस्कूलातील माझे शिक्षक व अभ्यास याविषयी साधारण आठवणी वर दिल्या. आता सोबती व त्यांच्याशी करमणुकीचे प्रकार सांगितले पाहिजेत. कारण स्वभाव आणि शील बनण्यात केवळ पुस्तकी अभ्यासापेक्षा ह्या दोहोंचा परिणाम अधिक होतो.

माझी भावंडे : माझी इंग्रजी पहिली इयत्ता मला कठीण व त्रासदायक गेली. त्या वेळी माझा वडील भाऊ जिवंत होता. त्यामुळे मला स्वतंत्र सोबती असणे साहजिक नव्हते. त्याचे जे सोबती असत त्यांच्याच मागे मागे दुय्यमप्रमाणे मला वागावे लागे. माझा भाऊ मजवर वडीलपणा गाजवी असे नव्हे. तो शांत स्वभावाचा होता. बरेच वेळा मी त्याचे ऐकत नसलो तरी तो समजुतीने माझ्याशी वागून मला आपल्याबरोबर नेहमी ठेवी. असा मायाळू भाऊ ह्या वर्षी एकदम वारल्यामुळे एकाएकी उघडा पडल्यासारखे मला झाले. तोपर्यंत माझ्या भावाशिवाय मी इतर कोणाशी मिसळत नसे. हायस्कूलात जाऊन मला माझ्या स्वत:चा शोध लागेपर्यंत माझी भावंडे हेच माझे मित्रमंडळ होते.

आमचा वाडा ज्या आळीत होता, तेथे मराठ्यांची जी घरे होती ती अगदी गरीब व खालच्या दर्जाची होती. एखाद्या किल्ल्याप्रमाणे आमचा वाडा किंचित् एकलकोंडा होता. तशात माझे प्राथमिक शिक्षण आटोपून मी इंग्रजी शाळेत जाऊ लागल्यामुळे, आळीतल्या मुलांतच काय पण मोठ्या माणसांमध्ये ही माझे महत्त्व वाढत असल्याची जाणीव मजमध्ये दिसू लागली. माझ्या भावात अशी अहंता नव्हती. समजूतदार असल्यामुळे तो भोवतालच्या लोकात अधिक मिसळत असे. अशा वेळी तो मला एकाएकी सोडून गेला. इकडे शाळेत नव्या इंग्रजी विषयाशी माझे नीट जमेना. त्यामुळे मी त्रासलेला व बहुतेक दुर्मुखलेला असे. माझे पहिल्या इयत्तेतले वर्ष इ. स. १८८५ बहुतेक एकलकोंडेपणातच गेले. आळीतील सामान्य लोकांना ही कारणे कशी कळणार? ते मला गर्विष्ठ समजत. माझ्या भावाच्या तुलनेने मी लोकांत जवळजवळ अप्रियच होतो.

माणुसघाणेपणा : मी लहानपणी फार लाजाळू असल्याने लोकांत न मिसळण्याचा माझा स्वभावच होता. अद्यापिही मला एकदम एखाद्या समाजात कारणाविना, किंबहुना अगत्याने बोलाविल्याविना जाणे आवडत नाही. त्यामुळे अजून केव्हाकेव्हा मजवर गर्विष्ठपणाचा–निदान मानीपणाचा–आरोप येतोच. माझ्या आत्येचा कितीही आग्रह असला तरी मी त्यांच्या आळीत कधी फिरकत नसे. पण माझा भाऊ मात्र त्या बाजूला फार लोकप्रिय असे. तो तरुण होता, माझ्यापेक्षा तो रंगाने उजळ व रूपाने देखणा होता. बड्या बापाचा वडील मुलगा आणि स्वभावाने मनमिळाऊ, मग का लोकप्रिय होणार नाही? विशेषत: त्या बाजूच्या तरुण मुली त्याच्यावर फार फिदा होत्या.

मला हे रहस्य त्या वेळी कळणे शक्य नव्हते. म्हणून माझ्या भावाच्या चहाड्या घरी येऊन मी आईजवळ सांगे. आई त्या मनावर घेत नसे आणि भावाला तर मजविषयी कधी रागच नसे. त्यामुळे माझ्या सासूच्या आळीतील लोक मला चहाडगा व मत्सरी म्हणत. मी जो मुलांशीही न मिसळणारा, तो मुलीत कसा मिसळणार? म्हणून त्या मला माणूसघाणा म्हणत. पुढे तर मी मोठा शिकलो, विलायतेला जाऊन आलो, ब्राह्मसमाजात शिरून सुधारणेचा अतिरेक केला, दारिद्र्याचे व्रत घेतले आणि शेवटी कुटुंबासह महारामांगांच्या वाड्यात त्यांची सेवा केली! ह्यापैकी एकाही कारणाने मराठ्यांसारखा मागासलेला समाज मला अद्यापि विक्षिप्त समजणे साहजिक आहे. मग ह्या सर्व कारणांचा कडेलोट करणाऱ्या मला जमखंडीतील सर्वच लोक अद्यापि माणूसघाणा म्हणतात ह्यात नवल का वाटावे? आता देखील फार दिवसांनी मी जन्मभूमीला गेलो, तर माझ्या घराण्याचा लौकिक जाणून लोक मला गावात तरी घेतात. बाटगा, ख्रिश्चन, बहकलेला समजून ते मला महारवाड्यात बसवीत नाहीत, ह्यातच मी भाग्य समजतो! अर्थात मराठेतर समजूतदार माणसे-मग ती ब्राह्मण असोत, लिंगायत असोत की मुसलमान असोत—मला फार बहुमानाने वागवितात तो प्रकार वेगळा. जमखंडीतील मराठे तरी मला अद्यापि दूरदूरच करीत आहेत.

माझा लाजाळू स्वभाव, लोकात बसण्या—उठण्याचा संकोच, माझ्या भावाच्या मृत्यूमुळे झालेला विरह आणि अंगवळणी न पडलेल्या इंग्रजी अभ्यासाचा कांच इत्यादी कारणामुळे ह्या वेळी मी फार घुम्या स्वभावाचा झालो होतो. अशा वेळी एक लहानशी सुंदर गोष्ट घडली ती आठवते. ती दिसण्यात क्षुद्र असली तरी माझ्या त्या वेळच्या अंत:स्थितीवर मोठा मनोरंजक प्रकाश पाडते.

गोड देखावा : माझा भाऊ वारल्यानंतर फार तर एक दोन महिन्यातली ही गोष्ट. त्या वेळी मी बारा वर्षांचाही नव्हतो व माझी बायको फार तर तीन वर्षांची असावी माझी आत्या वरचेवर समाचाराला आमचे घरी येई. एकदा तिने माझ्या या लहानग्या बायकोला लुगडे वगैरे विशेष काही न नेसविता तसेच बरोबर आणिले होते. कारण माझे घर जरी माझ्या बायकोचे सासर तरी तिच्या आईचे माहेर होते. किंबहुना तीच लहान पोर आईला न कळत अर्धी नागडीउघडी सहज मागे लागून आली असावी. आमच्या वाड्याच्या मोठ्या दरवाजातून आतील लहानशा चौकात येताना दारात एक मोठी गुळगुळीत फरशी होती. तिचेवरून दुडदुड धावत येताना हे लहान मूल पाय घसरून कोलमडून पडले. त्या वेळी मी जवळच एका खांबाला टेकून खाली मान घालून दु:खीकष्टी बसलो होतो. मी चटकन् उठून तिला कवटाळून उचलले व जेथे सर्व मंडळी बसली होती त्या कट्ट्यावर नेऊन ठेविले. हा देखावा पाहून मंडळीत हशा पिकला. लग्नात माझी बायको ६-७ महिन्यांची होती म्हणतात. तिची मानही नीट राहात नव्हती. लग्नात बायको लपवून ठेवितात. तिला नवऱ्याने शोधून कडेवर घेऊन यावयाचे वगैरे खेळ असतात. माझ्या लग्नात हा खेळ होणे शक्य नव्हते. तो खेळ मी आज केला, म्हणून मंडळी हसत माझी थट्टा करू लागली. मी स्वभावाने लाजाळू, घुमा व मंडळीत फारसा न मिसळणारा होतो. तरी प्रसंग पडल्यास उचित असेल ती गोष्ट करण्यास किंवा बोलण्यास मी कधी कसली फाजील लाज अगर भीड राखीत नसे. माझी बायको अद्यापि फार लहान असल्यामुळे तिला फार लाज कशी ती माहीतच नव्हती. ती माझी आतेबहीणच असल्याने मी तरी

ब्राह्मणांची मुले होती. त्यांच्या आईबापांनी एका घरी त्यांच्या जेवणा-राहाण्याची सोय करून दिली होती. ते सर्व आपसात जवळचे नातलग होते. थोड्याच दिवसात ती सर्व माझ्या भावंडांप्रमाणेच माझ्या घरी पडून राहू लागली. इतकेच नव्हे तर सुटीचे दिवसात त्यांनी मला आपल्या गावी न्यावे. त्यामुळे त्यांच्या घराण्याचा व माझ्या घराण्याचाही मोठा घरोबा जमला! मुलांकडून वडिलांचा स्नेह जमणे म्हणजे वळचणीचे पाणी आढ्याला चढण्याप्रमाणेच हा प्रकार होता. सातव्या इयत्तेत कुंदगोळाहून जनार्दन सखाराम करंदीकर हे आमच्या शाळेत आले. स्कॉलर ह्या नात्याने हे माझे प्रतिस्पर्धी होते. पुढेही ते व मी कॉलेजमध्ये बी. ए. पर्यंत बरोबर शिकत होतो.

●●●

१३

माझे खेळ

जमखंडी गाव हा खेडेवजा. इंग्रजी शाळा नुकतीच झालेली. तेथे अलीकडच्या हायस्कुलांप्रमाणे क्रीडांगणे, व्यायामाचे प्रकार, ड्रिलमास्तर हे कोठून असणार ? आम्ही कोठे तरी गावाबाहेर जाऊन खेळत असू.

सोंगट्यांचा खेळ : माझा वडील भाऊ असताना आमच्या घरी बैठा खेळ म्हणजे सोंगट्यांचा, गंजिफा, बुद्धिबळे, सोंगट्याचे हस्तिदंती फासे वगैरे खेळाची सर्व साधने आमच्या बाबांनी घरी करून ठेविली होती ; पण त्यांना कधी खेळताना आम्ही पाहिले नाही. हे सामान मात्र घरी भरपूर होते. हा एक बाबांच्या रसिकपणाचा मासलाच म्हणावयाचा. दिवाळीच्या सणात आमच्या घरी सोंगट्याची मजलसच भरे. नरकचतुर्दशीच्या आदले रात्रीपासून तो भाऊबिजेची रात्र उजाडेपर्यंत कवड्यांचा खळखळाट अष्टौप्रहर चालत असे. हा खेळ मोठ्या इरेचा. मनुष्य कितीही शांत असला तरी तो चिडून भांडल्याशिवाय ह्या खेळाची समाप्ती म्हणून व्हावयाची नाही. एकाएका बाजूला दहा-दहा बारा-बारा गडी बसलेले. संध्याकाळी खेळ सुरू होऊन उजाडेपर्यंत आम्ही त्यात गढून जात असू. भांडण केव्हा केव्हा हातघाईवरही यावयाचे.

एक मल्लयुद्ध : माझा स्वभाव विशेष तापट असे. एकदा अलगूरचे आमचे मामा (हे वयाने माझ्या वडील भावाहून फार तर १-२ वर्षांनी मोठे असतील) एकीकडे आणि मी व माझा भाऊ एकीकडे असे सोंगट्या खेळत होतो. मामा फार विनोदी, रडी खेळणारे, चिडखोरांना अधिक चिडवून मजा बघणारे. खेळ बाजूस राहून आमचे भांडण जुंपले. शब्दयुद्ध संपून मल्लयुद्ध सुरू झाले. मामा म्हणजे पट्टीचा पहिलवान ! आम्ही दोघेच काय, पण दहा असलो तरी ते कसची दाद देतात! दुसऱ्याला चिडवून ते स्वतः कधीचच चिडत नसत. शेवटी प्रकरण अगदी निकरावर जाऊन स्वयंपाकघरातून आईला आमचेकडे यावे लागले. गलिव्हरच्या अंगावरील लिलिपुटांप्रमाणे आम्ही दोघे बंधु मामांच्या पाठीवर चढून लाथांचा व बुक्क्यांचा मारा चालविला होता. मामा खाली तसाच वाकून हासून आम्हाला अधिकच खिजवीत होते. हा प्रकार पाहून आई म्हणाली, "अरे, हा कसला नवीनच डाव आज काढला आहे रे!" तीही आपल्या भावाचे पाठबळ न घेता आमचीच बाजू घेऊन मामांना म्हणाली, " तू मोठा असून तुला लहान मुलांशी असले प्रसंग करायला कळत नाही काय ?" खरे पाहता चूक आम्हांकडेच असावयाची. पुढे मी हायस्कुलात गेल्यावर अगदी मॅट्रिक होईपर्यंत आमचे घरी ह्या खेळाचा अड्डा जमत असे.

पटाईत वृत्ती : दीपवाळी आली की, माझ्या अभ्यासाच्या खोलीला चुना, रंग वगैरे मी स्वतः व माझे सोबती लावीत असू. वर छत, झालर आणि रोषणाई आम्ही आमच्या ऐपतीप्रमाणे

करीत असू. दुसऱ्यांच्या घरही असे अड्डे होत, तेव्हा अरसपरस जावे यावे लागे. रात्री किती भांडणे झाली, बोलाचाली केली, तरी उजाडल्यावर रात्रीचा प्रकार जणु काय स्वप्नात झाल्याप्रमाणे आम्ही सर्व विसरून जात असू! सहाव्या-सातव्या इयत्तेत असताना तेरदाळचे विष्णु देशपांडे, रामू पाटील, अंतू हनगंडी, मळलीचे हणमंत कुलकर्णी, त्यांचा भाऊ रामू, जमखंडीचे भिमू निवर्गी, व्यंकू कुलकर्णी, सिनू करकंबकर, रामू जासूद वगैरे १५-२० जण ह्या खेळात जमत असत. मी व तेरदाळचे देशपांडे नेहमी विरूद्ध पक्षाला असू. दोघेही सारखेच चिडखोर आणि हेकेखोर. खेळापेक्षा भांडणातच वेळ आणि शक्ती यांचा जास्त खर्च. शेवटी शेवटी जुळवून कवड्या टाकण्याची पद्धत निघाली. व्यंकू कुलकर्णी म्हणजे प्रत्यक्ष शकुनीमामाच. कवड्या जुळवून वाटेल तो फासा हमखास टाकण्यात त्याचा हातखंडा. त्याच्या खालोखाल मीही जुळवण्यास शिकलो. दहा, पंचवीस, सहा, बाराच काय, पण साधे तीन आणि चार हेही आम्ही जुळवून नेमके पाडीत असू. केव्हा केव्हा बाहेरचे लोक डाव पाहावयाला बसत असत. रंग बहारीचा चढे, पत्ते, गंजीफा आम्ही क्वचित् खेळत असू. बुद्धिबळाला तर हातच लागत नसे. तो गर्दीचा खेळ नव्हे. तितकी गंभीरताही आमच्यात नव्हती.

'किर्र' खेळ : आट्यापाट्या, हुतूतू, खोखो वगैरे मैदानी खेळ आम्ही खेळत असू. शिवाय किर्र म्हणून एक खेळ विशेष चुरशीचा असे. यात हरलेल्या बाजूचे गडी एकामागे एक कंबरेला हात धरून वाकून उभे राहात आणि विजयी बाजूचे गडी लांबून धावत येऊन त्यांच्यावर स्वार होत. ते बराच वेळ बसले आणि भार सहन होईनासा झाला, म्हणजे खालच्यापैकी कोणी तरी 'किर्र' म्हटले की, खाली उतरून पुन्हा उडी घेत. पण जर का वर बसलेल्यापैकी एकाचा जमिनीला पाय लागला की, त्याच्यावर डाव येऊन त्याच्या पक्षाला खाली वाकावे लागे. ब्राह्मणांची मुले हा खेळ खेळावयाला कचरत असत.

सूरपारंब्या : झाडावरचा सूर हा खेळ फार मौजेचा वाटे. जमखंडी गावाभोवती डोंगराच्या दरीतून व तळ्यांच्या काठी बऱ्याच रम्य आंबराया असत. येथे सायंकाळच्या वेळी निवांत असे. आमची वानरसेना हा खेळ खेळावयास एखादे विस्तीर्ण शाखेचे ठेंगणे आंब्याचे झाड गाठीत असे. सर्वांनी झाडावर चढावयाचे, एकाने खाली उतरून, एक दांडके आपल्या उजव्या तंगडीखालून दूर फेकावयाचे. ज्याच्यावर डाव आलेला असे तो ते आणीपर्यंत टाकणारा झाडावर चढे. ते दांडके ठरलेल्या कोंडाळ्यात ठेवून डाव आलेला गडी झाडावरच्यांना शिवण्याचा प्रयत्न करी. त्याची नजर चुकवून कोणी तरी दांडक्यावर नेमकी उडी टाकून ते दांडके पुन्हा पूर्वीप्रमाणे फेकून तो झाडावर चढे. कोणी तरी एकाला शिवेपर्यंत त्याच्यावरचा डाव जात नसे. हा खेळ मुख्यतः गुराखी मुलांचा असे. ह्याला वडाचे झाड चांगले. त्याच्या फांद्या लांबवर गेलेल्या असतात व लाकूड चिवट असल्याने मोडण्याची भीती नसते. आंब्याचे झाड पोकळ असते. शिवाय आंब्याच्या मोसमात आंबराईत राखण बसे. वडाला नेहमी मुक्तद्वार. शिवाय पारंब्या खाली लोंबत असल्यामुळे त्या धरून खाली उड्या घेण्यास किंवा खालूनच उलटे झाडावर चढण्यास हेच झाड फार सोयीचे. मात्र घरी येईपर्यंत अंगावरचे कपडेच काय, पण कातडेही जागजागी फाटलेले असल्यामुळे घरच्या मंडळीपासून फाटका

चित्रकला : आमचा सर्व वेळ अभ्यासात किंवा खेळातच जाई, असे नव्हे. नित्य काही तरी नवीन कल्पना निघे आणि आम्ही सर्वच त्यात रमत असू. चित्र काढण्यात आमच्यातला रामू रानडे याचा हात चांगला चाले. आमच्या टोळीला लागला चित्रे काढण्याचा नाद ! आमच्या सोप्यात आणि तुळशीकट्ट्यावरच्या भिंतीवर चमकावयाला लागली रामाची, मारुतीची, देवदेवींची चित्रे. तुळशीकट्ट्यावरची भिंत चुन्याची होती. तिचेवर मी लाईफ साईझ रामपंचायत रंगीत काढले होते. ते बरीच वर्षे राहिले होते. घरात आलेल्यांना ते दर्शनी भागी असल्यामुळे दिसे. आता आठवल्यावर मला त्याची लाज वाटते. (कारण त्याच दर्जाची ती आमची कला होती!) पण त्या वेळी मला त्या चित्राचा पोरकट गर्व वाटत होता. ह्यावरून मी लहानपणी किंचित् बढाईखोर असेन, असे वाटते.

कारागिरी : गणेशचतुर्थी आली आणि आमच्या टाळक्याने घेतले की, प्रत्येकाने गणपती स्वत: करावयाचा! मग चालले हे माकडमंडळ जमखंडीच्या पूर्वेस २-२।। मैलावर एक डोंगर आहे. तेथून शाडूची माती आणावयाला. बरीच शाडू आणून जो तो चढाओढीने गणपती करू लागला. 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ' असाही प्रकार पुष्कळांचा झाला. तरी प्रत्येकाला आपलीच कृती पसंत पडून प्रत्येकाने आपापली पाट आपणच थोपटून घेतली. खरे पाहता रामू रानड्याचा गणपती मात्र त्यातल्या त्यात गणपतीसारखा दिसत होता. काही असो, त्या गणेशचतुर्थीत सर्वांनी स्वकृत गणपतीचीच पूजा केली, ही काही थोडी गोष्ट नव्हे!

आमचे कारखाने : एकदा साबण करण्याची टूम निघाली. जो तो चुना आणि तेल ह्यात हात घालून बसला. वड्या तयार झाल्या, पण त्या वाळेचनात! वाळल्या तर पुन्हा ओल्याच होईनात. कपड्याला लावू गेलो तर कपडा फाटे, पण डाग काही जाईना. साबणाचे नवे डाग कपड्याला पडू लागले. चहूंकडे छी:थू झाली आणि आमच्या पियर्स सोप कंपनीचे दिवाळे निघाले. ह्याचप्रमाणे शिसेपेन्सिली, दगडी पेना ह्यांचे आमचे कारखाने जसे निघाले तसेच बुडाले. भागीदार आमचे आम्हीच असल्याने कोण कोणावर फिर्याद करतो? केली तरी पुन्हा हसेच होणार! तरी एका गोष्टीत आमचा हातखंडा असे. आमची शाई आम्हीच करीत असू. बाभळीच्या शेंगा शिजवून त्यात हिरडा व हिराकस घालून आम्ही शाईच्या बाटल्या भरून ठेवीत असू. मग वाटेल तितक्या दौती लवंडल्या तरी भरलेल्या बाटल्या कोनाड्यात शिल्लक असतच. मात्र ह्या शाईच्या कारखान्याच्या भरभरटीमुळे, शाई वेळोवेळी घरभर सांडे आणि त्यामुळे बिचाऱ्या आमच्या आईला सारवणाचा नवीनच त्रास उद्भवे. ह्या गालबोटामुळे आमच्या यशाची शुभ्रता जास्त उठावदार दिसू लागली. मग आईच्या त्रासाला कोण जुमानतो?

●●●

१४

माझ्या खोड्या

आग्रहीपणा : दंगा, मारामारी आणि स्वैर खेळ हे बालपणाचे जन्मसिद्ध हक्क होत आणि ते मी माझ्या परीने-आमचे बाबांचा आम्हावर कितीही दाब असो-बजावयाला काही कमी केले नाही. अगदी लहानपणी मी शेजारच्या मुलांना मारून आईकडे कागाळ्या आणीत असे, हे मला अद्यापि आठवते. आमचे आजोबा असताना आमच्या वाड्याच्या बाहेरच्या पटांगणात काही भाडोत्री कुळे राहात असत. त्यात पाटोळे नावाचे एकगरीब कूळ असे. त्यांचा रामू नावाचा एक माझ्याच वयाचा लहान मुलगा असे. सहज खेळता खेळता मी त्यांच्या डोक्यावर हात ठेवण्याचा हट्ट घेतला; पण हात ठेवू न देण्याचा त्यानेही हट्ट घेतला. कारण हट्ट करणे हा दोघांचाही सारखाच जन्मसिद्ध हक्क होता ना! शेवटी आम्हा लहानग्यांची मारामारी झाली. रामू आपल्या आईकडे रडत गेला. तरी मी त्याच्या मागे लागलोच होतो. शेवटी ह्या खटल्याचे अपील आमचे आईकडे आले. कारण रामूची आई माझ्या आईची मोठी मैत्रीण होती. आईने हा खटला साहजिकच आजोबांकडे वर्ग केला. आजोबांनी आम्हा दोघा हेकेखोरेना आपल्या समोर घेतले आणि दोघांना खाऊ देऊ केला; पण खाऊपेक्षा मला दावेदाराचे डोक्यावर हात ठेवण्यातच जास्ती ईर्षा वाटत होती. रामू खाऊला कबूल झाला आणि मी त्याच्या डोक्यावर हात ठेविला खटल्याचा निकाल लागला. बरा म्हणा वाईट म्हणा हा आग्रहीपणा माझ्यात केव्हा केव्हा चमकतो!

गांवढळ खोड : म्हातारबा सुतार म्हणून माझ्या वडिलांचे एक मित्र असत. त्यांची दोन मुले रामू आणि कृष्णा ही अनुक्रमे माझ्या आणि माझ्या वडील भावाच्या वयाची असत. मी मराठी शाळेत असताना आमची चौघांची फार गट्टी असे. एकदा आम्ही चौघे एकीकडे व दुसऱ्या आळीतील मुले दुसरीकडे, ह्यांची आमच्या घराच्या पश्चिमेस असलेल्या तळ्यात एक मोठी मारामारी झालेली आठवते. तळ्यात पाणी नसे. त्यात खेळण्यास विस्तीर्ण जागा असे ; पण एकदा रामूची आणि माझीच मारामारी जुंपुन आम्ही दोघेही आमच्या आळीतील मोठ्या रस्त्यात भली मोठी खोल गटारे होती त्यात घाणीत पडलो. रामूच्या आईने आम्हाला दोघांना धुतले, पुसले, खडे व काटे रुतले होते ते काढले. माझ्यापेक्षा रामूला जरी मार जास्त लागला होता. तरी त्याच्या आईने माझेच कौतुक करून मला आईकडे पाठविले.

विहिरीच्या जुन्या भिंतीवर एक प्रकारची बारीक लव्हाळ्याप्रमाणे वनस्पती चिकटून वाढत असे. ती वाळल्यावर आम्ही काढून आणीत असे. ती प्रतीपक्षाच्या मानेला न कळत फासल्यावर तेथे आग सुटे. हा खरोखर आमचा दृष्टपणा आणि भ्याडपणाही खरा; पण म्हणतात ना, प्रेमात

आणि युद्धात सगळेच काही शोभते. मग त्याला आम्हीच कसे अपवाद? शिमगा आला म्हणजे ह्या बालयुद्धाला नवीन जोम येई. पण जसजसा मी वरच्या वर्गात जाऊन ब्राह्मणांच्या मुलांना हाताशी घेऊ लागलो तसतसा हा गांवढळपणा कमी झाला. तरी माझ्या काही वैयक्तिक खोड्या चालूच होत्या.

रामतीर्थ : जमखंडीच्या पश्चिमेस रामतीर्थ म्हणून एक रम्य ठिकाण आहे. तेथे दर श्रावण सोमवारी जत्रा भरत असे. इ.स. १८५७ सालच्या बंडानंतर जमखंडीचे यजमान श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन ह्यांनी ह्या ठिकाणीच आपली वस्ती मांडली. पूर्वी येथे रामेश्वराचे एक जुने रम्य देऊळ होते. पुढे २५-३० वर्षात येथे विस्तीर्ण राजधानीचे स्थान झाले. पश्चिमेस डोंगराखाली कडपट्टी म्हणून एक लहान खेडेगाव आहे. तेथे बसवण्णाचे पुरातन प्रसिद्ध लिंगायत देवालय आहे. येथे मोठी यात्रा भरत असे. अप्पासाहेबांनी रामतीर्थ लोकप्रिय करण्यासाठीही यात्रा वर डोंगरात आपल्या राहण्याच्या जागी काही वर्षे नेली. रामतीर्थास जाण्याला एक वरची डोंगराची व दुसरी खालची सपाट-गाड्या वगैरे जाण्याची-अशा दोन वाटा असत. ह्या दोन्ही वाटा सोडून अगदी डोंगराच्या माथ्यावरून मेलगिरी लिंगाप्पाच्या देवळामागून रामेश्वराच्या देवळाला जाण्याची मी नवीन टूम काढली. ह्याचे कारण पावसाळ्यात डोंगरावरची व भोवतालच्या दूरवर मैदानी प्रदेशातील शोभा फार सुंदर दिसे.

विंचवांशी खेळ : ह्या डोंगरावर विंचू फार असत. ते भले मोठे काळे तांबडे असत. काळ्या विंचवाला इंगळी म्हणतात. ती चावली की प्राणान्तच! हे विंचू धरून त्यांची एक मोठी माळ करण्याची आम्हाला खोड लागली. दगड उचलला की, खाली विंचू आढळावयाचाच. मी तर विंचू धरण्यात मोठा धीट व पटाईत झालो. पुढे पुढे विंचवाच्या नांगीतले विष काढून त्याला अगदी तळहातात घेऊन मी इतर मुलांना चकीत करीत असे. विंचू नजरेस पडला की, तो आपली नांगी आधी वर करतो. ती मी मोठ्या शिताफीने चिमटीत घट्ट पकडीत असे. मग नखावर त्याच्या नांगीचे टोक घासले म्हणजे त्यातून विषाचा एक लहानसा बिंदू बाहेर निघे. तो पुसून टाकला की, विंचवाचे सर्व तेजच नाहीसे होई. तो आपोआपच नांगी खाली टाकी. मग त्याला कोणीही खुशाल हातावर घ्यावे. पण निस्तेज विंचवालाही हातात घेण्याचे धैर्य कोणास होत नसे. मग माझ्या फुशारकीला कोठली सीमा उरणार! घरात किंवा आमच्या शाळेत एखादा मोठा विंचू निघाला की मुले मजकडे येत. मी चटकन् तो धरून त्याचे विष काढून हातावर घेई. अशा गडबडीत एखादे वेळी चुकून मला विंचू चावतही असे; पण अभिमानास पेटून त्या वेदना मी मुकाट्याने सहन करीत असे. कोण हा अर्कटपणा!

सहिष्णूता : दुखणे आले किंवा जबर इजा झाली तर इतरांप्रमाणे मी विव्हळत नसे; स्वस्थ घुमेपणाने पडे. "विठ्या, काय तू बेरड आहेस रे!" असे आई म्हणे. तिकडे माझे लक्षच नसे. ही स्पार्टन सहिष्णुता माझ्यात जन्मतः नसून ती माझ्या मानीपणाने मी आणली होती. शिक्षकांनी छडी मारली की, साधारण मुले मोठ्याने किंकाळी फोडीत. इंग्रजी शाळेत गेल्यापासून मला तर शिक्षकाच्या हातून मार खाण्याची कधी अपवादादाखलही पाळी आली नाही. सहनशीलपणा वाढवावा म्हणून

रोज २०-२५ मैल सरोवरावरून बोटीतून जाई आणि उंच डोंगराच्या अगदी शिखरावर एकटाच तासन् तास जाऊन बसे. भीती वाटत नसे. भिण्यासारखे काही नव्हतेही. हॉटेलात श्रीमंत चोचले करणाऱ्या मंडळीत न मिसळता कोठे तरी अगदी एकान्तवासातील गरिबाच्या झोपडीत मी उतरत असे. सॅवरडेनॉन नावाच्या खेड्यात एका गरीब कुटुंबात मी उतरलो होतो. तेथील लहान मुलांना घेऊन मी लॉक् लोमंड सरोवरावर एकदा फिरत होतो. मनात आले की पोहावे. कपडे काढून घेतली उडी! जरी उन्हाळा होता तरी सरोवराचे पाणी इतके थंड होते की, मी पडल्याबरोबरच गारठलो. अंगाची मूठ वळावयाला लागली. पायाला गोळे येऊ लागले. मग पोहतो कसचा! मोठ्या प्रयासाने मी काठाला लागलो. लहान मुले घाबरून गेली. हा जिवावरचा प्रसंग गुदरला !

शर्यत : मी मराठी शाळेत असताना १०-१२ वर्षांचा होईपर्यंत तर फारच उतावळा, चळवळ्या व खोडकर होतो; पण माझा वडील भाऊ नेहमी पाठीराखा असे. म्हणूनच बाहेर गेलेला मी सुरक्षित घरी येत असे. एरवी आईला मोठी काळजीच असे. चैत्र महिन्यात रामतीर्थात श्रीमंत अप्पासाहेब गुरांचे जंगी प्रदर्शन करीत. त्या वेळी मोठमोठ्या शक्तिवान बैलाची ओझ्याने भरलेल्या गाड्या ओढण्याची शर्यत होत असे. ती पाहण्यास गावोगावच्या लोकांची मोठी गर्दी जमे. एकदा ही शर्यत पाहण्यासाठी मी आणि माझा भाऊ गेलो होतो. गर्दीत आम्हा मुलास कसे दिसणार? म्हणून आम्ही एका मोठ्या झाडावर चढलो; पण त्या झाडावर अगोदरच पुष्कळ माणसे चढून पाहात होती. त्या झाडाच्या एका मोठ्या उंच आणि लांब फांदीवर इतकी माणसे गर्दी करून बसली की, शेवटी भार सहन न होऊन ती संबंध फांदी माणसांसह तुटून खाली पडली. खाली देखील माणसांची गर्दीच होती. त्यामुळे मोठा हाहा:कार झाला. मीही उंचीवरून खाली पडलो. गर्दीत पडलो म्हणून हातपाय मोडले नाहीत; पण विलक्षण ओरखडले होते. इतक्यात पोलिसांची धराधरी चालली. मग मी जीव घेऊन पळत सुटलो. माझे लग्नातले मोठे लांब लाल पागोटे झाडाच्या फांदीत अडकलेले व लग्नातला लांब चिटाचा अंगरखा फाटलेला, शिवाय धोतर पायात अडकत होते. पोलीस तर धरावयास जवळ आलेला, अहाहा! काय तो प्रसंग! पण सर्वांना चुकवून पागोटेही झटकन ओढून घेऊन शेंडी सावरीत मी जी धूम ठोकली ती दीड मैल मागे न पाहाता घरापर्यंत मजल गाठली; पण मरण अद्यापि पुढेच होते. घरी बाबांनी फाटके कपडे पाहिल्यावर काय दशा होईल ती आठवून पोलिसपेक्षाही ह्या नवीन धास्तीने काळीज धडधडू लागले. घरी प्रवेश करण्याची छाती काही होईना. बाबा आहेत काय, कोठे बसले आहेत ह्याचा कानोसा वाकून पाहून घेतल्यावर चोराप्रमाणे मी आत शिरलो. बाबा घरी नाहीत हे पाहून हायसे वाटले व सर्व श्रमांचा परिहार झाला.

विशेष करामत : शिमग्यात एकदा अशीच खोड मोडली. शिमग्याचे दिवसात चांदण्या रात्री बाबांचा डोळा चुकवून उनाडक्या करीत आम्ही फिरत असू. विशेष करामत म्हणजे वेश्यांच्या आळीत बदफैली लोकांच्या नावाने शिमग्यातील अचकट-विचकट म्हणी म्हणत, अभद्र ध्वनी काढीत मध्यरात्र उलटून जाईपर्यंत हिंडावयाचे आणि पुन्हा धुळवडीच्या सकाळी भुताटकी करावयाची, ती निराळीच! एकदा मी काही मुलांबरोबर एका वेश्येच्या घराजवळ वाईट गाणी म्हणत बोंबलत गेलो. मुलाच्या नादी लागून तिच्या दाराशी मी दंगामस्ती करू लागलो. आतून बाळा काणे नावाचा एक तरुण ब्राह्मण त्रासून आला व त्याने मलाच पकडले. त्याच शिक्षकाने मला शाळेत घालण्याचा

१५

काही सवयी आणि वागणूक

हा काळ संपविण्यापूर्वी माझ्या काही सवयी व काही विशिष्ट वागणूक यासंबंधी आठवणी देणे बरे. माझ्या वयाच्या ६ व्या वर्षी मी प्राथमिक शाळेत गेलो आणि १२ व्या वर्षी हायस्कुलात गेलो. १९ वे वर्ष संपण्यापूर्वी माझे दुय्यम शिक्षण संपले. ह्या तिन्ही टप्प्यात माझ्या स्वभावात निरनिराळे फरक पडून अधिकाधिक विकास घडत असलेला मला देखील कळून येत होता.

पेहराव : प्राथमिक शाळेत असताना माझ्या पोषाखाचे बाबतीत मी फार गबाळ्या होतो. कर्नाटकात प्राथमिक शाळेत जाण्याच्या वयातही लहान मुले रुमालच बांधीत असतात. अजूनही खेड्यात तेथे हाच प्रकार दिसतो. पुणेरी टोपी मी सबंध हायस्कूलात असताना घातली नाही. पुण्यात कॉलेजात आल्यावर मोठमोठी बी. ए. च्या वर्गातली मुले नेहमीच-आणि मोठे प्रोफेसरही केव्हा केव्हा-टोपी घातलेली पाहून आम्हा कर्नाटकीयांना मोठेच आश्चर्य वाटे. आमच्या हायस्कूलच्या काळात पुणेरी टोप्या जमखंडी येथील दुकानात विकत मिळणेच संभवनीय नव्हते. मग कोट आणि वास्कुटांचे नावच घ्यावयाला नको. खादीच्या बंड्या आणि वरती केव्हा तरी घालावयाला लांब झग्याचे व अस्तन्याचे मांजरपाटी आंगरखे आणि नेसण्यास धोतर असत. डोईला कर्नाटकी जाडाभरडा रुमाल. तो मला प्राथमिक शाळेत असताना तरी नीट बांधावयाला येत नसे ! ब्राह्मणांची मुले लंगोटी घालीत; पण घरंदाज मराठ्यांची मुले धोतरे किंवा विजारी घालावयाची. धोतरे मळलेली, अंगारख्यावर शाई सांडलेली आणि रुमालाच्या एकदोन फेरी गळ्यात आलेल्या, कसे तरी अस्ताव्यस्त बांधलेले खड्यांचे दप्तर आणि पाटी सावरीत १०-१०।। वाजता आमची स्वारी दुडदुड धावत येई. भूक इतकी लागलेली असे की, आईला ओरबाडून खाण्याची तयारी! आमच्या सोप्यात समोरच्या भिंतीत एकावर एक असे दोन मोठे कोनाडे असत. वरच्या कोनाड्यात दप्तर पुस्तके वगैरे आणि खालच्यात कपडे ठेवावयाचे असत. पण मी हे सर्व उभ्याउभ्याच फेकून देत असे. ते सर्व नीट ठेवण्याचे काम माझ्या मोठ्या भावाचे किंवा आईचे. बाबांच्या दाबामुळे आंघोळ केल्याशिवाय गत्यंतरच नसे; पण ती आंघोळ त्याच मासल्याची, म्हणजे सगळे आंग काही भिजावयाचे नाही. मात्र कपाळावर गंधाचा नाम मात्र मोठा ओढलेला. त्यामुळे बाबांचे लक्ष आंघोळीच्या व्यंगाकडे जात नसे!

साधी राहणी : पोषाख भपकेदार करणे किंवा दागदागिने घालून नटणे ह्याची मला लहानपणापासून कधीच आवड नव्हती. हायस्कुलात गेल्यावर पोषाखातला गैदीपणा कमी झाला. तरी माझे लक्ष अशा गोष्टीकडे फारसे नसे. साधेपणा मला नेहमीच आवडे. बरेच दिवस अंगात

होई. एका जेकावर (चिखलाचा ६ इंचाचा एक लहानसा खांब) एक आडवी चोय ठेवून तिला दोन्ही टोकांना चिखलाच्या पणत्यातून दिवे लावून ते गरगर फिरवून आम्ही गुळ्ळव्वापुढे खेळत असू. चिखलाचा एक रेडा करावयाचा, त्याच्या पाठीला एक खळगा करून त्यात कुंकवाचे पाणी भरावयाचे आणि चिखलाच्याच सुरीने तो रेडा गुळ्ळव्वापुढे कापावयाचा. ह्या कामात माझा हातखंडा. दुसरे दिवशी बुधवारी गुळ्ळव्वाचे विसर्जन करावयाला आम्ही जनाक्काच्या मैत्रिणी घेऊन डोंगरात जाऊन सबंध दिवसभर खेळून येत असू. तेव्हा शिदोऱ्या, लाह्या, खोबरे यांची लयलूट! हे एक बाळ वनभोजनच. खरे पाहाता हा खेळ मुलींचाच. मी गेलो म्हणजे मुली "शेळ्यात लांडगा आणि बायकात हांडगा" असे म्हणून माझी टिंगल करीत. तरी पण जनाक्कासाठी ते सर्व सोसून तिच्या खेळाचे सुख मी भोगी. मी माझ्या वाचनातल्या गोष्टी व सहलीतील अनुभवही जनाक्काला वेळोवेळी सांगून तिला मी माझ्या ज्ञानाच्या व माहितीच्या पातळीवर (Level) ठेवण्याचा सतत प्रयत्न करी. जनाक्काचा प्रतियोगी सहकार असावयाचाच.

घरकामाची लहर : लहर आली म्हणजे मी आईच्या घरकामालाही हातभार लावीत असे. विशेषतः सणावारी स्वयंपाकघरात काही गोडधोड होऊ लागले की, माझ्या मातृभक्तीला पूर यावयाचा! नागपंचमीचे लाह्यापीठाचे लाडू, गणेशचतुर्थीचे मोदक, नवरात्रीच्या कडाकण्या, दिवाळीच्या करंज्या-कडबोळी, मोहरमातला मलीदा-चोंगे वगैरे खाण्याचे पदार्थ करण्याला माझी पुस्तके टाकून तिच्या पुढेपुढे मी इतका सुळसुळत असे की, जणू तिची मी एक सूनच! आईने पुरण घातले की कणीक मऊ करण्याला मी काच्या मारून दुःशासनवधासाठी जसा भीम असा सज्ज होई! अशा वेळी रामायण-भारतातील वामनाचे श्लोक, मोरोपंतांच्या आर्या आईपुढे म्हणून दाखविण्याचा तोंडाचा पट्टा एकदा का सुरू झाला, की कणीक मऊ झाली तरी हे साग्रसंगीत दुःशासन वध चालूच राही. मग आई तिकडे न का ऐकेना! "अरे विठ्या, लाकडाचे असते तर हे तोंड केव्हाच झिजले असते की रे!" असे आई कानडीत म्हणे. जनाक्का मात्र मोठी कामचुकार असे. खायला मी आणि कामाला माझा मोठा भाऊ हा तिचा बाणा असे.

अव्यवहारीपणा : डोंगरातून जळाऊ लाकाडांचा भारा आणून आईला मदत करण्याचे एकदा अस्मादिकांनी मनात आणिले. लागलीच एक कुऱ्हाड व एक मोठी दोरी मी घेऊन निघालो. पण शेवटी "जेनु काम तेनु थाय, बिजा करेसो गोते खाय" असाच शेवटी प्रकार घडला. जाळण्याला अगदी निरुपयोगी अशा काटेरी झुडुपांचा भारा मी तयार केला. पण तो काही केल्या मला घरापर्यंत आणता येईना. रात्र पडावयाला झाली तरी हा गडी घरी येईना, म्हणून आई अर्ध्या वाटेवर मला हुडकायला आलेली भेटली. भारा अर्ध्या वाटेवरच टाकून कसे यावे लागले ही रडकथा आईस सांगण्याची पाळी आली. कसली लाकडे गोळा केली हे आईने विचारता त्या झुडुपाचा मासला दाखविला. तिने कपाळाला हात मारून म्हटले "हायस्कुलात पहिला नंबर मिळाला तरी जळाऊ लाकूड कोणते व त्याचा भारा घरापर्यंत कसा आणावा हे व्यवहारज्ञान तुला नाही रे पोरा! लाकडे नाहीत ती नाहीत, पण दोरी मात्र डोंगरात टाकून हात हालवीत आलास. काय तुझी तारीफ !"

१६

माझ्या एकांत सहली

एकान्तातील सहली : जमखंडी हा गाव तिन्ही बाजूंनी डोंगराच्या बगलेत आहे. विशेषत: दक्षिणेस मुधोळ संस्थानच्या वाटेवर तर एक सुंदर लांब दरी आहे. तिच्यात कट्टेगिरी नावाचा दुसरा एक विस्तीर्ण तलाव आहे. पावसाळ्यात हा भरून वाहू लागला, म्हणजे त्या सर्व प्रदेशास सुंदर वन्य शोभा येत असे. मी जरी नेहमी माझ्या सवंगड्यांच्या घेऱ्यात अडकलेला दिसे, तरी एखाद्या दरीतून, डोंगराच्या माथ्यावरून, पूर्व व उत्तर या बाजूने पिकलेल्या शेतातून किंवा जमखंडीतील मोतीबागेतून एकटेच हिंडणे मला फार आवडत असे. जमखंडीचे उत्तरेस ४-४।। मैलांवर कृष्णेचे भव्य पात्र आहे. ते माझ्या नित्याच्या आटोक्याच्या बाहेरचे असे ; पण तेथेही केव्हा केव्हा मी माझी गोपाळमंडळी घेऊन जात असे. माझ्या हृदयाचा परिपोष माझ्या एकान्तातील सहलीमुळेच विशेष झाला. निर्जन डोंगरातून व दरीतून हिंडत असताना मी वाचलेल्या कादंबरीतला नायक मीच बनत असे. मात्र नायिका नसल्यामुळे माझा विप्रलंभ श्रृंगार लंगडालुळा पडत असे. जमखंडीत वसंत ऋतूत काही आंबरायांना मोहोर येऊन झाडावरच्या कोकिळा मदोन्मत होत ! उन्हाळा तेथे कडक भासे, सायंकाळच्या क्लांत समयी मी मोतीबागेतल्या कारंज्याजवळच्या बकुळीच्या झाडाखाली बकुळीच्या मधुर सुगंधाच्या फुलांच्या माळा विणीत बसलो असता--

कारंजाचे तुषार वाटति अग्निकणांचे परी,
पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूळ निपजवी शिरी
कोकिळकूजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी

वगैरे संगीत सौभद्र नाटकातून ऐकलेल्या पीडा मलाच होऊ लागत! पण सुभद्रेचा मागमूस कोठेच नसे ! सुभद्रा खोटी असली तरी सृष्टिदेवीचे हावभाव नजरेपुढे खरेच असत. मोठा झाल्यावर कालिदास, बाणभट्ट आणि त्याहीपुढे वर्डस्वर्थ आणि स्कॉटस् ह्या कवींनी व कादंबरीकारांनी जे दिव्यामृत पाजिले त्याचेच बाळकडू मला ह्या ओबडधोबड कादंबऱ्यांनी व नाटकांनी पोरवयातच पाजिले होते. मग त्यांचा मी आभारी का असू नये?

पहिला ठसा : पण सर्वांच्याही पूर्वी मला हृदयदान दिले. ते माझ्या पवित्र आईनेच! तिच्याच पुण्यप्रभावाने मला सर्व जड रसातून तारण मिळून माझ्या हृदयाचा परिपाक प्रथम धर्माच्या भक्तीरसात व नंतर तत्त्वज्ञानाच्या शांत रसात झाला. माझ्या वेळच्या मराठी पाचव्या क्रमिक पुस्तकात 'सहल करून येणे' हा एक धडा होता. तो मला फार आवडत असे. त्या आवडीचे

१७

माझे वाचन

खाजगी वाचन : आधुनिक विद्यार्थ्यांच्या मनाची वाट शाळेबाहेरच्या वाचनावर अवलंबून आहे. आधुनिक शिक्षणाला विद्यार्थ्यांच्या खाजगी वाचनाची जोड मिळाल्याशिवाय ते सर्व निरुपयोगी ठरते, हे आता सर्वमान्य तत्त्व झाले आहे ; पण माझ्या हायस्कुलच्या काळात हे तत्त्व आमच्या शिक्षकांना नुसते माहीतही नव्हते, मग मान्यता बाजूसच राहिली. आमची शाळा बहुतेक खेडवळ. मग तेथे पुस्तकालय कोठून असणार ? त्या वेळी मराठीतील वाङ्मयच मुळी जर संपुष्टात होते, तर माझ्या वाचनाचा मुद्दा कसा निघणार ? तरी मी इंग्रजी तिसऱ्या-चौथ्या इयत्तेत जाईपर्यंत मराठीतल्या त्या वेळच्या अद्‌भुत कथानकाच्या व उघड शृंगाराच्या कादंबऱ्या बऱ्याच वाचल्या होत्या. माझ्याइतक्या कादंबऱ्या त्या वेळच्या माझ्या सोबत्यांपैकी कोणीच वाचल्या नव्हत्या. मला अगदी लहानपणी तोंडी गोष्टी ऐकण्याचा फार नाद असे. हा नाद माझ्या आईनेच मला बाळपणी अद्‌भुत व करुण रसांच्या गोड गोड गोष्टी सांगून लावून ठेविला होता. पुढे घरी कोणी आल्या-गेल्याजवळ गोष्टी सांगण्याचा मी तगादा लावीत असे. ह्या बाहेरच्या लोकांनी मला ज्या गोष्टी सांगितल्या त्या मात्र सर्वच लहान मुलांनी ऐकण्यासारख्या नव्हत्या. काहीत बीभत्सपणा उघड असे. त्या वेळचे गांवढळ जगच तसे होते.

कादंबरी वाचन : पुढे मराठी ४/५ इयत्तेत असताना गुलबकावली, वेताळपंचविशी, बत्तीस पुतळी, शुकबहात्तरी वगैरे पुस्तके माझ्या हातात येऊ लागली. इंग्रजी शाळेतील खालच्या वर्गात असताना विचित्रपुरी, मंजुघोषा, मदनमंजरी, वसंतकोकिला, शृंगारसुंदरी ही आणि अशी कित्येक पुस्तके मी आधाशाप्रमाणे केव्हाच वाचून टाकीत असे. ही पुस्तके मला कोठून मिळत ह्याचेच मला आता आश्चर्य वाटते. 'इच्छा तेथे वाट सापडते' ही इंग्रजी म्हण माझ्या अनुभवास, ह्या कादंबरी-वाचनाच्या बाबतीत त्या वेळी फार येत असे. पुढे पुढे ६/७ व्या इयत्तेत गेल्यावर अरेबियन नाइटस्‌चे भाषांतर, नारायणराव गोदावरी, वेषधारी पंजाबी अशा प्रकारची पुस्तके मिळू लागली. हरि नारायण आपटे ह्यांची पुस्तके व 'करमणूक' हे पत्र मी पुण्यात कॉलेजात जाईपर्यंत मिळणे शक्यच नव्हते. किंबहुना ती त्या वेळी अस्तित्वातच नव्हती. मराठी शाळेतील बींभत्स गोष्टी आणि इंग्रजी शाळेतल्या उघड शृंगाराच्या घवघवीत वर्णनाच्या कादंबऱ्या यामुळे माझ्या कोमल आणि भावनाशील मनावर काही अंशी अनिष्ट परिणाम झाला, हे मला पुढे कळून आले. १४/१५ व्या वर्षाच्या आतच माझ्यात अकालीन शृंगार रसाचा प्रादुर्भाव झाला असावा, असे मला वाटते.

वाचनाचे वेड : करुण, श्रृंगार, वीर, रौद्र इत्यादी रसही समजू लागून माझ्या बुद्धीप्रमाणेच हृदयाचाही परिपोष होऊ लागला. तरी पण त्या काळच्या वाङ्मयातील तुटपुंजेपणामुळे मी अकाली

१८

पोरवयातील माझी धर्मभावना

प्रस्ताव : हायस्कूलचा काळ, इ.स. १८९१ अखेर म्हणजे माझ्या वयाची अठरा वर्षे. तेथपर्यंत माझा अभ्यास, खेळ, खोड्या, सोबत्यांचा सहवास व माझा एकान्तवास वगैरे गोष्टी उघडपणे मी सांगितल्या. आता जी धर्मभावनांची आठवण मी सांगणार आहे तो विषय गंभीर आहे. इतकेच नव्हे तर तो माझ्या चरित्रातला आत्मा आहे. धर्माने माझ्या आयुष्याचा प्रवाह, निदान त्याची दिशा तरी, पुढे पार बदलली. अशा महत्त्वाच्या विषयासंबंधी लिहिण्यापूर्वी धर्माविषयी माझी दृष्टी कशी आहे ते सांगणे जरूर आहे. मी केवळ आठवणी व मागील अनुभव लिहीत असता मध्येच माझी आताची दृष्टी किंवा विचार देणे आगंतुक विषयांतर आहे, हे मला कबूल आहे. पण माझी दृष्टी समजल्याशिवाय मी धर्माविषयी जे लिहीन ते वाचकांस न समजता कदाचित् गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून हे विषयांतर क्षम्य आहे, असे मला वाटते.

इतर गोष्टी वेगळ्या आणि धर्म ही बाब वेगळी, अशी पुष्कळ सुज्ञांचीही समज असते. पण इतर गोष्टींप्रमाणेच मनुष्यमात्रात धर्माची जी उपजत बुद्धी आढळते तीही परिणतीचा व विकासाचा विषय आहे असे मला वाटते. म्हणजे तीही नैसर्गिक नियमांना अनुसरूनच उपजते, वाढते आणि कदाचित् लयही पावते. खाणे, पिणे, वाचन, अभ्यास, मैत्री, वैर, खेळ, खोड्या, संपत्ती, विपत्ती वगैरे गोष्टी केवळ निसर्गाच्या नियमाप्रमाणे घडतात. त्यांना काही ईश्वरी प्रसादाची किंवा प्रेरणेची गरज नाही. मात्र धर्माच्या जागृतीला आणि वाढीलाच काय ती ईश्वरी कृत्याची जरुरी आहे, असे मला वाटत नाही. अशी जरूरी माझ्या धर्मबुद्धीला असेल तर ती माझ्या पाळण्यातल्या खेळांना आणि पोरकट खोड्यांना का नसावी ? मी जे बरे केले असेल, तेवढीच नेमकी ईश्वरी कृपा आणि वाईट गोष्टींना मात्र मीच जबाबदार, असे माझे मत नाही.

आपल्या चारित्र्याबद्दल व्यक्तीच सर्वस्वी जबाबदार असेही माझे म्हणणे नाही. जशी व्यक्ती जबाबदार आहे तसाच त्या व्यक्तीचा अनुवंश (पूर्वपरंपरा) आणि परिस्थिती (हिच्यातच त्या व्यक्तीचे शिक्षण, नातलग, स्नेही, वैरी वगैरे सर्वच नैसर्गिक बाबींचा समावेश होतो.) ह्याही गोष्टी जबाबदार आहेत. एकूण मनुष्याच्या चारित्र्याबद्दल व्यक्ती आणि निसर्ग ही दोनच कारणे पुरी असून, ईश्वराला त्यामध्ये खेचणे अनावश्यक दिसते. दांडगाई, मारामारी आणि माझ्या दुष्ट खोड्यांच्या आठवणी ज्या लेखणीने आणि ज्या ओघात लिहिल्या त्याच लेखणीने आणि त्याच ओघात मी माझ्या धर्माचाही विषय लिहितो, हे पाहून कोणा वाचकाचे कोवळे मन प्रथमच बिचकू नये आणि पुढेही ज्या सहज आणि मोकळ्या मनाने माझी व्यंगे मी सांगितली तशाच मोकळेपणाने माझ्या धार्मिक भावनांचा अहवाल मी सांगत आहे हे वाचून कोणाच्या कोवळ्या विचारांना धक्का लागू नये, म्हणून मध्येच ही थोडी प्रस्तावना केली आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१९

मूर्तिपूजा

देव्हारा : येथपर्यंत मी जे लिहिले त्या माझ्या बालवयातल्या चेष्टा होत्या. हा प्राथमिक शाळेतला १२ वर्षाच्या वयातला काळ होता. ह्या काळातही मी घरी देवपूजा केव्हा केव्हा फार मन लावून करीत असे. देव्हाऱ्यावर देव पुष्कळ असत. शिवाय इतर कोनाड्यातूनही पूजनीय वस्तु पुष्कळ ठेविलेल्या असत. उदाहरणार्थ, आमचा देव्हारा म्हणजे देवघरातल्या भिंतीत माझ्या कंबरेइतक्या उंचीवर एक मोठा चार फूट रुंद व तितकाच उंच आणि ३/४ फूट खोल असा कोनाडा होता. त्यात प्रथम देवांच्या मूर्ती आणि पितरांचे टाक नीट मांडावयाचे असत. त्यापुढे शाळिग्राम, निरनिराळ्या नद्यांतले गोटे, त्याचेहीपुढे घंटा, धूपारती, कापुरारती निरांजने, पळी, पंचपात्री आणि उजवीकडे एका अडणीवर मोठा शंख आणखी एक लहान शंख वगैरे ठेवलेले असत. उजवीकडे आत पुन्हा एका खिडकीत श्री यल्लमाची चवरी आणि आमच्या आजीची ताळी वगैरे जवाहीर असे. डावीकडील एका लहानशा देवळीत एक समई आणि जवळ एक काशीहून आणलेला गंगोदक बंद करून ठेवलेला तांब्या अशा किती तरी वस्तूंचा सुंदर संभार असे.

पूजेचा उत्साह : मनाला आले की, ह्या सर्व देवदेवता आणि इतर वस्तु धुऊन पुसून व्यवस्थेने मांडून त्यावर गंधाक्षता, कुंकू, हळद, फुले यथासांग लावून पूजा करण्यात करण्यात त्या बाळपणी देखील मला मोठे सुख आणि ईर्षा वाटे. ती माझ्या वडील भावाला वाटत नसावी आणि हा आम्हा दोघा भावांमधील भेद बहुतकरून माझ्या बाबांच्या लक्षात आला असावा ; म्हणून ते मलाच पूजा करावयास सांगत असावेत. ह्यावरून माझ्या स्वभावातील उत्साह हा गुणही दिसून येतो. विशेष सणावारी घरी काही गोडधोड नैवेद्याचे झाले, म्हणजे माझ्या बाळभक्तीला पूरच येत असे. मानवी जातीप्रमाणे व्यक्तीतही सकाम भक्ती अगोदर असणारच. मग मला ह्यात लाज आणणारे काही विशेष नाही.

आध्यात्मिकता : मूर्तिपूजा मुलांना आणि बायकांना देखील आवश्यक नाही, असे माझे आता धर्माचा इतिहास शास्त्रीय दृष्टीने वाचून ठाम मत झाले आहे. तरी त्या वेळी मूर्तिपूजेत माझी मोठी करमणूकच होई. आपण काही विशेष गोष्ट करीत आहो असे वाटे. ती गोष्ट अध्यात्मिक होती, हे त्या वेळी वाटणे शक्यच नव्हते. तरी मला जो उत्साह आणि निरतिशय आनंद वाटत होता, तो केवळ नैवेद्याच्या लोभामुळेच होता असेही नव्हते. माझ्या बाबांची दरारा घरी फार होता, तरी माझ्या आईवर लहानपणीही मी इतका दाब टाकत असे की, हट्ट धरला असता तर देवांच्याही अगोदर मला केलेले गोड पदार्थ खावयाला मिळाले असते. बाबांनीही ज्या अर्थी पूजेची मजवर सक्ती कधी केली नाही त्या अर्थी पूजा करण्यात मला तितक्या कोवळ्या वयातही ९/१० वर्षांचा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२०

भावी सामाजिक सुधारणेची तयारी

हायस्कुलात असताना विशेषतः ४ थ्या ५ व्या इयत्तेपासून पुढे माझ्यामध्ये भावी सामाजिक सुधारणेचे बीजारोपण कसे होऊ लागले ह्या संबंधीच्या आठवणी देऊन मी हा हायस्कूलचा काळ पूर्ण करणार आहे. ह्यालाही माझ्या आईबाबांचा धर्म आणि शील हीच केवळ कारणीभूत आहेत.

भावंडांची नावे : माझ्या आजा-आजींचा धर्म कसाही असो, ते जिवंत असेतोपर्यंत जरी माझ्या आईबाबांनी त्यांच्या पुरातन देवदेवींच्या उपासनेची परंपरा बिन तक्रार चालविली होती, तरी ती त्यांच्या पाठीमागे फार दिवस टिकली नाही. आजा-आजी असतानाच बाबांचा पंढरपूरच्या वारकरी पंथात नुसता प्रवेशच नव्हे तर पुढाकारही चालू होता. माझ्या वडील भावाचे लाडके नाव जरी भाऊ असे होते तरी त्याचे पाळण्यात ठेवलेले खरे नाव परशुराम हे होते. श्री यल्लमा हे रेणुकादेवी-जमदग्नी ऋषीची पत्नी-हिचे तेलुगू अथवा कानडी नाव होय. तिचा मुलगा परशुराम. हे नाव माझ्या भावाला श्री यल्लमाची भक्ती करणारी जी माझी आजी तिने ठेविले असावे. पण पुढील सर्व मुलांची नावे माझ्या बाबांनी आपल्या पंढरपूरच्या भागवत संप्रदायाप्रमाणे ठेविलेली आहेत. ती अशी, परशुरामाच्या पाठीवरच्या आणि माझ्या आधीच्या मुलाचे नाव कृष्णा. हा लहान असतानाच माझे आईचे अंगाखाली झोपेत चेंगरून मरण पावला, हे मागे आलेच आहे. ह्यानंतर माझे नाव विठू. जन्मपत्रिकेत माझे पाळण्यात ठेविलेले नाव तुकाराम असे आढळते. माझ्या जन्माचे वेळी बाबा पंढरपूरच्या वारीला गेले होते. म्हणून परत आल्यावर त्यांनी माझे नाव विठ्ठल हे ठेविले. मी पाचवा मुलगा. माझ्यानंतरचा मुलगा नाव ठेवण्यापूर्वी ६/७ वे दिवशीच वारला. नंतर मुलगी झाली. ती ७ वी जनाक्का. ही कार्तिक शुद्ध एकादशीस जन्मली. ह्या वेळीही बाबा पंढरपुरास जाऊन आले असावेत. आठवी मुलगी तान्याक्का. हिचे पाळण्यातले नाव मुक्ताबाई असे आहे. पुढे जी बरीच मुले झाली ती लहानपणीच वारली. त्यापैकी एकाचे नाव दत्त होते. शेवटचा मुलगा एकनाथ. अगदी अखेरचे मूल चंद्राबाई. हे नाव मात्र बबलादी सिद्धांचे जे उपास्यदैवत चंद्रगिरीताई तिचेवरून ठेविले होते. एकंदरीत वारकरी पंथाच्या साध्या, उदार, प्रागतिक, भागवत धर्माचा पगडा माझ्या वडिलांच्या मनावर आणि अकृत्रिम शीलावरही बसला होता.

मातापित्यांचे ऋण : तुकाराम हे नाव मागे पडून विठू हे माझे नाव कसे पुढे रूढ झाले त्याचा जरी शोध आता नीट लागण्याचा संभव नाही, तरी माझ्या बाबांच्या भागवत धर्मातून माझी भावी सामाजिक सुधारणा कशी उदय पावली हे शोधून काढणे तितके कठीण नाही.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।१।।

लहानग्या मित्रांबरोबर लडिवाळपणाने व मोकळेपणाने वागत. आई तर माझ्या कोणाही मित्राला आपल्याच मुलाप्रमाणे वागवावयाला केव्हाही तयार असे. ह्यामुळे आमचे घरी विश्वकुटुंबीयतेचा जिवंत देखावा अथवा साक्षात्कार दिसे.

नुसता पडदा न घालणे ह्यात काही विशेष नाही ; पण अंतःकरणातच मुळी पडद्याला थारा न देणे ही दैवी कृपा होय. आमचे घर म्हणजे ह्या कृपेचा एक देव्हारा होता! प्रापंचिक विपत्ती कितीही आल्या; दारिद्र्य, आजार, मरण, कर्जाचा बोजा असले इतर कितीही मनाची पारख करणारे प्रसंग आले, तरी घरचे शांतीचे वातावरण कधी क्षुब्ध होत नसे. येणेप्रमाणे भौतिक दारिद्र्यात आत्मिक श्रीमंतीचा भोग आमचे घरी आणि घरातील लहानथोर व्यक्तीत दिसत असे. अशा घरी मग जातिभेदाला कोठून वाव मिळणार! आधुनिक सुधारकांप्रमाणे जातिभेद मोडण्याची उठाठेव करण्याची आम्हाला कधी पाळीच येत नसे. कारण तो जातिभेदाचा संस्कारच आम्हावर घडला नव्हता. लहान मुलांपुढे मद्यपाननिषेधाच्या व्याख्यानाची जरुरीच नसते. त्याप्रमाणे जातिभेद मोडण्याचा कोणी आम्हाला उपदेश केला असता, तर तो मुळी आम्हाला समजलाही नसता. इतके आम्ही ह्या भेदाच्या अमंगळ विषाला अनभिज्ञ होतो!

मुलींचे शिक्षण : शिक्षणाचे बाबतीत आमच्या घराण्याचा त्या प्रांतात मोठा विशेष होता. बाबांनी जे पुस्तकी शिक्षण आणि जी बहुश्रुतता मिळविली ती त्या काळचे मानाने नावाजण्यासारखी होती. आणि मीही पुढे हायस्कुलात जाऊन सतत नंबर पहिला ठेविला व त्या काळच्या विद्यार्थी वर्गात अग्रगण्य झालो. ह्याचे प्रत्यक्ष श्रेय बाबांना नाही तरी अप्रत्यक्षपणे पूर्व भूमिका तयार केल्याचे श्रेय त्यांचेकडेच जाते. पण ह्यापेक्षाही त्यांच्या प्रागतिकपणाचे मोठे कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनी आपल्या दोन्ही मुलींनाही शाळेत घातले ही होय. मी जसा माझ्या हायस्कुलात अगदी पहिल्या अमदानीतला मुलगा तशा माझ्या बहिणी त्या वेळच्या मुलींच्या शाळेतल्या जवळजवळ पहिल्याच विद्यार्थिनी होत्या! जनाक्का आणि तान्याक्का ह्या दोघी माझेपेक्षा धाकट्या बहिणी. पहिली मोठी हुशार, सतेज दिसे. दुसरी धाकटी मात्र अगदी भोळी आणि बुद्धीने मागासलेली असे. जनाक्का बाबांची विशेष लाडकी. क्षत्रिय घराण्यात लहानपणी मुलींना मुलांचाच पोषाख घालण्याची बऱ्याच ठिकाणी चाल आहे. अशा मुलींना वडील केव्हा केव्हा सभांतून व दरबारातून अशाच पुरुषी पोषाखात घेऊन जात असतात. जनाक्काचा हा पोषाख व त्या वेळचे तिचे बाळसे बाबांना व आमच्या घरच्या सर्व मंडळींना फार आवडत असे. आम्ही मुलांनी कधी विजार घातली नाहीत तरी पण जनाक्काला ऊर्फ आपल्या 'आईला' बाबांनी कोल्हापूरी पद्धतीची तुमान करून आवडीने घालावी! आणि तिनेही ती घालून मोठ्या दिमाखाने आम्हापुढे यावे!

स्वभाव-लक्षणे : वरील परिस्थितीत वाढल्यामुळे माझ्या भावी सुधारणेची तयारी कशी झाली हे निराळे फारसे सांगावयाला नको. स्वातंत्र्याची प्रीती, नव्या जीवनाचा शोक व सत्याचा छडा लावण्याची जन्मजात हौस ही माझ्या स्वभावाची मुख्य लक्षणे होती. ह्या लक्षणांना कोणत्याही तऱ्हेने आळा घालण्याचा माझ्या आईबाबांनी कधीही प्रयत्न केला नाही, हे केवढे माझे भाग्य. कुरणात चरणाऱ्या आईबापांजवळ त्यांचे शिंगरू ज्याप्रमाणे स्वच्छंदाने बागडत असते, तद्वत् माझ्या आईबाबांचा मला आश्रय होता पण दाब कसलाही नव्हता! मी एखादी चांगली, पण अगदी

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२१

कॉलेज प्रवेश

इ. स. १८९३ चे आरंभापासून तो इ. स. १८९८ अखेर सहा वर्षे मी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये होतो. ह्या काळाचे दोन भाग पडतात. प्रिव्हियस आणि इंटरमिजियट परीक्षांचा पहिला भाग आणि बी. ए. आणि एल्एल्. बी. या परीक्षांचा दुसरा भाग. ह्या दोन भागात माझ्या घरची स्थिती, सांपत्तिक स्थिती, मन:स्थिती व देशस्थिती वगैरे अनेक कारणांमुळे बराच भेद पडला आहे.

घरची अत्यंत गरिबी, निराधार होऊन मी पुण्यासारख्या विस्तीर्ण शहरात कोणाची ओळख ना पाळख असा आलेला. तशात फर्ग्युसन कॉलेजमध्ये कसा प्रवेश मिळाला ह्याचे मला अद्यापी आश्चर्य वाटते. हायस्कुलातील सहाव्या इयत्तेतील माझे शिक्षक रा. वासुदेवराव चिरमुले, बी. ए. ह्यांनी 'पुणे येथे गरीब मराठा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे बाबतीत मदत करणारी एक संस्था आहे,' असे सांगितले, म्हणून केवळ माझे नशिबाची परीक्षा करण्याकरिता मी ह्या अफाट शहरात येऊन पडलो.

त्या वेळी मला विसावे वर्ष देखील पुरे झाले नव्हते. मॅट्रिकच्या परीक्षेकरिता मी पुण्यास इ. स. १८९१ चे अखेरीस फार तर एक आठवडा राहिलो असेन ; पण परीक्षेच्या घाईत ह्या शहरातील परीक्षेच्या मंडपापलीकडे अधिक माहिती होणे संभवनीय नव्हते. आमचे हायस्कूलचे हेडमास्तर रा. त्रिंबकराव खांडेकर ह्यांना मी आवडत नसे. त्यांचे एक बंधु पुण्यास वकील होते. त्यांना एखादे माझ्या ओळखीचे पत्र दिले असेल की काय हेही मला आठवत नाही. ह्या वकिलांचा एक मुलगा जमखंडी हायस्कुलात शिकण्यासाठी आपल्या चुलत्याकडे राहण्यासाठी आला होता. त्याचेशी माझी थोडी ओळख होती. पण त्याची भेट होऊन त्याच्याकडून किंवा त्याच्या वडिलांकडून मला विशेष मदत झाली असेल असे काही मला वाटत नाही. पुण्यास गरीब मराठ्यांना कॉलेजात मदत करणारी डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन नावाची संस्था आहे व तिचे संस्थापक व सेक्रेटरी रा. गंगाराम भाऊ म्हस्के ह्या नावाचे एक मराठा जातीचे इंग्रजी शिकलेले पुढारी गृहस्थ प्रसिद्ध वकील आहेत वगैरे माहिती रा. खांडेकर वकिलांनी मला दिली असावी. ह्या वेळी सदाशिव पेठेतल्या हौदाच्या रस्त्यावरील फडतरे यांच्या वाड्यात मी थोडे दिवस होतो, एवढीच अंधुक आठवण मला आता आहे.

गं. भा. म्हस्के : गंगाराम भाऊ म्हस्के ह्या गृहस्थाचे मराठा जातीवर मोठ उपकार आहेत. त्या काळचे एक फरडे इंग्रजी शिकलेले, सुधारकी बाण्याचे हुशार वकील अशी त्यांची प्रसिद्धी होती. पुणे लष्करात मेन स्ट्रीटवर त्यांचे मोठे चांगले स्वत:चे घर आहे. रानडे, भांडारकर वगैरेसारखी त्या काळच्या सुधारक पक्षात त्यांची चांगली मान्यता होती. वकिलीत त्यांनी बरेच पैसे मिळविले होते. हिराबागेत असलेल्या कॉस्मॉपॉलिटन क्लबच्या दिवाणखान्यात पुण्याच्या तत्कालीन

माझा प्रवेश अशा तुटपुंज्या स्कॉलरशिपने झाला नसता. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे (संस्कृत कोशकार) हे मी जाण्यापूर्वीच वारले असल्यामुळे त्यांचे जागी प्रसिद्ध सुधारक रा. गोपाळ गणेश आगरकर हे होते. हे गावात न राहता गावाच्या पश्चिम बाजूस ज्या विस्तीर्ण जागी हल्ली कॉलेजच्या स्वतःच्या इमारती आहेत त्या जागेवर एक झोपडे बांधून राहात असत. त्या झोपडीशिवाय आजूबाजूस त्या काळी वसतीचे एकही चिन्ह दिसत नव्हते. दरमहा दहा रुपये स्कॉलरशिपमध्ये माझा त्या वेळीही कॉलेजचा खर्च भागण्याचे मुष्किल होते. कारण कॉलेजची फी दरमहा ५ रु. वजा जाता माझ्या हाती ५ रुपयेच उरत ! म्हणून कॉलेजची फी माफ करण्याबद्दल मी एक अर्ज घेऊन प्रिन्सिपॉल आगरकर ह्यांना भेटावयाला गेलो.

आगरकर मोठे सुधारकाग्रणी ही कीर्ती माझ्या कानावर जमखंडीस असतानाच आली होती. इ. स. १८९२ साली मी जमखंडी शाळेत शिक्षक असताना त्यांचे सुधारक पत्रातले सणसणीत लेख माझ्या वाचनात येऊन माझी मते झपाट्याने सुधारणेच्या बाजूची बनत चालली होती. रा. गंगाराम भाऊ म्हस्के हे सुधारक आणि वकीलही होते. त्यांना पाहून पुणेरी सुधारक कसे असतात ह्याविषयी मला काहीशी कल्पना आली होती ; पण आगरकरांना प्रथम पाहिल्यावर त्या देखाव्याचा माझ्या ह्या कल्पनेशी नीट मेळ बसेना.

प्रि. आगरकर : माझ्या भेटीची वेळ सकाळी नऊ वाजण्याच्या सुमाराची होती. दिवस हिवाळ्याचे होते. आगरकर कायमचेच दमेकरी होते. ते झोपडीच्या बाहेर अंगणात उन्हात उभे होते. लोकरीचा जवळजवळ फाटलेला काळा मळकट कोट, चित्पावनी थाटाचे नेसलेले धोतर, लहानशा शेंडीचे थोडेसे विखुरलेले केस, पायात आगरकरी सुधारणेचा जोडा-म्हणजे ब्राह्मणी जोडाच ; पण त्याचे टाचेवरचे कातडे टाचेच्या मागे वर उभे आलेले, मुद्रा बरीच त्रासलेली, भुवयांचे केस दाट व डोळे किंचित् खोल व भेदक असे हे प्रथम दर्शन घडले. माझा अर्ज पाहून, मला डेक्कन मराठा असोसिएशनची स्कॉलरशिप मिळत आहे हे ऐकल्याबरोबर स्वारीने मला फी माफ व्हावयाची नाही हे निर्भीडपणे सांगितले. उगाच नादाला लावण्यापेक्षा त्यांचे हे तडकाफडकी उत्तर एका रीतीने योग्यच होते ; पण मजवर मात्र त्या उत्तराचा परिणाम बरा झाला नाही. आधीच त्यांचा एकंदर पोषाख व मुद्रा पाहून, त्यांच्या सुधारकी कीर्तीमुळे मी जी भलतीच कल्पना करून घेतली होती ती ढासळली होती आणि त्यावर हा नकाराचा बाँब मजवर आदळल्यामुळे आगरकरांविषयी माझा ग्रह अनुकूल झाला नाही. हा ग्रह कॉलेजच्या इतर प्रोफेसरांशी माझा पुढे जो अत्यल्प प्रत्यक्ष संबंध आला त्यामुळे काही म्हणण्यासारखा दुरुस्त झाला नाही. खरोखर पाहता ह्यात आगरकरांचा, इतर प्रोफेसरांचा किंवा कॉलेजच्या इतर परिस्थितीचा काहीच दोष नव्हता. केवळ ह्या निराशेला माझा अजाणपणा व व अननुभवीपणा हेच कारण होय.

●●●

२२

प्रीव्हियसचे वर्ष

कॉलेजचा पसारा : मी फर्ग्युसन कॉलेजातील पहिल्या म्हणजे प्रीव्हियसच्या वर्गात इ. स. १८९३ सालाचे आरंभी गेलो ; तेव्हा ते कॉलेज फुलग्रेड कॉलेज झाले होते की नाही हे मला आठवत नाही. निदान बी. ए. चा वर्ग त्या वेळी असला तरी तो सुरू होऊन फार वर्षे झाली असतील, असे मला वाटत नाही. कॉलेज पुणे शहरात शनिवार पेठेतील गद्रे ह्यांच्या वाड्यात भरत होते. त्यातच न्यू इंग्लिश स्कूलही भरत होते. त्याला लागूनच होळकरांचा मोठा वाडाही आहे. तो मी पुढे इंटरमिजिएट वर्गात गेल्यावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे आला होता. त्या वेळी शिक्षणासाठी ह्या मंडळींच्या एवढ्याच इमारती होत्या. खेळण्यासाठी पुढे लवकरच नारायण पेठेतील नदीजवळचा कबूतरखानाही मिळाला असावा. कारण आम्ही इंटरमिजिएटमध्ये असताना तेथे फुटबॉल खेळत होतो.

व्याख्यानपद्धती : प्रीव्हियसचा क्लास त्या वेळी गद्रेवाड्याच्या समोरच्या मोठ्या दिवाणखान्यात भरत असे, आमच्या वेळी देखील हा भव्य दिवाणखाना भरेल इतके सुमारे ६०/७५ विद्यार्थी तरी असत. ह्या वर्गात पोटतुकड्या नव्हत्या. त्यामुळे हा क्लास म्हणजे एक मेंढवाडाच दिसत असे. मराठी प्राथमिक शाळा सोडून जमखंडीस हायस्कुलात गेल्यावर मला जसे नव्या जगात व संस्कृतीत स्थित्यंतर झाल्याप्रमाणे वाटले तसेच तेथे वाटले. कॉलेजातल्या शिक्षणाच्या फरकाचे मुख्य लक्षण म्हणजे व्याख्यानपद्धती ही होय. शे-पन्नास मुलांनी एका उंच पीठावर बसलेल्या अगर उभ्या असलेल्या शिक्षकाचे निरूपण अगर प्रवचन ऐकत बसणे म्हणजे हायस्कूलमधल्या वैयक्तिक शिक्षणपद्धतीला मुकणेच होय. हायस्कुलाच्या वर्गात तीस मुलांपेक्षा अधिक शिष्यसमुदाय असणे इष्ट नाही. कॉलेजात ह्या संख्येला आळाच नसतो. त्यामुळे शिक्षकाचा शिष्याशी व्यक्तिगत संबंध तुटतो आणि विद्यार्थी धागा तुटलेल्या पतंगाप्रमाणे शिक्षकापासून किती लांब गेलेला असतो, हे शिक्षकास कळणे अशक्य होते. तथापि आम्ही व्याख्यान ऐकणारे सभ्य गृहस्थ (Gentlemen) झालो, ही भावना कॉलेजात गेल्याबरोबर प्रसवून एक प्रकारची आढ्यता येत असेल खरी; पण तिने खरा आध्यात्मिक किंवा बौद्धिक लाभ घडत नाही, हे माझ्या अनुभवास लवकरच येऊ लागले, आमच्या ह्या नवीन आढ्यतेची एक मौजेची गोष्ट आठवते, ती अशी--

मॅग्नाचार्टा : शे-पन्नास मुलांची हजेरी रोज घेणे अवश्य होते, कारण विश्वविद्यालयाच्या परीक्षेला बसण्यापूर्वी अमुक दिवसांची हजेरी (टर्म) कॉलेजात भरली आहे, असा दाखला विद्यार्थ्याला विद्यालयास द्यावयाचा असतो. प्रोफेसरचा वेळ हजेरी घेण्यात जाऊ नये म्हणून हे काम ह्या कॉलेजच्या श्री. दीक्षित नावाच्या एक अनुभविक कारकुनाकडे असे. हे भले धिप्पाड गृहस्थ न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ड्रिलही शिकवीत असत. त्यामुळे हे लष्करी कुर्त्यात हजेरी घेत. ह्यांचा आवाज

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२३

इंटरमिजिएटचे वर्ष

उलटा प्रकार : माझ्या हायस्कूलच्या काळापेक्षा कॉलेजचा काळ फार निराळा गेला. हायस्कुलात गेल्यापासून आमच्या घरच्या सांपत्तिक परिस्थितीमुळे मला मोठी आपत्ती कशी भोगावी लागली ह्याचे वर्णन मी केलेच आहे; पण ही आपत्ती मी अजून लहान व मुग्ध असल्यामुळे मला तितकी जाणवली नाही. ती माझ्या आई बाबांस जाणवली. मी त्यांच्या आश्रयाखाली सुखात (चैनीत) नाही तरी समाधानात होतो. जमखंडीसारख्या मागासलेल्या ठिकाणच्या मानाने माझा अभ्यास व हुषारी फार चांगली असल्यामुळे व मला स्कॉलरशिप मिळत असल्यामुळे मी आनंदात असे. आईबाबांच्या सहवासाशिवाय माझ्या भोवतालच्या मित्रमंडळींच्या सहवासामुळे माझा हायस्कूलचा सर्व काळ अगदी मजेचा गेला; पण कॉलेजचा सर्व प्रकार ह्याच्या उलट घडला.

गाढवी सवाष्णी : प्रीव्हियस परीक्षेत मी पास झालो असे मला जमखंडीसच कळले. कॉलेजची परीक्षा पास झालेला पहिलाच विद्यार्थी ह्या नात्याने जमखंडी गावात माझी ख्याती अधिकच पसरली. पुण्यास परत येऊन मुंबई इलाख्यातील प्रीव्हियसला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये माझा नंबर कितवा आला आहे हे जेव्हा मला कळले तेव्हा माझी मोठी निराशा झाली. माझा नंबर पहिल्या वर्गात किंवा दुसऱ्या वर्गात तर आलाच नव्हता, पण तिसऱ्या वर्गातही फारसा वर नव्हता, हे पाहून जमखंडीतील माझी हुशारी म्हणजे खेडेगावात गाढवी सवाष्णी ही म्हण प्रत्ययास आणून देणारीच एक चीज झाली. जमखंडी हायस्कूल म्हणजे एक क्षुद्र उंबराचे फळ, त्यात भराऱ्या मारणारा मी एक किडा. मुंबई विश्वविद्यालयाच्या विस्तीर्ण उघड्या अंगणात आल्यावर माझे अल्पबळ मला कळून आले!

ह्याशिवाय कॉलेजशिक्षणात मी निस्तेज होण्याची दुसरीही अनेक कारणे होती. माझ्या घरच्या गरिबीची जाणीव जी मला हायस्कुलात घडली नाही ती पुण्यास मी एकटाच आईबापांपासून दूर राहू लागल्यामुळे मोठ्या तीव्रपणाने भासू लागली. शिवाय माझ्या लाजाळू स्वभावामुळे जमखंडीतलेच जे काय एक-दोन ओळखीचे सोबती होते, त्यापलीकडे पुणेकर विद्यार्थ्यांपैकी कोणाशी माझी मैत्री जमली नाही. जनार्दनपंत करंदीकर, विश्वनाथ पोंक्षे आणि मी ह्या तिघा जमखंडीच्या विद्यार्थ्यांपैकी करंदीकर आणि मी दोघेच पास झालो.

कंगाल स्थिती : फर्ग्युसन कॉलेजची त्या वेळेची स्थितीही माझ्या स्वतःच्या स्थितीप्रमाणे कंगालच होती. वसतिगृह, क्रीडांगण वगैरे इतर उपकरणांचा व विद्यार्थ्यांनी वरचेवर एकत्र जमण्याच्या प्रसंगाचा अभाव असल्यामुळे त्या वेळची आमची निदान माझी तरी स्थिती जंगलात चुकलेल्या कोकराप्रमाणे असह्य भासत होती. अनेक कारणांमुळे कॉलेजच्या शिक्षणावर माझे प्रेम बसेना.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

आम्ही मुलीच्या शिक्षणक्रमात अडथळे आणू. ह्याचा सरळ अर्थ मला तरुण हिंदूला कळेना. मुलीच्या हिताच्या दृष्टीने ही अट अवश्य होती, असे बाईंचे मत पडले. पण ज्या नवमताचे पाणी ही पंडिता प्याली होती त्याचे चार थेंब माझ्याही पोटात गेले होते. मी उत्तर दिले, "बाई, शिक्षणात अडथळे आणण्यासाठी मी बहिणीस तुमच्याकडे पाठवण्याचे नाकारीन हे खरे कारण नाही. तिने ख्रिस्ती होण्यास आम्ही अडथळे आणू ही भीती तुम्हास असणे साहजिकच आहे. मुलीस नियमाप्रमाणे (विद्याखात्याच्या) सर्व सुट्या तुम्हाला देणे अवश्य आहे. मुलीच्या हिताची काळजी निदान तुमच्या इतकी तरी मला व मुलीच्या आईबापांना आहेच, हा विश्वास तुम्हाला असावा. तुमच्या शिक्षणाने मुलगी आपखुशीने व अक्कलहुशारीने ख्रिस्ती होऊ लागल्यास निदान मी तरी अडथळा आणणार नाही. तिच्यावर तिला न कळत जबरी तर राहोच, पण भुलभुलावणी होऊ लागली तर ते मी सहन करणार नाही. बेहत्तर आहे अशी तुमची अटीतटीची मदत न मिळाली तरी!"

पंडिता रमाबाईंना मी तरुण असून दिसतो तसा बावळट नाही, हे कळून चुकले. त्यांनी माझ्याविषयी अधिक चौकशी केली. मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी आहे असे ऐकल्यावर, ह्या कॉलेजचे प्रोफेसर नास्तिक आहेत, असा शेरा त्यांनी मारला. जखडलेल्या धर्मापेक्षा मोकळा नास्तिकपणा बरा, असे मी माझे मत सांगितले.

प्रो. कर्वे : ह्या सुमारास प्रो. आण्णासाहेब कर्वे यांनी हिंगणे येथे अनाथ बालिकाश्रमाची स्थापना नुकतीच केली होती. त्यांच्याकडे मी माझ्या बहिणीसाठी भेटावयास गेलो होतो. शेणमातीने सारवलेल्या कुडाच्या भिंतीच्या एका खोपटात प्रो. आण्णासाहेब जमिनीवर बसले होते. त्यांचे आश्रमात ब्राह्मण जातीच्याच १०/१५ विधवा मुली होत्या. माझे बहिणीला आपल्या आश्रमात घेता काय ह्या माझ्या प्रश्नाला, "ब्राह्मणेतरांच्या मुलींना घेण्याचा हा काळ नाही" असे प्रोफेसर आण्णासाहेबांनी सांगितले व माझ्या बहिणीला आश्रमात घेण्याचे साफ नाकारले. त्यामुळे माझी फार निराशा झाली. तत्कालीन महाराष्ट्रात एक सुधारणा करताना दुसऱ्या सुधारणेला कसा अडथळा येई ह्याचे हे उदाहरणच आहे.

मिस् मेरी भोर : पुढे माझ्या बहिणीच्या शिक्षणासाठी मला पुष्कळ धडपड करावी लागली. तिला मी शेवटी पुणे येथील प्रसिद्ध (हुजूरपागेतील) मुलींच्या हायस्कुलात घातले. जमखंडीस तिच्या ३/४ मराठी इयत्ता झाल्याच होत्या. इंग्रजी पहिल्या इयत्तेत तिचे नाव घालण्यास कोणतीच हरकत नव्हती. पण हिंदु विवाहित स्त्री म्हणजे कोणत्या भयंकर तुरुंगात असते, ह्याची कल्पना मला नव्हती. शाळेचे अधिकारी चि. जनाक्काच्या नवऱ्याची तिच्या शिकण्यास परवानगी मागू लागले. तिचे येथवर शिक्षण झाले हेच तर तिच्यावर नवरा जिवंत असून वैधव्याचा असला प्रसंग गुदरायचे कारण झाले वगैरे माहिती मला कष्टाने सांगावी लागली. नवऱ्याच्या हरकतीची जबाबदारी मी घेतली. तिला शाळेत प्रवेश मिळाला, पण मला तिला कोठून तरी स्कॉलरशिप मिळवावयाची होती. माझा वशिला तर कोठेच नव्हता. त्या वेळी हुजूरपागेत मिस् मेरी भोर नावाची हुशार ख्रिस्ती बाई शिक्षकीण होती आणि मिस् हरफर्ड नावाची एक युरोपियन बाई मुख्याध्यापिका होती. त्या दोघींना जनाक्काचा कळवळा आला. उच्चवर्णीय हिंदु लोकात घटस्फोटाचा कायदा नाही आणि

केला. युनिटेरीयन पंथाच्या बऱ्याच लहान लहान चोपड्या मी वाचल्या. Larger meaning of Uniteranism हे चोपडे मला फार बोधपर वाटले. त्याच वर्षी पुणे येथील प्रार्थनासमाजात एक लहानशी एकेश्वरी पंथाची परिषद भरली होती, असे मला पुढे किती तरी वर्षांनी कळले. आमच्या लोकांची काम करण्याची पद्धत किती टाळाटाळीची व पाश्चात्यांची विशेषत: अमेरिकनांची किती आकर्षक आहे हे कळले. डॉ. संडरलंडसाहेबांनी हिंदुस्थानातील आपल्या कामाचा अहवाल देशातील युनिटेरिअन सभेपुढे मांडला व विशेष सूचना केली की, हिंदुस्थानातील एकेश्वरी पंथाचा (ब्राह्म व प्रार्थनासमाजाचा) एक तरुण होतकरू विद्यार्थी अमेरिका, इंग्लंड येथील धर्माला वाहिलेल्या कॉलेजात स्कॉलरशिप देऊन बोलविण्यात यावा. ह्या सूचनेप्रमाणे १/२ वर्षात कलकत्त्याहून ब्राह्मसमाजाने दर दोन वर्षांनी एक असे तीन विद्यार्थी पाठविल्यानंतर इ. स. १९०१ साली पुढे स्वत: माझीच ह्या कामी योजना झाली.

प्रपंचाची काळजी : पण हा योग १८९५ साली मला कळण्यासारखा नव्हता. मला पुन्हा इंटरमिजिएटमध्ये बसावे लागले. पुण्यास मी व माझी बहीण, शिवाय १८९६ मध्ये माझ्या पत्नीलाही बहिणीबरोबर शाळेत घालुन ह्या तिघांचा पुण्याचा खर्चच नव्हे तर जमखंडीस माझे आईबाप व इतर ३ भावंडे ह्यांच्याही खर्चाचा भार माझेवरच पडला. मला १० रु. आणि जनाक्का हिला १० रु. अशी दरमहा वीस रुपयांचीच काय ती जमा असे. शिकवणीचे ५/७ रु. मिळालेच तर भर पडे. बाकीच्या खर्चाचे कर्जच होऊ लागले ! मोठी काळजी पडली. माझ्या तीन सख्ख्या बहिणी ; पण प्रपंचाची काळजी ही चौथी एक जन्माची सख्खी बहीण होती. तिनेच मला शहाणे केले. तितके शहाणपण मला मुंबई विश्वविद्यालयाने किंबहुना ऑक्सफर्ड विद्यालयानेही दिले नाही.

जादा मदत : पण नुसत्या काळजीने उपासमारीचा लांडगा काही दारातून निघत नाही. शेवटी मला बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव महाराज यांची आठवण झाली. डेक्कन मराठा असोसिएशनकडून मला दोन किंवा तीन वर्षे दरमहा १० रु. प्रमाणे फार तर ३६० रु. स्कॉलरशिप मिळाली व १८९६ साली इंटरमिजिएट मध्ये पास झालो. पण पुढे बी. ए. ची दोन वर्षे कशी जावीत ही विवंचना श्रीमंत गायकवाड महाराजांपुढे समक्ष ठेवण्यास मी बडोद्यास सुमारे १८९६ मध्ये गेलो. श्री. लक्ष्मणराव माने ह्या नावाचे एक थोर मनाचे मराठा गृहस्थ बडोदे येथे शहाबाग ह्या भागात होते. त्यांची व माझी कशी ओळख झाली व त्यांचेहुन एक बडे गृहस्थ श्री. खासेराव जाधव ह्यांचा व माझा कसा संबंध जडला हे मला काहीच आठवत नाही. तरी ह्या सद्‌गृहस्थांच्या शिफारशीने महाराजांनी माझ्यासारख्या निराधार तरुण विद्यार्थ्याची गाठ घेतली. त्यांनी मला दरमहा २५ रु. स्कॉलरशिप दिली. ही रक्कम मला डेक्कन मराठा असोसिएशनचे द्वारेच मिळावयाची होती. ही मदत मिळते म्हणून ह्या संस्थेने आपली १० रु. ची मदत बंद केली. खरे पाहता मला १५ रु. च अधिक मिळू लागले. तेवढ्यालाच पाहून भुकेचा लांडगा आमचे दार सोडून दूर गेला. ही स्कॉलरशिप देताना माझ्याकडून स्टँपवर एक कायदेशीर बाँड लिहून घेण्यात आला. त्यात माझे शिक्षण संपल्यावर मी बडोदा संस्थानात नोकरीस राहावे ; नाही तर घेतलेल्या स्कॉलरशिपची रक्कम परत करावी असा स्पष्ट करार होता ; पण ईश्वरी घटनेमुळे ह्यातील एकही अट पुरी करणे झाले नाही. कसे ते पुढे ओघाने कळेल.

●●●

२४

पदवीग्रहण

सवलत : बी. ए. मध्ये माझे ऐच्छिक विषय इतिहास आणि कायदा हे होते. माझा विशेष कल तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे असतांना लॉजिक आणि मॉरल फिलासफी, न्यायशास्त्र आणि नीतिशास्त्र हे विषय न घेता, मी इतिहास आणि कायदा हे विषय घेतले ह्याचे कारण बी.ए.च्या कायद्याच्या पेपरमध्ये शेकडा ६० वर मार्क मिळाल्यास फर्स्ट एल्एल् बी. ची परीक्षा पास झाली असे गणण्यात येत होते, म्हणून मी या सवलतीचा फायदा घेण्यासाठी ही निवड केली, दुसरे कारण असे की, माझे शिक्षण पुरे झाल्यावर कुठल्याही सरकारी नोकरीत अडकवून घेण्यापेक्षा सार्वजनिक कार्यात पडण्याचा माझा इरादा होता. त्यासाठी स्वतंत्रपणे वकिली करणे भाग होते, त्याशिवाय भावी आयुष्यांत माझा इतिहासाकडेच कल असल्याचे पुढे आढळून आले, विचारांच्या दोन पद्धती आहेत. एक तत्त्वज्ञानांची मोघम पद्धत, तीत ज्ञात कारणावरून अज्ञात कार्यांकडे; जाणे आणि दुसरी ऐतिहासिक पद्धत; तीत ज्ञात कार्यावरून अज्ञात कारणांचा शोध करीत जाणे, दुसरी पद्धत नवी असून अधिक परिणामकारी म्हणून मला तीच जास्त पसंत पडली; पण ही पसंती पुढील शिक्षणाचे काळांत झाली.

डेक्कन कॉलेज : कायदा ह्या विषयावरील व्याख्याने त्या वेळी डेक्कन कॉलेजात होत होती. त्यासाठी आम्हांला फर्ग्युसन कॉलेजातून डेक्कन कॉलेजात जावे लागे, त्या वेळी अनुभाऊ करंदीकर, माधव नारायण हुल्याळ इतकी मंडळी जमखंडीकरांचे शनिवारांतल्या वाड्यांत राहात होती. तेथून फर्ग्युसन कॉलेजात जाऊन तेथून डेक्कन कॉलेजात आठवड्यांतून दोनदा पायीं चालत जावे लागे, टांग्याचे भाडे जबर पडत असल्याने आणि त्या वेळी पुण्यांत सायकलीचा सुळसुळाट झाला नसल्याने मला पावसांत भिजत, उन्हाळ्यात शिजत एवढा मोठा पल्ला गाठावा लागे. पण त्याचे मला काही वाटत नसे, संगमावरून होडी चालू असे, तीत बसून शेतावरून डेक्कन कॉलेजला जाण्यास एक जवळच वाट होती. एकदा असे झाले की, कॉलेजवरून परत येण्यास रात्र पडली आणि होडी बंद झाली होती. मी एकटाच होतो, अंगावरचे सारे कपडे डोक्याला गुंडाळून मी पोहून संगमावर आलो. याचे माझ्या मित्रांना फार आश्चर्य वाटले. पावसाळ्यांत नदीला पूर आल्यावर फर्ग्युसन कॉलेजपासून होळकर ब्रिजवरून डेक्कन कॉलेजांत जाऊन, परत येते वेळी बंडगाईनवरून यावे लागे.

निकाल : १८९७ साली पुण्यास प्रथम फेगचा कहर सुरू झाला, त्या वेळी शाळा-कॉलेज बंद झाल्याने, माझ्या घरच्या मंडळींना घेऊन जमखंडीस जावे लागले. या सुमारास मुंबईस हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाल्याने पुण्यात सार्वजनिक गणपतीचा उत्सव लो. टिळकांनी राष्ट्रीय

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२५

विहंगमावलोकन

हेतू : परदेशात १९०१ ते १९०३ या दोन वर्षात माझे जे निरीक्षण व शिक्षण झाले त्याचा आराखडा विहंगमदृष्ट्या प्रथम घेणे बरे. मी इंग्लंडांत केवळ ऑक्स्फर्ड येथे मॅचेस्टर कॉलेजात धर्माचे पुस्तकी शिक्षण घेण्याकरता गेलो नव्हतो. मुख्यतः तुलनात्मक पद्धतीने जगातील सर्व धर्माच्या इतिहासाचे ऊर्फ विकासाचे अवलोकन करून स्वतःची धर्मबुद्धी विशद करून धर्मप्रचाराची तयारी करणे हा तर मुख्य हेतु होताच. पण तो एक हेतु होता. शिवाय युरोपातील प्रमुख चालीरीती पाहाव्या, वाङ्मय वाचावे, पंडित आणि सज्जन यांच्या भेटी घ्याव्या, नव्या-जुन्या संस्थांची वाढ निरखावी, निरनिराळ्या वर्गाची-विशेषतः खालच्या व चिरडलेल्या वर्गाची-अंतःस्थिती ओळखावी व त्यांच्यांत राहावे. सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळे पाहावीत आणि तेथे एकान्तवास करावा व आत्मशोध करावा. इ. अनेक हेतू होते.

कॉलेजातील सुट्ट्या : मँचेस्टर कॉलेज हे सुधारकी कॉलेज होते. ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटीत जुन्या ख्रिस्तीमताचा दाब दृढ असल्याने ह्या कॉलेजचा त्या युनिव्हर्सिटीत प्रवेश होणे शक्य नव्हते. तथापि त्या विश्वविद्यालयाचा बरा-वाईट परिणाम व संसर्ग ह्या कॉलेजवर न घडणे अशक्य होते. ह्या कॉलेजचा अध्ययनाचा व अनध्ययनाचा ऊर्फ सुट्टीचा काळ इतर कॉलेजांप्रमाणेच नियमित केला होता. पहिली टर्म ऑक्टोबरच्या मध्यापासून तो डिसेंबरच्या मध्यापर्यंत ८/९ आठवड्यांची व नंतर नाताळची सुट्टी ४ आठवडे. दुसरी टर्म जानेवारीच्या मध्यापासून तो मार्चच्या मध्यापर्यंत ८ आठवडे व नतर इस्टरचा सुटी ६ आठवडे. तिसरी टर्म मेच्या सुरुवातीपासून जवळ जवळ जून अखेर; नंतर उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी सप्टेंबरअखेर १२ आठवड्यांची. म्हणजे जवळ जवळ सहा महिने सुट्टी व सहा महिने अभ्यास असा प्रकार आहे. मी ऑक्स्फर्डमध्ये दोन वर्षे होतो. त्या काळी सहा टर्म्स व सहा सुट्या पडल्या. पहिली नाताळची सुट्टी मी लंडनमध्ये घालविली. दुसरी सुट्टी पॅरिसमध्ये घालविली. तिसरी उन्हाळ्याची दीर्घ सुट्टी इंग्लिश व स्कॉच Lake Districts मध्ये, म्हणजे पर्वत शिखरे व सरोवरे पाहण्यांत हिंडून घालविली. पैकी पहिले पंधरा दिवस बॉरोडेल नावाच्या सुंदर दरीत डरवेट वॉटर नावाच्या सुंदर सरोवराच्या किनाऱ्यावर माझे परमपूज्य प्रो. जे. एस्लीन कार्पेटर यांच्या लिथ नावाच्या कुटीरांत पाहुणा म्हणून होतो. माझ्याबरोबर ७/८ विद्यार्थी होते. चौथी दुसऱ्या नाताळची सुट्टी मी मुद्दाम ऑक्सर्फडमध्येच राहून घालविली. पाचवी मी कॉर्नवॉलमध्ये नैऋत्य किनाऱ्याकडील प्रदेशांतील वस्टनहॅम वगैरे शहरे व खेडी पाहण्यात घालविली, पैकी १३ दिवस माझे मित्र मिस्टर आणि मिस् जे. वॉल्टरकॉककडे त्यांच्या (बॉस कॅसल् या भागातील) पोल्ट्रुनी नामक झोपडीत पाहुणचार घेतला.

शेवटची दीर्घ सुट्टी मी काही दिवस चेस्टनहॅम येथील मध्यदेशात घालवून पुढे हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथे अनेक सुधारलेल्या देशांतील उदार धर्मीयांची परिषद भरली होती, तीत

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२६

माझे बिऱ्हाड

डॉ. ग्रेडन : इंग्लंडांत परक्याना राहण्यासाठी उत्तम व्यवस्था असते. श्रीमंतांसाठी व सामान्यांसाठी निरनिराळ्या दर्जाची हॉटेल शहरांत, गावांत आणि प्रेक्षणीय स्थळे असलेल्या रानावनातून सुद्धा मुबलक आहेत. शिवाय खाजगी रीतीने राहण्यासाठी मध्यम प्रतीचे लोक पाहुण्यांकडून पैसे घेऊन (Paying Guest) आपल्या घरी वाटेल तितके दिवस सोय करतात. डॉ. आणि मिसेस ग्रेडन या दंपतीकडे मी बहुतेक पहिली टर्म घालवली. मी उशिरा गेल्याने कॉलेजच्या वसतिगृहात जागा मिळाली नाही. पण पुढील अनुभवावरून स्वातंत्र्य आणि काटकसर या दृष्टीने बाहेर राहणेच बरे वाटू लागले. ग्रेडनसारख्या संभावित कुटुंबामध्ये मला इंग्रजी चालीरीती आणि सभ्यता यांची बरीच माहिती मिळून फार लाभ झाला, सामान्य हिंदू विद्यार्थ्याला टेबलावर बसून काटे-चमचे वापरणे, टॉय-कॉलर नीट बांधणे वगैरे शुल्लक गोष्टी पासून ती संभावित मंडळामध्ये बोलण्याचालण्यासाठी ढब राखणे व दुसऱ्यांचा पाहुणचार करणे वगैरेपर्यंतची फार खबरदारी घ्यावी लागते. शिकल्याशिवाय ही खबरदारी शक्य नाही. काटकसरीच्या दृष्टीने मला हे घर सोडून स्वतंत्र रीतीने भाड्याची जागा घेणे पुढे बरे वाटले. गरीब स्थितीचे कुटुंब एक सबंध घर घेऊन आपण तळघरांत राहून इतर मजले सभ्य गृहस्थास भाड्याने देऊन आपली गुजराण करते. कुटुंबातील मालकीण (हिला Land Lady असे म्हणतात) बहुतेक अशा प्रकारचा धंदा करते. पाहुण्याचे जेवणखान, स्नानाची, कपडे धुण्याची व काही घरगुती व्यवस्थेची जबाबदारी या बाईकडे असते.

भाड्याची जागा : ऑक्सफर्ड व्र्स्टर प्लेस नावाच्या मध्यम वस्तीच्या भागात नं. २३ च्या घरातील पहिल्या मजल्यातील दोन खोल्या मी घेतल्या होत्या. ऑक्सफर्डचा विद्यार्थी, विशेषत: ब्राह्मणसमाजाचा प्रतिनिधी म्हणून काटकसर संभाळून व्यवस्थेने व सभ्यतेने वागणे मला जरूर होते. निजावयाची खोली व उठण्याबसण्याची खोली निराळी ठेवावी लागते. युनिव्हर्सिटीतील बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यावर युनिव्हर्सिटीच्या शिस्तीचा डोळा असतो. म्हणून अशा घरांना युनिव्हर्सिटीकडून परवाना घ्यावा लागतो. माझ्या लँडलेडीचे नाव मिसेस पिअर्सन होते. मिस्टर पिअर्सन ऑक्सफर्डच्या एका मोठ्या हॉटेलांत वाढण्याचे काम करीत होते. ह्यांना दोन मुले व चार मुली होत्या. माझ्या वरच्या मजल्यास दुसरा एक पाहुणा होता. आम्ही दोघे ६ महिन्यांचे वर तेथे राहिलो तरी एकमेकांशी कधीच बोललो नाही. कारणाशिवाय एकमेकांशी सलगी लावणे हे असभ्य समजले जाते.

पिअर्सन : पिअर्सन हे कुटुंब अत्यंत साधे, गरीब व फार प्रामाणिक होते. जातिभेद नाही तरी इंग्लंडांत वर्गभेदाचे प्रस्थ फार आहे. ऑक्सफर्डचा विद्यार्थी आणि त्यातल्या त्यात धर्मशिक्षणाचा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२७

मँचेस्टर कॉलेज

इंग्लंडांतील धर्म प्रचारक पद्धतशीरपणे तयार करण्यासाठी मँचेस्टर कॉलेज या नावाची केवळ उदार धर्मशिक्षणासाठी वाहिलेली संस्था ऑक्सफर्ड येथे आहे. मँचेस्टर कॉलेज हे मँचेस्टर येथे प्रथम निघून लंडन वगैरे ठिकाणी स्थलांतर पावून आता ऑक्सफर्ड शहरांत स्वतःच्या कायमच्या इमारतीत चालू आहे.

वास्तविक पाहता ही संस्था इ.स. १७५७ मध्ये वॉरिंग्टन अकॅडमी या नावाने वॉरिंग्टन येथे स्थापन झाली. तिचे पुढे १७८६ साली मँचेस्टर कॉलेज असे रूपांतर झाले, या क्रांतीच्या काळी संस्थापकांना धर्म व शास्त्र या दोन्होवरही सारखाच विश्वास होता. म्हणजे यांचा धर्म शास्त्रीय व शास्त्र धार्मिक होते.

अध्यापक वर्ग : पहिले प्राध्यापक जॉन टेलर हे (१७५७-६१ साली) होते. इ.स. १८९७ सालापर्यंत प्रसिद्ध डॉ. मार्टिनो हे प्राध्यापक होते. त्यानंतर माझ्या वेळी व नंतरही डॉ. ड्रमंड हे प्रिन्सिपाल होते. हे विद्येने तसेच श्रद्धेने आणि शीलाने फार मोठे गृहस्थ होते. ह्यांच्याशिवाय प्रो. अप्टन (तत्त्वज्ञान), प्रो. कार्पेन्टर (तुलनात्मक धर्म व पाली भाषा), प्रो. ऑजर्स (Church Histary) ख्रिस्तीसंघाचा इतिहास), प्रो. जॅक्स (समाजशास्त्र आणि Higbburt Jonrnal चे संस्थापक व संचालक) वगैरे जाडे पंडीत त्या विषयांचे अध्यापक होते. प्रिन्सिपाल ड्रमंड हे बायबल आणि धर्मशास्त्र शिकवीत. ह्यापैकी प्रो. कार्पेन्टर ह तुलनात्मक धर्म ह्या माझ्या ऐच्छिक विषयाचे विशिष्ट Tutor म्हणजे माझ्या अभ्यासावर देखरेख ठेवणारे, नेमून दिलेले गुरु असत. त्यांच्याजवळ मी पाली भाषा आणि बुद्धधर्माचा विशेष अभ्यास केला. दोन वर्षाचा अभ्यास आटोपून ह्या कॉलेजचा डिप्लोमा मला देतेवेळी कॉलेज कमिटीकडे प्रो. कार्पेन्टरने मजबद्दलचे जे प्रशस्तीपत्र पाठविले त्यांत माझ्या खास गुरुने (डॉ. कार्पेन्टरने) चांगले गौरवपर आणि प्रेमळ उद्‌गार काढले होते.

पूर्व व पश्चिम : हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयाप्रमाणे ह्या कॉलेजात विद्यार्थ्यांची परीक्षारूपी शर्यत लावून त्यांच्या शहाणपणाचा दर्जा ठरवीत नाहीत. नेमून दिलेले खास गुरू आपापल्या शिष्यांना निरनिराळ्या विषयांत निबंध लिहिण्यास सांगून त्यांच्या अभ्यासाची आणि विचारविकासाची पारख करतात. वर्षअखेर खास निबंध लिहावयाला देऊन त्यात दाखवलेल्या हुशारीप्रमाणे प्रशस्तिपत्र लिहून देतात. कॉलेजात विद्यार्थीही इकडच्याप्रमाणे शेकड्यानी प्रशस्तिपत्र लिहून देतात. कॉलेजात विद्यार्थीही इकडच्याप्रमाणे शेकड्यांनी किंवा हजारांनी मोजता येण्यासारखा प्रकार मँचेस्टर कॉलेजात नाही. एका वेळी फार तर १५/२० विद्यार्थ्याहून जास्त नसतात. तेही दोन वर्षातून विभागलेले

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

नसत. त्यांच्या घरी चहाची परतभेट देण्यासही आनंदाने जात. मग अशा कॉलेजला कुटुंब म्हणू नये तर काय म्हणावे ?

उपासक : सकाळी १० पासून दोन प्रहरी १ पर्यंत तीनच तास कॉलेजची व्याख्याने असत. झालीच तर संध्याकाळी जाहीर व्याख्याने असत. रात्रीच्या वेळी क्लबच्या सभा, संमेलने चालत. वर्षातून सहा महिने अभ्यास आणि सहा महिने सुट्टी असे वर सांगितलेच आहे. पण आठवड्यांतून चार दिवस कॉलेज व तीन दिवस सुट्ट्या असत. शनिवार, आदितवार, सोमवार हे सुट्टीचे दिवस ठेवण्याचे कारण हे की, इतर गांवातील कुठल्याही एका युनिटेरियन समाजामध्ये जर एखादे वेळी उपासक आचार्य नसले तर मँचेस्टर कॉलेजांतील विद्यार्थ्यांला ते काम करण्याला पाठविण्यात येत असे आणि सांजसकाळच्या दोन उपासनेसाठी जाण्यायेण्याचे भाडे, पाहुणचारासह दोन पौंड वेतन त्याला मिळत असे. ही वर्णी मलाही लागत असे. ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधी म्हणून मला विशेष आवडीने निवडण्यात येत असे. ह्या व इतर अनेक प्रकारांनी हे कॉलेज म्हणजे सर्व देशांतील सर्व युनिटेरियम समाजाचे एक काळीजच (Heart) होऊन राहिले होते. याशिवाय मुलांना गरीब लोकांच्या वस्तीत जाऊन तेथे दयेची व परोपकाराची कामे करण्याची सवय लागावी म्हणून एका स्वतंत्र लहानशा मिशनची स्थापन झाली होती. ह्याचा कॉलेजशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. तरी डॉ. ड्रॅमंड यांची कन्या मिस नेली हिने पुढाकार घेऊन हे चालविले होते आणि कॉलेजचे विद्यार्थी त्यात भाग घेत होते.

●●●

२८

खेळकर वृत्ती

मँचेस्टर कॉलेजातील विद्यार्थी पोक्त वयाचे पदवीधर व पुढे धर्मोपदेशकाचे गंभीर काम करणारे होते. म्हणून हे नेहमीच गंभीरपणाने वागत असत असे मुळीच नाही. ते बहुतेक खेळकर वृत्तीने वागत. केव्हा केव्हा तर ते लहान मुलांप्रमाणे दंगा माजवून सोडीत.

टोयोसाकी : जापनचे एक टोयोसाकी नावाचे आमचे वर्गबंधू असत. ते ठेंगू असून मोठे गमती होते. त्यांच्याशी इतर विद्यार्थ्यांच्या नेहमी चेष्टा चालत, ते कॉलेजच्या वसतिगृहातच राहात. एखादे दिवशी रात्री नाटकाला जाऊन उशिरा परत आले आणि दार ठोठावू लागले म्हणजे दारावरील खिडकीवरून त्यांच्यावर पाणी ओतावे; ते असे की ते फार भिजू नयेत अशाच बेताने, असे चाळे चालत. एकदा एक अशी टूम निघाली की, सर्वांची उंची मोजावी, टोयोसाकीला एका भिंतीजवळ उभे केले. त्याच्या उंचीची रेघ मारण्याच्या मिषाने हात वर करून वर असलेली पाण्याची तोटी खुली केली. टोयो दचकून निसटला व सर्वत्र हशा पिकला. दर रविवारी टोयो फार सभ्यतेचा पोशाख करी. लाँग कोट, टॉप हॅट घालून स्वारी सडकून सभ्य गृहस्थ बने आणि शहरातल्या मुख्य रस्त्यांवरून हिंडून येई. एकदा एका चावट मित्राने त्याच्या पाठीवर कोटाला एक कागदाची चिठी लावली व त्यावर (Chase me Girls) असे जाड अक्षरात लिहिले होते. टोयो घरी परत येईपर्यंत त्याला हे कळलेच नव्हते. हे पाहून मोठा हशा पिकला.

मलूल हिंदी : कॉलेजच्या इमारतींत विद्यार्थ्यांसाठी Common Room म्हणून एक मोठे दालन होते. त्यात विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने वागावे, सिगारेट्स फुंकाव्यात, खेळावे, खिदळावे असा प्रकार चाले. केव्हा केव्हा प्रोफेसरही या खोलीत येत. त्यांच्याबरोबर सिगारेट्स फुंकणे, एखादी त्यांना देणे असेही चाले. या दालनांत मध्यभागी एक मोठे गोल मेज होते. मी इतरांइतका खिदळत नसे, म्हणून मला Meek Indian म्हणजे 'मलूल हिंदी' असे नाव पडले होते. माझा निरुपद्रवीपणा त्यांना जणू उपद्रवच देत होता; म्हणून सूड उगवण्यासाठीच की काय दोघा धटिंगणानी मला सपशेल उचलले, गोल मेजावर आडवे ठेवले आणि गाणे गात ते मला घाण्यासारखे फिरवू लागले. असा वात्रटपणा केलेल्या धटिंगणाला पुन्हा पुढच्या बुधवारी उपासनालयात गंभीरपणे उपासना चालवताना पाहून मला हसे आवरत नसे. अशा चाळ्यांपासून खुद्द प्रि. ड्रमंड हे सुरक्षित नव्हते. तशात त्यांची व्याख्याने असल्याने या चेष्टांना साहजिकच उत्तेजन मिळे.

इव्हर्ट : कॉलेजात मी केव्हा केव्हा माझा आवडता पिवळा फेटा बांधून शेमला सोडीत असे. इव्हर्ट नावाचा एक स्कॉच विद्यार्थी नेहमीच माकडचेष्टेत गुंतलेला असे. त्याने हळूहळू माझा शेमला ओढण्याला सुरुवात केली. फेट्याचा खालचा एक विळखा सुटला, दुसरा सुटला तरी

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२९

काही टिपणे

युनिटेरियन समाज : ज्या युनिटेरियन लोकांकडून हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाजाच्या प्रतिनिधी विद्यार्थ्यांला मँचेस्टर कॉलेजातून धर्मप्रचारासाठी तयार करण्या प्रीत्यर्थ स्कॉलरशिप मिळते तो इंग्लडांतील युनिटेरियन समाज आणि हिंदुस्थानांतील ब्राह्मसमाज या दोहोंची धर्मतत्त्वे, आचारांचे आणि कार्याचे धोरण स्थूल मानाने पाहता जवळजवळ सारखेच उदारपणाचे आहे. हिंदुस्थातील निरनिराळ्या ब्राह्मसमाजाची व प्रार्थनासमाजांची संख्या, मी १९१२ साली प्रसिद्ध केलेल्या Theistic Directory मध्ये हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतातील मिळून एकंदर संख्या १६७ आहे. इंग्लंड, आयलंड, व वेल्स मिळून एकंदर युनिटेरियन समाजाची संख्या १९०३ सालच्या Unitarian Pocket Book मध्ये दिल्याप्रमाणे ४५६ आहे. पण ब्राह्मसमाजापेक्षा युनिटेरियन समाजाची घटना किती तरी पटींनी अधिक कार्यक्षम व सांपत्तिक स्थिती अधिक अनुकूल असल्यामुळे हिंदुस्थानात आजन्म वाहून घेतलेले ब्राह्मधर्मप्रचारक आणि आचार्य फार थोडे म्हणजे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. आणि त्यात पद्धतशीर रीतीने तयार करून घेतलेले २/४ असतील किंवा नसतील. इंग्लंडात अशा प्रचारकांची संख्या १९०३ मध्ये ३७४ होती. सर्व युनिटेरियन कामकाज आवरण्यासाठी लंडनमध्ये British and Foreign Unitarian Association नावाची एक संख्या आहे, तशी हिंदुस्थानात नाही. साधारण ब्राह्मसमाज नावाची कलकत्यात एक मध्यवर्ती संस्था आहे. पण तिचा ताबा सगळ्यांवर सारखा चालत नाही. न्यूयॉर्कमध्ये American Unitarisan Association नावाची एक मध्यवर्ती संस्था आहे. कलकत्ता, लंडन आणि न्यूयॉर्क या तिन्ही मध्यवर्ती संस्थांकडून परस्पर सलोख्याचे सहकार्य घडते. हे कार्य आजपर्यंत जवळजवळ शेसव्वाशे वर्षापासून चालत आले आहे.

साधनसभा : ता. १० नोव्हेंबर १९०१ च्या आदितवारी संध्याकाळी ६ वाजता आमचे कॉलेजबंधू मि. कॉक यांचे घरी साधनसभा होती. जेवण तेथेच झाले. परस्परांची हकिकत सांगितली. त्यांच्या घरी मि. कॉक व त्यांची बहीण दोघेच आहेत. मोठ्या आनंदाने दिवस घालवत आहेत. दोघे अत्यंत समताळू व सात्त्विक आणि हिंदूधर्माचे व तत्त्वज्ञानाचे चाहते आहेत. दोघे Theosophist आहेत. मि. कॉक हा स्वतः खाटकाचा मुलगा असून पूर्वाश्रमी बरेच दिवस खाटकाचा धंदा करुनही, हा आणि ह्याची बहीण आतां पूर्णतः शाकाहारी बनली आहेत. आध्यात्मिक भाव व भक्ती वाढविण्याकरिता नियमित वेळी आम्ही एकत्र असून काही साधन करण्याचे त्यांनी सुचविले. माझे मनात हे होतेच, त्यास मी चांगलेच प्रोत्साहन दिले. घरी परत आल्यावर जेवताना मिस्टर व मिसेस ग्रेडन (ज्यांचेकडे मी भाड्यांने राहात होतो) यांच्याशी मांसाहाराबद्दल कडाक्याचा वाद

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

३०

परत प्रवास

शेवटचा निरोप : ३१ ऑगस्ट, १९०३ रोजी सकाळी मी होवर्न येथून निघालो. लंडनला आणि इंग्लंडलाही शेवटचा रामराम केला. जर्मन समुद्रांतून हॉलंडची राजधानी ॲम्स्टरडॅम येथे इंटरनॅशनल लिबरल रिलीजस कॉन्फरन्स करता गेलो तेथे मी ता. ४ सप्टेंबरपर्यंत होतो.

एक अडचण : विलायतेला येताना मला बोटीच्या प्रवासाबद्दलचा खर्च श्रीमंत सरकार सर सयाजीरावमहाराजांनी दिला होता. स्वदेशी परत जाण्याचा खर्च मिळण्यापूर्वी माझ्या कॉलेजातील अभ्यासाबद्दल कॉलेज अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविण्याबद्दल हुकूम महाराजांकडून झाला होता. त्याप्रमाणे हा इंग्रजीतला रिपार्ट अध्यापकांकडून महाराजांकडे गेला. त्याअन्वये मी महाराजांकडे अर्ज केला असता त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून पत्र आले की, मी स्वदेशी परत गेल्यावर बडोदे संस्थानात नोकरी करण्याबद्दलचा करार लिहून देईन तर हा खर्च मिळेल. मी ता. १ मे, १९०३ रोजी महाराजांना खुलाशाचे सविस्तर पत्र लिहिले की, 'मला जी युनिटेरियन स्कॉलरशिप मिळाली होती तिची एक शर्त अशी होती की, मी आजन्म स्वतःला धर्मप्रचारासाठीच वाहून घेईन. यदाकदाचित माझ्या योगक्षेमाची कोणी जबाबदारी घेतली नाही, तर या प्रचाराला प्रतिकूल होणार नाही असेच एखादे काम करून उदरनिर्वाह करीन; पण प्रचार सोडणार नाही. महाराजांनी हे सर्व पसंत केले होते. म्हणून आता कोणती हरकत न घेता स्वदेशी परत जाण्याला मला ते मदतच करतील.' हे पत्र पावताच महाराजांनी टॉमस कुक कंपनीकडे तारेने तिकीट देण्याबद्दल हुकूम केला असल्याचे त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरींनी मला कळविले.

ॲम्स्टरडॅमचा खर्च : कॉलेजला उन्हाळ्याची सुटी झाल्याबरोबर माझे इंग्लंडातील काम संपले म्हणून स्वदेशी निघता आले असते, पण ॲम्स्टरडॅम येथील आंतरराष्ट्रीय उदार धर्मपरिषदेला मला ब्राह्मसमाजाने हिंदुस्थानचा प्रतिनिधी निवडल्यामुळे आणि ती परिषद सप्टेंबरमध्ये भरणार असल्याने दरम्यानचा तीन महिन्यांचा खर्च आणि जादा प्रवासखर्च यांची पंचायत पडली. युनिटेरियन स्कॉलरशिप मला दरसाल १०० पौंडांची होती. तीच अपुरी होती. मी फार काटकसरीने राहून माझ्या खर्चाची कशीबशी तोंडमिळवणी केली होती. ॲम्स्टरडॅमच्या जादा खर्चाविषयी माझे मित्र श्रीयुत बा. बा. कोरगावकर यांनी वर्गणीचे परिश्रम करून ता. २५ जुलै, १९०३ राजी पत्राने १३ पौंड ६ शिलिंग ८ पेन्सचा (म्हणजे २०० रुपयांचा) चेक पाठविला. कलकत्त्याहून हेमचंद सरकारकडूनही निदान तितकीच रक्कम मिळेल असे कळविले. अशा रीतीने माझी अडचण भागली.

ॲम्स्टरडॅमची परिषद : ता. १ सप्टेंबर रोजी इंग्लंडहून निघालेल्या पाहुण्यांची बोट ॲम्स्टरडॅमला पोहोचली. तीतच मी होतो. नदीच्या काठावरच्या सुंदर अम्स्टील हॉटेलात आमची

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

ता. ११ सप्टेंबर रोजी मी कोलंबसाच्या जिनोवा या गावी गेलो. ता. १२ रोजी कॅम्पो सँटो नावाची अत्यंत सुंदर स्मशानभूमी पाहिली. इटालियन शिल्पकलेची येथे लयलूट झालेली दिसली. नंतर पाच दिवस मी रोम शहरी घालविले. मुंबई विद्यालयात माझा आवडीचा विषय रोमचा प्राचीन इतिहास असल्याने हे पाच दिवस माझे मोठ्या बोधाचे गेले. ता. १५ रोजी रविवारी व्हटिकन् नावाचा पोपचा राजवाडा पाहिला. तिसरे दिवशी पोप पायसचे प्रत्यक्ष दर्शन घेतले. दूर अंतरावरून आलेली शेकडो भक्तमंडळी यांच्या दर्शनासाठी रांगेने बसलेली होती. पोपची स्वारी जवळ येताच ही मंडळी त्याच्या चरणाचे चुंबन घेत. माझ्यापुढे आल्यावर मी हिंदुस्थानचा रहिवासी म्हणून त्यांनी आपल्या हातातील आंगठी माझ्यापुढे चुंबनासाठी पुढे केली. मी चुंबन घेतले.

मोझेसचा पुतळा : सिस्टाइन चॅपेल नावाच्या एका दालनात हा प्रसिद्ध भव्य पुतळा एका उंच कट्ट्यावर ठेवला होता. मायकेल अँजेलो नावाच्या प्रसिद्ध शिल्पकाराला हा महत्त्वाचा पुतळा कोरण्याला ४० वर्षे लागली असे सांगतात. दुसरीकडे सेंट पॉलचा लाइफ साईझ पुतळा हातात नंगी तलवार घेऊन उभा आहे. इटालियन लोकांच्या चित्रकलेतील वैभवाला ह्या शहरी नुसता पूर आला आहे. २००० वर्षांपूर्वीच्या प्राचीन इमारतींचे अवशेष मोठ्या आतुरतेने पाहिले. फॅबियन अँफिथिएटर नावाची एक अर्धवर्तुळाकार प्रचंड इमारत पाहून गतवैभवाची कल्पना आली. ह्यात ग्लॅडिएटर नावाच्या मल्लांचे प्राणांतिक मल्लयुद्ध होत असे. पादाक्रांत परकीय कैद्यांना (ह्यात राजेही असत) ह्या इमारतीच्या भुयारात आणून ठेवीत असत. प्रसंगविशेषी जनतेची करमणूक व्हावी म्हणून ह्या कैद्यांना बाहेर काढून आपसात लढवीत असत. तो भयंकर रक्तपात पाहून प्रेक्षकजन आनंद मानीत व मल्लयुद्ध जिंकणाऱ्यावर खूष होत. हे रोमन स्वराज्याचे लक्षण !

नेपल्स : ता. १८ रोजी मी नेपल्सला गेलो. ह्या बंदराचा देखावा फारच सुंदर आहे. मुंबईच्या मलबार हिलप्रमाणे समुद्रकाठावरील एका टेकडीवर उंच उंच एक रस्ता जातो. अपोलो बंदराप्रमाणे येथे धक्काही फार सुंदर आहे. मात्र लोकांचा विशेषतः व्हिक्टोरियावाल्यांचा अप्रामाणिकपणा वेळोवेळी नजरेस आला. एकदोनदा तर माझ्या प्राणावरच बेतली होती. माझ्या हॉटेलातील खिडकीतून धुमसत असलेल्या व्हेसुवियस ज्वालामुखीचा देखावा फार भीषण दिसत होता.

पाँपी : दोन हजार वर्षांपूर्वी भूकंपामुळे व ज्वालामुखी पर्वताच्या तप्तरसामुळे हे शहर दडपून गेले होते. त्याचे आता उत्खनन होऊन त्याला आता प्रेक्षणीय स्वरूप आले आहे. हे नेपल्सपासून सुमारे ४-५ मैल अंतरावर आहे. हे पाहण्यासाठी मी. ता. १९ शनिवारी गेलो. गरम राखेचा ढीग वर पडल्याने त्याच्याखाली जी माणसे, जनावरे व इतर वस्तू सापडल्या त्यांचे हुबेहूब सांगाडे तेथील म्युझिअममध्ये दाखविण्यात येतात. हे खरे सांगाडे नसून राखेखाली ह्यांचे जे साचे बनले होते त्यात प्लॅस्टर ऑफ पॅरिस ओतून उत्खननकारांनी कौशल्याने हे सांगाडे बनविले आहेत. कित्येक इमारतींतील भिंतीवरचे रंग व चित्रे अगदी ताजी दिसली. रस्ते व दुतर्फा ओटे फरसबंदी होते. यावरून जड चाकांच्या चाकोऱ्यांच्या खोल खुणा दिसल्या. एका दिवाणखान्याच्या भिंतीवर काही बीभत्स चित्रे दिसली. त्यावरून त्या ऐश्वर्याच्या काळात रोमन लोकांची नीती कशी खालावली होती हे कळले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भाग दुसरा

१

धर्मसेवा

माझी मनोरचना : माझ्या सार्वजनिक कामाच्या आठवणी आणि अनुभव देण्यापूर्वी माझी ध्येये आणि मनोरचना याविषयी थोडासा सामान्य विचार करणे जरूर आहे. त्याशिवाय पुढील आयुष्यामध्ये ज्या क्रांत्या झाल्या आणि जे वळसे पडले त्यांची वाचकांना नीटशी कल्पना येणार नाही. कोणाही व्यक्तीच्या सार्वजनिक जीविताचा जो परिपोष होतो त्याचे दोन अगदी भिन्न प्रकार आहेत. एकाचा उदय विश्वात्मकतेमध्ये होऊन हळूहळू स्थानिक प्रश्नाकडे उतरत जातो, तर दुसऱ्याचा उदय अगदीच स्थानिक प्रयत्नात होऊन त्याचे वलय विश्वात्मकतेकडे विस्तृत होऊ लागते. उदाहरणार्थ, एखादा आपल्या जातीच्या सुधारणेकडे लक्ष घालतो किंवा जातिभेदावर त्याचा मुळीच विश्वास नसला तर नागरिक सेवेत लक्ष घालतो व हळूहळू राष्ट्राकडे आणि अखेरीस विश्वाकडेही त्याचा लय लागतो. याच्या उलट दुसरी व्यक्ती एकदम धर्मसुधारणेकडे वळते, म्हणजे विश्वधर्मापासून सुरुवात करून त्याची भिन्न भिन्न प्रतीके, समाजसुधारणा, समाजसेवा, राष्ट्रोद्धार त्यातील निरनिराळ्या वर्गाची उन्नती किंवा अखेरीस आपल्या स्वतःच्या कुटुंबातील आप्तांची काळजी इकडे उतरू लागते. माझा जीवितविकास यापैकी दुसऱ्या प्रकारे घडला. पहिल्या भागात (पृष्ठ १२९) 'जागृतीतले स्वप्न' म्हणून जे सदर आहे ते फार अर्थपूर्ण आहे. लंडन येथील पॅस्मोर एडवर्ड इन्स्टिट्यूटमधील चित्रे पाहून व व्याख्याने ऐकून माझ्या विश्वव्यापक ध्येयाला जी चालना मिळाली त्याचे हे स्वप्न द्योतक आहे. ह्या स्वप्नाप्रमाणे जरी माझ्या हातून जगभर प्रवास घडला नाही, तरी माझ्या जीवितकार्यात माझे विश्वध्येय ध्रुवाच्या ताऱ्याप्रमाणे माझ्या नजरेपुढे कायमचे राहिले.

पहिल्या भागात माझ्या मनोविकासाचे वर्णन करीत असताना मी म्हटले आहे की, मी ब्राह्मसमाजात गेल्याने सुधारक झालो असे नसून मी सुधारक होतो, म्हणून ब्राह्मसमाजात गेलो. माझ्या उदार ध्येयामुळे मी मनामध्ये जी वेळोवेळी मानवी आयुष्याची चित्रे रेखाटली तिला तंतोतंत जुळेल अशी ब्राह्मसमाजाची ठेवण मला दिसली. त्यामुळे मी एकदम ब्राह्मसमाजात (मुंबई प्रार्थनासमाजात) शिरलो. एवढेच नव्हे तर लवकरच त्याच्याशी मी इतका तादात्म्य पावलो की, स्वतःला पूर्णतः वाहून घेऊन त्याचे प्रचारकार्य हीच तळमळ मला लागली.

दोन पक्ष : त्या वेळी हिंदुस्थानात विशेषतः महाराष्ट्रात, सार्वजनिक चळवळ करणाऱ्यांचे दोन भिन्न पक्ष होते. एक स्वतःला राष्ट्रीय उर्फ जहाल म्हणवीत असे, तर दुसरा स्वतःला प्रागतिक उर्फ उदार म्हणवीत असे. पण एकाचा जहालपणा आणि दुसऱ्याचा उदारपणा प्रतिपक्षाच्या कार्यात मात्र दिसून येत नसे. म्हणून हे एकमेकांच्या कार्यांचा हेवादावा आणि वेळप्रसंगी एकमेकास

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२

मुंबईतील स्थानिक कार्यक्रम

परत आल्यावर मुंबईतील कामाचा कार्यक्रम मी ठरवू लागलो. धर्मकार्याची दोन मुख्य अंगे आहेत. पहिले आचार्यकार्य ; दुसरे प्रसारकार्य, ज्यांनी धर्माच्या स्वीकार करून दीक्षा घेतलेली असते अशांच्या धर्माचरणाची व्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न करणे, त्यांतील प्रमुख भाग म्हणजे दर आठवड्याला साप्ताहिक उपासना चालविणे, घरोघरी भेटी देऊन कौटुंबिक धर्माचरणाची निगा ठेवणे, समाजात जे निराश्रित आणि अंपग असतील त्यांची शुश्रूषा करणे; नामकरण, उपनयन, विवाह, अंत्येष्टी इत्यादी गृहविधी चालविणे, सभासदांतील परस्पर-परिचय वाढवून समाज दृढ व्हावा म्हणून वेळोवेळी स्नेहसंमेलने करणे इत्यादी, स्त्रियांसाठी दर शनिवारी आर्य महिलासमाज, मुलांसाठी रविवारचे धर्म व नीती शिकवण्याचे वर्ग, तरुणांसाठी तरुण ब्राह्म मंडळ, वृद्धांसाठी संगतसभा आणि बाहेच्यांसाठी व्याख्याने हा क्रम आठवडाभर चाले. ह्यात मी आल्यावर पुढील नवीन संस्थांची भर टाकली.

पोस्टल मिशन : मी विलायतेत असताना तेथील स्त्रियांनी चालवलेले युनिटेरियन पोस्टल मिशन हे कार्य निरखून पाहिले होते. माझे मित्र वासुदेवराव सुखटणकर या वेळी पुण्यास होते. त्यांच्याकडून अशाच थाटावर ब्राह्म पोस्टल मिशन ही घटना मी स्वदेशी येण्यापूर्वीच करवली होती. ब्राह्मधर्माच्या तत्त्वावर आणि उपासनापद्धतीवर लहान लहान पुस्तके छापवून ती टपालमार्गे लोकास वाटून त्यावर वाचकांकडून जी प्रश्नोत्तरे येतील त्याबाबत सतत पत्रव्यवहार ठेवून सवडीप्रमाणे वाचकांस भेटीस बोलावून धर्मप्रसार करण्याच्या पद्धतीला पोस्टल मिशन हे नाव आहे. या कामात युनिटेरियन लोकांकडून त्यांची लहानमोठी पुस्तके व द्रव्यनिधीची ही मदत मी मिळविली. मी स्वदेशी आल्यावर सुखटणकर माझ्याजागी विलायतेला गेले. त्यांचे पुण्यांतील कार्य मुंबईला आणून मी ते वाढविले. ह्या कामी माझे मित्र व समाजाचे सभासद सय्यद अब्दुल कादर यांची मोठी मदत झाली. ह्या मिशनसंबंधाने पहिल्या १० वर्षाची जी माहिती प्रसिद्ध झाली आहे ती फार बोधपर आहे. त्या सातआठ वर्षीच्या अवधीत एकंदर ३४३८ ब्राह्मधर्मावरील पुस्तके १२७०० लहानसान पत्रके, ६३३ युनिटेरियन पुस्तके व ५००० युनिटेरियन पत्रकांचा प्रसार करण्यात आला. ह्यातील पुष्कळशी फुकट वाटण्यात आली. काहीची अल्प किंमत घेण्यात येत असे, जे कोणी पुस्तकांची मागणी करीत अगर पत्रव्यवहार करीत त्यांची नावे एका पुस्तकात दाखल करण्यात येत असत व त्यांच्याशी पत्रव्यवहार करून उदार धर्मवार्ता त्यास कळावी, अशी व्यवस्था करण्यात आली होती. मी दोन वेळा मुंबई इलाख्यातील काही ठिकाणी प्रवास करून व्याख्याने दिली. ह्या दोन्ही सफरीचा खर्च युनिटेरियन असोसिएशनने त्या वेळी दिला होता. पुढे प्रार्थनासमाजाशी धर्मप्रचारक या नात्याने असलेला माझा संबंध सुटल्यानंतर हे काम बंद पडले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

३

काठेवाडचा दौरा

काठेवाडचा दौरा : १९०४ च्या एप्रिल महिन्यामध्ये माझे मित्र गुजराथेचे नानालाल कवी सादरा येथे सरकारी नोकरीत होते. उन्हाळ्याची सुट्टी पडल्यामुळे माझ्याबरोबर काठेवाडात समाजाच्या प्रचारकार्यासाठी दौरा काढण्याचे त्यांनी ठरविले. मी सादरा येथे गेलो. स्टेशनहून सादरा गाव बराच लांब असल्याने व प्रदेश वाळवंटाचा असल्यामुळे माझी प्रवासाची उंटावरून जाण्याची व्यवस्था केली होती. सवय नसल्यामुळे ह्या प्रवासाचा मला बराच त्रास झाला. अंग फार हालल्याने दोन दिवस कमरेला ठणका लागला होता. साद-याहून आम्ही दोघे प्रथम अहमदाबाद प्रार्थनासमाजात गेलो. तेथे व्याख्याने आणि सभासदांशी परिचय वगैरे करून घेण्यात दोन दिवस गेले. समाजाचे अध्यक्ष लालशंकर उमीयाशंकर यांची प्रथमच ओळख झाली. त्यांनी स्थापलेले मोठे अनाथालय पाहिले. ह्या समाजाला पैशाचे भरपूर साहाय्य आहे, प्रार्थनामंदिर प्रशस्त आणि सुंदर आहे. सभासदांची संख्या पुष्कळ आहे. पण अनुष्ठानिक सभासद फारच कमी होते. रा. रमणभाई नीलकंठ हे समाजाचे सेक्रेटरी होते. आम्ही अहमदाबादहून राजकोटला गेलो. प्रसिद्ध विद्वान् (प. वा.) शंकर पांडुरंग पंडित, बॅ. सिताराम नारायण पंडित आणि धनश्याम नारायण पंडित हे काठेवाडात मोठी मान्यता पावलेले तीन पंडित बंधु राजकोटात कायमची वस्ती करून राहात असत. आम्ही शंकर पांडुरंग यांचे घरी उतरलो. रा. शंकर पांडुरंग पंडित हे प्रार्थनासमाजिस्ट होते आणि दुसरे दोघे प्रागतिक ध्येयाचे होते. राजकोटात राजकुमार कॉलेज व इतर तशाच मोठ्या लोकांच्या शिक्षणी मध्यवर्ती संस्था होतो. ग्राशिया नावाचा काठेवाडातील जमीनदारांचा एक श्रीमत वर्ग आहे. त्याचीही एक शाळा श्रीमती थाटाची होतो. कवाईत करणे, घोड्यावर बसणे व इतर मर्दानी खेळ खेळणे ह्या बाबतीत ह्या कुमारांची फार काळजी घेण्यात येत असे आणि ही कामे ह्या तरुणांना फार आवडतही असत. क्षत्रियाला शोभणारा पेहेराव, पाणीदार वृत्ती आणि कसलेली शरीरप्रकृती पाहून आनंद झाला. मुंबई इलाख्यातील राजेरजवाड्यांच्या मुलांची सोय येथे एकत्र केल्याने परस्पर परिचय होऊन ते पुढे राजपदारूढ झाल्यावरही तो कायम राहातो. राजकोटहून आम्ही भावनगरला गेलो. तेथील कॉलेजात माझे व्याख्यान झाले, सर प्रभाशंकर पट्टणी यांचे या संस्थानांत फार वजन असे. त्याचीही ओळख झाली भावनगरहून आम्ही जुनागडला गेलो व दिवाण बेचरदास यांचेकडे उतरलो. व्याख्याने, भेटी हा ठरीव कार्यक्रम झाल्यावर जवळीच असलेल्या गिरनार पर्वतावर जाण्याचा विचार ठरला. दिवाणांच्या ओळखीमुळे गिरनार पर्वतावर आमची राहण्याची व्यवस्था मोठ्या बडदास्तीची झाली.

गिरनार : 'गढ जुनो गिरनार बादल थीनुं बातुं करी' ही काठीवाडी म्हण बहुजनसमाजात प्रसिद्ध आहे. तिच्यामुळे हा गड पाहण्याची आम्हास फार आतुरता लागली होती. मेघांशी भाषण

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

४

स्थानिक कार्य

प्रेमळ गोतावळा : वर आखलेल्या आराखड्याप्रमाणे मी स्थानिक कामास लागलो. दिवसाची कामे आटोपल्यावर रात्री सभासदांच्या भेटी घेणे. रात्रीच्या शाळांची देखरेख करणे वगैरे आटोपून घरी येण्यास रात्रीच ११/१२ वाजत. मुंबईसारख्या अफाट वस्तीत सभासदांची घरे १०/१२ मैल लांबवर पसरलेली असत व शाळाही दूरदूर असत. म्हणून इतका वेळ लागे. कामात वक्तशिरपणा राखण्यास जड जाई. प्रथम प्रथम संघटना होणे कठीण गेले. समाजात तरुणांचा उत्साह वाढत होता. त्यांचे साहाय्य आनंदाने मिळू लागले; पण अनियमितपणाबद्दल काहीजणांकडून प्रथमपासूनच टीका चालत असे; पण ती प्रेममूलक होती. त्यामुळे तो दु:सह होत नसे. समाजाच्या बाहेरची मंडळी मला माझ्या कामात कितपत यश मिळेल याबद्दल साशंक नजरेने पाहात असत. तर काही कौतुकाने पहात असत. या भिन्न प्रवृतीमुळे मी माझी करमणूक करून घेत असे, आमच्या घरची मंडळी साध्या राहाणीची व खेडवळ प्रांतातून आलेली. त्यांना ह्या मुंबईसारख्या नवीन नवीन ढंगाच्या समाजामध्ये आपले बस्तान बसविण्यास प्रथम प्रथम कठीण गेले. प्रार्थनासामजाच्या थोर थोर घराण्यांनी आमची खरी स्थिती पाहून आम्हास मोठ्या मान्यतेने सांभाळून घेतले. भांडारकर, भाडगावकर, चंदावरकर वगैरे घराण्यातील स्त्रियांनी माझ्या वृद्ध आईशी मिळूनमिसळून वागणूक ठेवून मुंबईचा परकेपणा व तुटकपणा भासू दिला नाही. वासुदेव बाबाजी नवरंगे, सदाशिवराव केळकर, द्वारकानाथ वैद्य, सौ. लक्ष्मीबाई रानडे वगैरे घराणी तर आम्हास आमच्या घराण्यासारखीच वाटत होती. रा. कोरगावकरांनी तर प्रथमपासूनच माझ्याबद्दल फारच काळजी वाहिली. वामनराव सोहोनी व सय्यद अबदुल कादर हे तर माझ्या कामात आजीव येऊन मिळाले. डॉ. सुखटणकरांची माझ्याशी परदेशातून कळकळीचा पत्रव्यवहार चालू असे. डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. वैकुंठ कामत वगैरे तरुण मंडळी आमच्या घरगुती अडचणी भागविण्याला सदैव तत्पर असत. असा हा गोतावळा भोवताली जमून आल्यामुळे मुंबई शहरातल्या राहणीच्या आर्थिक तंगीच्या वेदना सहज सह्य झाल्या. जसजसा माझ्या कामाचा व्याप वाढू लागला तसतसा हा गोतावळाही वाढू लागला.

क्रांती : विसाव्या शतकाच्या आरंभापासून वृद्ध पिढी जाऊन नवीन पिढीने त्याची जागा घेतल्यामुळे प्रार्थनासमाजात एक प्रकारची क्रांती होऊन तो वाढीला लागला. जुन्या संस्थांना नवीन जोम आणि नवीन संस्थांची भर ह्यामुळे चहूकडे नवचैतन्य फुलू लागले. रा. द्वारकानाथ वैद्यांनी सुबोध-पत्रिका सावरली. वामनराव सोहोनी यांनी रात्रीच्या शाळा हाती घेतल्या. कोरगावकरांनी जमाबंदीची काळजी केली आणि इतर नवीन नवीन तरुण स्वयंसेवक म्हणून पुढे आले. ह्याचा परिणाम पुढे काही वर्षे समाजाच्या वार्षिक उत्सवाचे वेळी स्पष्ट दिसू लागला. दूरदूर राहणाऱ्या सर्व कुटुंबांची स्नेहसंमेलने घडू लागली. निरनिराळ्या दर्जामध्ये परिचय वाटून निरनिराळ्या कुटुंबांमध्ये

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

५

घरच्या अडचणी

चंद्राक्का : समाजाच्या स्थानिक कामाला अशा रीतीने रंग चढला; पण इकडे घरच्या मंडळीच्या हलाखीची स्थिती जास्त वाढत चालली जमखंडीसारख्या खुल्या हवेच्या आणि साध्या राहणीच्या आमच्या मंडळीना मुंबईची दाट वस्ती व कोंदट हवा नीट मानवेना. माझी पत्नी सौ. रुक्मिणीबाई हिला १९०४ ऑक्टोबरचे सुमारास तिसरा मुलगा विश्वास झाला ह्या बाळपणापासून त्याची प्रकृती खालावली. आईबाप वृद्ध आणि बहिणी शाळेत जाणाऱ्या म्हणून घरकामाचा सारा भार माझ्या पत्नीवरच पडत असल्यामुळे तिची तारांबळ उडाली. अशा स्थितीत माझी धाकटी बहीण चंद्राक्का हिला क्षयाची भावना जडली. १९०१ साली माझे मित्र वासुदेवराव सुखटणकर यांची बहीण शांताबाई ही माझे बहिणीसह पुण्याचे हुजूरपागेच्या हास्कूलमध्ये शिकत होती. ती प्रकृतीने फार अशक्त होती. सुखटणकरांची आई वारल्यामुळे तिची काळजी घेण्यास घरी कोणी नव्हते. पुढे तिला क्षयाची भावना झाली. म्हणून आमच्या घरी जमखंडी येथे तिला हवापालटीसाठी नेण्यात आले. पुढे ती त्याच रोगाने वारली. माझी बहीण चंद्राबाई ही नेहमी तिच्या सहवासात व शुश्रूषेत असल्यामुळे आणि पुढे मुंबईतील कोंदट हवेचा तिच्यावर परिणाम झाल्याने तिला तोच रोग जडला. माझ्या वृद्ध आईबाबास ही एक नवीन चिंता उपस्थित झाली.

रात्रीची शाळा : १९०५ च्या उन्हाळ्याचे आरंभी माझे बाबा चंद्राबाईला घेऊन खंडाळ्याला हवाफेरीसाठी राहू लागले तेथून त्यांनी पुण्यास वेताळ पेठेतील भाजेकरांच्या वाड्यात स्थानांतर केले. मी मुंबईहून जाऊन येऊन राहात होतो. या वर्षी मी पुण्यातच जास्त राहून तेथील समाजाचे कामात मदत करू लागलो. ह्या सालातील रामनवमीच्या दिवशी मीठगंज पेठेत अस्पृश्यांसाठी एक रात्रीची शाळा मी उघडली. त्या वेळी जनाक्का व तान्याक्का उन्हाळ्याच्या सुटीनिमित घरी आल्या होत्या. शाळा उघडण्याचा समारंभ झाला. त्यात हुजूरपागेतील बऱ्याच मुली हजर होत्या. भिजलेली डाळ व ऊसाचा रस वाटण्यात आला. हा समारंभ भाजेकरांचे वाड्यातच करण्यात आला समारंभास काही ख्रिश्चन मुली हजर होत्या. त्यातील एक उसाच्या रसात थुंकली, अशी खोटी हूल उठविण्यात आली. समारंभाचा बराच विरस झाला. या अपशकुनामुळे या शाळेत पुढे वेळोवेळी अडचणी येऊ लागल्या. ही शाळा पुणे प्रार्थना समाजाच्या स्वाधीन करण्यात आली आणि अखेरीस पुढे निघालेल्या डिप्रेस्ड क्लास मिशनमध्ये सामील करण्यात आली.

सुबोध-पत्रिकेच्या ता. १९-३-१९०५ च्या अंकात खालील इंग्रजी मजकूर आहे.

A friend writing from Poona says that the presence of Mr. V. R. Shinde there, is infusing a new spirit in the Prarthana Samaj of that town. He has within the short time that he has been there, organised a Sangat

६

दौरा

नाशिक : अशा वेळी माझ्या मुलाच्या मृत्युमूळे वैतागून मी मन:शांतीसाठी महाराष्ट्रात व कर्नाटकात दौरा काढला, 'केवळ विश्वासासाठी' या मथळ्याखाली हा दौरा सुबोध पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. बरोबर मी डॉ. रुबेन व स्वामी स्वात्मानंदजी यांना घेतले. प्रथम ठाण्यास उतरलो. तेथे डॉ. संतुजी रामजी लाड यांचे घरी राहून उपासना चालवली. जाहीर व्याख्यान झाले. त्यात तेथील सभासद रा. गुप्ते यांनी भाग घेतला. त्यानंतर नाशिक येथे तेथील सुप्रसिद्ध वकील माझे मित्र रा. नीळकंठराव पाटणकर याचेकडे उतरलो. जाहीर व्याख्याने व खाजगी संभाषणे सुरू झाली; पण सर्वात डॉ. रुबेनचे भजन लोकप्रिय ठरले. भजनमार्गात फारसा शुष्क बुद्धिवाद किंवा खरा प्रयत्नवाद आम्हा हिंदू लोकांना मानवत नाही. भक्तिरसाच्या पुरात वाहात जाणे आम्हाला आवडते. रुबेनने एकतारीवरील भजनात काहीही मत प्रतिवादले तरी चालेल; एरव्ही खटखट नको, असे एका पुढाऱ्याने स्पष्ट सांगितले. रा. पाटणकरांचे ओळखीने व सूचनेवरून नाशिक जिल्ह्यातील आसवले येथे राहणाऱ्या अस्पृश्यवर्गातल्या एका श्रीमंत पुढाऱ्याकडे गेलो पण आम्ही तिघांचा विचित्र वेष पाहून आम्ही काही तरी मागावयाला भिकारबैरागीच आलो. अशी समजूत करून घेऊन मुख्य मालक आम्हास घराबाहेर भेटावयासच आला नाही. आम्ही कंटाळून नदीवर जाऊन स्नान वगैरे उरकले. खावयास आमच्याजवळ उन्हाशिवाय काहीच नव्हते. मुकाट्याने आम्ही अहमदनरगची वाट धरली. पुढे रा. पाटणकरांनी या गृहस्थाची चांगलीच हजेरी घेतली. वर्तमानपत्री याची चर्चा झाली; पण सर्व व्यर्थ! अहमदनगरचे काम आटोपून आम्ही बारामतीस आलो. डॉ. रुबेननी अहमदनगराहूनच कामाची रजा घेतली आणि त्यांची जागा रा. लक्ष्मण मनकू सत्तूर यांनी घेतली. बारामतीला ब्राह्मधर्माचा प्रसार अगदी नवीन होता.

एक पंढरीमाहात्म्य : बैलगाडीने आम्ही तिघे पंढरपुरास गेले. तेथे प्रार्थना समाजाच्या बालहत्त्या प्रतिबंधक गृहात उतरलो. तेथील हायस्कूलचे प्रमुख रा. मोडक आमच्या परिचयाचे होते. स्वात्मानंदजीचे व माझी अशी दोन व्याख्याने या दोन दिवशी स्वारीने जाहिराती लावून आपल्या शाळेत केली; पण आयत्या वेळी पाहतो तो या स्वारीचा डाव भलताच होता. अर्धा तास उलटून गेला. तरी शाळेत एक चिट्पाखरूही आले नाही. हेडमास्तरांनी आपल्या विद्यार्थ्याकडून ठिकठिकाणी नाकेबंदी केल्यामुळे आमचा हा कोंडमारा झाला. अक्षरश: रिकामी बाके आमच्यासमोर दिसू लागली. स्वामी स्वात्मानंदजी मोठे करारी, "शिंदेजी, आज हम व्याख्यान करेंगे, आप सुनीये कल आप कीजिये और मैं सुनोगा." असे म्हणून त्यानी संपूर्ण व्याख्यान दिले. दुसरे दिवशी मीही तसेच केले. हे पंढरीमाहात्म्य 'हा तो काही नव्हे निराशेचा गांव। भले पोटी बाब राखिलीया।।

पुढे सोलापुरात सरकारी वकील रा. नागेश पै यांचेकडे उतरलो. तेथील रिपन कल्बात व्याख्यान झाले. तेथे पंढरपुराच्या उलट प्रकार घडला. व्याख्यानावर चांगली चर्चा झाली. विजापुरात रा. आजरेकर वकिलांच्याकडे उतरलो. तेथील एका थिएटरात व्याख्यान झाले. आमच्याबरोबर ब्राह्मो पोस्टल मिशनच्या पत्रिकांचा व पुस्तकांचा गठ्ठा होताच. ही सामुग्री आम्ही सढळ हाताने वाटीत चाललो. हुबळीस सर नारायण चंदावरकराचे व्याही रा. नारायणराव शिरूर यांचा कळकळीचा पाहुणचार घेतला. म्युनिसिपल हॉलमध्ये व्याख्यान झाले. धारवाडांत उतरण्याची विवंचना पडली. तेथील माझे बालमित्र रा. जनार्दन सखाराम करंदीकर यांची गाठ पडली. त्यानी उतरण्याची व कामाची उत्तम सोय केली. बेळगावास आम्ही मणेरीकर यांचेकडे उतरून त्यानंतर पुण्याहुन मुंबईस आलो.

तातडीची तार : घरी परत येईतोपर्यंत मंडळीचा आजार वाढला होता. अशा घाईत काशी येतील भारतीय एकेश्वरी धर्मपरिषदेची कामगिरी अंगावर घ्यावीच लागली. पुढील नाताळात ते काम आटोपून बंगाल-बिहार-आसामच्या लांब दोऱ्यावर निघालो. शेवटी बदरीलाल येथे जाहीर व्याख्यान करीत असता वरून एक तातडीची तार हाती आली. मुंबईस सौ. रुक्मिणीबाई हिच्यावर कामा हॉस्पिटलमध्ये एक कठीण ऑपरेशन झाले आणि अमहदनगर येथे बहीण चंद्राबाई मृत्यूशय्येवर पडली आहे. असा मजकूर तारेत होता. डॉ. वैकुंठ कामत ह्यानी ही तार केली होती. जवळजवळ तीन हजार मैलांचा दौरा टाकून मी तातडीने घरी निघालो. रात्री १२ वाजता मी अहमदनगर येथे पोचलो. प्रिय भगिनीचे शेवटचे दर्शन घेऊन मी पुन्हा येतो असे आश्वासन देऊन पत्नीच्या समाचाराला मुंबईला गेलो. दुसरे दिवशी चंद्राबाईच्या निधनांची बातमी आली. १९०२ चा फेब्रुवारी, ता. २ हा दिवस. ह्याचे नाव प्रचारकार्य !

उदार धर्म वाचनवर्ग : ता. १२ फेब्रुवारी, १९०४ रोजी ब्रिटिश ॲड फॉरेन युनिटरियन असोसिएशनरचे सेक्रेटरी यांचेकडून पत्र आले. त्यांत सेंट्रल पोस्टल मिशन, लंडन या संस्थेने प्रार्थनासमाजामार्फत ह्या मिशनचे कार्य यशस्वी रीतीने चालविल्याबदल शिंदे आणि सुखटणकर यांच्या अभिनंदनचा ठराव पास केला. यानंतर ता. १८ आक्टोबर, १९०४ रोजी वरील संस्थेकडून दुसरे पत्र येऊन त्यात ह्याच कामाचा विस्तार करण्यासाठी उदार धर्मवाचक ग्रंथाचा एक विशेष वर्ग चालवून त्यात विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पारितोषिके देण्याची व्यवस्था केल्यास तूर्त १०० रु. ची देणगी पाठवू काय, असे विचारले होते. कलकत्यास हेमचंद्र सरकारने असा वर्ग काढला होता व त्यांना अशी देणगी देण्यात आली होती. उदार धर्मवाङ्मयाचा प्रसार हिंदुस्थानात अधिक प्रमाणावर करण्यासाठी ब्रिटिश ॲड फॉरेन युनिटेरियन असोसिएशनचा प्रतिनिधी या नात्याने काम चालवल्यास माझी इतर कामे संभाळून मी तयार आहे की नाही हे विचारले होते. तयार असल्यास वाङ्मयाचा साठा गरजेप्रमाणे अधिक पुरवण्याची हमी घेतली होती. त्यासाठी जो खर्च होईल तोही वेळोवेळी रोख पाठविण्याची कबुली दिली होती. त्यांना मी उतर कळवले की, 'मी हा विशेष वर्ग चालवण्याचे कार्य आधीच सुरू केले आहे. ह्या वर्गातील हजेरीपटावर सुमारे ३० अंडरग्रॅज्युएटस्ची नावे आहेत. तूर्त विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षेत गुंतले असल्यामुळे हा वर्ग बंद ठेवण्यात आला आहे. योग्य वेळी, सालोसाल तो पुढे चालू होईल. ही व्यवस्था कित्येक वर्षे चालू ठेवण्यात आली. त्यामुळे तरुणांचे लक्ष समाजाचे कामाकडे विशेष लागले.

●●●

७

स्थानिक समाज

सातारा समाज : मुंबई शहराशिवाय महाराष्ट्रात पुणे, सातारा, अहमदनगर, गुजराथेत अहमदाबाद, बडोदे आणि माळव्यात इंदोर वगैरे ठिकाणी प्रार्थना समाजाचे स्थानिक समाज आहेत. ह्याचे सालोसाल वार्षिक उत्सवाचे समारंभ होत असतात. ते जवळजवळ आठवडाभर चालत असतात. त्यात भाग घेण्यास मला जावे लागे. १९०५ सालच्या उन्हाळ्यात सातारा येथील उत्सवासाठी मी गेलो. रा. सितारामपंत जव्हेरे जे ह्या समाजाचे काम कळकळीने चालवीत असत. रा. काळे, रा. मोरोपंत जोशी व त्यांची कन्या मथुराबाई वगैरे मंडळी त्यांना मदत करीत असत. भजन, उपासना, व्याख्याने ही कार्यक्रमातील ठराविक कामे झाल्यावर तेथील लष्करात, अस्पृश्य लोकांच्या सैनिकांकरिता एक विशेष व्याख्यान झाले. गावात अस्पृस्यांसाठी एक शाळा उघडण्यात आली. साताऱ्याहून पाच मैलावर वर्णे नावाचे एक खेडे आहे तेथील सबरजिस्ट्रार रा. बापूजी बच्चाजी शिंदे यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. गणपतराव शिंदे यांनी मुद्दाम बोलावून नेले. खेड्यातील लोकांसाठी भजन, उपासना, करवल्या. लोकांमध्ये वाटण्यासाठी पोस्टल मिशनचे वाङ्मय पाठविण्यात आले. पुढील एका वर्षी डॉ. भांडारकर गणपतराव आंजर्लेकर, स्वामी स्वात्मानंद गणपतराव कोटकर, श्रीमती जनाबाई शिंदे वगैरे मंडळीसह साताऱ्यास गेलो. उत्सव थाटाचा झाला. यवतेश्वराच्या डोंगरावर वनोपासना झाली.

अहमदनगर समाज : १९०६ साली अहमदनगर समाजात उत्सवासाठी गेलो. तेथील साळी समाजाचे प्रमुख पुढारी रा. सहदेवराव बागडे या समाजाचा पुढाकार घेऊन काम चालवीत. यांच्या वजनामुळे समाजात बरेच साळी जातीचे लोक येत असत. शंकर पांडुरंग पंडित, लालशंकर उमीयाशंकर वगैरे विद्वानांच्या प्रोत्साहनाने नगर येथे स्वतंत्र मंदिर बांधण्यात आले होते. इ. स. १९०५ सालापासून पुढे मी या समाजात मधूनमधून जाऊ लागलो. त्या वेळी व पुढे संत, हिवरगावकर, धनेश्वर, ऋषी वगैरे तरुण मंडळीनी समाजाचे काम नेटाने चालविले होते. फ्रेंड्स् लिबरल् असोसिएशन नावाची संस्था स्थापन होऊन तिच्या विद्यमाने समाजाबाहेरही व्याख्याने देण्याचा उपक्रम तेव्हा झाला; पण समाजाचा मुख्य भार त्या वेळी प. बा. सहदेवराव बागडे यांच्यावरच पडला होता. त्यांच्या साहाय्याने एक स्पृश्यासाठी व एक अस्पृश्यांसाठी अशा दोन रात्रीच्या शाळा काढण्यात आल्या. पुढे काही वर्षानी त्या बंद पडल्या. रा. ब मारुतीराव भुजंगराव या वृद्ध गृहस्थाने आपल्या स्वकुळ साळी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी ५००० रु. व केवळ प्रार्थनासमाजासाठी ३००० रु. अशा देणग्या दिल्या त्यातच सहदेवराव बागडे यांनी स्वत:च्या १००० रु. ची भर घातली (प्रार्थनासमाजाचा इतिहास, पान २९२).

सोनईची चळवळ : पुढे १९०८ साली अहमदनगरास गेलो असता सोनई येथे मोठी चळवळ झाली. तेथील खेड्यातील लोकांचे एक शिष्टमंडळ मला तेथे नेण्यास आले, ही सत्यशोधक मंडळी होती. तेथील स्थानिक ब्राह्मणमंडळीशी काही वाद माजून आसपासच्या बऱ्याच खेड्यात असंतोष उत्पन्न झाला होता. जातीजातीत समाजिक बाबतीत वैमनस्य माजले असता त्यांच्यात सलोखा घडवून आणून उदारधर्माच्या चळवळीकडे लक्ष लावणे हे प्रार्थनासमाजाचे ब्रीद आहे. म्हणून मी सोनई येथे गेलो. तेथील ओढ्याच्या काठी वाळवंटात प्रचंड जाहीर सभा भरली. निरनिराळ्या खेड्यातून सर्व जातीची हजारो मंडळी जमली होती. प्रत्येक जातीचे दोन दोन प्रतिनिधी घेऊन एक साधारण समिती बनविण्यात आली. त्यात ब्राह्मणांचेही दोन प्रतिनिधी घेण्यात आले. सत्यसमाज हे नाव ह्या नवीन चळवळीला देण्यात आले. एक दोन वर्षे काम चालल्यावर सोनई येथील दोन पाटील घराण्यात वितुष्ट आल्याने ह्या नवीन चळवळीचा लोप झाला.

इंदूर : १९०७ साली मी इंदुरास समाजाचे उत्सवास गेली. बरोबर माझी पत्नी सौ. रुक्मिणीबाई आणि सहकारी स्वात्मानंद हे होते. इंदूर समाजाचे नाव मध्यभारतवर्षीय ब्राह्मसमाज असे आहे. डॉ. प्रभाकरपंत भांडारकर, होळकर कॉलेजचे प्रो. देसाई, तेथील प्रसिद्ध पाटकर जाधव यांचे घराणे, चित्रकार मिटबावकर ह्यांचा या समाजात मोठा पुढाकार असे ही सर्व मंडळी अनुष्ठानिक असून समाजाचे काम जोरात चालले होते. रा. सदाशिवराव केळकरही तेथेच होते. ह्या उत्सवास नगरसंकीर्तनाचे कार्य थाटाचे झाले. शेवटी नगराबाहेर वनोपासनेत प्रीतिभोजनाचा समारंभही गोड झाला. ता. २४ एप्रिल, १९०७ रोजी तेथील काही पुढारी मंडळीच्या मदतीने एक कमिटी स्थापन करुन अस्पृश्यांसाठी ता. ५ मे, १९०७ रोजी एक संस्था उघडण्यांत आली. होळकर कॉलेजचे प्रो. गोखले हे व्हाइस प्रेसिडेन्ट व रामचंद्रराव मिटबावकर हे सेक्रेटरी होते. ह्या समाजाचे एक सुंदर बाह्ममंदिर आहे. तेथील पाटकर-जाधव घराण्यातील मंडळीची समाजाला फार मदत होती. त्यांचे होळकर दरबारात वजन असल्याने श्रीमंत तुकोजीराव महाराज व त्यांची पत्नी सीताबाई होळकर यांचे समाजाकडे लक्ष लागले. महाराजांकडून या समाजास दरमहा ३० रु. चे वर्षासनही मिळत असते.

मांडवगड : उत्सव आटोपल्यावर जाधवमंडळीनी धार, मांडवगड, महू वगैरे प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी बैलगाडीतून सफर काढली. माझ्या पत्नीलाही घेऊन मी त्या सफरीस गेलो. धार येथील प्रसिद्ध किल्ला आणि तेथील प्राचीन राज्याचे अवशेष पाहून आनंद झाला. विंध्याद्रीच्या शिखरावर मांडवगड ही मध्ययुगीन मुसलमान बादशाहीची राजधानी होती. तेथे दहावीस मोठमोठ्या मशिदी, देवळे आणि राजमहल ही फार प्रेक्षणीय दिसली मध्ययुगीन राजा बाजबहादूर व रूपमती यांच्या प्रेमाची स्थळे पाहण्यास आली. यानंतर नर्सिंगचे शिक्षण घेण्यासाठी सौ. रुक्मिणीबाई काही महिने इंदुरास जाधवमंडळीकडे ठेवून मी मुंबईस आलो. तुकोजीरावमहाराजांची दाई व बाळकृष्णपंत जाधव यांची पत्नी सौ. अहल्याबाई या फार चारित्र्यवान व थोर मनाच्या बाई होत्या. त्यांच्या प्रेमळ सहवासात रुक्मिणीबाईना मोठा लाभ घडला.

नवसारी : पोस्टल मिशनच्या कामात परिचय झालेले रा. जी. के. वैद्य यांचे ता. सप्टेंबर, १९०४ चे पत्र आढळते. त्यावरून नवसारी येथील प्रार्थना समाजाची खालील हकिगत मिळते. रा. ब. हरी रामचंद्र शिंदे, बडोदा स्टेट इंजिनियर यांनी ३० ऑक्टोबर १८९८ रोजी नवसारी येथे समाज

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

नाखूश होती. मी ही गोष्ट महाराजांचे कानी घालून मुलांच्या नोकरीविषयी काही झाल्यास करावे अशी सूचना केली. धोरणी महाराजांनी लोकमत अनुकूल नसल्याने तूर्त हे शक्य नाही असे सांगितले; पण स्कॉलर्शिपा देऊन पुढील शिक्षणाची सोय करण्याचे कबूल केले आणि त्याप्रमाणे तशी व्यवस्था पण झाली.

मराठ्यांकडून स्वागत : बडोदे शहरातील प्रमुख मराठेमंडळीनी माझे स्वागत करून पानसुपारीचा एक जाहीर समारंभ केला. मेहेरबान खासेराव जाधव यांचा या बाबतीत पुढाकार होता; पण एकामागून एक जी वक्त्याची भाषणे झाली. त्यातून प्रतिकूल सूरच निघू लागले. माझे सर्व शिक्षण मराठा समाजाचे खर्चातून झाल्याने व विलायतेला जाण्यायेण्याचा खर्चही महाराजांकडून मिळाला असता मी मराठा समाजाच्या सेवेला हजर न होता प्रार्थनासमाजात शिरलो हे बरे केले नाही, अशी भाषणे करून माझ्या गळ्यात जेव्हा माळ घालावयास मंडळी पुढे आली तेव्हा उत्तर देताना मी म्हटले की, "असे जर आहे, तर मी ही माळ घालण्यास लायक नाही. म्हणून तो हातातच घेत आहे. प्रार्थनासमाज सर्वांसाठी आहे आणि त्यासाठी मला तयार केले हे मराठ्यांस, विशेषत: महाराजांना भूषणावहच आहे. स्वत: महाराज हेच जर केवळ मराठ्यांकरिता नाहीत तर त्यांचा अनुयायी मी निराळा कसा होऊ ? "

सन १९०४ साली नाताळांत काँग्रेसचे अधिवेशन मुंबईस ठरले. सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान या वर्षी महाराजांना द्यावयाचे ठरले होते. ह्याच वेळी एकेश्वरी धर्मपरिषदेची पुनर्घटना करून तिचे अधिवेशन मुंबईस करण्याचे कामी मी पुढाकार घेतला होता. त्या वेळी मुंबई प्रार्थनासमाजास भेट द्यावी व समाजाच्या रात्रीच्या शाळांच्या बक्षीससमारंभामध्ये अध्यक्षस्थान स्वीकारावे म्हणून महाराजांना आमंत्रण करण्यासाठी मी बडोद्यास डिसेंबर १९०४ मध्ये गेलो. त्या वेळी तेथील हायकोर्टाचे जज्ज व डॉ. भांडारकर यांचे बंधु श्री. वासुदेवराव गोपाळ भांडारकर हे होते. मी त्यांचेकडे उतरलो. हे प्रार्थनासमाजाचे सभासद होते. शेठ हरगोविंददास कांटावाला वगैरे जुन्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बडोद्यास एक प्रार्थनासमाज चालविला होता; पण त्याचे काम हल्ली बंद होते. बडोद्यातील जयसिंगराव स्टेट लायब्ररीमध्ये महाराजांच्या आज्ञेने माझे एक जाहीर व्याख्यान करण्यात आले. महाराजांनी मुंबईत समाजाच्या परिषदेच्या कामात भाग घेण्याचे मान्य केले.

मंगळूर : सन १९०७ च्या ऑक्टोबर अखेरीस हिंदुस्थानच्या नैऋत्य किनाऱ्यावरील मंगळूर शहरातील ब्राह्मसमाजाकडून मला तिकडे नेण्यासाठी त्या समाजाचे रा. व्यंकटाप्पा कांतप्पा नावाचे एक सभासद मुंबईस आले मी व चि. जनाक्का श्री. व्यंकटाप्पाबरोबर आगबोटीने निघालो. मंगळूरला पोचल्यावर समाजाचे अक्षरश:सर्व सभासद-स्त्रीपुरुष आणि मुले-माझे स्वागत करण्यासाठी बंदरावर आले होते. मंगळूर हे बंदर उतरण्यास कठीण असल्यामुळे आगबोट बंदरापासून लांब थांबते. लहानशा मचव्यातून उतारूना बंदरावर पोचविण्यात येते. ही सर्व मंडळी माझ्यासाठी किती तरी वेळ उन्हात तिष्ठत होती. त्यांचे हार्दिक स्वागत पाहून आम्हांला गहिवर आला. वृद्ध अध्यक्ष उल्लाळ रघुनाथय्या, सेक्रेटरी के. रंगराव, खजीनदार कृष्णराव गांगुली, कर्नल सदाशिवराव व आणखी काही थोडी सारस्वत ब्राह्मण घराणी होती. बाकी सर्व तिकडील प्रांतातील बिल्लव जातीचे सभासद होते. ही जात तिकडे अस्पृश्य मानलेली होती. पण तो आश्रम पालटून ब्राह्मसमाजात

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

अखिल भारतीय निराश्रित सहकारी मंडळीची ही मंगळूर शाखा म्हणून त्या मंडळीशी संलग्न (Affiliated) केली. पुढे हिची वाढ झपाट्याने झाली. ह्या नैऋत्य किनाऱ्यावरील द्राविड संस्कृती लोकरिवाज, आश्चर्यकारक इतिहास यांचे निरीक्षण करण्यास बरीच मोठी संधी मिळाली. बऱ्याच वेळा मी या प्रांती पुढे निरनिराळया कामानिमित्त येऊन गेलो.

प्रेमाचे भांडण : आम्हा दोघा भावंडाची उतरण्याची सोय या बिल्लव मंडळीनी एका स्वतंत्र बंगल्यांत केली होती. तरुण स्वयंसेवक नेहमी कामाला हजर असत. बिल्लव मंडळीची माझ्यावर अपूर्व भक्ती होती. मला आपला गुरु मानून ते माझ्या अर्ध्या वचनात राहात असत. नरसाप्पा व नारायणाप्पा या नांवाचे दोघे बंधु आमच्या बंगल्यात सहकुटुंब राहात असत. आमच्या पाहुणचाराची जबाबदारी त्यांच्यावर असे. तो करण्यामध्ये त्यांची केव्हा केव्हा अशी चुरशीची चढाई लागे की, "देवा, आमचे ह्या शिष्यापासून रक्षण कर" असे म्हणण्याची आम्हावर पाळी येई, एकदा आमचे काम करण्यासाठी ह्या दोघा भावांचे अक्षरशः मल्ल्युद्ध जुंपले, मी ते सोडविण्यास गेलो असता त्या दोघाचे आघात माझ्या पाठीवर पडून ती बरीच तिंबून निघाली कारण ही वेळ पहाटे ५ वाजतांची रात्रीची असल्याने हा प्रकार अंधारांत चालला होता. त्या दिवशीचा स्वयंपाक कोणी करावा याबद्दल वाद उपस्थित झाला होता. जो तो मी करणार असे अट्टाहासाने म्हणे, उजाडल्यावर माझ्या पाठीवरचे वळ पाहून दोघे भाऊ लहान मुलासारखे स्फंदून स्फंदून रडू लागले. त्यांची समजूत घालण्यासाठी मला माझी बरीच शक्ती खर्च करावी लागली.

बिल्लवांची गृहस्थिती : मंगळूरभोवती सृष्टिसौंदर्य अपूर्व आहे नद्यांची रुंद पात्रे, दोन्ही बाजूना सुंदर रेती व त्यापलीकडे लाल मातीच्या टेकड्या व त्यावरील गर्द झाडी वगैरे शोभा सर्व ऋतूत अपूर्व दिसते. अड्यावर नावाच्या जवळच्या एका खेड्यात मी बोटीतून सफर काढली. बिल्लव जातीचे पुढारी व समाजाचे सभासद श्री. बोळार व्यंकटाप्पा या नावाचे पोलीस अधिकारी बरोबर होते. त्यांनी ह्या सफरीची सर्व सोय केली होती. आम्ही जगलात राहाणाऱ्या बिल्लव जातीच्या गृहस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी एका घरात शिरलो. मोठमोठ्या जमिनीवर राबण्यासाठी हे लोक वंशपरंपरागत कुळे म्हणून खपतात. ह्यांची स्थिती जवळजवळ जनावरासाखीच आहे. राहण्यासाठी एखादी क्षुद्र झोपडी, ताडामाडाच्या लाकडांची काही शुल्लक उपकरणे एवढीच ह्यांची संपत्ती अंगावरच्या पोशाखाशिवाय बदलावयाला कपडे नसतात. मी एका म्हाताऱ्या स्त्रीला तिचे वय विचारले तिने लाजून म्हटले, "मला काय माहीत ? माझ्या जमिनीच्या मालकाला ठाऊक असेल !" अशा लोकांसाठी रा. रंगरावांनी मिशन काढले यात काय नवल ! या लोकांची मुले दिवसभर कुठे तरी झाडावरील चिंचा, बोरे व केव्हा झाडपाला खाऊन पोट भरतात. रात्री थोडीशी कांजी मिळाल्यास ती चाटून चाटून खातात. औषध पाण्याची त्यांना गरजच लागत नाही. नंतर चारसहा आठवड्यांनी आम्ही मुंबईस परत आलो.

पनवेल : १९०६-०७ च्या सुमाराला चि. जनाक्का कोकणातील पनवेल या गावी तेथील म्युनिसिपल शालेत मुख्य शिक्षक या नात्याने काम करीत होती. सुधारक म्हणून तिला तेथे फार विरोध होऊ लागला. तिचेबरोबर आई, बाबा आणि माझा मुलगा प्रताप हे राहात होते. प्रार्थनासमाजाची तत्त्वे तेथील लोकास समजावून दिल्यास गैरसमजूत कमी होऊन विरोध कमी होईल या आशेने

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

८

भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद

[All India Theistic Conference]

येथवर माझ्या प्रचारकार्यांचे स्थानिक आणि प्रांतिक स्वरूपाचे वर्णन केले. पण प्रथम सांगितल्याप्रमाणे माझे लक्ष ब्राह्मधर्माच्या विश्वव्यापकत्वाकडे आणि त्या उच्च अधिष्ठानावरून ब्राह्मधर्माच्या भारतीय कार्याकडे नेहमी लागून राहिलेले असे. या धर्माचे मुख्य अंग ही धर्मपरिषद होती. सन १८८५ साली हिंदी राष्ट्रीय सभेचे पाहिले अधिवेशन मुंबई येथे भरले. त्यात न्या. मू. रानडे यांचा अप्रत्यक्ष पुढाकार होता. त्यांची बुद्धी अष्टपैलू, भावना उदार व उच्च प्रतीच्या होत्या. पुढील दोन अधिवेशने कलकत्ता व मद्रास शहरी झाल्यावर अलहाबादला चौथी बैठक भरली. आरंभापासूनच राजकारणास समाजसुधारणेचा बळकट पाठपुरावा होता. अर्थात ह्या चौथ्या बैठकीत उदारधर्माचा पाठिंबा ह्या राष्ट्रीय चळवळीस मिळणे क्रमप्राप्तच होते. एकेश्वरी बैठकीचे अध्यक्ष न्या. मू. रानडे झाले. कलकत्त्याचे मिस्टर आणि मिसेस् आनंदमोहन बोस, लखनौचे बिपिनबिहारी बोस, बिहारचे बलदेव नारायण, लाहोरचे पं. शिवनारायण अग्निहोत्री यांनी आपापल्या प्रांतातील ब्राह्मसमाजाच्या कार्यासंबंधी भाषणे केली. पुढे सालोसाली राष्ट्रीय सभा जेथे जेथे भरेल तेथे त्या वेळी ही धर्मपरिषदही भरविण्यात यावी आणि पुढील वर्षाचे सेक्रेटरी म्हणून पं. शिवनाथशास्त्री यांना नेमावे, असा ठराव करण्यात आला.

ब्राह्मसंघ : १८८९ साली मुंबईला ही परिषद मुं. प्रांतिक समाजात भरली आणि त्या वेळी प्रांतोप्रांतीच्या पुढाऱ्यांनी भाग घेतला. कलकत्त्याहून नवविधान समाजाचे प्रतापचंद्र मुझुमदारही हजर होते. तेव्हा Theistic Union (ब्राह्मसंघ) या नावाची एक मध्यवर्ती संस्था स्थापून पुढील कार्याचा प्रयत्न करण्यात यावा असे ठरले. (१) ब्राह्मसमाजाच्या निरनिराळ्या पक्षांच्या एकत्र उपासना व संमेलने व्हावीत. (२) प्रचारासाठी एकत्र प्रयत्न व्हावा. (३) परोपकाराचे आणि भूतदयेचे काम एकत्र व्हावे वगैरे. नवीनचंद्र राय ह्यांना ह्या संघाचे सेक्रेटरी नेमले. कलकत्त्यास साधारण ब्राह्मसमाज, नवविधान ब्राह्मसमाज व आदि ब्राह्मसमाज असे निरनिराळे पक्ष पडून ब्राह्मसमाजाच्या सामाईक कार्यात फूट पडली होती. ह्या नवीन संघामुळे ही फूट भरून येण्याचा बराच संभव होता आणि त्यात आम्ही मुंबईकडील पुढाऱ्यांनीच न्या. मू. रानडे ह्यांच्या नेतृत्वाखाली उचल खाल्ली असा तर्क करण्यास बरीच जागा आहे. कारण पुढील दोनतीन साली रानडे ह्यांनाच परिषदेचे अध्यक्षस्थान देण्यात आले होते. चवथी बैठक नागपुरास १८८१ साली भरली. तेथे ब्राह्मसमाज नसल्यामुळे काम फारसे झाले नाही. पुढील सालाकरिता वामन आबाजी मोडक व पांडुरंग सदाशिव केळकर यांस सेक्रेटरी नेमण्यात आले. १८९४ साली मद्रासच्या बैठकीस डॉ. भांडारकर हे अध्यक्ष होते व पुढील साली म्हणजे १८९५ साली पुण्याच्या काँग्रेसचे वेळी पुणे

वेळ	स्थळ	अध्यक्ष	सेक्रेटरी
डिसेंबर, १९०४	मुंबई	डॉ. रा. गो. भांडारकर	श्रीयुत वि. रा. शिंदे
--,,-- १९०५	बनारस	पं. शिवनाथशास्त्री	श्रीयुत वि. रा. शिंदे
--,,-- १९०६	कलकत्ता	श्रीयुत व्यंकटरत्नम् नायडू	श्री. हेमचंद्र सरकार आणि श्री. प्रमथलाल सेन
--,,-- १९०७	सुरत	श्री. सत्येंद्रनाथ टागोर	श्री. वि. रा. शिंदे
--,,-- १९०८	मद्रास	श्री. अविनाशचंद्र मुझुमदार	-,,- -,,- -,,-
--,,-- १९०९	लाहोर	प्रो. विनयेंद्रनाथ सेन	-,,- -,,- -,,-
--,,-- १९१०	अलाहाबाद	पं. शिवनाथशास्त्री	श्री. वि. रा. शिंदे व अविनाशचंद्र मुझुमदार
--,,-- १९११	कलकत्ता	श्री. उल्लाल रघुनाथय्या	श्री. हेमचंद्र सरकार
--,,-- १९१२	बांकीपूर	सर नारायण चंदावरकर	-,,- -,,- -,,-
--,,-- १९१३	कराची	रेव्हरंड जे. टी. संडरलंड	श्री. वि. रा. शिंदे

मुंबई : १९०३ सालच्या मद्रास-बंगालच्या सफरीवरून हिंदुस्थानातील निरनिराळ्या ब्राह्मसमाजाची मला बरीच प्रत्यक्ष माहिती झाली होती. १९०४ साली मुंबईच्या परिषदेत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतातून पुष्कळसे प्रमुख पुढारी मुंबईस आल्याने त्यांच्या समक्ष परिचयाची भर पडली आणि त्यांच्यावर ह्या नवीन संघटित परिषदेचा परिणाम घडला. मुंबई प्रार्थनासमाजांतील पुढाऱ्यांनाही ह्या नवीन प्रयत्नांचे महत्त्व कळून चुकले. कलकत्त्याच्या खालोखाल मुंबई प्रार्थनासमाजाचे महत्त्व असल्याने येथील बैठक समाजाबाहेरील लोकांवरही परिणामकारी झाली. यंदाच्या सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान श्रीमंत सयाजीरावमहाराजांनी स्वीकारल्यामुळे तो एक नवीनच विशेष घडला. म्हणून धर्मपरिषदेतही महाराजांनी प्रत्यक्ष भाग घ्यावा ही कल्पना मला सुचली. स्वतः मी त्यास आमंत्रण करण्यास गेलो हे वर आलेच आहे. स्वागताध्यक्षाचे काम सर नारायण चंदावरकरांनी आणि अध्यक्षाचे काम गुरूवर्य डॉ. भांडारकरांनी केल्यामुळे ह्या अधिवेशनास अधिक रंग चढला. रात्रीच्या शाळांचा बक्षीससमारंभ झाला. त्यात अध्यक्षस्थान पत्करून त्याच रात्री राममोहन आश्रमात जे थाटाचे प्रीतिभोजन झाले त्यातही महाराजांनी प्रमुखपणे भाग घेतला. ह्या भोजनास मुंबईच्या आर्यसमाज आणि सामाजिक परिषदेचे प्रतिनिधी यांना आमंत्रण केले होते. आर्यसमाजाचे सेक्रेटरीनी १५० सभासदांना घेऊन येण्याचे कबूलही केले होते. प्रार्थनासमाजाचे उपाध्यक्ष दानशूर दामोदरदास सुकडवाला यांनी भोजनाचा सर्व खर्च सोसण्याची जबाबदारी घेतली होती ; पण मुंबई प्रा. समाजाने काही मुसलमान गृहस्थांना प्रार्थनासमाजाची दीक्षा दिलेली होती, म्हणून आयत्या वेळी आर्यसमाजिस्टांनी भोजनाला हजर राहण्याचे टाळले. कृतीची बाजू आल्यावर केवळ ध्येयवादावर आकांडतांडव करणारे हे वाचीवीर कशी बगल मारतात ह्याचे हे उदाहरण आहे. शिवाय तो काळ १९०५ सालचा होता. आर्यसमाजात बहुतेक गुजराथ्यांचाच भरणा होता. कृतीच्या सुधारणेला गुजराथ प्रांत त्या काळी तयार नव्हता त्याचे हे उदाहरण. पण महाराज श्रीमंत सयाजीराव यांनी गुजराथ्यांना हे

मुं. प्रा. समाजासारख्या तिऱ्हाइताचे कामाची माहिती इकडल्या दूरदूरच्या समाजास कळावी, (कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज ह्यांतील भेद न जाणणारे काही ब्राह्मसमाजिस्ट इकडे भेटले.) काही प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी, मुख्य मुख्य स्थानिक समाज पाहावे वगैरे हेतू मनात धरून मी ह्या सफरीवर निघालो.

बांकीपूर : बिहार प्रांताची राजधानी बांकीपूर येथे ता. २ जानेवारी, १९०६ रोजी आलो. हा देश जरी बिहारी (हिंदुस्थानी) लोकांचा असला तरी येथे बंगाली लोकांची बरीच वस्ती असून सार्वजनिक बाबतीत त्यांचाच पुढाकार व सुळसुळाट दिसला. वायव्येकडील प्रांतात ज्याप्रमाणे एकही तद्देशीय ब्राह्म सापडणे कठीण त्याप्रमाणे सबंध बिहार प्रांतात बिहारी ब्राह्मांची एकाच बोटावर मोजण्याइतकी संख्या आहे. मुख्य ब्राह्मसमाज नवविधान मताचा आहे. भाई प्रकाशचंद्र राय हे त्याचे पुढारी. हे सर्वांशी मिळूनमिसळून वागून सार्वजनिक कामात पुढाकार घेणारे आहेत. राममोहन राय सेमिनरी ही साधारण ब्राह्मसमाजाची असून त्या शाळेतच ह्या पक्षाच्या उपासनाही होतात. तारीख ४ रोजी राय यांचे घरी मी प्रमुख मंडळी जमवून प्रथम मुंबईकडची हकीकत सांगितली. उत्सवांत एकमेकांनी मिळून कार्यक्रम ठरवावा, एकमेकांच्या उपासनेस पाळीपाळीने जावे असे ठरले. बॅ. दास यांचे घरी तारीख ५ रोजी दोन्ही पक्षांच्या स्त्रियांची सभा भरली. पोस्टल मिशन, डोमेस्टिक मिशन, सामाजिक मेळा वगैरे कामे स्त्रियांनी कशी करावयाची हे मी सांगितले. सिल्हेटहून काशी परिषदेस आलेल्या सौ. हेमंतकुमारी चौधरी ह्यांनी हिंदीत भाषण केले.

मोघीर : तारीख ६ रोजी मोघीर येथे आलो. हे रमणीय स्थान भागीरथीचे काठी आहे. पुराणातील राजा दानशूर कर्ण ह्याची दान देण्याची जागा अद्यापि गंगेच्या तीरावर दाखवितात. ब्राह्म यात्रेकरूंस या स्थळाचे महत्त्व असे सांगण्यात येते की, ब्राह्मसमाजात पुढे जो भक्तिसंप्रदाय सुरू झाला तो मूळ या ठिकाणी. १८७२ साली हल्लीचे मंदिर बांधण्यात आले. या मंदिरात एकदा काही वैष्णव मंडळीस भजनास बोलविले होते. त्यापैकी एका चांडाळ जातीच्या भक्ताने इतके सुश्राव्य व आवेशयुक्त भजन केले की, त्याचा मंडळीवर विलक्षण परिणाम झाला. पुढे साधु अधीरनाथ ब्राह्मप्रचारक यांचे भजनाविषयी प्रेम अधिकाधिक वाढून शेवटी स्वतः केशवचंद्र सेन येथे असता त्याच्यावरही भजनाचा परिणाम घडला व येथील कार्य बरेच वाढले. तरी येथील हल्लीची ओसाड व दीनवाणी स्थिती पाहून माझे मन गहिवरले व मानवी मनाची अस्थिरता पाहून विस्मयले. मंदिरापुढील पटांगणात केशवचंद्र सेन, साधु अघोरनाथ व दीननाथ चक्रवर्ती यांच्या तीन समाधी मध्यभागी एका चौथऱ्यावर बांधल्या आहेत. १९०२ साली या गावी आर्यसमाजाची स्थापना झाली; पण तोही नीट चालत नाही.

भागलपूर : भागलपूर येथे तारीख ७ रोजी पोचलो. हा समाज तारीख २२ फेब्रुवारी १८६४ रोजी स्थापण्यात आला. राजा शिवचंद्र बॅनर्जी नावाच्या एका अत्यंत आस्थेवाईक हितचिंतकाने स्वतः सर्व खर्च सोसून मंदिर बांधविले. केशवचंद्र सेन ह्यांच्या हस्ते हे मंदिर उघडण्यात आले. समाजात थोडी का होईना, पण बडी बडी प्रमुख व वृद्ध मंडळी आहेत; पण उपासनेशिवाय काही काम होत नाही. तारीख ९ रोजी सुमारे ५/६ तरूण पदवीधर ब्राह्ममंडळीपुढे मुंबईच्या तरुण ब्राह्ममंडळाचे छापील नियम मी वाचून दाखविले आणि तेथील पूर्वीची तरूण संस्था पुन्हा स्थापन

पहिल्या प्रतीचे गणले जाऊन शिवाय ब्रिटिश सरकारच्या मर्जीतले असावे असे दिसते. येथे एम.ए. पर्यंतचे पूर्ण दर्जाचे एक कॉलेज आहे. त्यात सुमारे ३०० विद्यार्थी असून फी सपशेल माफ आहे. शिवाय एतद्देशीय विद्यार्थ्यांसाठी फुकट बोर्डिंग आहे. सुधारणेची ही थोडी चिन्हे सोडून दिल्यास कुचबिहार नगरावर व तेथील अस्सल प्रजेवर अद्यापि हिमालयाचेच पुरातन वन्य साम्राज्य चालू आहे. राजमहाल, चार बड्या लोकांची घरे आणि कांही सरकारी इमारती सोडून बाकी सर्व लहानमोठ्यांची घरे म्हणजे अक्षरशः झोपड्याच! गावाकडे नजर फेकल्यास असे वाटते की, केळी व पोफळी यांच्या सुंदर बनात एकान्त जागा पाहून आधुनिक सुधारणेच्या प्लेगला कंटाळून जणू एक सेग्रिगेशन कँपच बांधला आहे. रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ह्या बांबूच्या झोपड्या दरम्यान बरीच मोकळी जागा सोडून हारीने बांधलेल्या दिसतात. प्रथम जमिनीवर सुमारे तीन फूट उंचीच्या खांबावर ओटा बांधून तक्तपोशी वेळूची, भिंती वेळूच्या, वरचे छत व छप्पर वेळूचे, आतील सामान वेळूचे आणि बाहेरील भक्कम कंपाऊंडही वेळूचेच! याची कारणे पुष्कळ आहेत. एक तर लोक गरीब आणि अल्पसंतुष्ट. दुसरे देश दलदलीचा, सर्द व अति पावसाचा. तिसरे, घरे बांधण्यास चिखल व दगड दोन्ही मिळत नाहीत. जमीन राखेच्या रंगाची, मऊ व बारीक रेतीची. तिच्या विटाही बनत नाहीत. बरे इतक्यालाही न जुमानता आढ्यतेने जर एखादे घर उभारले, तर हिमालयबुवा वरचेवर भूकंपाचे धक्के देऊन जागे करण्यास तयार आहेतच. राजाचा सुमारे १३ लाखांचा सुंदर व भव्य प्रासाद व भोवतालची विस्तीर्ण बाग पाहून प्रेक्षक बाहेर राजरस्त्यात येतो, पण दुतर्फा सेग्रिगेशन कँप पाहून त्याचा बराच हिरमोड होतो.

ब्राह्मधर्माचा दिग्विजय करण्याकरिता जी प्रचारकसेनेची अभेद्य फळी उभारली होती तिची दुफळी केली ती याच कोपऱ्यातल्या कुचबिहारने. कुचबिहारात साधारण ब्राह्मसमाजपक्षाचा आणि नवविधान पक्षाचा असे दोन समाज व त्यांची मंदिरे आहेत. साधारण पक्षाचे अध्यक्ष स्वतः दिवाण रायबहादूर कालिकादास दत्त होत. त्यांचे विचार पूर्णपणे उदार आहेत, पण त्यांची व्यवहारकुशलता त्याहूनही परिपूर्ण असल्यामुळे ते केवळ अध्यक्ष होण्यापुरते हितचिंतक आहेत. हा साधारण ब्राह्मसमाज विजयकृष्ण गोस्वामी यांनी १८८४ साली स्थापन केला. १८९७ सालच्या भूकंपात पूर्वीचे मंदिर पडल्यामुळे त्याच्याच पायावर हल्लीचे (१९०५) मंदिर नुकतेच बांधले आहे.

१८७८ साली केशवचंद्र सेन यांच्या ज्येष्ठ कन्येचा विवाह कुचबिहारचे राजे सर नृपेंद्रनारायण भूपबहादूर यांच्याशी झाला. राजेसाहेब आणि राणीसाहेब यांना आपल्या नवविधान पक्षाचा निराळा समाज पाहिजे होता, म्हणून १५ ऑगस्ट, १८८६ रोजी येथील नवविधान समाज स्थापण्यात आला. त्यापूर्वी म्हणजे १८८४ सालीच केशवचंद्र सेन वारले होते. विवाहाचे वेळी केशवचंद्रांच्या कन्येचे वय १४ वर्षाहून कमी होते, म्हणून ब्राह्मसमाजात दुफळी झाली हे सर्वश्रुतच आहे. हल्ली या समाजाचे प्रमुख स्वतः राजेसाहेब आहेत ; पण सर्व व्यवस्था राणीसाहेबांचे हातूनच होत असते. राजाचे कुटुंब धरून समाजात एकंदर ११ अनुष्ठानिक कुटुंबे आहेत. त्यात एकंदर ७० मुलेमाणसे आहेत. शिवाय ४० हितचिंतक आहेत. समाजाच्या खर्चाकरिता सालिना ५००० रू. ची नेमणूक आहे. एक कायमचा मिशनरी व गायक यांचा खर्च त्यातूनच होत असतो. अर्थातच समाजाचे एक सुंदरसे मंदिर आहे.

तिन्ही बाजूंनी हिचा प्रवास असल्याने हा गाव तिने खाकेत कवटाळून धरल्यासारखा दिसतो. महासागरात पाहून ईश्वराच्या अनंत स्वरूपाची व गंभीरतेची थोडी कल्पना येते खरी; पण अशा महानदीच्या विभूती पाहिल्याशिवाय ईश्वराचे कार्य व संसाराची प्रगती याविषयीची प्रत्यक्षता ध्यानात येण्यासारखी नाही. अस्तमान झपाट्याने होऊ लागला. सर्व दृश्य जगावर रात्रीचा अभेद्य पडदा पडू लागला. मातीच्या डोळ्याला जसजसे कमी दिसू लागले तसतसे स्मृतीच्या डोळ्यास अधिकाधिक दूरदूरचा प्रदेश दिसू लागला. किती देश, किती भाषा! किती जाती, किती रीती! पण सद्धर्माची किंचित आंच लागल्याबरोबर हे सर्व भेद विरघळून जाऊन एकत्र प्रेमरस कसा पाझरतो! धर्माची पताका धारण करून निघालो म्हणजे किती पाहुणचार! किती आदर! किती कळकळ! ही जणु आपला शोध काढीत येतात आणि मग आलेल्या वाटेने आपल्या मागे हे प्रेमसुताचे जाळे किती फैलावलेले दिसते! तशीच पुढील खाचखळग्यांची दिसणारी वाट जसजशी पायाखाली येते तसतशी कशी सपाट होते--आजच्या चिंताच उद्याच्या आनंदास कशा कारणीभूत होतात--काल भोगलेले क्षणिक शारीरिक कष्ट आज कसे अक्षय्य मानसिक सुख देतात--या प्रकारे आतील मानससरोवरातून निघणाऱ्या या स्मृतिनदाचे सुखदायी तरंग बाहेरील ब्रह्मपुत्रा दिसेनाशी झाली तरी एकावर एक स्वप्नवेगाने सुटू लागले असता वरील धन्यतेचे उद्‌गार माझे तोंडून निघाले यात काय नवल!

हा गाव लहान व येथील समाजही अगदीच लहान होता. तरी समाजातील मंडळीची जूट व एकमेकांविषयीची कळकळ पाहून संतोष झाला. विशेषकरून स्त्रियांमध्ये उपासनेविषयी अत्यंत आतुरता दिसली. त्याच रात्री मी घरी परत येऊन पोशाख बदलून प्रार्थनेला गेलो तो स्त्रिया आधीच येऊन पडद्याआड बसल्या होत्या. बहुतेक सर्व उपासना त्यांच्यासाठी हिंदी भाषेत करणे भाग पडले. दुसरे दिवशी सायंकाळी समाजात Some Ideals for Modern India ह्यावर माझे इंग्रजीत व्याख्यान झाले. तारीख १७ रोजी सकाळी तरुणांसाठी शाळेत व्याख्यान झाले. तारीख १७ रोजी तेथून निघून नदीवरून आगबोटीने जगन्नाथगंज येथे गेलो. तारीख १८ रोजी मैमनसिंग येथे पोचलो.

मैमनसिंग : येथे दोन्ही पक्षांचे दोन समाज आहेत. बाबू ईशानचंद्र विश्वास हे गृहस्थ कलकत्त्याहून येथे येऊन त्यांनी १८५५ चे सुमारास ब्राह्मसमाजाची स्थापना केली. नंतर डॉ. जगदीशचंद्र बोस यांचे वडील भगवानचंद्र येथे आल्यापासून ह्या समाजाची भरभराट झाली. तथापि गावात ह्यांना फार हाल काढावे लागले सबंध गाव येथील जमीनदाराचे ताब्यात असल्यामुळे आणि तो विरूद्ध असल्याने मंदिराकरिता जागाच मिळेना. प्रथम मंदिर १८६७ मध्ये बांधले; पण ते १८८६ च्या भूकंपात पडले, म्हणून पुन्हा बांधण्यात आले. ह्यापूर्वीच कुचबिहारच्या लग्नामुळे झालेल्या दुफळीमुळे ह्या समाजमंदिराच्या मालकीसंबंधी तंटा होऊन विघ्ने उपस्थित झाली. १८९७ सालच्या भूकंपात हे मंदिरही पडले. ह्याच भूकंपात पूर्वी ज्या जमीनदाराने विरोध केला त्याचाही वाडा जमीनदोस्त झाला. हल्ली (१९०५) जे मंदिर बांधले आहे त्याचे उंच व नकशीचे भारी दरवाजे, तुळ्या व इतर संगमरवरी दगडाचे सामान ज्याच्याकडून पूर्वी जागाही मिळाली नाही त्याच जमीनदाराकडून मिळाले आहे. समाजाला त्याची बरीच सहानुभूती आहे. नवविधान समाजात

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

वेळी काही कारणांवरून पंजाबातील आर्य समाजावर पतियाळाच्या संस्थानधिपतीचा फार रोष झाला होता. लाला मुन्शीराम, स्वामी श्रद्धानंद यांचेवर ह्या रोषाचा घाला पडला होता. पतियाळाच्या आर्यसमाजमंदिराचे रूपांतर संस्थानच्या घोडशाळेत करण्यात आले होते. लालाजीना आम्ही भेटण्यास गेलो, तेव्हा ते खिन्न मुद्रेने पण उदात्त वृत्तीने या शाळेत बसलेले दिसले. सौ. हेमंतकुमारी चौधरी ह्या ब्राह्मभगिनीकडे आम्ही एक दिवस उतरलो. उपासना वगैरे आटोपून आम्ही निघालो. परत येतांना अजमीरजवळील अबूच्या पहाडात आम्ही दोन दिवस धर्मचिंतनात घालविले. तेथील सुप्रसिद्ध जैनमंदिर, दिलवारा आणि प्रेक्षणीय स्थळे पाहिली. ह्या मंदिराचे सर्व काम संगमरवरी दगडाचे असून तेथे कलाकुसरीची इतकी कमाल झाली आहे की, तशी सुबकता व नाजुकता जगात इतरत्र क्वचितच आढळेल. मोगलांच्या तडाक्यातून हे रत्न कसे वाचले याचे आम्हाला मोठे आश्चर्य वाटले. हे स्थळ इतके अपूर्व असून त्या मानाने त्याची प्रसिद्धी का नाही याचे अधिक आश्चर्य वाटले. कदाचित अप्रसिद्धपणामुळेच हे स्थळ सुरक्षित राहिले असेल अशी भोळी समजूत आम्ही करून घेतली.

मातोश्रीचा अंत : ह्या प्रवासास निघण्यापूर्वी माझी वृद्ध मातोश्री कॅन्सरच्या व्यथेने अत्यवस्थ होती. तिला सोडून मला प्रवासास निघवेना आणि गेल्याशिवाय राहवेना असा पेच पडला; पण मातोश्रींनी मला धीर दिला. त्यांनी मला जावयास अनुज्ञा दिली आणि "तू परत येईपर्यंत मी तुला सोडून जात नाही" असे आश्वासनही दिले. हा जुन्या माणसांचा करारीपणा! मी परत आल्यावर तारीख ८ फेब्रुवारी, १९१० रोजी माझ्या प्रेमळ मातोश्री सुमारे ७० वर्षाच्या होऊन निवर्तल्या.

ह्या परिषदेचा अहवाल प्रसिद्ध करताना मुंबईतील सुबोधपत्रिकेत खालील अर्थाचा मजकूर आहे :--

परिषदेचे जनरल सेक्रेटरी रा. वि. रा. शिंदे यांनी परिषदेपुढे आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगिलते की, १९०३ साली भरलेल्या मद्रासच्या बैठकीत या परिषदेची मंदावलेली स्थिती पाहून १९०४ साली मुंबईच्या बैठकीत हिची पुनर्घटना करण्यात आली. तेव्हापासून मुंबई, काशी, कलकत्ता, सुरत, मद्रास आणि लाहोर या सहा ठिकाणी परिषद भरल्यामुळे तिची भरतखंडात एक फेरी संपूर्ण झाली असून तिच्या विकासाचा एक टप्पा संपला आहे. म्हणजे ब्राह्मसमाजाच्या सामान्य गरजा निरनिराळ्या प्रांतिक पुढाऱ्यांच्या द्वारे एकमेकास कळून चुकल्या आहेत. ह्यापुढे ह्या परिषदेची अधिक पद्धतशीर घटना व्हावी, मध्यवर्ती कचेरी, निधी आणि वाहून घेतलेले कार्यवाहक नेमून त्यांच्या द्वारे वेळोवेळी करण्यात आलेल्या ठरावांची अंमलबजावणी व्हावी, अशी कळकळीची विनंती रा. शिंदे यांनी केली. ह्यावर पुढे दोन तास कडाक्याचा वाद होऊन शेवटी परिषदेला अद्याप अशी घटनेची वेळ आली नाही, असे बहुमताने ठरले. या निराशेचे कारण कलकत्त्यातील ब्राह्मसमाजाच्या शाखांची मने अद्यापि परस्परांविषयी कलुषित राहिल्यामुळे एकत्र कार्य करणे अशक्य होते.

अलाहाबाद : १९१० साली ही परिषद अलाहाबाद येथे भरली. तेथे पूर्वी एक ब्राह्मसमाज होता ; पण अलीकडे तो बंद पडला होता. लाहोरचे अविनाशचंद्र मुझुमदार या प्रांतातील माहितगार

एकमत झाले कारण ठरावच तसा मोघम होता. हेमचंद्र सरकारने ठराव आणला की, सन १८७२ चा तिसरा कायदा मिश्रविवाहासंबंधी होता, तो सुधारावा. कलकत्त्यातील ब्राह्मसमाज कमिटीने या बाबतीत काय प्रयत्न केले ह्याची हकीकत त्यांनी सांगितली. ठराव एकमताने पास झाला. पुढील सालाकरिता वि. रा. शिंदे, बाबू अविनाशचंद्र मुझुमदार, विनयेंद्रनाथ सेन, व्यकंटरत्नम् नायडू, गुरुदास चक्रवर्ती आणि नृत्यगोपाळ राय ह्यांची स्टँडिंग कमिटी नेमण्यात आली. हेमचंद्र सरकार ह्यांना जनरल सेक्रेटरी नेमण्यात आले.

कलकत्ता : १९११ च्या नाताळात कलकत्त्यास सिटी कॉलेजमध्ये ही परिषद भरली. मंगळूर ब्राह्मसमाजाचे अध्यक्ष उल्लाल रघुनाथय्या यांना अध्यक्ष नेमण्यात आले. जर्मनीतील गॉटिंजन युनिव्हर्सिटीच प्रख्यात प्रोफेसर डॉ. रुडॉल्फ ऑटो हे परिषदेसाठी मुद्दाम आले होते. पहिली उपासना सत्येन्द्रनाथ टागोर यांनी संस्कृतमध्ये चालविली. स्वागतमंडळाचे अध्यक्ष प्रिन्सिपल हेरंबचंद्र मित्र यांनी भाषण करून स्वागत केले. निरनिराळ्या ठिकाणच्या अनेक प्रसिद्ध सभासदांनी महत्त्वाची भाषणे करून निबंध वाचले. बारा महत्त्वाचे ठराव पास झाले. तिसरा ठराव परिषदेच्या संघटनेबद्दल होता. मागल्या परिषदेतील मसुदा आणि समाजाच्या अभिप्रायाचा अहवाल वाचल्यावर अविनाशचंद्र मुझुमदारांनी तो ठराव पुढे मांडला. परिषदेच्या अध्यक्षाच्या नेमणुकीबद्दल एक जादा नियम घातला होता. तो हा की स्टँडिंग कमिटीने स्वागत कमिटीचा अभिप्राय घेऊन अध्यक्ष निवडावा व तो परिषदेच्या बैठकीत मंजूर व्हावा. हा ठराव पास झाला. कलकत्ता ही देशाची राजधानी आणि ब्राह्मसमाजाचे मुख्य केंद्र असल्याने हा सर्व समारंभ त्या मानाने थाटाचा झाला. नंतर एक सुंदर स्नेहसंमेलन मेरी कार्पेंटर हॉलमध्ये झाले. त्यात प्रोफेसर रुडॉल्फ ऑटो यांचे सहानुभूतिपर भाषण झाले.

बांकीपूर : १९१२ साली ही परिषद बांकीपूरला भरली. अध्यक्षस्थान सर नारायण चंदारवरकर यास देण्यात आले होते. या ठिकाणी कलकत्त्यातील दोन्ही शाखांचे (साधारण व नवविधान) ब्राह्मसमाज असल्याने आणि बाबू हेमचंद्र सरकार हे जनरल सेक्रेटरी असल्याने पूर्वतयारीचा त्रास पडला नाही. माझ्याबरोबर डि. क्ला. मिशनचे एक आस्थेवाईक कार्यकर्ते अमृतलाल ठक्कर हे बांकीपुरास आले होते. मिशनची एक जाहीर सभा झाली. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार आर. एन. मुधोळकर ह्यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले होते. अमृतलाल ठक्करनी माहितीचे आकडे वगैरेची जय्यत तयारी करून ही सभा यशस्वी रीतीने पार पडली. पुढील अधिवेशन कराची येथे ठरले. तेथे नवविधान पक्षाचा फार जोर असल्याने परिषदेचा जनरल सेक्रेटरी म्हणून मलाच नेमण्यात आले.

कराची : १९१३ साली नाताळात ही परिषद कराचीस नव्यानेच भरविण्यात आली. हैदराबाद समाजाचे अध्यक्ष दिवाण कौरामल वगैरे पुढाऱ्यांनी कराचीच्या सभासदांच्या मदतीने कराचीचा टाऊन हॉल 'खालिक्दिना हॉल' येथे परिषदेच्या जाहीर बैठकीची सोय केली होती. अमेरिकेचे जे. टी. संडरलंड हे या परिषदेसाठी मुद्दाम आले होते. त्यांनाच अध्यक्ष नेमण्यात आले. युनिटेरियन लोकांच्या नेतृत्वाखाली एक उदारधर्ममतवादी लोकांची जागतिक परिषद आजपर्यंत युरोपातील आणि अमेरिकेतील निरनिराळ्या ठिकाणी भरविण्यात येत असे. १९०३ साली ॲम्स्टरडॅम येथे

मदतीचे आश्वासन : कराची येथील काम आटोपल्यावर बडोद्याचे श्रीमंत सर सयाजीरावमहाराज गायकवाड यांची डॉ. संडरलंडशी समक्ष भेट करून देण्यासाठी महाराजांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीला आगाऊ भेटून तयारी केली. डॉ संडरलंड, त्यांची कन्या व मी महाराजांचे पाहुणे म्हणून बडोद्यास दोन तीन दिवस होती. अशा जागतिक परिषदेची महाराजांना हौस फार. त्यांची सहानुभूती आणि मदत मिळण्याची आम्हाला आशा होती. त्यांनी मदतीचे आश्वासन दिले. राजवाड्यात डॉ. संडरलंडचे एक व्याख्यान त्यांनी करविले. विषय 'इमर्सन' हा होता. व्याख्यान संपल्यावर लक्ष्मीविलास राजवाडा संपूर्णपणे फिरून दाखविण्यात आला. वाड्याचे एकंदर काम व मांडणी पाहून डॉ. साहेबांनी संतोष व्यक्त केला आणि जगातील उत्तमोत्तम वाड्यांमध्ये ह्याचा नंबर बराच वर येतो असा अभिप्राय दिला. हिंदुस्थानातील प्रमुख शहरी ह्या जागतिक परिषदेची ठरलेली योजना तेथील पुढाऱ्यांस समक्ष समजावून सांगून डॉक्टरमजकूर अमेरिकेस परत गेले.

महायुद्ध : लगेच मी ह्या नवीन कामास लागलो. एक जाहीर विनंतीचे लहानसे पुस्तक मी छापले आणि ते हिंदुस्थानातील युरोपातील आणि अमेरिकेतील परिचित गृहस्थांना पाठवून पत्रव्यवहार सुरू केला. बरीच समाधानकारक उत्तरे आली. युरोपातील त्या काळचे प्रसिद्ध व अग्रगण्य जर्मन तत्त्वज्ञानी प्रो. रुडॉल्फ ऑयकेन यांचे 'परिषदेस हजर राहून भाग घेतो' अशा आशयाचे पत्र आले. प्रोफेसर मजकूर पुढील वर्षी जपानला जाणार होते. म्हणून वाटेत हा कार्यभाग उरकून घेण्यास त्यांना कठीण पडणार नव्हते. पूर्वतयारीची ही धामधूम चालली असतांना विधिघटना निराळीच चालू होती. १९१४ च्या ऑगस्ट महिन्यात महायुद्ध अकस्मात सुरू झाले. त्यात ही परिषदच काय पण अनेक जागतिक महत्त्वाच्या गोष्टींची होळी झाली. महायुद्धाने सर्व जगाला 'त्राहि माम्' करून सोडले. मग पुढे भरणाऱ्या परिषदेची कथा काय! गेल्या दहा वर्षात अत्यंत श्रम करून ज्या एकेश्वरी धर्मपरिषदेला आम्ही नावारूपाला आणले होते तिचासुद्धा ह्या खाईत स्वाहा झाला.

प्रार्थनासमाजाचा प्रचारक या नात्याने माझा संबंध १९१० साली सुटला होता. पुढे तीन वर्षे डि. क्ला. मिशनच्या कामानिमित्त मध्यवर्ती शाखा मुंबईतच होती, म्हणून मला मुंबईलाच राहावे लागले; पण मिशनची वाढ कल्पनेबाहेर वाढू लागली. म्हणून माझे मुख्य ठिकाण मुंबई हे सोडून पुणे करावे लागले.

●●●

९

ब्राह्मधर्मसूची ग्रंथ

या विषयाची रजा घेण्यापूर्वी या परिषदेच्या कामातूनच निघालेल्या Theistic Directory ऊर्फ ब्राह्मधर्मसूची ग्रंथ ह्याविषयी थोडी माहिती देऊन हा भाग पुरा करू. भारतातील निरनिराळ्या ब्राह्मसमाजाच्या कार्याची आणि प्रगतीची माहिती जमा करून सालोसाल प्रसिद्ध करण्याचे काम कलकत्त्याचे भाई प्रतापचंद्र मुझुमदार यांनी प्रथम १८७२ च्या सुमारास सुरू केले आणि Theistic Anuual या नावाखाली १८७९ पर्यंत चालू ठेवले. पुढील वर्षी एका त्रैमासिकाच्या रूपाने त्यांनी हेच काम चालविले. पुढे मिस्. एस. डी. कॉलेट ह्या उत्साही इंग्रज स्त्रीने १८७६-८७ पर्यंत Bramho Year Book या नावाने हेच काम अधिक पद्धतशीर चालविले.

प्रकाशन : त्यापुढे १८८८ साली ब्राह्मपरिषदेचे काम सुरू झाले. १९०५ साली काशीच्या परिषदेत या सूचीग्रंथाच्या कामासाठी मी पुन्हा उचल केली. परिषदेकडून मी एकमताने ठराव पास करून घेतला व समक्ष माहिती करून घेण्यास बंगालची सफर काढली. जाहीर सर्क्युलर काढून व खासगी पत्रव्यवहार करून कित्येक वर्षे प्रयत्न करूनही समाधानकारक माहिती मिळेना, म्हणून हा प्रयत्न मला दोनदा सोडून द्यावा लागला. शेवटी १९१२ साली मी हा प्रयत्न पुन्हा केला. ज्या अर्थी निरनिराळ्या स्थानिक ब्राह्मसमाजांच्या इतिहासाची मनोवेधक माहिती मला आधीच मिळाली होती व ती मी छापूनही काढली होती त्या अर्थी हे काम असे अर्धवट टाकणे मला पसंत पडले नाही. भारताच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यांतील कार्यवाहकांना मिळालेले अपयश देखील उद्बोधक होते. ही माहिती ठिकठिकाणच्या प्रत्यक्ष कार्य करणाऱ्यांनी आणि डोळ्यांपुढे घडलेल्या गोष्टीची साक्ष देणारांनी लिहून पाठविली होती. समुद्रापलीकडील इतर देशातील उदारधर्माची चळवळ करणारांनी आपापल्या माहितीची आणि संदेशांचीही यात भर टाकली म्हणून मी हे अत्यंत परिश्रमाने तयार केलेले सुमारे ३७५ पानांचे इंग्रजी पुस्तक १९१२ च्या डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध केले. ह्याला सर नारायण चंदावरकरांनी आपली सुंदर प्रस्तावना जोडली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "भरतखंडात ब्राह्म आणि प्रार्थनासमाजांनी चालविलेल्या एकेश्वरी धर्माची एकत्रित माहिती ह्या समाजाच्या सभासदांना व हितचिंतकांनाच नव्हे तर ज्या कोणाला ह्या चळवळीकडे चिकित्सक दृष्टीने पाहावयाचे असेल तर अशा बाहेरच्यांना देखील ही माहिती अत्यंत उपयोगी ठरेल. आधुनिक सुशिक्षित हिंदुलोक धर्माचे बाबतीत अत्यंत उदासीन आहेत, असा आक्षेप वरचेवर करण्यात येतो; पण तो सर्वाशी खरा नाही. हिंदुमहामंडळ, आर्यसमाज, थिऑसफी आणि इतर धर्माच्या चळवळी यांचे कोणी निरीक्षण केल्यास नवीन चैतन्याची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. आधुनिक विचारी जगात दोन भिन्न प्रमुख शक्तीचे कार्य चालू आहे. एक धर्मकारण व दुसरे

अर्थकारण. ह्या दोन शक्ती सर्व सुधारलेल्या जगास हालवून सोडीत आहेत. नुसत्या अर्थाच्या मागे लागलेला मनुष्य अथवा संस्था असणे शक्य नाही. जसजशी श्रीमंती वाढते तसतसा कंगालपणाही त्याचबरोबर वाढतो आणि त्याच्या मागोमाग युद्ध हे ठेवलेलेच! दुसरे सत्य हे की, मतमतांतरांचा गलबला चालला असता त्यातूनच एक मूलभूत सामान्य तत्त्व बाहेर डोकावते. बंगाल्याकडील राममोहन राय, महर्षी देवेंद्रनाथ, ब्रह्मानंद केशवचंद्र आणि आमचेकडील सर रामकृष्णपंत भांडारकर यांनी या सामान्य तत्त्वाचा स्वीकार केला असून त्याचा पुकारा ते आधुनिक जगास करीत आहेत. त्यांची जबाबदारी किती मोठी आहे हे हा सूचीग्रंथ दाखवीत आहे. ह्या ग्रंथांत वर्णिलेली परिस्थिती वाचून नेहमी आनंदच होईल असे नाही. तथापि ब्राह्मधर्माचा प्रचार अधिक नेटाने करणे कसे अवश्य आहे हे पटले आणि ब्राह्मधर्मानुयायी होणे हे सुखातले मोठे सुख आणि भाग्यातले मोठे भाग्य आहे याची खात्री पटते."

माझे मित्र द्वा. गो. वैद्य व वामनराव सोहनी यांनी या पुस्तकप्रकाशनाच्या कामी फार मदत केली. या पुस्तकाचे दोन निराळे भाग असून पहिल्या भागात जगातील उदारधर्माच्या निरनिराळ्या पंथाचे कार्य, परोपकारी प्रयत्न व त्या त्या चालकाकडून लिहून आलेल्या निबंधाचा समावेश करण्यात आला आहे. अशा चालकांकडून जी माहिती मिळाली नाही अशी प्रकरणे मी स्वतःच लिहून काढली आहेत. पश्चिम हिंदुस्थानातील प्रार्थनासमाजाची चळवळ, एकेश्वरी धर्मपरिषद, भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी, इराणातील बहाई धर्माची चळवळ, युरोपातील व अमेरिकेतील युनिटेरियन आणि युनिव्हर्स्यालिस्ट समाज ही प्रकरणे माझीच आहेत. बंगाल्यांतील ब्राह्मसमाज ह्यावरील लेख प्रसिद्ध पं. शिवनाथशास्त्री यांनी स्वतः लिहिला आहे. मँचेस्टर कॉलेजातील माझे सहाध्यायी झेनो सूके टोया साकी यांनी जपानमधील उदारधर्म हे प्रकरण तयार केले आहे. दुसऱ्या भागात बंगाल, बिहार आणि ओरिसा ह्या प्रांतातील १०१ ब्राह्मसमाज, मद्रास प्रांतातील ३२ ब्राह्मसमाज, मुंबई प्रांतातील १६ प्रार्थनासमाज, पंजाब आणि संयुक्त प्रांतातील १८ ब्राह्मसमाज आणि लंडन येथील रे. चार्ल्स व्हायसे यांचे Theistic Church अशा एकूण १६८ संस्थांची तपशीलवार माहिती आणि सविस्तर इतिहास आला आहे. सेक्रेटरीचे नाव आणि पत्ता, सभासदांची संख्या, अनुष्ठानिक किती व इतर किती याचा निर्देश, हितचिंतकांची संख्या आठवड्यातून सभा किती वेळा भरते, पोटसंस्थांचा तपशील, स्वतंत्र मंदिर आहे की नाही, वर्तमानपत्रे, मासिके कोणती आहेत, प्रचाराची तजवीज काय वगैरे सर्व माहिती अत्यंत कसोशीने गोळा केलेली आहे. एकंदरीत हे पुस्तक प्रचाराचे काम करणारासच नव्हे तर इतर जिज्ञासूंना देखील एक अमोलिक ठेवाच वाटण्यासारखे आहे.

पुस्तकाचा छपाईखर्च, माझ्या प्रवासाचा आणि पत्रव्यवहाराचा खर्च अनुक्रमे ब्राह्मो पोस्टल मिशन व बनारस येथील परिषदेच्या शिलकेतून भागविण्यात आला. कोणत्याही स्थानिक समाजावर ह्याचा बोजा पडलेला नाही. नुसती माहिती पुरविण्यास ज्यांनी विलंब केला किंवा मुळीच दिली नाही अशांकडून पैशाची मदत कोण अपेक्षील? ही पुस्तके ब्राह्मधर्मप्रचारकांना फुकट वाटण्यात येतील, टपालहशील देखील पडणार नाही. फक्त त्यांनी मागणी करावी, असे वेळोवेळी जाहीर करूनही कोणा एकाकडून मागणी देखील आली नाही. हा अव्यवहारीपणा पाहून आश्चर्याचा मोठा धक्का

१०

विविध प्रयत्न

नागपूरच्या सरकारी कॉलेजचे प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी यांनी आपल्या नवभारत ग्रंथमालेतर्फे माझे 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक इ. स. १९३३ साली प्रसिद्ध केले आहे. त्यात मी या प्रश्नाचा प्राचीन कालापासून सविस्तर व सांगोपांग विचार केला आहे. ह्याचा परामर्ष पुढे योग्य स्थळी घेणे बरे पडेल. तूर्त अस्पृश्यतानिवारणासंबंधी डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे काम सुरू होण्यापूर्वी गेल्या शतकाच्या मध्यापासून जे प्रयत्न झाले आहेत. त्याचा जरुरीपुरता निर्देश करणे बरे. याविषयी रा. श्री. व्यं. केतकरकृत 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' या पुस्तकात १९२४ साली माझा सविस्तर लेख प्रसिद्ध झाला आहे.

पूर्वेतिहास : या जागतिक प्रश्नाच्या उत्पतीविषयी मी 'ज्ञानकोशा' च्या लेखाच्या आरंभी म्हटले आहे की, अस्पृश्यतेचा इतिहास निदान हिंदुस्थानात तरी आर्य लोकांच्या आगमनाइतकाच जुना आहे. चांडाल हा शब्द वैदिक वाङ्मयात आणि बौद्ध वाङ्मयातून आढळतो. बुद्धाच्या वेळेच्या पूर्वीपासून तरी निदान चांडाल आणि इतर राष्ट्रे अस्पृश्य गणली जात होती, असे उल्लेख आढळतात. इराणातील झरतुष्ट्रपंथी आर्य व हिंदुस्थानातील देवयज्ञी आर्य यांना अस्पृश्य आणि तिरस्करणीय समजत असत, असे पारश्यांच्या जुन्या व अर्वाचीन ग्रंथात पुरावे मिळतात. आर्यांचा हिंदुस्थानात कायमचा जम बसल्यावर त्यांनी येथील दस्यु ऊर्फ शूद्र नावाच्या जित लोकांना आपल्या वस्तीजवळच, पण बाहेर राहावयास लावले. त्यांच्या व आपल्या संस्कृतीत भेसळ होऊ नये म्हणून त्यांनी त्यांना अस्पृश्य ठरविले. ज्या अर्थी जपानात हैटा व हीना नावाच्या अस्पृश्य जाती अद्यापि आहेत त्या अर्थी अस्पृश्य जात ही संस्था आर्यानीच निर्माण केली नसून तिचा प्रादुर्भाव पूर्वी मोगल लोकांतही होता हे सिद्ध होते. हैटा किंवा ऐटा ही जात फिलिपाइन बेटातून जपानात गेली असावी. अथ्रवण (ब्राह्मण), रथेष्ट्र (राजन्य), वस्ट्रय (वैश्य) आणि हुइटि (शुद्र) असे झरतुष्ट्राच्या वेळी इराणात चार भेद होते. वेदांत शूद्र हा भेद फारसा आढळत नाही, पण महाभारतात अभीर आणि शूद्र यांचा उल्लेख असून सिंधु नदीच्या मुखाजवळील भागात त्यांची वस्ती असावी असे दिसते. ऋग्वेदात पुरुषसूक्तात शूद्र शब्द आला आहे व शुल्क यजुर्वेदात आठ वेळा हा शब्द आला आहे. Castes of India ह्या पुस्तकात विल्सनने म्हटले आहे की, कंदाहार प्रांतात शूद्रोई नावाचे प्राचीन राष्ट्र होते आणि सिंधु नदीवर शूद्रोस नावाचे शहर होते. इराणातील हुइटी अथवा शूद्रोई आणि फिलिपाइन बेटातील हैटा या जातीचा संबंध असल्याचे सिद्ध करता आल्यास अस्पृश्यतेच्या प्राचीन उत्पत्तीवर आणि प्रसारावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे. इंग्रजी शिक्षणामुळे हिंदुस्थानात जी आधुनिक सुधारेची प्रवृत्ती झाली तिच्यामुळे अस्पृश्यतेच्या निवारणार्थ जे ठिकठिकाणी प्रयत्न झाले त्यांचा आता विचार करू.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भरून राममोहन आश्रमात श्रीमंत महाराजांनी प्रीतिभोजनात भाग घेऊन आमच्याशी सहकार्य केले. या परिषदेचा महाराष्ट्रावर व विशेषतः पुण्यातील कार्यकारी पुढाऱ्यांवर जसा शुभ परिणाम झाला तसाच महाराजांच्या उत्साहशक्तीवरही झालेला दिसतो. लगेच दोनतीन वर्षात पुणे-मुंबई येथे सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सर्व्हिस लीग, सेवासदन, डि. क्ला. मिशनसारख्या अखिल हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनावर परिणाम करणाऱ्या संस्थांचा उद्‌भव झाला. उलटपक्षी याच सुमारास श्रीमंत महाराजांनीही आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करून राष्ट्रीय शिक्षणाचा धडा इतर लहान-मोठ्या संस्थानांसच नव्हे तर प्रत्यक्ष इंग्रज सरकारासही घालून दिला. बडोद्याच्या इतिहासात हे साल सोन्याच्या अक्षरात लिहिले जाईल. बडोद्यात सक्तीच्या शिक्षणाचे प्रस्थान मांडल्यावर उसळीसरशी अंत्यज शाळांची संख्या १८ ची २४७ आणि विद्यार्थ्यांची संख्या ५००० ची ९२६९ झाली. बंद केलेल्या वसतिगृहांची पुन्हा गरज भासू लागली. लौकरच अंत्यजांच्या सुदैवाने आर्यसमाजी पं. आत्माराम ह्या तरबेज आणि स्वतःस वाहून घेतलेल्या कार्यवाहकाची जोड मिळाली. १९०७-८ च्या सुमारास हल्लीचे नावाजलेले बडोद्याचे अंत्यज विद्यार्थी वसतिगृह उघडण्यात आले. पंडितजींना त्यांचे सुपरिटेंडेंट व बडोदे राज्यातील अंत्यजांच्या शिक्षणाचे इन्स्पेक्टर नेमण्यात आले. ह्याच सुमारास महाराजांनी मला बडोद्यास पुन्हा बोलविले. न्यायमंदिराच्या भव्य दिवाणखान्यात एक जंगी दरबारवजा जाहीर सभा बोलावून महाराजांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली माझे 'अस्पृश्योद्धार' ह्या विषयावर व्याख्यान करविले. हेच व्याख्यान मला पुढे लिहून काढावयास सांगून 'बहिष्कृत भारत' या नावाने ते प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या १०० प्रती बडोदे दरबारने विकत घेतल्या. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम बडोद्याच्या कार्यावर होऊन पंडित आत्मारामांच्या देखरेखीखाली त्याला मोठा जोर आला.

डॉ. आंबेडकर ह्या अस्पृश्यवर्गाच्या प्रसिद्ध पुढाऱ्याला महाराजांचा मोठा आश्रय होता. बडोदा कॉलेजातून ते बी. ए. झाल्यावर महाराजांनी त्यांना अमेरिकेत दरबारच्या खर्चाने कित्येक वर्षे ठेवून पीएच. डी. करवून आणले. बडोदे शहरातील चार वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देऊनच न थांबता त्याच्या धार्मिक शिक्षणाचीही उत्तम सोय करण्यात आली आहे. गुजराथेतील अंत्यजवर्ग आपापली धार्मिक गृहकृत्ये आपल्याच जातीच्या पुरोहिताकडून करवून घेत असतात. त्यांना गरोडा म्हणतात. या गरोड्यांकडून धर्मकृत्ये योग्य रीतीने व्हावीत म्हणून त्यांच्यासाठी एक संस्कृत शाळा काढण्यात आली आणि त्यात २५ गरोडा विद्यार्थ्यांना दरमहा ८ रू. स्कॉलरशिप देऊन तयार करण्यात आले. वसतिगृहांतील सर्व विद्यार्थ्यांना वेदमंत्रासह नित्याची उपासना करण्यास शिकविण्यात येते. शिवाय त्यांची दोन बालवीरपथके आहेत.

खालील कोष्टकावरून बडोद्यातील अंत्यज शाळांची कशी प्रगती झाली हे दिसून येईल.

वर्ष	मुलांच्या शाळा	मुलींच्या शाळा	एकंदर शाळा	विद्यार्थी
१८८३	..	..	२	..
१८८४	..	..	९	..
१८९१	..	..	१०	७८४
१९००	..	..	२२	१,७२६

सुमारास मी मंगळुरास ब्राह्मसमाजाच्या कामासाठी गेलो तेव्हा मी ही संस्था आमच्या भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीत शाखा म्हणून संलग्न करून घेतली. तेव्हापासून पुढे हिची बरीच भरभराट आणि प्रसिद्धी झाली.

ब्रिटिश सरकार आणि ख्रिस्ती मिशने : यांनी अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी जे काही प्रयत्न केले ते प्रसिद्धच आहेत. यांच्या मार्गात अडथळा काय तो नोकरशाहीची नवाबी पद्धती आणि मिशन-यांचे धर्मांतराचे वेड एवढाच होता. बाकी साधने भरपूर होती. हे अडथळे नसते, तर त्यांच्या हातून हा अस्पृश्यतेचा प्रश्न लवकर सुटला असता. मद्रासकडील ख्रिस्ती मिशन-यांच्या-विशेषत: रोमन कॅथॉलिक पंथाच्या पद्धतीत तर उघड उघड अक्षम्य दोष मला दिसले ते हे की जातिभेदाचे निर्मूलन करण्याचे त्याचे धर्मात सांगितले असूनही केवळ आपली संख्या वाढवावी ह्या कावेबाज हेतूने अस्पृश्य लोकांना ख्रिश्चन धर्मात घेऊन पुन्हा त्यांना अतिनीच अवस्थेतच ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना हिंदुधर्मास पारखे होऊन शिवाय जातिभेदाचे व अस्पृश्यतेचे असह्य जुलूम सोसावे लागतात. ब्राह्मण-ख्रिस्ती लोकांशी त्यांना मिसळून वागता येत नाही. उपासनेसाठी ख्रिस्ती देवळात जाण्यास त्यांना मज्जाव आहे. मेरी माता, ख्रिस्त इत्यादी मूर्तींची पूजा अस्पृश्यवाड्यात सर्रास चालू आहे. त्याचे पुरावे मी स्वत: दक्षिण देशी त्रिचनापल्ली वगैरे ठिकाणी हिंडत असताना पाहिले. ख्रिस्ती लोकांत हल्ली जी राष्ट्रीय चळवळ चालू आहे, ती कायम राहिली आणि हिंदुमहासभेसारखी चळवळ शब्दांपालीकडे जाऊन कृतीत उरली, तर लवकरच हे ख्रिस्ती अस्पृश्य पुन्हा धर्मांतर करून हिंदुधर्मात येतील असे वाटते.

इंग्रज सरकारने सक्तीचे शिक्षण देऊन शिकलेल्यांना मोठमोठ्या जागा देऊन ह्या लोकांना वर आणण्यात आजवर जी अक्षम्य ढिलाई केली आहे, ती केली नसती तर अस्पृश्यतेला ताबडतोब ओहोटी लागली असती. तथापि, अशा बाबतीत परकीय नोकरशाही आणि परधर्मी कावेबाजी यांना पोकळ नावे ठेवण्यापेक्षा सर्व दोष स्वकीयांनीच पत्करावा हे योग्य आहे.

आर्यसमाज, ब्राह्मसमाज, हिंदुसमाज ह्यातील कित्येक उदार गृहस्थांनी अस्पृश्यतानिवारणाच्या लहानमोठ्या बऱ्याच संस्था काढून ह्या कामी पुष्कळ स्तुत्य प्रयत्न केले. म्हैसूर, निजाम, हैद्राबाद, इंदोर वगैरे मोठमोठ्या संस्थानांनी आपल्या विद्याखात्यामार्फत अस्पृश्यवर्गाची शिक्षणविषयक तरतूद पुष्कळ केली. पण हे सर्व प्रयत्न भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे कामाचा बोलबाला झाल्यानंतर जी सहानुभूतीची व जागृतीची लाट देशावर पसरली तिच्यामुळे झाले.

येथवर अस्पृश्यासाठी स्पृश्यांनी ज्या चळवळी केल्या त्यांच्याच उल्लेख आला आहे. पण त्या बाबतीत स्वत: अस्पृश्यांनीसुद्धा आत्मोद्धाराची चळवळ केली आहे. पूर्वी ब्रिटिश सरकारच्या सैन्यांत अस्पृश्य लोकांची भरती होत असे. ती पुढे बंद झाली. सुमारे १८९०-९१ पासून महार-चांभारादी अस्पृश्यांची नवीन भरती बंद झाली. नंतर पूर्वीच्यांनाही रजा मिळू लागली. ह्याविषयी दाद लावून घेण्याचे पहिले प्रयत्न महाड तालुक्यातील रानडुल गावचे पेन्शनर हवालदार गोपाळनाक विठ्ठलनाक वलंगकर नावाच्या वृद्ध गृहस्थाने मोठ्या चिकाटीने केले. महात्मा जोतिबा फुले, बाबा पदमजी यासारख्यांची ह्यांना शिकवण व मदत होती. सन १८९५ साली पुण्यास

११

भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळाची स्थापना

पूर्वतयारी : अमावस्येची काळोखी रात्र. १९०५ सालचे उन्हाळ्यातले दिवस. अहमदनगरच्या समाजाच्या उत्सवासाठी मी तेथे गेलो होतो. नेहमीची दगदगीची कामे करून मी नुकतेच कोठे जमिनीला अंग टेकले होते. अवचित अस्पृश्यवर्गाचे एक शिष्टमंडळ रात्री १२ वाजता मला भेटण्यास आले. भिंगार म्हणून अहमदनगराहून चार मैलांवर एक खेडेगाव आहे. तेथील स्थानिक अस्पृश्यांनी अशावेळी एक मोठी जाहीर सभा बोलावली होती. तिचे अध्यक्षस्थान स्वीकारून मी चार शब्द सांगावे म्हणून आमंत्रण करण्यासाठी हे शिष्टमंडळ अपरात्री आले होते. नित्याप्रमाणे माझे बरोबर स्वामी स्वात्मानंद हेही होते. मी त्यांना म्हणालो, "चला स्वामीजी, जाऊ या." "काय हो, कोण हे लोक ? काय ही सभा! आगाऊ तपास केल्याखेरीज एकाएकी कसे जावयाचे?" स्वामीजी किंचित् त्रासून उद्‌गारले. "स्वामीजी, सत्कार्याला काळ वेळ, मुहूर्त लागत नाही. तुमच्या शंकेला उत्तर सभेच्या ठिकाणी गेल्याशिवाय मिळणार नाही. भलताच काही प्रकार घडला, तर तुमच्या हातात दंडा आहेच. आणखी मग काय पाहिजे?"

स्वामीजींना चेव आला. "बेशक चलीये!" म्हणून ते टांग्यात बसले. गावाच्या हद्दीवर महारवाड्यात उतरलो. मोठमोठे हिल्लाळ पेटलेले होते. लहानथोर, बायकामुले गजबजलेली सभा वाट पहात बसली होती. आम्ही गेल्याबरोबर टाळ्यांच्या प्रचंड गजरात स्वागत झाले. खेडेगावातल्या मागासलेला समाजाचा एवढा जमाव जमलेला पाहून स्वामीजी आश्चर्य पावले. "ही सभा अशावेळी का बोलाविली?" असे स्वामिजीनी चालकांना विचारले. "साहेब, आम्ही गरीब लोक. दिवसभर कष्टात राबावे लागते. आम्हाला हिच्याशिवाय दुसरी वेळ कोणती? तशात आम्ही सर्व चालकमंडळी शेजारच्या जिल्ह्याच्या गावच्या परकीय साहेबांच्या घरगुती कामात गुंतलेलो. आम्हाला या वेळेपूर्वी हूं की चूं करण्यास वेळ मिळत नाही. आपल्यास तसदी दिली याची माफी असावी." माझ्या अंत:करणात चक्क उजेड पडला. ह्या लोकांची हजारो वर्षाची कहाणी अभ्यासून माझे मन हळुवार झाले होते. अधिक खुलासा नको होता. स्वामीजींच्याही सर्व शंका तत्काळ मिटल्या. कामास सुरूवात झाली.

किसन फागू बंदसोडे आणि वऱ्हाड-नागपूरकडील इतर अस्पृश्य पुढारी यांनी सोमवंशी हितचिंतक समाज ही संस्था त्या प्रांती काढली होती. त्यांच्या सूचनेवरून अहमदनगर येथील अस्पृश्यांचे पुढारी श्रीपतराव थोरात (बटलर), पांडुरंग लक्ष्मण डांगळे (हेडमास्तर), रावजी सदोबा गायकवाड (शिक्षक नगर म्युनिसीपालिटीची शाळा) वगैरेनी ही सभा बोलविली होती. ह्या मंडळीचे आत्मसुधारणेचे कामी पुण्यातील पुढारी शिवराम ज्ञानबा कांबळे यांच्या मदतीने ठिकठिकाणी चार

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

निराश्रितांना सदनात आणीत व शिवण्याचा वर्ग आणि बायकांचा वर्ग चालवीत. तरुण गृहस्थ सर्व संस्थांची देखरेख करीत. परळ शाळेतील सुमारे १२ विद्यार्थ्यांच्या जेवण्याखाण्याची सोय सदनांतील वसतिगृहात केली जाई.

१०. Purity Servant या नावाचे इंग्रजी मासिक दर महिन्याच्या तारीख १५ ला प्रसिद्ध होत असे. त्यात मद्यपाननिषेध व इतर सामाजिक विषयांवर लेख येत आणि मिशनची सर्व बातमी प्रसिद्ध होई. ह्याचे संपादक श्री. वा. स. सोहोनी हे होते. ह्याशिवाय मुंबईबाहेर खालील शाखा होत्या.

१. पुणे – (१) दिवसाची शाळा, (२) रात्रीची शाळा, (३) भजनसमाज, (४) चर्चामंडळ. शाळांतील पटावरील संख्या, अनुक्रमे १४९, २५, ३३.

२. मनमाड – १ रात्रीची शाळा, ४५ विद्यार्थी.

३. इगतपुरी – १ दिवसाची शाळा, ६८ मुले. ही शाळा दोन महार तरुणांनी चालविली होती. शिवाय रविवारची धर्मशिक्षणाची शाळा व धर्मसमाज चालू होते.

४. इंदूर – १ रात्रीची शाळा, २० विद्यार्थी.

५. अकोला – २ रात्रीच्या शाळा, ७२ विद्यार्थी, १ भजनसमाज, १ विद्यार्थी वसतिगृह.

६. अमरावती – २ रात्रीच्या शाळा, ५३ विद्यार्थी.

७. दापोली -- १ दिवसाची शाळा, ३७ विद्यार्थी. ह्याशिवाय मुलांना विद्यार्थीवेतने मिळत.

८. मंगळूर – १ दिवसाची शाळा, ४९ विद्यार्थी, हातमागाचा विणण्याचा कारखाना. सर्व मुलांना दुपारचे जेवण मिळे. ७ मुले मोफत वसतिगृहात राहात.

९. मद्रास – १ पारिया जातीच्या अस्पृश्यांसाठी दिवसाची शाळा, २३ विद्यार्थी, १ चांभारांसाठी दिवसाची शाळा, विद्यार्थी २९.

१०. महाबळेश्वर – मे १९०९ मध्ये गव्हर्नरच्या बंगल्यावर लेडी म्यूर मॅकेंझी यांच्या आश्रयाखाली मिशनच्या हितचिंतकांची सभा भरली. सुपरिटेंडेंट मेजर जेम्सन हे अध्यक्ष होते. पूर्वी जमलेला ९०० रू. चा फंड मिशनला देण्यात आला आणि ही शाखा उघडली. दोरखंड तयार करणे, वेताचे विणकाम करणे वगैरे कामे होत.

११. नाशिक – १९०९ सप्टेंबरमध्ये जनरल सेक्रेटरी ह्या जिल्ह्यात दौऱ्यावर गेले असताना नाशिक येथे जाहीर सभा होऊन जिल्ह्याची कमिटी नेमण्यात आली. जिल्ह्याचे कलेक्टर मि. जॅक्सन ह्यांस अध्यक्ष नेमण्यात आले. येणेप्रमाणे तिसरे वर्षाच्या अखेरीस ह्या मिशनच्या १२ शाखा, १६ दिवसांच्या प्राथमिक शाळा, १०१८ विद्यार्थी, ६ रविवारच्या शाळा, ५ भजनसभा, ४ उद्योगशाळा, ७ मिशनरी कामाला वाहून घेतलेले कार्यवाह आणि एक मासिक पत्र इतकी वाढ झाली.

●●●

१२

सामान्य विचार

दोन पद्धती : कोणत्याही एका मोठ्या समाजसुधारणेचे व्यापक कार्य घेतल्यावर कार्यपद्धतीचे ढोबळदृष्ट्या दोन भिन्न प्रकार पडतात. विवक्षित आणि मर्यादित क्षेत्र घेऊन पद्धतीचे केंद्रीकरण आणि संघटन ही पहिली पद्धत अमर्याद लोकसमाजाचे मत आणि वळण बदलण्यासाठी प्रचारकार्य करणे ही दुसरी पद्धत. पहिलीला सुवर्णकार-पद्धती आणि दुसरीला मेघवृष्टी-पद्धती असे म्हणावयास हरकत नाही. सोने, मोती हिरे वगैरे धातू घेऊन सुवर्णकार आपल्या कलाकुसरीने त्यांचे उत्तम नग बनवतो, तर दुसऱ्या पद्धतीत अमर्याद क्षेत्रावर मेघाने वर्षाव केल्यामुळे अखेरीस उत्तम पीक येते. हा पद्धतीचा भेद केवळ आधुनिक आहे असे म्हणता येणार नाही. पुरातन काली मोठमोठे धर्मप्रसार झाले. धर्मबुद्धीच्या घटना झाल्या. त्यांच्या चालकांना या दोन्ही पद्धती स्वीकाराव्या लागल्या. ठिकठिकाणी गुरुकुले स्थापून त्यांनी आचार्यांच्याद्वारा धर्मबुद्धीची शिकवण दिली व पुरोहित नेमून धर्माची अनुष्ठाने, गृह अथवा सामाजिक संस्कार यांच्याद्वारे धर्माची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली ही पहिली पद्धत. निस्संग परिव्राट् व सतत संचार करणारे परमहंस संन्यासी नेमून त्यांच्या द्वारा वेळोवेळी झोपी जाणाऱ्या लहानथोर जनतेला जागी करणे आणि कार्यप्रवण राखणे ही दुसरी.

अस्पृश्यतानिवारण हे मोठे जागतिक कार्य. खंडवजा भारतासारख्या देशसमुहावर ह्या कार्याचा प्रयोग करणे हे काही लहानसहान कृत्य नव्हे. कार्य मोठे, पण कार्यवाह लहान. पण विभूतीची वाट पहात बसण्याला अवसर कोठून आणणार! विभूतीची वाट पहाण्यात बराच काळ अगोदरच लोटून गेला होता. अलौकिक, लोकोत्तर विभूती आणि सामान्य माणसांची घटना ह्या दोहोंचे मी समाजशास्त्रदृष्ट्या विद्यार्थीदशेत थोडेबहुत आकलन केले होते. म्हणून विभूतिवादावरील माझा विश्वास कमी होऊन सामान्य माणसांच्या घटनात्मक प्रयत्नाकडे माझा कल विद्यार्थीदशेतच होऊ लागला होता. थॉमस कार्लाईलचा विभूतिवाद आणि हर्बर्ट स्पेन्सरचा सामान्य माणसांचा घटनात्मक प्रयत्नवाद ह्या दोहोंची तुलनात्मक मीमांसा मी तरुणपणीच केलेली होती. म्हणून अस्पृश्यतानिवारणाचे कामी आधुनिक काळात कोणी विभूती पुढे येत नाही आणि मी तर स्वतः अत्यंत सामान्य माणूस ही वस्तुस्थिती पाहून मी हताश झालो नाही. श्रद्धेने पर्वत हलतात ह्या ख्रिस्तोक्तीची प्रचिती पाहण्याची वेळ आली होती. श्रद्धा मग ती एखाद्या विभूतीची असो वा सामान्य माणसांची असो, श्रद्धा ती श्रद्धाच! तिने पर्वत हे हललेच पाहिजेत. मात्र सामान्य माणसाची तशी घटना झाली पाहिजे. अपेक्षेप्रमाणे थोडाबहुत पैशाचा निधी जमल्यावर कामासाठी मी योग्य माणसे जमा करू लागलो. निधी जमवणे हे माणसाचे काम. पण माणसे मिळणे ही ईश्वरी देणगी. ह्या कामाला स्वार्थत्यागपूर्वक वाहून घेऊन काम करणारी माणसे मिळणे कठीण जाऊ लागले.

प्रचारकांचे दोन प्रकार : अशा माणसांचेही दोन प्रकार पडतात. सर्वसंगपरित्यागी संन्यासी हा पहिला प्रकार. घरादारांची जबाबदारी असलेली, अरण्यात जाण्यापेक्षा समाजातच राहून गृहस्थाश्रम चालविणारी सामान्य माणसे हा दुसरा प्रकार. संन्यासी कामाला मिळाले असते तरी ते शिस्तीत बसणारे व चालणारे नसतात. ज्यांना घर करण्याचा अनुभव नाही त्यांना समाज वळविण्याचा अनुभव कोठून येणार! तो अनुभव असला तरी तसले अनुभवी संन्यासी कोठून आणावयाचे? असल्या संन्याश्यांशी गाठ पडली नाही हेच मी नशीब समजतो. प्रार्थनासमाजाचे प्रचारकार्य करीत असताना मला असले एक संन्यासी मिळाले होते. त्याचे नाव स्वामी स्वात्मानंदजी. मेघवृष्टीने उपदेश आणि प्रवचने करण्यात त्यांचा मला मोठा लाभही झाला होता. त्यातही केव्हा केव्हा मतभेद झाल्यास स्वामीजी दंडा घेऊन उठत. हा अनुभव मला आलेला होता. म्हणून अशा संन्याश्याची मला फार हळहळ लागली नाही. त्यात मी स्वतः पडलो अगदी सामान्य माणूस. माझ्याबरोबर काम करण्याला असामान्य माणूस कशाला येईल? नुसती बी. ए., एम. ए. आणि परदेशविद्याभूषित माणसेसुद्धा माझ्या भेदरट मनाला असामान्य दिसू लागली. अशी माणसे थोडा वेळ स्वार्थत्याग करतील, पण ती अखेरपर्यंत मिशनची शिस्त पाळतील याची खातरजमा कोण देणार! 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' अशी म्हण आहे 'ज्ञानवान् लभते श्रद्धा' अशी म्हण नाही. म्हणून फारशी इंग्रजी विद्या न मिळवलेली आणि गरजेपुरते व कामापुरते आधुनिक विद्येचे चांगले ज्ञान असलेली अशी माणसे क्रमाक्रमाने मिळाली. त्यांनाच ह्या मिशनचे सारे श्रेय आहे!

कार्याची घटना : मिशनच्या कामाची खालीलप्रमाणे मांडणी करण्यात आली. एक मध्यवर्ती शाखा ठरवायची. तिचा हेतू आणि रचना यासंबंधी जरूर तितकेच नियम करावयाचे. अशी ही मातृसंस्था मुंबई शहरात स्थापण्यात आली. प्राथमिक अथवा दुय्यम शिक्षणाची शाळा, उद्योगशाळा, विद्यार्थी-वसतिगृहे, फुकट दवाखाना, धर्मशिक्षणाच्या आणि नीतिशिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, केवळ सार्वत्रिक धर्माला अनुसरून म्हणजे जातिभेद आणि मूर्तिपूजा यांना फाटा देऊन चालविण्यात येणारी उपासनालये एवढी तरी निदान ह्या मध्यवर्ती संस्थेची अंगे ठरली. ह्यासाठी एक आश्रम स्थापण्यात येऊन त्याची सर्व जबाबदारी अंगावर येणाऱ्या कुलगुरूची आवश्यकता मला भासली. ह्या मध्यवर्ती आश्रमाची घडी नीट बसल्यावर पुढे जसजसा अनुभव येईल तसतशा निरनिराळ्या प्रांतांतून भाषावार प्रांतिक शाखा आणि त्याच्या जिल्हानिहाय व तालुकानिहाय पोटसंस्था स्थापण्याचा विचार ठरला. सुवर्णकार पद्धतीने ही कामे चालू असता मेघवृष्टीचे काम म्हणजे जाहीर व्याख्यानांच्याद्वारे परिषदा, प्रदर्शने, प्रात्यक्षिके, मिरवणुकी वगैरे साधनांच्याद्वारे लोकमत तयार करणे हे काम आवश्यक होते. ह्या दोन्ही पद्धतीची कामे परस्परावलंबी होती. ठिकठिकाणच्या केंद्रीकृत संस्था नसत्या आणि नुसते प्रचाराचेच काम चालले असते तर लोकमत कसे बनणार आणि मेघवृष्टी प्रचाराचे काम न चालवता नुसत्या स्थानिक संस्थांना द्रव्याचे व सहानुभूतीचे साहाय्य तरी कसे मिळणार! म्हणून या दोन पद्धतीची कामे मी एकमेकांपासून भिन्न पण परस्परपोषक अशी प्रथमपासूनच ठरविली होती. प्रचाराचे काम मी स्वतः अंगावर घेऊन करण्यासारखे होते. पण पहिल्या कामासाठी मात्र तज्ज्ञ आणि अधिकारी माणसे पाहिजे होती. मिशनचे काम म्हणजे अस्सल धर्मयुद्धाचे काम होते. नुसती मुलुखगिरी केल्याने युद्धात जय मिळत नाही आणि मिळाला तरी तो टिकत नाही.

१३

कार्याची सुरुवात

निराश्रित सेवासदन : अशा रीतीने एक वर्ष लोटल्यावर निराश्रित साह्यकारी मंडळीचे कामाचा चहूकडे बोलबाला होऊ लागला. या नवीन कार्याबद्दल अनुकूल-प्रतिकूल मते प्रकट करण्यात वृत्तपत्रकारांची चढाओढ लागली. या राष्ट्रीय मुहूर्तकालात मुंबईस बिनबोभाट परोपकारी कृत्ये करणारे दोन दानशूर गृहस्थ होते. एक मलबारी नावाचे पारशी गृहस्थ व दुसरे दयाराम गिडुमल, सुरतेचे डिस्ट्रिक्ट जज्ज. पुण्याचे प्रो. धोंडोपंत कर्वे– अनाथ महिलाश्रमाचे संस्थापक, प्रो. गोपाळ कृष्ण गोखले–भारत सेवकमंडळाचे संस्थापक, राजकारणात सारा हिंदुस्थान हलवून सोडणारे टिळक वगैरेंनी महाराष्ट्राला तत्कालीन अग्रपद मिळवून दिले होते. अशा मुहूर्तकाळी वरील दोन परोपकारी गृहस्थांना केवळ महिलांच्या उद्धारासाठी निष्काम बुद्धीने काही तरी करावे ही तळमळ लागून राहिली होती.

एके दिवशी दयाराम गिडुमल या थोर पुरुषाकडून मी त्यांना समक्ष भेटून जावे अशी अत्यंत प्रेमळपणाची चिठ्ठी आली. ती भेट मी कधी विसरणार नाही त्यांनी मला अत्यंत आपलेपणाने कवटाळून, डोळ्यात आसवे आणून विचारले. "हे अपूर्व मिशन काढण्याची कल्पना तुम्हाला कशी सुचली? ह्या कामी अस्पृश्यवर्गातल्या महिलांसाठी तुम्ही काही तजवीज केली आहे काय?" मी निर्भीडपणे सांगितले, "ह्या हतभागी भारतामध्ये पुरुषांपेक्षा महिलांची स्थिती अत्यंत दुर्बल व केविलवाणी आहे, हे मी जाणून आहे. माझ्याप्रमाणेच माझ्या घरातल्या मंडळीनाही ही जाणीव असल्याने माझी त्यागी बहीण आणि पूज्य माता यांनी आपले पाठबळ दिले आहे." ही वार्ता दयारामजींच्या कानावर अगोदरच आली होती. म्हणूनच त्यांनी मला समक्ष भेटीला बोलावून असे कळकळीचे स्वागत केले. त्यांनी पुढे विचारले, "ह्या अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठी आम्ही काय करू शकू?" मी उत्तर दिले. "आमच्या मध्यवर्ती आश्रमात निराश्रित सेवासदन या नावाखाली एक स्वतंत्र शाखा आम्ही काढू." दयारामजींनी ताबडतोब दरमहा १०० रु. ची मदत देऊ केली आणि हे सदन निघाले.

पहिली शाळा : मिशनची पहिली शाळा १८ ऑगस्ट, १९०६ साली एल्फीन्स्टन रोडवरील, स्टेशनच्या पूर्वेस मुरारजी वालजीच्या बंगल्यात निघाली, असे मागे सांगितलेच आहे. पण कामाची वाढ झाल्याने ही जागा पुरेना, म्हणून ह्या स्टेशनाचे पश्चिमेस ग्लोब मिलजवळ एका चाळीत अधिक प्रशस्त जागा घेतली. मिशनचा पहिल्यापासूनच एक दंडक ठरला होता की, मिशनमध्ये काम करणाऱ्यांनी ज्या ठिकाणी अस्पृश्य लोक राहतात तेथेच त्यांच्यात मिळूनमिसळून राहावे. काम करणाऱ्यांनी आपल्या कुटुंबासह येऊन राहावे. मिशनऱ्यांच्या बायकामुलांनी अस्पृश्य मानलेल्या

लोकांचे आहे, असे समजून हे मिशनरी ख्रिस्ती असावे असा गैरसमज होऊ लागला. त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचारक बायांनी भारत, भागवत, रामायण वगैरे हिंदू लोकग्रंथांचे घरोघरी वाचन सुरू केले. एकादशी, शिवरात्र वगैरे हिंदू सणांचे दिवशी सदनामध्ये भक्तिविजयासारखी हिंदू संतांची चरित्रे वाचून दाखविण्यात आली. आजाऱ्यांची शुश्रुषा करण्यासाठी आणि बाळंतपणात मदत देण्यासाठी सदनातील स्त्रियांना शिक्षण देऊन तयार करण्यात आले. श्रीमती वेणूबाई, द्वारकाबाई आणि श्रीमती कल्याणीबाई सय्यद ह्या तीन स्त्रिया सदनात राहून ही कामे उत्कृष्ट रीतीने करीत. या सदनातील घरगुती सर्व कामे माझी बहीण जनाबाई जबाबदारीने पार पाडी. बाहेरच्या कामाचा सर्व बोजा रा. सय्यद अबदुल कादर यांनी उचलला होता. या कामासाठी निराश्रित महिलासमाज ही निराळी संस्थाच जनाबाईने काढली होती. या महिलासमाजाचा पहिला वार्षिकोत्सव मदनपुरा मोरलँड रोडवरील इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या चार माड्यांसमोरील मंडपात त्यावेळी सौ. लेडी लक्ष्मीबाई चंदावरकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता. गावातील प्रमुख स्त्रिया हजर होत्या. या महिलासमाजाची कामे भायखळा व परळ येथे दोन ठिकाणी स्वतंत्रपणे चालत असत.

समाचार : घरोघरी भेटीला जाऊन समाचार घेण्याचे काम वर्षभर चालत होते. त्या कामाचा फायदा आमच्या निराश्रित भगिनींना कितपत मिळतो हे आम्हास सांगवत नाही. परंतु त्याचा आम्हाला मात्र निरीक्षणदृष्ट्या बराच मिळतो. ह्यानंतर सौ. कल्याणीबाई सय्यद यांनी भायखळा येथील कामाबद्दलचा वाचलेला रिपोर्ट पुढीलप्रमाणे आहे. 'घरातील वर्ग सुमारे ६ महिने चालले. गेल्या वर्षी एकंदर १३ बायकांची प्रसूती करण्यात आली. पुष्कळांना दवाखान्याचा लाभ देण्यात आला. पोलीस कमिशनरकडून बेवारशी मुले व बायका मिळून ५ आली. त्यांची निगा ठेवण्यात आली.

सोमवंशीय मित्रसमाज : महिलांच्या समाजाप्रमाणेच पुरुषांचाही सोमवंशीय समाज स्थापन करण्यात आला. इंप्रुव्हमेंट ट्रस्टमधील चाळ नं. ३ मध्ये हा समाज तारीख २४ मार्च, १९०७ रोजी स्थापन करण्यात आला. ह्याचा हेतू अस्पृश्य लोकांकरवीच स्वोद्धारार्थ धार्मिक व सामाजिक सुधारणा करवून घ्यावा असा होता. १९१० अखेर पटावर ४० सभासद होते. ते दरमहा ४ आणे वर्गणी देत. दर रविवारी एकेश्वरी माताच्या उपासना त्यांचेसाठी चालविण्यात येत. १९१० साली अस्पृश्यांच्या निरनिराळ्या मोहल्ल्यांतून ह्या लोकांनी ११ जाहीर सभा घडवून आणल्या. अशाच एका सभेचेवेळी एकनाथ व अस्पृश्य जाती या विषयावर माझे जाहीर व्याख्यान झाले. ह्या मंडळीचा उत्साह इतका वाढला की, ह्या समाजासाठी एक स्वतंत्र उपासनामंदीर बांधावे असा विचार १९०९ नोव्हेंबरमध्ये ठरून वेळोवेळी सभा होऊ लागल्या. ह्यासाठी फंड जमा होऊन ६५० रु. मुंबई बँकेत ठेव ठेवण्यात आली. ती ठेव पंचांच्या नावे होती. परंतु कोणत्याही कामात स्थावर मिळकत येऊ लागली म्हणजे वादाची मुळी पेरल्याप्रमाणे होते. हा अनुभव ह्या लहानशा कामातही येऊन काही वर्षानी हे काम बंद पडले.

अनुभवाचा फायदा : ह्या निराश्रित सेवासदनाच्या खर्चासाठी दयाराम गिडुमल यांनी दरमहा १०० रु. देणगी दिली होती. ती तीन वर्षांपुरतीच होती. सुरुवातीचे अनुभव घेऊन पाहण्यासाठीच

होता, म्हणूनच ही कृत्ये त्याच्याकडून पार पडली. तो कामावर गेल्यावर जनाबाई बाईला भेटण्यास घरी गेल्या. मुलगा रेल्वेत मजूर होता. दारुच्या नशेत रेल्वे ओलांडीत असता दोन्ही डब्यात चेंगरून तो जागच्या जागी ठार झाला. तेव्हा त्याची आई, "बाळा, माझ्या तोंडात मारायला तरी पुन्हा येरे!" असे हंबरडे फोडू लागली. त्याच शोकात म्हातारीचा त्या रात्री शेवट झाला आणि जनाबाईचे हे हृदयविदारक कामही संपले. (३) खालच्या वर्गात मुरळी सोडण्याची चाल त्या वेळी जारी असे. मदनपुऱ्यात आमच्या शाळेत येणाऱ्या एका मुलीला सोडणार आहेत असे कळल्यावरून सदनांतील भगिनीं चार समजुतीच्या गोष्टी सांगण्यास त्या मुलीच्या आईकडे गेल्या. आपल्या धर्मात हात घातल्याबद्दल अत्यंत संताप येऊन पुन्हा आमच्या अंगणात येऊ नका असे त्या मुलीच्या आईने दरडावून सांगितले आणि आपल्या मुलीला शाळेतून काढून घेतले. (४) पुण्याच्या डॉ. मॅनकडून मुरळी सोडलेली मुलगी सदनांत आली. तिला अंगभरून वाईट रोग जडला होता. तिची कोठेही व्यवस्था होत नसल्याने निर्वाणीचा उपाय म्हणून ही मुलगी सदनात पाठवली गेली; पण मुलांबाळांनी भरलेल्या सदनांत ही मुलगी ठेवणे धोक्याचे होते. म्हणून आमच्या भायखळा येथील शाळेजवळ एक स्वतंत्र खोली घेऊन जनाबाईला तिच्यासाठी निराळे राहावे लागले. मुलगी फार आडदांड स्वभावाची होती. बरेच दिवस तिने फार त्रास दिला. तथापि तिला तसेच शिकवून बरी केल्यावर आणि ती चांगली शिकल्यावर तिचा योग्य स्थळी विवाह करून देण्यात आला. ही मुलगी महाराची होती. ती हल्ली निजाम हैद्राबाद येथे शिक्षकीण आहे.

पुष्कळ बायांना गरोदरपणी व बाळंतपणी फार नाजूक उपचार करण्याची पाळी येई. मिशनचे हितचिंतक मोठमोठे स्त्री-डॉक्टर असत. ते औषधोपचार सांगत; पण शुश्रुषेची कामे सदनातील स्त्रियांवर पडत एनिमा देणे वगैरे नवीन उपचाराचे काम आल्यास जुन्या मताच्या रोग्यांना आवरणे फार कठीण होई. ते अत्यंत बीभत्स शिव्या देऊन निघून जात. वेळोवेळी पोलिसांकडून अनाथ अर्भके सदनात पाठवली जात. अस्पृश्य म्हणून इतर अनाथालयात त्यांचा शिरकाव होणे अशक्य होते. अशा मुलांना पंढरपूरच्या आश्रमात किंवा दयारामशेठनी मालाड येथे काढलेल्या आश्रमात पाठविण्यात येई.

प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी : अशा प्रकारची दयार्द्रतेची कामे करण्यास पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या अंत:करणाची जोड मिळविणे आवश्यक असते. या सदनाच्या कामामुळे तेही लवकर घडून आले. १९०८ साली खालील प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी नेमण्यात आली. लेडी म्यूर मॅकेंझी–अध्यक्ष ; लेडी चंदावरकर–उपाध्यक्ष ; मिसेस स्टॅनले रीड–चेअरमन; सौ. सीताबाई सुखटणकर आणि सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्या जॉईंट सेक्रेटरी; कु. एस. के. काब्राजी–खजिनदार; ह्यापैकी डॉ. वासुदेवराव ह्यांची पत्नी सौ. सीताबाई सुखटणकर ह्या पूर्वाश्रमीच्या मँचेस्टर डोमेस्टिक मिशनचे चालक रेव्हरंड बिशप ह्यांची कन्या. ह्यांनी इंग्लंडमध्ये असतानाच ह्या मिशनला तेथील युनिटेरियन लोकांची सहानुभूती मिळवून एकंदर ७०० रु. पाठविले होते. त्या हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी ह्या स्त्रियांच्या कमिटीचा सेक्रेटरीपणा पत्करला; पण पुढे डॉ. सुखटणकरांना लवकरच मुंबई सोडून लाहोरला जावे लागल्याने ह्या बाईचा मिशनशी फारसा संबंध उरला नाही. ह्या कमिटीवरच्या मोठमोठ्या घरंदाज बायकांनी व्यक्तिश: मिशनची वेळोवेळी फार काळजी घेतली आणि मोठमोठे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

(४) कामठीपुरा-भंगी लोकांसाठी दिवसाची शाळा--ही एक गुजराथी गृहस्थाच्या उदार आश्रयाने चालू होती. हिला प्रथम जागाच मिळेनाशी झाली. भंगी लोकांचा तिरस्कार इतर अस्पृश्यांनाही वाटत असे. शिक्षक मिळण्याची मारामार पडू लागली. त्यामुळे शाळा बंद पडेल की काय असे वाटू लागले. शेवटी बडोद्यास तयार झालेले एक धेड जातीचे गृहस्थ मिळाले. पटावरील संख्या ७६ होती. रोजची हजेरी ६६ होती. मराठी ४ इयत्तेपर्यंत शिक्षण दिले जाई.

●●●

१४

मिशनची घटना

मिशनची घटना : येणेप्रमाणे मुंबई येथील मध्यवर्ती संस्थांची कामे होऊ लागून एका नमुनेदार मातृसंस्थेची उभारणी झाली. यापुढे या संस्थेच्या प्रत्यक्ष शासनाखाली प्रांतिक मुख्य शाखांची घटना करावयाला जनरल सेक्रेटरी लागले. ह्या मिशनच्या सनदेचे जे नियम होते त्यांच्या अन्वये मिशनच्या शाखांचे तीन प्रकार ठरले होते. पहिला प्रकार अंगभूत शाखांचा. ह्या शाखा मिशनची जी मध्यवर्ती कार्यवाहक कमिटी होती तिच्या प्रत्यक्ष अंमलाखाली चालावयाच्या होत्या. जमाखर्चाची सर्व जबाबदारी आणि इतर कारभार मध्यवर्ती कमिटीच्या संमतीने चालावयाचा होता. प्रांतिक शाखांचे मुख्य चालक आणि त्यांच्या मदतनीस कमिटीचे सभासद हे मध्यवर्ती कमिटीच्या संमतीने नेमले जात. हा चालक स्वतःला वाहून घेऊन काम करणारा असल्यास त्याच्या पगाराची जबाबदारी मध्यवर्ती कमिटीकडे असे. बाकीचा सर्व खर्च चालविण्याची जबाबदारी ह्या मुख्य चालकांवर आणि त्याच्या कमिटीवर असे. वर्षअखेर जमाखर्चाचा खर्डा स्थानिक ऑडिटरने मंजूर केल्यावर तो खर्डा आणि वार्षिक अहवाल मध्यवर्ती कमिटीच्या पसंतीला मुंबईस पाठवण्यात येई. वेळोवेळी या शाखांची आणि त्यांच्या आश्रयाखाली चाललेल्या इतर शाखांच्या संस्थांची तपासणी जनरल सेक्रेटरीकडून होत असे. ह्या शाखांची वर्षअखेर जी शिल्लक असे ती पैकी जास्तीत जास्त १००० रू. मध्यवर्ती कमिटीच्याद्वारे मातृसंस्थेकडे येत. याशिवाय विशिष्ट हेतुने दिलेले कायमचे निधी असतील तर हे ट्रस्टफंड या नात्याने वरील ट्रस्टीकडे येत.

दुसरा प्रकार संलग्न शाखांचा. ह्या शाखांची जमाखर्चाची आणि कामाची जबाबदारी प्रत्यक्षपणे मध्यवर्ती कमिटीकडे नसे. मात्र कामाचे धोरण मिशनच्या हेतुला धरून चालले आहे की नाही हे जनरल सेक्रेटरी वेळोवेळी तपासून पाहात. मिशनच्या वार्षिक सर्वसाधारण अहवालात सामील करण्यासाठी अशा शाखांच्या जमाखर्चाचा तक्ता आणि कामाचा अहवाल जनरल सेक्रेटरीच्या ऑफिसात वेळेवर येत असे.

तिसरा प्रकार सहकारी शाखांचा. ह्या बहुतेक स्वतंत्रपणे चालत. सामान्य धोरण आणि परस्पर सहानुभूती असली की अशा शाखा मिशन मान्य करीत असे.

मातृसंस्थेचे आद्य ट्रस्टी — (१) नामदार गोकुळदास कहानदास पारेख, बी.ए.एल.एल.बी., (२) शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला व (३) श्री. विठ्ठल रामजी शिंदे, बी. ए. तारीख १ जानेवारीपासून ३१ डिसेंबरपर्यंत मिशनचे दप्तरी वर्ष ठरलेले असे.

पुणे शाखा : मि. ए. के. मुदलियार हे पुणे शाखेचे सन्मान्य सेक्रेटरी. ह्यांनी पाठविलेल्या पहिल्या सहामाही अहवालाचा पुढील सारांश आहे. १९०८ सालच्या एप्रिलमध्ये पुणे येथील काही

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१५

निधीची योजना

निधीची टंचाई : मिशनच्या सुरुवातीस निराश्रित सेवासदन चालू करण्यासाठी दरमहा १०० रु. ची देणगी दयाराम गिडुमल यांनी दिली हे मागे सांगितलेच आहे. ही देणगी तीन वर्षांसाठीच होती. ह्या तीन वर्षांत मिशनची बरीच वाढ झाली; पण १९१० च्या जूनअखेर ही वर्गणी बंद झाली. काम वाढले पण मदत नाही, अशी पंचाईत पडली. गरिबांची लग्ने करण्यात लोक मोठा परोपकार समजतात; पण लग्नामुळे संसाराचा पसारा होऊन गरिबांचे फार हाल होतात. तसाच ह्या मिशनचा प्रकार झाला. निराश्रित सेवासदन बंद पडल्यामुळे त्यातील कार्यकर्त्यांची इतर कामांकडे वाटणी करण्यात आली. श्रीमती वेणूबाईस पुण्याच्या शाखेत पाठविले. भगिनी जनाबाईस प्रचारकार्यासाठी बरोबर नेण्यात आले. भगिनी तान्याबाईस परळच्या शाळेत शिक्षकीण म्हणून ठेवण्यात आले. सय्यद अबदुल कादर यास बाहेरच्या शाखांची पूर्वतयारी करण्यास पाठविण्यात आले. पण ह्या सर्व कामास निधीची फार जरूर लागली. ती पुरेशी न मिळाल्याने जनाबाईला जे अल्पवेतन होते तेही बंद करण्यात आले. शिक्षकिणीची कायमची नोकरी सोडून त्या मिशनमध्ये आल्या होत्या; पण आता त्यांचे काम मात्र फार वाढले होते आणि अल्पवेतनही बंद झाले. त्यामुळे मोठी खाजगी आपत्ती ओढवली. सय्यद अबदुल कादर व इतर कार्यकर्ते ह्यांची वेतने बंद करणे शक्य व इष्ट नव्हते; म्हणून आम्ही रूपी फंड, तांदूळ फंड, कपडे फंड, पेटी फंड इत्यादी युक्त्या काढून भुकेच्या वेदना कशाबशा शमवू लागलो. पुण्यास ना. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क ह्यांच्या कन्येने जलसा करून जी शिल्लक उरली त्यात थोड्या रकमेची भर घालून ५००० रु. ची रक्कम मुंबईतील ट्रस्टीकडे पाठविण्यात आली. पण तो कायम निधी म्हणून राखून ठेवण्यात आल्याने चालू खर्चास त्याचा उपयोग करता येईना.

संस्थापनेचा दिनसमारंभ : तारीख १८ ऑक्टोबर, १९०९ रोजी मिशनच्या संस्थापनेचा दिवस साजरा करण्यासाठी आणि शाळांतील मुलांचा बक्षीससमारंभ करण्यासाठी मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये एक अपूर्व जाहीर सभा भरविण्यात आली. तिचे अध्यक्षस्थान श्रीमंत सर सयाजीराव यांनी मंडित केले. त्यावेळी मिशनचे अध्यक्ष चंदावरकर, नामदार जी. के. गोखले, मि. विमा दलाल, बडोद्याचे पं. आत्माराम ह्यांची भाषणे झाली. गावातील प्रमुख स्त्री-पुरुषांनी प्रशस्त टाऊन हॉल चिक्कार भरला होता. महाराजांनी आपले अध्यक्षीय भाषण संपवून आपली २००० रु. ची देणगी देऊ केली. सयाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती या नावाने तिचा उल्लेख करण्यात आला. मिशनचे उपाध्यक्ष शेठ दामोदरदास सुखडवाला ह्यांनी ५००० रू. ची देणगी दिली. मिशनच्या घटनेच्या नियमाप्रमाणे त्यांना आश्रयदाते करण्यात आले. ह्याप्रमाणे त्या मोठ्या रकमा कायम

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

कापड फंड व पेटी फंड : विद्यार्थ्यांना जेवणाशिवाय नवे जुने कपडे, बिछाने, भांडी, साबण, औषधे, पुस्तके वगैरे अनेक घरगुती वस्तूंची जरुरी लागे. ती गरज ह्या कापड फंडाने भागविली जात असे. सीलबंद केलेल्या लहान लहान लाकडी पेट्या, मुख्य मुख्य कचेऱ्या, खाजगी दवाखाने, वकिलांची घरे आणि इतर माणसांची जा-ये पुष्कळ आहे अशा ठिकाणी ठेवण्यात आल्या. त्या ठिकाणी नेहमी असणाऱ्या मिशनच्या हितचिंतकाला ह्या पेटीची जबाबदारी देण्यात आली. दर महिन्याच्या शेवटी स्वयंसेवकाने जाऊन जबाबदार हितचिंतकाचे समोर ती उघडून आतील रकमेची पावती देऊन स्वयंसेवक मिशनच्या खजिनदाराकडे हा हिशेब देई. खजिनदाराची पावती अखेरची समजली जाई.

ह्या निरनिराळ्या फंडाची योजना मिशनच्या निरनिराळ्या शाखांतून सुरू करण्यात आली. तांदूळ आणि कापड फंड जमविण्याचे कामी रुपी फंडाप्रमाणे सौ. रुक्मिणीबाई शिंदे यांनी मोठे यश मिळविले. त्या जेथे जात तेथे कनवाळू स्त्रिया मुठीने तांदूळ न देता सुपाने तांदूळ भरभरून इतके देत असत की, विद्यार्थ्यांना ते उचलून आणणे देखील जड जात असे.

औद्योगिक शिक्षण : विद्यार्थी वसतिगृहे आणि उद्योगशाळा ही मिशनची स्वीकृत कामे फार खर्चाची आणि दगदगीची होती. मुंबईतील परळ शाळेत बुक-बाइंडिंग व शिवण्याचे काम, मंगळूर येथे हातमागावर विणण्याचे काम, महाबळेश्वर येथे काथ्याचे दोरखंड आणि वेताच्या टोपल्या वगैरे करण्याचे काम, अशी औद्योगिक कामे प्रथमपासून चालली होतीच. १९१२ साली मुंबईच्या परळ येथील शाळेला एक स्वतंत्र उद्योगशाळा जोडण्याची आवश्यकता भासू लागली. औद्योगिक शिक्षणाची मुख्य कल्पना ही आहे की, विद्यार्थ्यांच्या हातांना आणि डोळ्यांना व्यावहारिक वळण लागावे आणि तद्द्वारा विद्यार्थ्याला भावी आयुष्यामध्ये कोणता तरी हस्तकौशल्याचा धंदा करता यावा. बहुतेक अस्पृश्यवर्ग असा कोणता ना कोणता धंदा करून आपले पोट भरती असतो. म्हणून अशा धंद्याची तयारी लहानपणापासूनच केली नाही, तर ते पुढे पोकळ पंडित बनून आईबापांच्या आणि स्वतःच्या निराशेला कारणीभूत होतील.

वाडिया ट्रस्टींची मदत : ह्या कामी पुरेसा निधी मिळावा, म्हणून मुंबईच्या एन. एम. वाडिया ट्रस्टीकडे अर्ज करण्यात आला. त्या फंडाचे प्रमुख ट्रस्टी सर जमशेटजी जीजीभाई आणि बॅ. एच. ए. वाडिया यांना मिशनची परळ येथील दुय्यम शाळा समक्ष दाखविण्यात आली. सर्व कामे बारकाईने पाहिल्यावर औद्योगिक शाळा चालविण्यास मिशन पात्र आहे, अशी या ट्रस्टीची खात्री झाली आणि दरसाल ६००० रु. ची देणगी या प्रमाणे तीन वर्षेपर्यंत एकूण १८,००० रु. देण्याचे त्यांनी कबूल केले. त्या प्रमाणे ही नवीन उद्योगशाळा निघाली. ह्या शाळेत सुतारकाम, चित्रकला व रंगकाम, शिवणकाम, पुस्तके बांधण्याचे काम असे चार निरनिराळे वर्ग योग्य शिक्षकांच्या नजरेखाली उघडण्यात आले. कोणत्या ना कोणत्या वर्गात तरी शाळेतील सर्व मुलांनी-विशेषतः वसतिगृहांतल्या सर्व विद्यार्थ्यांनी–दिवसांतून दोन तास हे औद्योगिक शिक्षण अवश्य घ्यावे, अशी योजना करण्यात आली. पुणे शाखेत विद्यार्थी वसतिगृहाची पूर्वतयारी १९१२ अखेर करण्यात आल्यावर तेथेही अशा शिक्षणाची तरतूद करण्यात आली.

●●●

१६

महाराष्ट्र परिषद

मिशनच्या परिषदा : मेघवृष्टीने प्रचार करण्याचे तीन प्रकार आहेत---(१) ठिकठिकाणच्या हितचिंतक पुढाऱ्यांची मने वळवून त्यांच्याकडून लोकमत तयार करण्यासाठी त्यांच्या त्यांच्या गावी प्रचंड सभा भरविणे. (२) अशा रीतीने लोकमत अजमाविल्यावर जनरल सेक्रेटरीने (मुख्य प्रचारकाने) प्रांताच्या एका मुख्य ठिकाणी अंगभूत शाखा स्थापून तिच्या नियंत्रणाखाली जिल्ह्याच्या ठिकाणी उप शाखा स्थापण्यासाठी प्रांताचे निरीक्षण करून आणि निधी मिळविण्यासाठी दौरे काढणे. (३) तिसरा प्रकार मिशनच्या खास परिषदा भरविणे. भारतीय राष्ट्रीय सभेची बैठक नाताळात जेथे जेथे होत असे तेथे तेथे एकेश्वरी धर्माची परिषद भरविण्यास मला जावे लागत असे. त्याच वेळी मी ह्या मिशनच्याही परिषदा संघटित रूपाने भरवीत असे. १९०६ मध्ये मिशन स्थापल्यावर १९०७ मध्ये सुरत, १९०८ मध्ये मद्रास, १९०९ लाहोर, १९१० अलाहाबाद, १९१२ बांकीपूर, १९१३ कराची येथे काँग्रेसच्या वेळी या परिषदा भरविण्यात आल्या. बांकीपूर येथे काँग्रेसचे अध्यक्ष, अमरावतीचे नामदार मुधोळकर वकील हेच मिशनच्या परिषदेचे अध्यक्ष होते. कराचीच्या परिषदेत लाला लजपतराय हे अध्यक्ष होते. ह्या परिषदांमुळे प्रांताप्रांतांतून आलेल्या पुढाऱ्यांचे लक्ष ह्या मिशनच्या कार्याकडे लागत असे. त्या त्या प्रांतात ह्या मिशनच्या कार्याची उभारणी करण्यासाठी माहिती आणि मदत मिळत असे. पण प्रत्यक्ष काँग्रेसच्या कार्यात ह्या अस्पृश्यांच्या प्रश्नाला शिरकाव होण्याला त्या वेळी अनुकूलता मुळीच नव्हती. हा प्रश्न धर्माचा आहे; त्याची भेसळ राजकारणात नको, अशी सबब सांगून त्या वेळचे जहाल अथवा मवाळ राजकीय पुरुष हा प्रश्न सफाईदारपणे टाळीत असत.

परिषदेची तयारी : १९०६ साली हे मिशन निघून त्याचे अर्धे तप १९१२ अखेर संपूर्ण झाले. ह्या राष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतीत ह्या अर्ध्या तपात महाराष्ट्रीयांनी उचल खाऊन सर्व प्रातांत आघाडी मारली. मुंबई, मद्रास, मध्यप्रांत ह्या हिंदुस्थानातील तीन इलाख्यात ह्या मिशनच्या द्वारे व शासनाखाली ह्या प्रश्नाची अपूर्व घटना केली. म्हणून मला असे वाटू लागले की, ह्या मिशनची खास महाराष्ट्रीय परिषद भरवून लोकमताचा आढावा घ्यावा. ह्या प्रयोगासाठी पुणे शहर हेच योग्य ठिकाण असे ठरविले. मुंबई हे पैशाचे केंद्र आणि पुणे हे चळवळीचे केंद्र हा आधुनिक महाराष्ट्राचा अनुभव आहे. पुणे शाखेचे वसतिगृह स्थापावे, सर्व मिशनचा एक मध्यवर्ती आश्रम स्थापावा, सनातनी पक्षाला हालवून पाहावे, भिन्नजातीय व भिन्नधर्मीय पुढाऱ्यांची सक्रीय सहानुभूति कसोटीस लावून पहावी वगैरे इतर अनेक हेतु होतेच. ही परिषद वरिष्ठ वर्ग आणि अस्पृश्यवर्ग ह्यांच्या सहकार्यावर घडवून आणण्यात आली.

परिषद फर्ग्युसन कॉलेजच्या ॲफि-थिएटरमध्ये सर रामकृष्णपंत भांडारकर यांचे अध्यक्षतेखाली सन १९१२ ऑक्टोबर तारीख ५, ६, ७ ह्या तीन दिवशी भरली. परिषदेच्या कामाकरिता स्वयंसेवकांची जोरदार घटना केली. त्यात विशेषतः पुणे येथील शेतकी कॉलेजचे व इतर कॉलेजातील बऱ्याच तरूण स्वयंसेवकांनी ऊन, वारा, पाऊस यांना न जुमानता एकसारखी मेहनत केली. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद रा. वझे यांनी आणि इतरांनी फारच श्रम घेतले. परिषदेकरिता आलेल्या सर्व जातीच्या दूरदूरच्या पाहुण्यांची जेवण्याची व राहण्याची सोय मिशनच्या लष्करांतील शाळेत करण्यात आली. जेवणासाठी भव्य मंडप घालण्यात आला होता. सर्व जातीचे मिळून २६० पाहुणे आले होते. त्यांची एकत्र भोजने तीन दिवस मिळून-मिसळून होत होती. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी परिषदेचे स्वयंसेवक, वरिष्ठ जातीचे हितचिंतक आणि निरनिराळ्या अस्पृश्य जातीचे पाहुणे मिळून सुमारे ४०० पानांचे थाटाचे प्रीतिभोजन झाले. ह्या भोजनात ५० वरिष्ठ जातीच्या लोकांनी भाग घेतला. कमिटीचे स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. मॅन यांनी प्रीतीभोजनात सर्वात मिसळून भोजन केले.

सर्व पाहुणेमंडळी पुण्यास आल्यावर त्यांचे नाव, जात ह्यांची नोंद होई. सकाळचा चहा झाल्यावर परस्पर परिचय होऊन भोजन होई. सभेचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे उरकण्यात येई. सर्व कार्यक्रमाला भजनाने व उपासनेने आरंभ होई. पाहिले दिवशी रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनी उपासना चालविली. दुसरे दिवशी परिषदेसाठी प्रार्थना समाजाच्या हरिमंदिरात परिषदेचे अध्यक्ष डॉ. भांडारकर यांनी उपासना चालविली. त्या वेळी परिषदेचे बाहेरगावचे २५० पाहुणे हजर होते. तिसऱ्या दिवशी मिशनचे शाळेत मी स्वतः उपासना चालविली. त्या वेळी मुंबईहून आलेल्या परळ मिशनच्या मुलांनी निरनिराळ्या व्यक्ति-प्रार्थना केल्या.

पुढाऱ्यांचा मेळावा : दोन प्रहरी अध्यक्ष भांडारकर स्थानापन्न झाले. जमलेल्या थोर मंडळीत सर चंदावरकर, डॉ. मॅन, भावनगर संस्थानचे दिवाण पट्टणी, ना. मौलवी रफिउद्दीन, इचलकरंजीचे अधिपती श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, कोल्हापूरचे भास्करराव जाधव, गोपाळराव देवधर, बी. एस. कामत, प्रो. धोंडोपंत कर्वे, रेव्हरंड रॉबर्टन्, तेलुगू समाजाचे पुढारी डॉ. कोरेज, अस्पृश्यांपैकी सुभेदार मेजर भाटणकर, नगरचे डांगळे, पुण्याचे कांबळे, भंग्याचे पुढारी नाथामहाराज, साताराचे मातंग पुढारी श्रीपतराव नांदणे वगैरे अनेक पुढारी होते.

कार्याचे क्षेत्र : प्रथम मी माझ्या भाषणात ह्या चळवळीचा थोडक्यात इतिहास सांगून मिशनच्या हल्लीच्या कार्याचा विस्तार पुढील कोष्टक देऊन सांगितला.

अ.क्र.	ठिकाणे		संस्था
१	मुंबई	--	५ दिवसाच्या शाळा व १ रात्रीची शाळा, ५०० विद्यार्थी, १ वसतिगृह व त्यातील २६ मुले, २ भजनसमाज, १ धंदेशिक्षणाची शाळा.
२	पुणे	--	एक २०० मुलांची शाळा, १ भजनसमाज, १ वाचनालय, क्रिकेट क्लब वगैरे.
३	हुबळी	--	१ दिवसाची शाळा, १ रात्रीची शाळा, १ वसतिगृह.
४	सातारा	--	१ रात्रीची शाळा, १ भजनसमाज.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

दुय्यम चिटणीस रा. दा. ना. पटवर्धन ह्यांनी ही परिषद घडवून आणण्यासाठी जे अविश्रांत श्रम केले त्यांचे वर्णन शब्दाने करवत नाही. रा. ए. के. मुदलियार यांचे हाताखाली त्यांना दक्षतेचे आणि तत्परतेचे वळण लागले होते. परिषदेचे बहुतेक श्रेय त्यांनाच आहे. सुमारे पाऊणशे पानांचा परिषदेचा अहवाल पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून परिषदेच्य वाङ्मयात त्यांनी एक संस्मरणीय भर टाकली.

उदार देणगी : ही परिषद पुणे येथील इमारतफंडासाठी मुखत्वेकरून भरविण्यात आली होती. परिषदेत तो फंड न मिळता उलट खर्चातच २५९ रु. १४ आ. ३ पै. तूट आली. पुणे शहराच्या दारिद्र्याचे याहून सुंदर प्रदर्शन दुसरीकडे कोठे दिसणार! पण चिटणीस रा. पटवर्धन यांचे सात्त्विक परिश्रमाला दुसरीकडूनच यश येणार होते. परिषदेचा सुंदर अहवाल वाचून इंदूरचे महाराज श्रीमंत तुकोजीराव होळकर यांना दयेचा पाझर फुटला आणि त्यांनी पुढील महिन्यांतच जनरल सेक्रेटरी म्हणून मला ताजमहल हॉटेलमध्ये बोलावून २०,००० रु. चा चेक माझे हाती दिला. ह्यांतच पुढे मुंबई सरकारच्या ८७,००० रु. ची भर पडून पुणे शाखेसाठी भोकरवाडीत 'अहल्याश्रम' या नावाच्या सुंदर इमारतीत आश्रम उघडण्यात आला.

●●●

१७

अंतर्बाह्य खळबळ

एक प्रश्न : पहिल्या सहा वर्षात मिशनची वरील वाढ झाली हे खरे! पण ती होत असताना अनेक अडचणी, विघ्ने, गैरसमज आणि परिक्षेचे प्रसंग आले हेही खरेच. वाढ झपाट्याने होऊ लागली असता पहिला प्रश्न असा उद्‌भवला की, हे मिशन मुंबई प्रार्थनासमाजाने आपल्या ताब्यात आणि जबाबदारीखाली आपलेच एक अंगभूत काम अशा दृष्टीने चालवावे की, ते सर्व राष्ट्राचे काम आहे म्हणून सर्वांचे सहकार्य मिळवून शक्य तेवढी त्याला बाहेरूनच मदत करावी? डॉ. भांडारकरांचे मत पहिल्या बाजूने पडले. आरंभी मिशनच्या मध्यवर्ती कमिटीवर सर्व अधिकारी आणि सभासद प्रार्थनासमाजाचेच पुढारी होते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या प्रोत्साहनाने आणि बळावरच मी हे काम काढले होते. पुढे बरीच वर्षे समाजाची सहानुभूति आणि मदत मिशनला बिनतक्रार व आनंदाने मिळत होती. मिशनचा सामाजिक हेतु समजाला पूर्णपणे मान्य होता. इतकेच नव्हे तर मिशनचे कार्य धर्माच्या पायावरच चालवावयाचे होते. तो पायाही समाजाला मान्य होता. मात्र अस्पृश्यवर्गातून समाजाला सभासद मिळावे असा हेतू समाजाने कधीच बाळगला नाही आणि तशी तक्रारही कधी कोणी बाहेच्यांनी केली नाही. म्हणून साहजिकच डॉ. भांडारकारांना वाटू लागले की, प्रार्थना समाजाने हे काम आपल्याच जबाबदारीवर चालवावे. बंगल्यात ब्राह्म समाजाने आणि पंजाबात आर्य समाजाने ह्या मिशनचे काम इतरांची मदत घेऊन पण स्वतःच्याच नियंत्रणाखाली चालविले होते. म्हणून डॉ. भांडारकरांचे मतात काही वावगे होते असे नाही. पण ह्या मिशनचे काम नेहमी वाढते राहणार. प्रश्न जरी हिंदूपुरता असला तरी अस्पृश्यतानिवारणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानांत राहणाऱ्या प्रत्येक जातीच्या आणि धर्माच्या माणसावर पडते, हे आम्ही वेळोवेळी सर्वांना बजावूनच काम चालविले होते. पैशाची मदत जर सर्वांकडून घ्यावयाची तर त्याचा विनियोग आणि सर्व कामांच्या जबाबदारीचा वाटा खुशीने घेतील त्यांना देण्यातच शहाणपणा आहे, हे आम्ही जाणूनच होतो. म्हणूनच सर नारायणराव आणि कमिटीचे इतर सभासदांना मिशनच्या कामांत सर्वांना मोकळीक ठेवावी असे वाटले डॉ. भांडारकरांनाही लवकरच ते पटले आणि हा वाद फारसा माजला नाही.

माझी स्थिती : काम झपाट्याने वाढू लागल्यामुळे अर्थातच माझा वेळही ह्या कामात अधिक अधिक जाऊ लागला. मी मूळ प्रांतिक समाजाच्या कामाला वाहिलेला. अल्प का होईना पण माझ्या योगक्षेमाची तरतूद समाजाने केलेली. अर्थातच समाजाच्या कळकळीच्या सभासदांना-विशेषतः ज्यांनी मला मदत केली होती त्यांना--सहाजिकपणे ह्या बाबतीत वैषम्य वाटू लागले. हळूहळू हा विषय वादग्रस्त होऊ लागला, आणि त्यात कोणाचा काय इलाज! जनतेची सेवा हीच

ईश्वराची सेवा असे ब्राह्म आणि प्रार्थना समाज नेहमी ओरडून सांगत आहे. हरिजनसेवा करण्यात प्रार्थना समाजाची सेवा मी विशेष उत्कटतेने करीत आहे असेही मन:पूर्वक वाटत होते. पण मी मिशनमध्ये वेळ न खर्चता समाजालाच चिकटून रहावे असा व्यक्तिश: मजसंबंधी वाद सुरू झाला; तेव्हा माझी स्थिती नाजूक झाली. मला दगदग, चिंता पडत होती; त्यांत आत्मसमर्थनाचा बोजा माझ्यावर येऊ लागला. तो जड वाटू लागला. मिशनांची आणि समाजाची दोन्ही कामे मी सांभाळीतच होतो.

माझ्या पाठीमागे माझे परम मित्र वासुदेवराव सुखटणकर हे मँचेस्टर कॉलेजात धर्मशिक्षणार्थ गेले. इंग्लंडात दोन वर्षे राहून व जर्मनीत आणखी दोन वर्षे राहून १९०७ साली ते मुंबईस परत आले आणि प्रार्थना समाजाच्या प्रचाराची जबाबदारी त्यांनी अंगावर घेतली. पण योगायोग असा आला की, त्यांनी हे काम वर्ष-सहा महिन्यांतच सोडून दिले. म्हणून माझ्यावर प्रार्थना समाजाच्या कामाचा बोजा पडल्याने मी तिकडे अधिक लक्ष पुरवावे हे म्हणणे सकृद्दर्शनी संयुक्तिक होते. तरी पण समाजातील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि बहुतेक सभासद यांना कळून चुकले होते की, मिशनच्या कामातून माझी सुटका होणे केवळ अशक्य होते. म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारची हरकत घेतली नाही; इतकेच नव्हे तर सालोसाल अधिक नेटाने सहकार्य केले.

टिळकांस शिक्षा : वादाचे तिसरे एक कारण उद्‌भवले. हिंदुस्थानच्या राजकारणात राष्ट्रीय पक्ष आणि प्रागतिक पक्ष असे दोन भेद पडून एकाचे लक्ष समाजसुधारणेकडे आणि सरकारशी जुळते घेऊन काम करण्याकडे अधिक तर दुसऱ्याचे लक्ष राजकीय यशाकडे आणि तेही सरकारशी विरोध करून, निदान फटकून राहून, मिळण्याकडे होते. आणि मला तर माझ्या कामात मग ते प्रार्थना समाजाचे असो, मिशनचे असो की इतर कोणते असो, होता येईल तो सर्वांचे सहकार्य मिळविणे अवश्य होते. इतकेच नव्हे तर माझेही मतस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य कोणतीही आपत्ती आली तरी पूर्ण राखून ठेवण्याच्या हक्काला मी कधीही बाधा येऊ दिली नाही. पडेल तो त्याग करणे, येतील त्या संकटांना तोंड देणे, ह्या बाबतीत घरादाराचाही मुलाहिजा न राखणे ही गोष्ट वेगळी. पण स्वत:चे व्यक्तिस्वातंत्र्य घालवून घेऊन, आपले व्यक्तित्वच नष्ट करून घेणे ही गोष्ट वेगळी. राजकारणात माझे मत आणि कल पूर्णत: राष्ट्रीय बाजूकडे होता. तथापि मी कोणत्याही पक्षाशी तादात्म्य पावलो नाही. पण मत स्पष्ट सांगावयाला आणि तद्‌नुरूप वागायला मी कधीही कचरलो नाही. माझी मते प्रार्थना समाजावर लादण्याचा आणि प्रार्थना समाजाची राजकारणातील प्रागतिक बाजूची मते इतरावर लादण्याचा मी कदापिही प्रयत्न केला नाही.

पण एकदा एक चमत्कारिक योग आला. १९०७ च्या सुमारास लोकमान्य टिळकांनी मद्यपाननिषेधाची प्रचंड धामधूम उठविली. तीत सर्व पक्षांनी आणि काही ख्रिश्चन मिशनरीसारख्या लोकांनी भाग घेतला. अशाच वेळी सुरत येथे झालेले काँग्रेस अधिवेशन लोकमान्यांनी उधळून लावून काँग्रेसला आपल्या कक्षेत खेचले. त्यामुळे ते सरकारच्या विशेष डोळ्यांवर आले. लवकरच त्यांच्यावर खटला होऊन त्यांना सहा वर्षे कारावासाची जबर शिक्षा झाली. शिक्षा फार निष्ठुर झाली, म्हणून पुष्कळांना तिचा फार चटका लागला. मद्यपाननिषेधाची चळवळ आणि त्यात कुठे कमीजास्त बोलल्याबद्दल ही शिक्षा. त्याबद्दल मलाही फार वाईट वाटत होते. शिक्षा झाल्यावर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

वळविले. ते म्हणाले, "हिंदुस्थानातील निरनिराळ्या मिश्र जातींना एकत्र करुन लवकरच हिंदुस्थानात एकराष्ट्राची उभारणी करावी हा सरकारचा हेतू आणि कर्तव्य आहे. हे कार्य सर्वत्र चालू झाल्याची लक्षणे हल्ली दिसत आहेत. त्यात भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे कार्यामुळे हिंदुस्थानात विश्वबंधुत्त्व निर्माण होत आहे. त्याचा मी येथे विशेष उल्लेख करतो. इंग्लंडांतील पुष्कळ कॉलेजांकडून अशा मिशनसाठी मिशनऱ्यांचा पुरवठा होत आहे. तुम्ही देखील ह्या बाबतीत आपला शक्य तो वेळ पुरवून पुणे येथील कार्याला मदत कराल तर बरे होईल."

मिशनचा बक्षीससमारंभ : मिशनच्या ४ थ्या बक्षीस-समारंभानिमित्त ५ दिवस उत्सव करण्यात आला. त्यात चोखामेळ्याचे प्रसिद्ध हरिदास धोंडीबा सासवडकर यांची कन्या प्रसिद्ध कीर्तनकार सौ. बायजाबाई हिची तीन कीर्तने करण्यात आली. भायखळा येथील मदनपुरा मोटारस्टॅंडवर भव्य मंडप घालण्यात आला होता. त्यात मुंबई येथील सर्व जातीचे गिरणीकामगार आणि अस्पृश्यवर्ग ह्यांच्या स्त्रीपुरुषांची अलोट गर्दी जमली होती. बाईची कीर्तने बहुजनसमाजास इतकी आवडली की, तिसरे दिवशीची रात्रीची गर्दी अनावर झाली. मांडवाचे खांब पाडून गर्दी आत शिरू लागली. मांडव जमीनदोस्त झाल्याने कीर्तन बंद करावे लागले. दुसरेच दिवशी मुख्य समारंभाचा दिवस असून ना. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क हे अध्यक्षस्थान स्वीकारणार होते. आयत्यावेळी त्यांची कन्या वारल्यामुळे गेल्या वर्षी विरस झाला होता. त्याची पुरावृत्ती ह्या वर्षी हा मंडप पडल्यामुळे होते की काय अशी भीति वाटू लागली. मिशनचे उत्साही कार्यकर्ते रा. अमृतलाल ठक्कर, त्या वेळचे मुंबई कार्पोरेशनचे इंजिनियर यांनी रात्रीचा दिवस करून शेकडो मजूर लावून पहिल्यापेक्षांही चांगला मंडप दुसरे दिवशी दुपारचे आत उभा करून बैठकीची जय्यत तयारी करून दिली. गावातील नामांकित लोकांची गर्दी उसळली होती. सर नारायणराव यांनी गव्हर्नरसाहेबांचे योग्य स्वागत केले.

संशयाचे निराकरण : नामदार गव्हर्नरांनी या वेळी केलेल्या सहानुभूतीपर भाषणाचे खालील उद्‌गार चिरकाल संस्मरणीय राहतील. "ह्या मिशनचे काम दुहेरी. एका बाजूस वरिष्ठ वर्गाचे लक्ष अस्पृश्यवर्गाच्या दु:खाच्या कहाणीकडे वेधणे, दुसऱ्या बाजूला ह्या अस्पृश्यांना शिक्षण देऊन वर आणणे. माझ्यापूर्वीचे एक प्रसिद्ध गव्हर्नर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यांनी आपल्या मार्च १८२४ च्या खलित्यांत अस्पृश्यांविषयी असे स्पष्ट म्हटले की, ह्या अस्पृश्य वर्गाचे लोक संख्येने अत्यंत मोठे आणि अत्यंत तिरस्कृत गणले गेले आहेत. ब्रिटिश सरकारने जर ह्यांना शिक्षण दिले तर ते उपयुक्त ज्ञानामध्ये शिखरावर बसतील; पण इतर वरिष्ठ वर्गाचा त्यांच्याबद्दलचा तिरस्कार कायम राहील आणि शिक्षण घेऊन हे ज्ञानसंपन्न झाले असता ह्यांचा तिरस्कार करणाऱ्या बहुजनसमाजाला एका बाजूस ठेवून ह्या तिरस्कृत पण नवीन सुशिक्षितांना आम्हाला हाताशी धरावे लागेल. ८७ वर्षापूर्वीच्या मोठ्या मुत्सद्द्याचे हे उद्‌गार आहेत. ह्या तिरस्कृत वर्गास जर आम्ही शिक्षण देऊ तर प्रत्यक्ष शिक्षणाचाच वरिष्ठ लोक तिरस्कार करू लागतील अशी भीती ह्या मुत्सद्द्याला पडली होती. आता भारतात किती बदल झाला आहे. तेव्हा भारतीयांच्या मनात कोणत्याही प्रकारचा किंतु येऊ न देता शिक्षण द्यावे लागत होते. आता काही झाले तरी शिक्षणाचा मगदूर आणि पात्रता न पाहता शिक्षण घ्या अशी एकच ओरड सुरू झाली आहे. आता तुमच्या मिशनची इच्छा आहे की, अस्पृश्यवर्गानाही त्या शिक्षणाचा पूर्ण वाटा मिळावा."

मात्यापित्यांचे कार्य : वार्धक्यातील आणि व्याधींच्या वेदना सोसूनही माझी आई व बाबा महारवाड्यात घाणेरड्या वस्तीत स्वतः राहून मला मदत करीत असत. मला मात्र प्रार्थना समाजाच्या कामकाजाच्या कामासाठी राममोहन राय आश्रमात राहावे लागे. पुढे मिशनची आर्थिक स्थिती सुधारून सुसंघटित वसतिगृहे सुरू झाली. पण त्यापूर्वी अस्पृश्यांची पोरकी आणि होतकरू मुले आमच्या निराश्रित सेवासदनात येत. ती वयाने लहान असत. त्याचे संगोपन करण्याचे काम माझ्या आईने आनंदाने पत्करले होते. मिशनच्या विद्यार्थांसाठी हितचिंतकांकडून जे जुने कपडे येत त्यात काही चांगली लुगडी येत. ती कापून त्यांचे लहान लहान परकर, पोलकी, अंगडी, टोपडी वगैरे करण्याचे काम आई काटकसरीने करीत असे. टायपिस्ट आणि कारकून हे पुढे मिशनला मिळाले. पण त्यापूर्वी मिशनच्या सन्माननीय खजिनदाराच्या हाताखाली पद्धतशीर हिशोब लिहिणे, ऑडिटसाठी पावत्यांची जंत्री करून ठेवणे वगैरे तपशिलाचे व दगदगीचे काम माझे बाबा चोख करीत. ह्या कामात जमखंडी संस्थानात त्याची ख्याती चांगली असे. ही कामे करीत असताना ह्या दोघांच्या पवित्र मनाला वेतनाच्या विचाराचा स्पर्शही झाला नाही. पण ह्यापेक्षा विशेष म्हणजे मिशनच्या कामी माझ्या सत्त्वाची एकसारखी पारख चालली असता मला माझ्या आईबापांचा मोठा आश्रय असे. तो असा एकदम तुटल्यामुळे मी एखाद्या पोरक्याप्रमाणे हवालदील झालो.

अशी ही अंतर्बाह्य खळबळ उडून मी वर सांगितल्याप्रमाणे १९१० नोव्हेबरात प्रार्थना समाजाच्या वेतनाच्या बंधनातून सुटलो. त्या वेळपर्यंत मी राममोहन आश्रमात राहात होतो. मी होऊनच वेतन नाकारले; आश्रमाचा फायदाही मी होऊनच नाकारावा हे स्पष्ट दिसले. आश्रम ज्या उदार गृहस्थाने समाजाला दिला त्या शेठ दामोदरदासांनी मी आश्रम सोडून जाऊ नये अशी मला गळ घातली. पण शरिराच्या स्वास्थाला मानसिक शांतीचीच अधिक जरुरी असते. म्हणून मी बांद्रा येथे मोकळ्या हवेत एक लहानशी जागा भाड्याने घेतली आणि आश्रमाला रामराम ठोकला. परंतु समाजातील सलोखा मी बिघडू दिला नाही. समाजाचे चिटणीस, माझे मित्र रा. द्वा. गो. वैद्य ह्यांनी माझ्या योगक्षेमाची जबाबदारी व्यक्तिशः आपल्यावर घेतली. समाजातील आणि बाहेरच्या काही थोड्या चाहत्या मंडळीकडून खासगी रीतीने वर्गणी जमा करून माझ्या या मित्राने पुढे दोन वर्षे माझी तरतूद राखली. कोणाकडून वर्गणी जमविली हे त्याने मला मुळीच कळू दिले नाही. मात्र माझ्या स्वातंत्र्याला आणि सुधारणाकार्याला बाध न येईल अशा कराराने ही मदत करावी अशी अट मी घातली होती. ती ह्या भल्या मित्राने पूर्णपणे पाळली. अशा रीतीने ६० रु. दरमहा नियमाने येऊ लागले, आणि माझ्या संसाराचे गाडे चालले.

●●●

भाग तिसरा

१

आयुष्यातील परिवर्तन

माझ्या आयुष्याचे साकल्येकरून निरीक्षण केल्यास त्यात खालील चमत्कारिक योगायोग येऊन प्रत्येक दहा वर्षांनी एक निश्चित परिवर्तन घडून आल्याचे दिसून येत आहे. मी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केलेला नाही. पण निश्चितकाली झालेली ही परिवर्तने पाहून त्यांच्या मुळाशी काही ग्रहलाघव आहे असा एखादा ज्योतिषशास्त्रज्ञ सांगू शकेल. माझ्या जन्मकाळीच म्हणजे ता. २३ एप्रिल, १८७३ रोजी आमच्या गृहपुरोहिताने माझी सशास्त्र जन्मपत्रिका वर्तवली. ती मी खाली जशीच्या तशी देत आहे.

जन्मपत्रिका : स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १७९५ प्रवर्तमाने श्रीमुखनाम संवत्सरे।। चैत्र वद्य ११ बुधवार घटी १५ पळ १ शततारानक्षत्र घटी ० पळ ५८।। ब्रह्मनामयोग घटी ९ पळ ४८ नराकर्ण घटी १५ पळ २८ एवं पंचांगशुद्धौ।। अस्मिन् शुभदिवसे रामबसप्पा तस्य भार्या कुंकुमोक्तसौभाग्यवती यमुनाबाई तृतीय (पंचम संतानं अथवा चतुर्थ पुत्रः V. R. Shinde) मजीजनत्॥ अवकहडाचक्रानुसारेण जननकाल घटी सूर्योदयानंतर १४ घटिका प्रसूतकालाः॥ पूर्वाभाद्रपदा नक्षत्र प्रथम चरण॥ जन्मनामशंक्रप्पाइति॥ शेशिगिरीइतिप्रतिष्टितं॥ कुंभराशीमहानक्षत्रमुखं पतति उत्तमं।। मुखेअन्नसुखंचैवशीर्षोराजंश्वमेवच। मनुष्यगण। हारणी जाति॥ आजायोनी॥ जन्मकालेशिंहलग्न॥ जनकाले गुरू महर्दश॥ ..... जन्मापासून सोळा वर्षापर्यंत सर्व गोष्टी उत्तम प्रकार होईल।। १२, १७, २१, ३२, ४२, ४३ येतेषुशुभगृहावलोकिते॥ आयुष्य ८०॥ मातापितृसेवकः॥ विद्यावंतः॥ बहुजनप्रियः॥ देवब्राह्मणद्विजपूजिकः॥ श्रीमंगलमाहेश्वरी शुभं भवतु॥ तदेव लग्नं॥ शुभमस्तु॥ कल्याणमस्तु॥

जन्मकुंडली



राशिकुंडली



वरील अशुद्ध लेखनावरून पुरोहितबुवा फारसे मोठे भाषापंडित होते असे दिसत नाही. त्यांचे ज्योतिषशास्त्रपांडित्य किती होते हे सांगण्याचा मला अधिकार नाही. कुंडलीमध्ये काही दोषस्थळे आहेत असे माझ्या तज्ज्ञ मित्रांनी सांगितले. फलश्रुतीच ताडून पहावयाची तर वर जी माझ्या आयुष्यातली वर्षे शुभग्रहाची म्हणून सांगितली आहेत त्यांचा मला तरी तसा अनुभव आला नाही. काही वर्षे तर मला उलट अनुभव आला आहे. ते कसेही असो. माझ्या आयुष्यात निश्चितपणे प्रत्येक १० वे वर्षी जी ठळक स्थित्यंतरे आढळून आली त्यावरून पुढील परिवर्तनकाल मी ठरविला आहे तो असा :--

ता. २३ एप्रिल, १८७३ जन्मकाल

परिवर्तन १ ले :--१८८२-८३ माझा विवाह. वडिलोपार्जित घर गहाण ठेवून विवाहाप्रीत्यर्थ कर्ज. त्यापायी सर्व मिळकत जाऊन भयंकर दारिद्र्यप्राप्ती. वडील बंधूचा मृत्यू. प्राथमिक शिक्षण संपले.

परिवर्तन २ रे :--१८९२-९३ दुय्यम शिक्षण संपले. पहिली नोकरी सुटली. कॉलेजशिक्षणार्थ पुण्यास आलो.

परिवर्तन ३ रे :--१९०३ विलायतेतील शिक्षण संपवून मुंबईस परत आलो. सार्वजनिक सेवेची सुरुवात.

परिवर्तन ४ थे :--१९१२-१४ अंतर्बाह्य खळबळ, प्रार्थनासमाजाचा संबंध सुटला. भारतीय निराश्रीत साह्यकारी मंडळीचे पहिल्या सहा वर्षाचे अर्धे तप संपले. मुंबई शहराची वस्ती सोडून पुणे शाखेची व्यवस्था प्रत्यक्ष ताब्यात घेतली. मग त्यासाठी पुण्यास येऊन राहिलो.

परिवर्तन ५ वे :--१९२३-२४ निराश्रित साह्यकारी मंडळीचा (डी. सी. मिशनच्या प्रत्यक्ष चालकत्वाचा) संबंध सुटला. कलकत्त्यास गेलो. ब्राह्मसमाजाचा पुन्हा प्रचारक झालो. हिंदुस्थानच्या नैऋत्य किनाऱ्यावरील मंगळूर येथील ब्राह्मसमाजाचा आचार्य झालो.

परिवर्तन ६ वे :--१९३३-३४ राममोहन रॉय शतसांवत्सरिक तिथी प्रीत्यर्थ महाराष्ट्रात व बृहन्महाराष्ट्रात थेट नागपूरपर्यंत जिल्ह्या-जिल्ह्यातून व काही तालुक्यातूनही व्याख्यानांचा मोठा दौरा काढला. शीण इतका आला की मधुमेहाची तीव्र व्यथा झालेली आढळली. हल्ली वार्धक्य आणि आजार यांच्या ताब्यात गेलो आहे.

परिवर्तन ७ वे :--१९४३ ह्या साली किंवा त्या अगोदर काय होणार हे अस्पष्ट दिसतच आहे.

वरील जी परिवर्तने झाली त्यात स्थानांतर आणि स्थित्यंतर ही मुख्य लक्षणे होती.

१९०९-१० साली जी अंतर्बाह्य खळबळ म्हणून वर्णन केले आहे, ती १९१२-१३ चे जे ४ थे परिवर्तन घडले त्याची पूर्वतयारी होती. आई-बाप वारले, योगक्षेमाचे साधन नाहीसे झाले. घरातील सगळी मंडळी रोगग्रस्त झाली, मी फार कंटाळून गेलो; तरीदेखील आणखी दोन वर्षे मिशनच्या कामासाठी मुंबईतच काढावी लागली. मुंबई आणि पुणे येथे मिशनला स्वतःच्या इमारतींची फार जरुरी भासू लागली. पण पुरेशी स्वतःची जागा मुंबईसारख्या दाट शहरात मिशनला मिळणे अशक्य होते. सरकारलाच स्वतःच्या कचेऱ्यासाठी जागा मिळेना. मुंबई शहरातील लंबरेषेत वस्ती पसरू लागली. मग आमच्या गरीब मिशनची दाद कोण घेणार? मुंबई शहराचा अवाढव्य खर्चिकपणाही

२

अहल्याश्रमाची तयारी

लेडी विलिंग्डन : १९१३ साली मी पुण्यास येऊन राहून लागल्यावर मुंबईचे गव्हर्नरचे जागी लॉर्ड विलिंग्डन हे आले. त्यांची उत्साही पत्नी लेडी विलिंग्डन यांच्या कानावर माजी गव्हर्नरकन्या ख्रिस्तवासी मिस् व्हायोलेट क्लार्क हिची हकिकत गेली असावी. लेडी विलिंग्डन ह्या पुण्यास राहण्यास आल्याबरोबर पुण्यातील मिशनचे काम समक्ष पाहण्याची इच्छा त्यांनी मला पत्राने कळवली. मला मिस् क्लार्कची आठवण झाली. मोठमोठ्या परकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या घरच्या मंडळींचे कसे सहकार्य असते ह्याची मला खात्री पटली. लागलीच मी एक मिशनची जाहीर सभा बोलावली. मोठा शामियाना घातला. अस्पृश्य बायकामुले व त्यांच्या मदतीला वेळोवेळी येणाऱ्या गावातील प्रतिष्ठित स्त्रियाही बोलावल्या. ठरल्या वेळी नियमितपणे लेडी विलिंग्डन शामियानात आल्या. जमलेला मोठा मिश्र समाज पाहून त्यांना आश्चर्य वाटले. प्रमुख स्त्रीपुरुषांचा परिचय झाल्यावर कामाची अपूर्वता पाहून त्यांना आनंद वाटला. शाळेची टापटीप, विद्यार्थ्यांची प्रसन्न वदने, विशेषत: त्यांची चित्तवेधक व तालसुरावर झालेली कवाईत पाहून बाई रममाण झाल्या. पुणे शाखेच्या अस्पृश्य मुलांना कवाईत शिकवण्यासाठी अस्पृश्यवर्गाचाच लष्करी पेन्शनर मिळत असे. बँडच्या चालीवर निशाणीची कवाईत तो फार उठावदार करी. कवाईत संपल्याबरोबर लेडी विलिंग्डन माझ्या कानात विनोदाने म्हणाल्या, "मि. शिंदे हे गरीब लोक पुढे एके काळी हिंदस्थानचे राजे होतील!" तितक्याच विनोदाने मी उत्तर दिले, "बाईसाहेब, आपला आशीर्वाद खरा होणार यात मला तिळमात्र संदेह नाही. पण हे लोक राजे झाल्यावर आपण आपली तशरीफ कोठे न्याल?" बाई मन:पूर्वक हसल्या. पुढे लॉर्ड विलिंग्डनने मिशनला जी वेळोवेळी उदार मदत केली आणि मिशनच्या चालकांशी मिळून वागले त्याचे हे पूर्वचिन्ह होते.

आश्रमासाठी जागा : ह्यापुढे मी ह्या शाखेच्या स्वतंत्र इमारतीच्या तयारीला लागलो. त्याप्रीत्यर्थ श्रीमंत सर तुकोजीराव होळकरांकडून २०००० रु. ची रोख देणगी मिळाली होती. देणगीतून पुणे शाखेसाठी ज्या इमारती व्हावयाच्या होत्या त्यांना "अहल्याश्रम" हे नाव देण्याचे ठरले होते. त्या आश्रमासाठी प्रशस्त जागा हुडकू लागलो. नानाच्या पेठेत जेथे हल्ली पोलीस क्वार्टर्स आहेत त्याच्या उत्तरेला भोकरवाडी म्हणून अस्पृश्यांची एक कंगाल वस्ती आहे. ती त्या वेळी अत्यंत गलिच्छ स्थितीत होती. तिच्या आजूबाजूस जवळजवळ दोन फर्लांग मैदानाची उघडी जागा होती. ते सर्व स्थळ इतके उजाड आणि भयाण दिसत होते की, दिवसाढवळ्या तेथे जाण्याला कोणी धजत नसत. खाचखळगे, काटेखडेच नव्हे तर जनावरांच्या हाडांचे मोठमोठे सापळे, चिंध्या, मोडके डबे वगैरे कंगालांच्या संपत्तीचे हे मैदान एक उघडे भांडारच होते. हल्ली ज्याला 'आर्यार्विन रोड' म्हणून मोठे आढ्यतेचे नाव आले आहे त्यावर पोलीस लोकांच्या वस्तीचे ठाणे असूनही हा

३

नागपूर व हुबळी शाखा

नागपूर शाखा : मुंबई इलाख्यात मुंबई, पुणे, हुबळी वगैरे अंगभूत शाखा आणि त्यांच्या उपशाखांचे येणेप्रमाणे बस्तान बसल्यावर माझे लक्ष नागपूर येथे सर्व मध्यप्रांतासाठी मिळून एक अंगभूत शाखा काढण्याकडे लागले. कोल्हापुरचे वकील रा. गणपत कृष्णाजी कदम ह्यांनी ह्या कामी स्वत:ला वाहून घेण्याचे कबूल केले. अमरावती, अकोला, यवतमाळ वगैरे ठिकाणी संलग्न शाखांची कामे ह्यापूर्वीच चालू होती. राजधानीचे ठिकाण नागपूर येथे ह्या प्रांताची मध्यवर्ती शाखा उघडून ह्या संलग्न शाखा तिच्याकडे सोपवून एक प्रांतिक नवीन अंगभूत शाखा उघडण्याची वेळ ठेपली होती. १९१४ च्या उन्हाळ्यात मी एकटाच नागपूरला गेलो. नागपूर शहराची परिस्थिती पाहून निधी मिळविण्याचा अंदाज करणे हा उद्देश होता. तेथील प्रागतिक पक्षाचे वृद्ध पुढारी रा. ब. वामनराव कोल्हटकर यांच्या घरी मी उतरलो. त्यांनी माझे फार प्रेमळपणे स्वागत केले. उन्हातान्हातून मला घरोघर नेऊन त्यांनी आपल्या वजनदार मित्रांचा परिचय करून दिला ; थोडीबहुत आरंभीची मदतही मिळवून दिली. ह्या गोष्टीने उत्तेजन मिळून पुढे लवकरच रा. कदम यांना बरोबर घेऊन मध्यप्रांतातील हिंदी जिल्ह्यातून पूर्वतयारीसाठी आणि निधी जमवण्यासाठी एक विस्तृत दौरा मी काढला. भंडारा, बालाघाट, जबलपूर, रायपूर, विलासपूर आणि उत्तर हिंदुस्थानात सागर व दमोह वगैरे ठिकाणी माझी आणि रा. कदम यांची व्याख्याने झाली. सुमारे ४००० रु. ची मदत मिळाली. दमोहहून कदमांना नागपूरकडे परत पाठविले आणि मी पुढे एकटाच भोपाळ, देवास, इंदूर आणि धार या संस्थानिकांच्या भेटी घेऊन आणि सहानुभूती घेऊन मुंबईला परत आलो. नागपूर येथे पुन्हा जाऊन एंप्रेस मिलचे मॅनेजर सर बेझनजी यांची गाठ घेऊन त्यांच्या मालकीची पाचपावली येथील चाळीपैकी एक चाळ मिशनकडे घेतली. सर मोरोपंत जोशी, ना. मुधोळकर वकील, वामनराव कोल्हटकर, डॉ. ल. वि. परांजपे, नामदार नियोगी वगैरेची एक कमिटी नेमण्यात आली. पुढे लवकरच प्लेगची साथ उद्‌भवून कामात मोठाच अडथळा आला. रा. कदमांकडून हे काम निभवेना म्हणून स्थानिक कमिटीच्या तक्रारीवरून त्यांना कमी करून त्यांच्या जागी रा. सय्यद अबदुल कादर यांची हुबळीहून सहकुटुंब रवानगी करण्यात आली. त्यांनी पाचपावली येथे वर सांगितलेल्या चाळीत एक वसतिगृह म्हणून तेच आपले राहण्याचे ठिकाण मुक्रर केले आणि तेथून अमरावती, अकोला, यवतमाळ वगैरेंकडील संस्थांची देखरेख आपल्याकडे घेतली.

हुबळी शाखा : रा. सय्यद यांची रवानगी हुबळी येथून नागपूरला करण्यात आल्याने त्या शाखेची जबाबदारी घेण्याला कोण तरी तज्ज्ञ अधिकाऱ्याची नेमणूक करणे भाग पडले. रा. दामोदर नारायण पटवर्धन ह्यांची तयारी पुणे येथील कामात पूर्ण झाल्याचे दिसून आले. हुबळी येथील

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

४

राजकारणाची सुरुवात

१९१४ सालच्या महायुद्धामुळे सरकारचे, शेटसावकराचे, पुढाऱ्यांचे आणि जनतेचेही लक्ष देशाबाहेरच्या गोष्टींकडे लागले. सरकारची सहानुभूती पददलित म्हणून अस्पृश्यवर्गाकडे होती, ती आता आणखी एका कारणामुळे अस्पृश्यांकडे विशेष लागली. अस्पृश्य लोकांनी, विशेषत: महार व चांभार जातींनी ब्रिटिश लष्करात फार चांगली कामे केलेली आहेत. दक्षिण देशातील पारिया वगैरे पलटणींनी लॉर्ड क्लाइव्हच्या कालापासून लष्करी कामगिरीत प्रसिद्धी मिळवलेली आहे; पण पुढे बराच काळ शांतीत गेल्यामुळे या गरीब लोकांना लष्करात मिळालेले स्थान टिकून राहिले नाही. हा इतिहास स्वतंत्रपणे अभ्यासण्यासारखा आहे. २० व्या शतकाच्या आरंभापासून विशेषत: महार जातीय पुढाऱ्यांनी ह्या बाबतीत उचल खाल्ली होती. शांतीच्या काळात कमी केलेल्या पलटणी पुन्हा सुरू कराव्यात अशा प्रकारचे अर्ज गव्हर्नर, व्हाइसरॉय, स्टेट सेक्रेटरी यांच्याकडे वेळोवेळी करून पाहिले होते. पुण्याचे शिवराम जानबा कांबळे, पनवेलचे सुभेदार मेजर वलंगकर वगैरेंनी ह्या बाबतीत पुढाकार घेतला होता. अर्थात या युद्धाच्या वेळी सरकारला रिक्रूटांची आवश्यकता लागली. तेव्हा मराठ्यांबरोबर महारांचाही जयजयकाराचा ध्वनी उमटू लागला. मुंबई व पुणे येथील टाऊन हॉलमध्ये चालू युद्धाकडे अस्पृश्यांचे लक्ष वेधण्याकरिता मोठमोठ्या जाहीर सभा होऊ लागल्या. मिशनचे काम ह्या वर्गाची सर्व बाजूंनी उन्नती व्हावी--मग ती शैक्षणिक असो, सामाजिक असो किंवा राजकीय असो; सरकारसंबंधी असो किवा सनातनी धर्माधिकाऱ्यांसंबंधी असो--चोहीकडून सतत चालवणे हे होते. म्हणून ह्या युद्धामुळे ह्या वर्गाच्या राजकारणी महत्त्वाकांक्षेला नवीन अंकुर फुटू लागले. ते वाढीस लावणे मिशनला क्रमप्राप्तच होते.

लखनौ पॅक्ट : महायुद्धाला जसजसा रंग चढू लागल तसतसा भारतीय वरिष्ठ वर्गाच्या पुढाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षेला नवीन वळण लागू लागले. १९१६ साली लखनौला काँग्रेस भरली त्या वेळी हिंदुस्थानातील जे निरनिराळे पक्ष होते त्यांच्यात दृढ ऐक्य व्हावे अशी गरज भासू लागली. युद्धाचे शेवटी विलायत सरकारपुढे हिंदुस्थानसाठी अधिक हक्क मागण्याचे कामी, ह्या मागण्या एकमुखाने व्हाव्यात म्हणून, हे ऐक्य आवश्यक होते. हिंदुस्थानातील मुख्य पक्ष म्हणजे हिंदू आणि मुसलमान. ह्यांना एकमेकांजवळ ओढण्याचा प्रयत्न काँग्रेसला करावयाचा होता. म्हणून लखनौच्या अधिवेशनात हिंदू-मुसलमानांचा लखनौ पॅक्ट (गट्टी) हा इतिहासप्रसिद्ध बनाव तयार झाला. पुण्याचे लोकमान्य टिळकांची या वेळी मोठी चलती होती. त्यांनी ह्या गट्टीत पुढाकार घेतला होता ; पण ही गट्टी नुसती हिंदू-मुसलमानांपुरतीच होऊन कार्य भागणारे नव्हते. हिंदूमध्ये जे अनेक पंथ व जाती आहेत त्यांच्यातही ऐक्य व्हावयाला पाहिजे होते. पण ज्या वर्गात राजकारणाबद्दल जागृतीच नाही

आहे. तेव्हा ह्या समाजाची जागृती तर एका बाजूने व्हावीच; पण त्या जागृतीमुळे महाराष्ट्रात फूट न पडावी. उलट ब्राह्मणांपासून तो अस्पृश्यांपर्यंत हे जागृतीचे व ऐक्याचे लोण खाली उतरावे, आणि ह्या हेतूने मध्यवर्ती मराठ्यांना जागे करावे हा विचार सतत माझ्या मनात घोळू लागला. पुढे लवकरच "मराठा राष्ट्रीय संघ" या नावाची संस्था उघडण्यात आली. त्या संघाचे एक जाहीर पत्रक छापून प्रसिद्ध करण्यात आले. त्यात आरंभी खालील मजकूर आहे.

मराठा राष्ट्रीय संघ : "हल्ली आपल्या देशात जी जोराची राष्ट्रसुधारणेची चळवळ चालू आहे तिच्यामुळे लहानथोर समाजामध्ये चांगली जागृती झाली आहे. आपल्या महाराष्ट्रात केवळ संख्येनेच नव्हे तर इतर अनेक कारणांमुळे मराठा समाज हा एक प्रमुख समाज आहे. गतकालात तर हा समाज सर्व महाराष्ट्राचा पोशिंदा होता असे पूर्वेतिहास सांगत आहे. हल्ली देखील शेती, शिपाईगिरी आणि गिरण्यातील कष्टसाध्य काम वगैरेंच्या दृष्टीने देशाच्या पोषणाचीच नव्हे तर त्याच्या संरक्षणाचीही मुख्य जबाबदारी ह्याच इतिहासप्रसिद्ध समाजावर अवलंबून आहे; आणि ही जबाबदारी पार पाडण्यात ब्रिटीश साम्राज्याच्या संरक्षणाचे कामी देखील मराठ्यांनी माघार न घेता आपले रक्त ओतून सक्रीय राजनिष्ठा प्रकट केली आहे. अशा हल्लीच्या आणीबाणीच्या स्थितीमध्ये मराठ्यांनी सर्वसाधारण राष्ट्रीय बाबीसंबंधी उदासीन किंवा अज्ञानी राहणे मुळीच श्रेयस्कर नाही. इतकेच नव्हे, तर मराठ्यांचे विशेष हितसंबंध, गरजा किंवा अडचणी असतील त्यांची उज्ज्वल जाणीव त्यांच्यात असणे, हे केवळ त्यांच्याच नव्हे तर राष्ट्राच्या हिताला पोषक आहे; कारण वर निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या वरील राष्ट्रीय जबाबदारीवरून त्यांचे हितसंबंध म्हणजे पर्यायाने राष्ट्राचेच हितसंबंध आहेत असे दिसून येईल.

वरील सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून पुणे येथील प्रमुख मराठा मंडळींची एक प्रास्ताविक सभा रा. गोविंद कृष्णाजी बोत्रे, रा. त्रिंबक हरी आवटे व रा. काशिनाथ ठकूजी जाधव, रा. नरहर गोविंद शिंदे ह्यांच्या आमंत्रणावरून रा. बोत्रे यांचे वाड्यात ता. २६ ऑक्टोबर १९१७ रोजी सायंकाळी ५ वाजता भरली होती. त्या वेळी रा. नारायण ग्यानबा एखंडे ह्यांनी मंडळींच्या सूचनेवरून अध्यक्षस्थान स्वीकारले आणि त्यांच्या विनंतीवरून रा. विठ्ठल रामजी शिंदे यांनी साधारणतः हल्लीच्या परिस्थितीचे आणि विशेषतः मराठा समाजाच्या आजच्या कर्तव्याचे दिग्दर्शन केले. त्यानंतर रा. निंबाळकर, रा. गायकवाड, रा. त्रिंबकरव हरी आवटे, रा. जाधव वगैरेंची समयोचित भाषणे झाली. त्यानंतर सर्वांनुमते ह्या संघाचे राष्ट्रीय सभेला अनुकूल असे धोरण ठरून पुढील संघाचे पहिले काम म्हणून राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग ह्यांनी लखनौच्या बैठकीत स्वराज्याची जी एकत्र योजना ठरविली तिला पाठिंबा देण्यासाठी पुणे शहरात व भोवतालच्या भागात राहणाऱ्या सर्व पंथांच्या, जातीच्या व धर्माच्या लोकांनी सभा बोलवावी असे ठरले."

वर ठरलेली जंगी जाहीर सभा गुरुवार ता. ८ नोव्हेंबर १९१७ रोजी सायंकाळी येथील मराठा संघाच्या विद्यमाने शनिवारवाड्यापुढील भव्य पटांगणात भरली. तीत शहरातील सर्व जातीचे, धर्माचे व पंथांचे लोक उपस्थित होते. लखनौ येथे राष्ट्रीय सभेने पास केलेल्या स्वराज्याच्या योजनेस पुष्टी देणे हा या सभेचा उद्देश होता. सभेस सुमारे १०,००० पर्यंत लोकसमुदाय हजर होता. सभेचे अध्यक्षस्थान मजकडे आले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

झाला हा प्रकार ठीक झाला नाही असे टाइम्स ऑफ इंडियासारख्या पत्रालाही वाटले. इकडे हा असा प्रकार झाला तर तिकडे अकोल्यास महारांच्या परिषदेत निराश्रित साह्यकारी मंडळींचे आभार मानण्याचा ठराव पसार होऊन या संस्थेचे राजकीय धोरण आपल्याला पसंत नाही असा अव्यापारेषु व्यापार करणारा ठराव पास झाला आहे! ही मंडळी लोकहिताचे काम करण्यासाठी स्थापन झालेली आहे व हिच्यातील सर्व माणसांचे राजकीय बाबतीत मतैक्य नाही ह्या एका गोष्टीवरून संस्थेचे असे राजकीय धोरण असणे शक्य नाही हे कोणासही सहज कळण्यासारखे आहे. असे असता आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी ही कुचेष्टा करण्याची बुद्धी आमच्या महारबंधूंना झाली ह्याबद्दल आम्हाला फार वाईट वाटते. निराश्रित सहकारी मंडळी ही सरकारमध्ये नोंदलेली संस्था आहे हे पूर्णपणे माहीत असून तीतील काही मंडळींचे विचार संबंध संस्थेवर लादून संस्थेला राजकीय करण्याचा प्रयत्न करणे हे सरळ वृत्तीच्या माणसाला शोभण्यासारखे नाही."

●●●

५

अस्पृश्यतानिवारक संघ

हिंदुस्थानातील सर्व लोकांमध्ये राजकारणाची जागृती होऊ लागली. अशा वेळी ह्या मिशनला कोणत्याही राजकीय पक्षाशी तादात्म्य न पावता केवळ तिऱ्हाईत दृष्टीने मागासलेल्या लोकांच्या हितसंबंधाचा पुरस्कार करणे भाग पडले. हे राजकारणाचे काम मिशनच्या शैक्षणिक कामापासून निराळे ठेवून स्वतंत्र रीतीने चालविणे इष्ट होते. त्यासाठी एक निराळीच सहकारी संस्था काढणे जरूर पडले. म्हणून त्यासाठी पुणे येथे अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक संघ (All India Untouchability League) ही संस्था स्थापण्यात आली. तिच्या- द्वारे अस्पृश्यांसंबंधी वेळोवेळी जे राजकीय प्रश्न निघत, त्यांचा विचार आणि पुरस्कार करणे बरे पडेल म्हणून हा स्वतंत्र संघ काढला.

मिसेस् बेझंट : या वेळी डी. सी. मिशनकडे कित्येक राष्ट्रीय पक्षाच्या प्रमुख पुढाऱ्यांचे लक्ष वेधले होते आणि ते मिशनची वर्गणी देऊन कळकळीचे सभासदही झाले होते. याचे कारण मुंबई आणि पुणे या ठिकाणी राष्ट्रकार्यवाहकाचे ऐक्य व्हावे आणि बहुजनसमाज आणि अस्पृश्यांनी ह्या ऐक्यात भाग घ्यावा म्हणून वरील संघाने केलेले प्रयत्न होत. ह्या सुसंधीचा फायदा घेऊन सर्व पक्षांची आणि विशेषतः अस्पृश्य वर्गाच्या पुढाऱ्यांची एक अखिल भारतीय परिषद मुंबईला घडवून आणण्याचा मी प्रयत्न करू लागलो. १९१७ सालच्या अखेरीस कलकत्ता येथे जे काँग्रेसचे अधिवेशन भरले त्याचे अध्यक्षस्थान मिसेस् बेझंट ह्या बाईंनी स्वीकारले होते. ह्या थोर बाईंनी डी. सी. मिशनची मुंबईतील परळ येथील शाखा व वसतिगृहाचे काम स्वतः डोळ्यांनी पाहिले होते. म्हणून काँग्रेसमध्ये अस्पृश्यतानिवारणाचा एक ठराव आणव म्हणून मी त्यांना निकराची विनंती केली होती ह्यापूर्वी मी सतत १० वर्षे अशा प्रकारची विनंती काँग्रेसला केली असताही तिची दाद लागली नव्हती. थिऑसॉफिस्टांनी मद्रासकडे अस्पृश्यांसाठी पुष्कळ काम केले होते. ह्या बाईंच्या वजनामुळे माझ्या विनंतीस मान देऊन हा ठराव काँग्रसने प्रथमच पास केला.

काँग्रेसचा ठराव : ही राष्ट्रीय सभा हिंदुस्थानातील सर्व लोकांस अशी जाहीर विनंती करते की, अस्पृश्यवर्गावर आजपर्यंत जो अनन्वित जुलूम होत आहे तो ताबडतोब बंद करण्यात यावा. हा ठराव मद्रासचे जी. ए. नटेशम् यांनी मांडला. कलकत्त्याचे एस्. आर. बमनजी यांनी त्यास अनुमोदन दिले. पुण्याचे रा. एस्. के. दामले आणि कालिकतचे मि. मंजेरी रामय्या यांनी पुष्टी दिली. हा ठराव सर्वानुमते पास झाला. ह्यानंतर मोठमोठ्या राष्ट्रीय मंडळींनी मिशनच्या कामात सक्रीय भाग घेण्यास सुरुवात केली.

अस्पृश्यतानिवारक परिषद : ता. २३ मार्च, १९१८ रोजी श्रीमंत सयाजीरावमहाराज यांच्या अध्यक्षत्वाखाली अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषदेला सुरुवात झाली. चौपाटीजवळील फ्रेंच ब्रिजनजिकच्या पटांगणात भव्य मंडप घालण्यात आला होता. हिंदुस्थानातील प्रमुख पुढाऱ्यांना आमंत्रणे दिली गेली होती. स्वागत मंडळाचे अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर आणि सभासद ना. सी. व्ही. मेहता, ना. व्ही. जे. पटेल, ना. बेळवी, बाबू बिपिनचंद्र पाल, एस्. आर. बमनजी, जमनादास द्वारकादास, पी. के. तेलंग, आर. जी. प्रधान, लक्ष्मीदास तेरसी, बॅ. जयकर, भुलाभाई देसाई, डॉ. साठ्ये, वेलकर वगैरे बडी बडी मंडळी प्रामुख्याने झळकत होती. सभेचे काम ता. २३, २४, २५ असे तीन दिवस झाले.

पहिल्या दिवशी सुमारे ५००० तर तिसरे दिवशी ७००० चे वर इतकी चिक्कार गर्दी जमली होती. त्यात अर्ध्याहून जास्त अस्पृश्य स्त्री-पुरुष यांची भरती होती. स्वागताध्यक्ष सर नारायणराव यांनी फार कळकळीचे भाषण केले. ते म्हणाले,--"इतिहास आपणास सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो अशा सर्व प्रकारच्या जागतिक चळवळींचा उगम थोड्याश्या व्यक्तींच्या कार्यातच आढळतो. प्रस्तुतच्या बाबतीत त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम प्रथम अत्यंत हेटाळणी झाली ते डी. सी. मि. चे कार्यकर्ते होत. त्यांच्या कार्याने प्रचंड हिंदुसमाजाची सदसद्विवेकबुद्धी जागृत झाली." भाषण संपविताना सर नारायणरावांनी निरनिराळ्या संस्थानिकांचा--विशेषत: गायकवाडसरकारांचा-आपापल्या संस्थानात अस्पृश्योद्धारार्थ केलेल्या कार्याबद्दल आभारपूर्वक उल्लेख केला. नंतर श्रीमंत सर सयाजीराव महाराजांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. त्यानंतर जनरल सेक्रेटरींनी सर्व हिंदुस्थानातून अभिनंदनाच्या ज्या तारा आल्या त्या वाचून दाखविल्या. महात्मा गांधी, डॉ. रवीन्द्रनाथ टागोर, करवीर मठाधिपती शंकराचार्य वगैरेंच्या तारा प्रमुख होत्या. द्वारकापीठाच्या शंकराचार्यांकडून एक विलक्षण तार आली होती. त्यात "सर सयाजीरावमहाराज, रा. वि. रा. शिंदे हे आधुनिक काळातील महान् कलिपुरुष आहेत" म्हणून त्यांचा तीव्र निषेध केला होता. ह्यानंतर श्रीमंत सर सयाजीरावमहाराजांचे विचारपरिप्लुत असे भाषण झाले.

प्रमुख ठराव : सभेचा पहिला मुख्य ठराव बॅ. जयकर यांनी मांडला :--"निकृष्ट वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी आणि या कार्यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यतानिवारक जाहीरनामा काढून निकृष्ट वर्गास शाळा, दवाखाने, न्यायकचेऱ्या, सार्वजनिक खर्चाने चालविलेल्या सर्व सार्वजनिक संस्थांत तसे विहिरी, तळी, म्युनिसिपालिटीचे नळ अशा सार्वजनिक पानवट्यास व्यवहाराची व करमणूकीची ठिकाणे व देवालयासारख्या सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे प्रतिबंध न राहता पूर्ण मोकळीक करून द्यावी असे ह्या परिषदेचे मत आहे." अशा प्रकारच्या जाहिरनाम्याचा मसुदा करून त्यावर राष्ट्रातील पुढाऱ्यांच्या सह्या घेण्याचा अधिकार मिशनच्या जनरल सेक्रेटरीस देण्यात आला. मसुद्याच्या शेवटी वरील ठरावात सांगितल्याप्रमाणे अस्पृश्यता निवारणाचे कामी जाहीरनाम्याचे खाली सही करणाऱ्यांनी व्यक्तिश: जबाबदारी घेण्याचे कलम मुख्य व महत्त्वाचे होते. हेच कलम ह्या परिषदेच्या कार्याचे मुख्य लक्षण होते. ह्या ठरावास मुंबई आर्य समाजाचे प्रचारक पं. बाळकृष्ण शर्मा ह्यांनी अनुमोदन दिले. हा ठराव श्रीमंत सर सयाजीरावांनी सभेपुढे मांडल्यावर तो सर्वानुमते पसार झाला.

लोणावळे येथील परिषद : १९१७ साली कलकत्त्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या ठरावानंतर त्या शहरी पुढे ज्या प्रांतिक व जिल्हानिहाय राजकीय परिषदा भरू लागल्या त्यातून कलकत्त्यातील ठरावाचा व मुंबईस भरलेल्या अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषदेत लो. टिळकांनी मांडलेल्या ठरावाचा अनुवाद होऊ लागला. पुढे लवकरच लोणावळे येथे जिल्हा राजकीय परिषद भरली होती. आमंत्रणावरून मीही तेथे हजर होतो. सभेतील स्वराज्याचा मुख्य ठराव मी स्वत:पुढे मांडावा अशी परिषदेची इच्छा दिसली. मी स्पष्ट सांगितले की, "अस्पृश्यतानिवारणाचा ठराव या परिषदेने एकमताने पास करून घ्यावा म्हणजे मीही स्वराज्याचा ठराव आनंदाने पुढे मांडीन." माझे मित्र प्रसिद्ध मद्यपाननिषेधक रा. शंकरराव लवाटे यांनी माझ्या म्हणण्यास विरोध केला. त्या वेळी 'केसरी' पक्षातील सगळे तरुण पुढारी माझ्या बाजूला आले व म्हणू लागले, "रा. लवाटे ह्यांच्याशिवाय बहुतेक मंडळी माझ्या मताला अनुकूल दिसतात, म्हणून मी स्वराज्याचा ठराव मांडावा." मी नम्रपणे सांगितले, "अस्पृश्यतानिवारणाचा ठराव एकमताने पास होण्यातच विशेष आहे. असा महत्त्वाचा ठराव काँग्रेसच्या मुख्य अधिवेशनात एकमताने पास झाला असताना जिल्हा परिषदेत तो नुसत्या बहुमताने पास होणे म्हणजे राष्ट्राने माघार घेण्यासारखे आहे. शिवाय त्यात राष्ट्रीय सभेची शिस्तही मोडते." अशी भवति न भवति चालून हा प्रश्न सभेपुढे दुपारच्या अधिवेशनात यावा असे ठरले. काही केल्या तडजोड होईना. लो. टिळक सभेच्या बाहेर काही कामात गुंतले होते. त्यांच्याकडे रा. लवाटे यांना नेण्यात आले. टिळकांनी पोक्त विचार करून अखेरचा सल्ला दिला की, "धर्माची सबब काढून अस्पृश्यतानिवारण्याचे कामी कचराई करण्याचा काळ गेला आहे. रा. शिंदे यांना अनुकूल करून घेऊन स्वराज्याचा ठराव एकमताने पास करून घ्यावयाचा असेल तर त्यांचा अस्पृश्यतानिवारणाचा ठरावही एकमतानेच पास झाला पाहिजे. हे जर रा. लवाटे यांना पटत नसेल तर त्यांनी अस्पृश्यतानिवारणाचे ठरावावर मते घेताना मंडप सोडून जावे हे इष्ट. या सभेला यश यावे." त्याप्रमाणे लवाट्यांनी मान्य केल्यावर वरील दोन्ही ठराव सभेत एकमताने पास झाले.

नागपूरचे शिष्टमंडळ : मागे सांगितल्याप्रमाणे मिशनच्या कामाला हिंदुस्थानातील निरनिराळ्या पक्षांचे पुढारी आणि अखेर राष्ट्रीय सभा यांचे सहकार्य मिळाले. सरकारची सहानुभूती आणि मिशनशी सहकार्य ही या पूर्वीच मिळालेली होती. यासंबंधी मुंबई सरकारने सर्वात आघाडी मारली हे वर आलेच आहे. याचे कारण मिशनचा आरंभ मुंबईलाच झाला व तेथून प्रांतोप्रांती वाढ सुरू झाली. नागपूरची शाखा संघटित रूपाने स्थापित झाल्यावर १९१६-१७ च्या साली त्या वेळचे नागपूरचे चीफ कमिशनर सर रॉबर्टसन (प्रांताधिपती) यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेण्यात आले. त्याचे मुख्य सर मोरोपंत जोशी हे होते. ह्या प्रांतात अस्पृश्य मुलांची संख्या जरी बरीच शिकत होती तरी मुंबईतील मुलांप्रमाणे त्यांना स्वतंत्र शाळा नव्हती. अनुभव घेऊन पाहण्याकरिता काही नमुनेदार शाळा सरकारने चालवाव्यात अशी शिष्टमंडळाने मागणी केली. ह्या मिशनच्या शाळा व वसतिगृहे नागपूर, अकोला व यवतमाळ वगैरे ठिकाणी होती. त्यांना सरकारने खास सवलती आणि पुरेशी मदत द्यावी अशी दुसरी मागणी होती. महारांच्या वतनाची जी जुनी संस्था होती ती आता निरुपयोगी ठरत असल्याने व ती चालू असेतोपर्यंत अस्पृश्यतानिवारणास प्रतिबंध होत आहे असा अनुभव आल्याने ही वतनसंस्था बंद करून रोख नेमणुका द्याव्यात अशी तिसरी मागणी होती. ह्या वतनासंबंधी वऱ्हाड व नागपूर प्रांतात मोठी चळवळ चालू होती.

६

हिंदुस्थान सरकारास सूचना

१९१६ सालापर्यंत हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतिक सरकारांकडूनच नव्हे तर प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारकडूनही आमच्या मिशनला मान्यता मिळाली. ह्याचे एक उदाहरण म्हणून ता. १२ मे, १९१६ तारखेचा एक खलिता हिंदुस्थानच्या चीफ सेक्रेटरीकडून मुंबई इलाख्याच्या चीफ सेक्रेटरीमार्फत आमच्या मिशनकडे आला. ता. १६ मार्च, १९१६ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळापुढे नागपूरचे नामदार मि. दादाभाई यांनी अस्पृश्यवर्गाच्या सुधारणेकरिता एक ठराव आणला होता. त्याअन्वये हिंदुस्थान सरकारने निरनिराळ्या प्रांताच्या सरकारांनी आजपर्यंत अस्पृश्यवर्गाच्या बाबतीत काय काय केले आहे व पुढे काय काय करणार आहेत याविषयी तपशीलवार माहिती मागितली आणि ह्या बाबतीत आमच्या मिशनची मते काय आहेत आणि सरकारने पुढे काय काय करावे ह्या विषयी मिशनची सूचना पाठवण्याविषयी लिहिले होते. मिशनचे सविस्तर अहवालही मागविले होते.

ता. ३० ऑक्टो. १९१६ रोजी मुंबई सरकारच्या सेक्रेटरीमार्फत हिंदुस्थान सरकारला उत्तरी कळवले. अस्पृश्यवर्ग, गुन्हेगार जाती आणि जंगली जाती हा प्रस्तुत चौकशीचा विषय होता. पैकी अस्पृश्यवर्गाचेच हे मिशन काम करीत आहे. ह्या जातीला सक्तीच्या मोफत शिक्षणाची तर जरूर आहेच; पण ते यशस्वी होण्याला पुरेसे आकर्षणही झाले पाहिजे. ह्या बाबतीत सरकारने आमच्या मिशनसारख्या खासगी संस्थांची मदत घ्यावयाला पाहिजे. वाङमयीन शिक्षणाला औद्योगिक शिक्षणाची जोड आवश्यक आहे; पण ह्या जातीला हजार वर्षे केवळ शारीरिक कष्टाची गुलामगिरी करण्याचे अंगवळण पडल्याने औद्योगिक बाबतीत वरिष्ठ दर्जाचे प्राविण्य मिळविण्यात त्यांना उत्साह नाही. सामाजिक बंधनाने त्यांना मोकळीक नाही. त्यानी उत्पन्न केलेल्या मालाला उठाव मिळत नाही. हा प्रश्न त्यांचा जन्मस्वभाव बदलण्याचा आहे. ही क्रांती घडवून काम चुटकीसरीशी, किंबहुना एकदोन पिढ्यात घडवून आणण्यासारखे नाही. नैतिक शिक्षण याहूनही कठीण आहे; आणि ते झाल्याशिवाय शिक्षणाचे काम पुरे होणार नाही. स्वाभिमान, आत्मसंयमन, आत्मविश्वास ही तत्त्वे ह्यांच्या अंगी बाणल्याशिवाय ह्यांच्या उद्धाराविषयी बोलणे व्यर्थ आहे. गेल्या १० वर्षात मिशन हे पायाशुद्ध काम करीत आले आहे. खास वसतिगृहाची योजना ठिकठिकाणी हे मिशन करीत आहे. साधे पण उदात्त घरगुती वातावरण ह्या वर्गातील होतकरू तरुणास मिशन पुरवीत आहे. ह्या बाबतीत मिशनला अकल्पनीय अडचणी येत आहेत. मिशन मुलांबरोबर मुलींचीही सोय करीत आहे. मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देऊन निरनिराळ्या कॉलेजात जाणारी मुलेही या वसतिगृहात आहेत. औद्योगिक शिक्षण केवळ शाळांतूनच देऊन चालणार नाही. मुले मोठी झाल्यावर त्यांना निरनिराळ्या कारखान्यातून जडजोखमीची कामे हाताळण्याची सवय व्हावी, म्हणून त्यांना मोठमोठ्या कारखान्यांतून उमेदवार

७

बंगलोर शाखा

मागासलेल्या लोकांत, विशेषतः अस्पृश्यवर्गात त्यांच्या राजकीय हितसंबंधाची जागृती व्हावी म्हणून अस्पृश्यतानिवारक संघ ही स्वतंत्र सहकारी संस्था पुण्यात १९१७ सालच्या अखेरीस स्थापण्यात आली. या संस्थेची जरूरी विशेषतः मद्रास प्रांती फार भासली. पूर्व किनाऱ्यावरील मद्रास शहरी आणि पश्चिम किनाऱ्यावर मंगळूर व मलबारात मिशनच्या शिक्षणविषयक संस्था याच्या अगोदरच कित्येक वर्षे स्थापण्यात येऊन त्यांचे काम बरे चालले होते. या दोन किनाऱ्यांवरील परस्परांची माहिती होऊन त्यांचा संबंध मिशनच्या मातृसंस्थेशी निकट यावा म्हणून मधोमध बंगलोर येथे आमच्या मिशनची एक नवीन प्रांतिक अंगभूत शाखा स्थापावी, असे विचार माझ्या मनात १९१८ सालापासून घोळू लागले. त्या सुमारास माझे मित्र आणि प्रा. समाजाचे एक जुने सभासद रा. काशीनाथ नारायण देवल यांच्या परिश्रमाने तेथील अस्पृश्यवर्गासाठी बंगलोर लष्करात, टॅनरी रोडवर एक दिवसाची शाळा स्थापण्यात आली होती. ती मातृसंस्थेस जोडून घ्यावी अशी रा. देवलांनी मागणी केली होती. म्हणून मी रा. कृष्णाजी गोविंदराव पाताडे यांस बरोबर घेऊन बंगलोरला ऑगस्ट १९१९ मध्ये गेलो.

कृ. गो. पाताडे : रा. कृष्णाजी गो. पाताडे ह्या तरुण गृहस्थाची गाठ १९१७ मध्ये मुंबईस प्रथम पडली. हे राष्ट्रीय वृत्तीचे उत्साही तरुण होते. ता. ८ नोव्हेंबर, १९१७ रोजी शनिवारवाड्यापुढे भरलेल्या सभेत ह्यांनी भाग घेतला होता. त्यानंतर त्यांचा पुणे शाखेत प्रवेश झाला. वर्षदीड वर्षातच त्यांच्यामध्ये मिशनची स्वतंत्र शाखा चालविण्याइतपत तयारी झाली. लहानपणी गिरणीत काम करून रात्रीच्या शाळेत इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत त्यांनी अभ्यास केला होता. गृहस्थ फार हिंमतीचे असत.

तामिळ प्रांतातील दौरा : ह्या कामी १९१५ साली मिशनचे अध्यक्ष सर नारायणराव चंदावरकर यांनी जो दौरा काढला होता त्याचा उत्कृष्ट परिणाम ह्या प्रांतात झालेला आढळून आला. आम्ही प्रथम बंगलोरहून सेलम ह्या जिल्ह्याच्या गावी गेलो. तेथे सुप्रसिद्ध राजगोपालाचारी ह्यांचा पुढाकार होता. त्यांचे मित्र प्रो. यज्ञनारायण ह्यांच्या घरी उतरलो. हे मद्रासच्या पाछाप्पा कॉलेजचे प्रोफेसर होते. राजगोपालाचारी ह्यांनी एका सार्वजनिक क्लबात आम्हाला मोठी चहापार्टी देऊन व्याख्यान करविले आणि पुढे अस्पृश्योद्धारासाठी त्यांनी एक स्वतंत्र आश्रम स्थापून प्रत्यक्ष कार्य केले. ह्या ठिकाणी आम्हास अशी बातमी लागली की, तंजावर त्रिचनापल्लीकडे अस्पृश्य व जमीनदारवर्ग ह्यामध्ये मोठा चुरशीचा लढा चालू आहे. आम्ही तो पाहून घ्यावा. मद्रासला गेल्यावर तेथे चालू असलेले आमच्या शाखेचे काम तपासले. बंगलोरास असताना सर व्ही. पी. माधवराव

म्हणतात तेच खरे. त्यांनी दंग्याच्या जागी जाण्याच्या निर्धारापासून आमचे मन पूर्णपणे वळविले. आम्हालाही काही निकडीच्या कामासाठी बंगलोरकडे व मुंबईकडे जाणे भाग होते. नाइलाजाने आम्ही हुल्लडखोरीचा मार्ग सोडला.

ख्रिस्त्यांचा कावा : या सफरीत आणखी एक मोठा मजेदार अनुभव आम्हास आला. रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट पंथाच्या ख्रिस्ती लोकांनी अस्पृश्यवर्गाच्या असंख्य प्राण्यांना आपल्या जाळयात कोंडून ठेवलेले आम्ही प्रत्यक्ष पाहिले. ह्या गरिबांचे धर्मांतर करून त्यांचा भौतिक, मानसिक व आध्यात्मिक असा कोणताच फायदा झालेला दिसला नाही. उलट त्या फायद्याच्या मार्गात मूर्तिपूजक ख्रिस्ती धर्माच्या नावाने सतिपूजा, रथोत्सव, यात्रा, जातिभेद याचे भयंकर तट उभारलेले आम्ही पाहिले, त्रिचनापल्ली या शहराच्या आसमतात ज्या पारिया लोकांच्या कंगाल वस्त्या पाहिल्या त्यात झोपड्यातून क्षुद्र ख्रिस्ती देवस्थाने आम्ही डोळ्यांनी पाहिली. खेड्यांतील म्हसोबा, रवळनाथ, सटवाई, जाखाई-जोखाई अशा क्षुद्र हिंदू-दैवतांप्रमाणेच मेरी, जोसेफ, ख्रिस्त व त्याचे बारा शिष्य यांच्या नावाने शेकडो दगड ठेवून त्यांना शेंदूर माखलेला आम्हीं पाहिला ख्रिस्ती सणासुदीला हिंदूप्रमाणेच रथोत्सवही करीत असतात. प्रत्येक देवस्थानापुढे लाकडी रथ दिसले. या गरीब लोकापेक्षा प्रत्यक्ष ख्रिस्ती धर्माची व स्वतः ख्रिस्तीची अशी हालअपेष्टा पाहून आम्हाला कीव आली. अशा उपायाने अस्पृश्यांनी ख्रिस्ती अनुयायांचा भरणा केलेला आम्ही पाहिला. इतर प्रांतातील समजूतदार ख्रिस्ती मिशन~यांना ह्या प्रकाराची गंधवार्ता तरी आहे की नाही, असल्यास ते मूग गिळून स्वस्थ कसे बसतात याचा उलगडा आम्हास काही केल्या होईना. हिंदू धर्माप्रमाणेच ख्रिस्ती झालेल्यात कडक जातिभेद आहेत. ब्राह्मण, मुदलियार, पिल्ले, रड्डी, शेट्टी वगैरे हिंदू जाती ख्रिस्ती धर्मानुयायांमध्ये अबाधित कशा राहतील ह्याचीच रोमन कॅथालिक पाद्र्यांना मोठी काळजी पडलेली असते. लहानमोठ्या ख्रिस्ती उपासनालयातून ह्या निरनिराळ्या जातींची बाके व दर्जे ठरवलेले असतात. अस्पृश्य ख्रिस्तांना तर या सर्वच मंदिरातून शिरकाव नसतो. त्यांनी बाहेरूनच रस्त्यांतून अगर अंगणातून गुडघे टेकून प्रार्थना करावी आणि मोक्ष मिळवावा. मात्र हिंदू धर्मांत त्यांनी पुन्हा जाऊ नये. ख्रिस्ती अनुयायांत त्या प्रांती स्वतंत्रतेची मोठी चळवळ चालली होती. ती दाबून टाकण्यासाठी रोमहून एक मोठे धर्माधिकारी पोपसाहेब आले होते. ही शिस्तीची परंपरा सर्वांनी मानावी असा अखेरचा फतवा मागे ठेवून हे आलेले बडे अधिकारी परत गेले असे माझ्या ऐकण्यात आले.

रेडा आणि माणूस : एके दिवशी तिसरे प्रहरी त्रिचनापल्लीच्या मोठ्या रस्त्यातून जात असता म्युनिसिपालिटीचा कचऱ्याने भरलेला एक मोठा गाडा मोठ्या कष्टाने रखडत चाललेला आढळला. त्याला एका बाजूला एक रेडा व दुसऱ्या बाजूला एक माणूस जुंपलेला आढळला. हा काय चमत्कार म्हणून जवळ जाऊन शोध करता माणसाने उत्तर दिले की, "मी जातीने पारिया पण धर्माने रोमन कॅथालिक आहे." जात व धर्म कोणताही असो, माणसाने रेड्याची मजल गाठली हे पाहून आम्ही थक्क झालो! रेड्यांचा तुटवडा पडतो म्हणून माणसांना असली कामे करावी लागतात. धर्मांतर केलेल्या पारियांची ही भौतिक उन्नती! असे आम्ही अनुभवलेले अनेक प्रकार एका फूलस्केप कागदावर छापून त्यांच्या अनेक प्रती आम्ही चोहोकडे वाटल्या; पण त्याला उत्तर

८

इमारतीची योजना

याच सुमारास युरोपातील महायुद्ध नुकतेच संपले होते. सर्व जगाला हायसे वाटले. ह्याच वेळी आमच्या मिशनच्या विस्ताराचे कामही तूर्त पूर्ण झाले होते. सबंध दक्षिण हिंदुस्थान व उत्तरेकडे काठेवाडपर्यंत पश्चिम हिंदुस्थानाइतक्या प्रदेशात मिशनच्या मध्यवर्ती मातृसंस्थेच्या नजरेखाली घटनेची तयारी पूर्ण झाली होती. पूर्वेकडील बंगाल्यात ब्राह्म समाजाच्या सत्तेखाली आणि मध्यसंयुक्त प्रांती व पश्चिमेकडे आर्यसमाजाच्या नजरेखाली या वर्गाच्या कल्याणासाठी ठिकठिकाणी कामे चालू होती. १९०८ साली मी कलकत्त्याला गेलो असता साधारण ब्राह्म समाजाचे पुढारी पं. शिवनाथशास्त्री यांनी साधारण ब्राह्म समाजाच्या मुख्य मंदिरात अस्पृश्यतेच्या प्रश्नावर माझे एक खास व्याख्यान करविले. त्यात मी बंगाल्यात ब्राह्म समाजाने हे काम सुरू करावे अशी निकराची सूचना केली. तिचा स्वीकार करून १९०९ साली बंगाल डिप्रेस्ड क्लासेस मिशनची संस्थापना वरील शास्त्रीमहाशयांनी केली. ह्यापुढे मोर्ले-मिंटो सुधारणेचे प्रस्थान हिंदुस्थानात सुरू झाले. त्या धुमश्चक्रीत हिंदुस्थानातील लहानमोठ्या सर्व जातीतून राजकारणाचा धुमाकूळ माजला. त्याचा शेक ह्या मिशनलाही बसला. पुणे येथील अहल्याश्रमाच्या इमारतीच्या कामातून ह्या राजकारणी वादाचा आरंभ कसा झाला ते सांगण्याचे क्लेशकारण काम माझ्या भागास कसे आले ते आता सांगतो.

मद्रासहून पुण्यास परत आल्यावर महायुद्धामुळे तहकूब झालेले इमारतीचे दगदगीचे काम मी पुन्हा हाती घेतले. या इमारतीचा नकाशा मुंबईतील पाटकर, शहा आणि कंपनीकडून आणि खर्चाचे अंदाजपत्रक अमृतलाल व्ही. ठक्कर या मित्राकडून मोफत करून घेण्यात आले. एकंदर खर्चाचा अंदाज एक लाख रुपयावर गेला. खालील ६ इमारतीचे नकाशे तयार झाले.

गट १ ला : (१) सुपरिंटेंडिंग मिशनरीची राहण्याची जागा, (२) विद्यार्थी वसतिगृहे, (३) स्नानगृहे वगैरे.

गट २ रा : (१) मध्यवर्ती इंग्रजी मराठी शाळा, (२) उद्योगशाळा, (३) स्नानगृहे वगैरे.

एवढ्या इमारतीसाठी वर सांगितलेल्या ४० हजार रुपयांचे जे आश्वासन मिळाले होते ते अगदी अपुरे होते. म्हणून विद्याखात्याला अधिक मागणीचा दुसरा अर्ज पुन्हा करण्यात आला. त्यावेळी लॉर्ड विलिंग्डन गव्हर्नर होते. त्यांच्याच सहानुभुतीमुळे विद्याखात्याने आणखी ६५,००० रु.ची ग्रँट, वरील २०,००० रु. शिवाय मंजूर केली. परंतु नुकतेच महायुद्ध झाले असल्यामुळे सरकारला चोहोकडेच काटकसरीची कातर लावावी लागलो. त्यामुळे रोख मदत मिळण्याला अडचण येऊन इमारतीचे काम कांही दिवस तहकूब ठेवावे लागले. मध्यतरी नवीनच एक आपत्ती आली. होळकर सरकारने दिलेली २०,००० रु.ची मदत सरकारी प्रॉमिसरीच्या नोटात गुंतून पडली

वारल्याचे कळतांच त्रिमकदास शेठजी आपल्या गाडीत बसून प्रेत स्मशानात पोचण्यापूर्वी तेथे जाऊन उभे राहिले. प्रेताला ते सामोरे आलेले पाहून मला शंका वाटू लागली की, लकडी पुलावरील स्मशानात प्रेत जाण्याला ते मनाई करतील. कारण ते स्मशानभूमीचे एक प्रमुख ट्रस्टी होते. माझ्या समारे येऊन ते म्हणाले, "श्री. शिंदे यांची बहीण ती माझी बहीण. तिचे प्रेत जाळण्यास कोणी कदाचित हरकत घेतील; पण तसे न व्हावे. सर्व विधी यथास्थित झालेला पाहावा, म्हणून मी येथे मुद्दाम आलो आहे." शेठजीची ही दिलदार सहानुभूती पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. माझी चिंता दूर झाली.

चिमुकला बळी : पुढे लवकरच मिशनच्या शाळा भोकरवाडीतील नवीन इमारतीत गेल्या. मिशनऱ्यांनी राहण्याची जागा आणि वसतिगृह या इमारती कशाबशा पूर्ण झाल्या होत्या. पण भिंती आणि गिलावा नीट सुकलेला नव्हता. फरसबंदीचे काम, दारेखिडक्या लावण्याचे काम घाईने चालले होते. नाइलाजाने अशा ओल्या स्थितीतच जाऊन रहावे लागले. भोवताली साफसफाई अद्याप व्हावयाची होती. माझी ४ वर्षांची एकुलती एक धाकटी मुलगी होती. ती दिसण्यात सुंदर असून माझी फार लाडकी होती. दिवसभर उन्हात इकडे तिकडे हिंडून, ओल्या इमारतींत राहून तिची प्रकृती बिघडली. तिला मेनिनजायटिस् नावाचा मेंदूचा विकार जडल्याचे आढळून आले. सतत एक महिना मांडीवर घेऊन मला तिची अहोरात्र शुश्रूषा करावी लागली. वास्तुशांती न करता आम्ही येऊन राहिलो, म्हणून ही बाधा झाली, असे भेटीला आलेल्या काही अशिक्षित बायका म्हणू लागल्या. काही उतारे सुचवू लागल्या. अर्थात् अशा गोष्टींवर आमचा विश्वास बसेना. भोवतालच्या दूषित स्थितीवरूनच आजार आला होता हेच खरे कारण. शेवटी ६ जून, १९२० रोजी हा चिमुकला जीव कालवश झाला. अशा रीतीने घरचा बळी देऊन वास्तुशांती झाली, म्हणून माझी जुन्या वळणाची पत्नी शोक करू लागली. ही लहान मुलगी इमारतीचे बांधकाम करणाऱ्या अस्पृश्य मजूरांमध्ये खेळीमेळीने हिंडत असल्याने त्या सर्वांना फार प्रिय असे. कोणी मिशन पाहण्यास आल्यास ती त्यांचेशी चुरुचुरु बोले. सुपरिंटेंडेट जनाक्काची तर ती फार लाडकी होती.

●●●

९

निवडणूक

१९२० साली मॉंटेग्यू-चेम्स्फर्ड सुधारणांची धामधूम उठली. वरील सुधारणान्वये नोव्हेंबर, महिन्यांत पाहिली निवडणूक होणार होती. मराठ्यांमध्ये जे दोन भिन्न पक्ष पडले होते त्या दोहोची एक संयुक्त सभा जेथे मॅन्शनमध्ये झाली. त्या सभेचे मला बोलावणे आले. पुढील निवडणुकीत मी उभे राहावे असे दोघांचे मत पडले. मराठ्यासाठी सात राखीव जागा सरकारने ठेवल्या होत्या. "त्या राखीव जागेसाठी मी उभा राहणार नाही. त्यातील जातीयवाचक तत्त्वाच्या मी विरूद्ध आहे." असे मी बजावले. पुणे शहरच्या उघड्या जागेसाठी सर्व पक्षांनी मिळून मदत केल्यास मी उभा राहण्याचे कबूल केले. माझे म्हणणे कळवण्यासाठी 'बहुजनपक्ष' या नावाने मी माझा सविस्तर जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यातील पुढील उताऱ्यावरून माझे मत समजेल-हिंदुस्थानांतील एकंदर **बहुजनपक्ष** लोकसंख्येचे केवळ राजकीय दृष्ट्या दोन मुख्य भाग पडत आहेत. ते हे की (१) विद्याबल, द्रव्यबल किंवा अधिकारबलाने पुढारलेला वर्ग. (२) आणि दुसरा यातील कोणतेच बल अंगी नसल्याने व नाइलाजाने मागासलेला वर्ग किंवा बहुजनसमाज. ह्या दुसऱ्या वर्गातच अत्यंत तिरस्कृत अशा अस्पृश्यवर्गाचा अंतर्भाव होतो. हल्लीच्या राजकीय सुधारणेचा नुसता अरुणोदय होतो न होतो तोच ह्या दोन भागात मोठा विरोध भासू लागला आणि या विरोधानुसार बहुजनसमाजाचा अथवा मागासलेल्या वर्गाचा एक नवीन पक्षच होऊन चुकला आहे. ह्यालाच ब्राह्मणेतरपक्ष असे नाव दिले जाते. पण नाइलाज आणि बलहीनता ही जी मागासलेल्या वर्गाची मुख्य लक्षणे ती ह्या वर्गाच्या पक्षास 'ब्राह्मणेतरपक्ष' असे जातिविशिष्ट नाव दिल्याने अगदी काटेकोर रीतीने सार्थ होत नाहीत. म्हणूनच ह्या नवीन पक्षास बहुजनपक्ष अथवा जनपदपक्ष असे अगदी सार्थ व निर्विकल्प नाव दिल्याने त्यावर कसलाही आक्षेप आणण्यास जागा उरणार नाही.

कार्यपद्धती : हा नवीन पक्ष जरी इतरांशी स्वतंत्रपणाने वागणारा आहे तरी जेथे जेथे त्याचा हितसंबंधाचा प्रश्न उभा राहील, तेथे तेथे त्याचा समानतेचा दर्जा संभाळून जी कोणी व्यक्ति असो अथवा पक्ष असो त्याला सक्रीय साहाय्य करण्यास तयार असेल त्याच्यासाठी तेवढ्यापुरते सहकार्य करावयाला हा पक्षही तयार राहील. कारण ह्या पक्षाच्या पायाखाली केवळ पोकळ भावना नसून भरीव हितसंबंध आहेत, ह्या पक्षात खालील वर्ग मोडतात.

१ ला, शेतकरीवर्ग : ह्यात डोईजड जमीनदारांचा किंवा पिढीजात जहागीरदारांचा समावेश मुळींच होत नाही. जो आपल्या मालकीचे अथवा कौलाचे शेत आपणच वाहतो आणि त्या कामासाठी पुरेशा मजुरदारांना समान दर्जाने योग्य वेतन देऊन संभाळतो तोच शेतकरी जाणावा.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

ता. क. आम्ही कोणातच मिळू इच्छित नाही. सत्य असेल तेथे मिसळल्याशिवाय राहणार नाही. हेच ना आम्ही मुलांनी ध्येय ठेवायचे ? लोभ करावा ही विनंती.

(सही) शाहू छत्रपती
स्टेशन बंगला, ता. ३०/८/१९२० इसवी

आपण आम्हा सर्वांचे विनंतीस मान देऊन इलेक्शनला उभे राहण्याचे कबूल केले याबद्दल आम्हास आपले उपकार वाटत आहेत. आपल्यासारखे मोठे योग्य पुरुष मराठा समाजाला काय तर कोणत्याही समाजाला लाभले तर फारच उत्तम आहे. इलेक्शनच्या कामी माझ्या हातून जी सेवा होईल ती मी मोठ्या आनंदाने करीन.

(सही) शाहू छत्रपती

भवानी पेठेतील मारामारी : शाहू छत्रपती पुण्यात आले. शिवाजी मराठा शाळेने त्यांचे अध्यक्षतेखाली भवानी पेठेत एक मोठी जाहीर सभा बोलविली. त्यात सर्व पक्षांनी व इतरही मराठे मंडळी हजर होती. छत्रपतींनी मराठा क्षात्रजगद्गुरू नेमण्याचा विचार चालविला होता. मीही काही बोलावे असा आग्रह केल्यावरून मी उठून सांगितले, "धार्मिक बाबतीत काही वाद निघाल्यास त्यात अखेरचे मत अभिषिक्त राजाने द्यावे अशी परंपरा पहिल्या शाहूमहाराजांपासून आहे, असे इतिहास सांगतो. आता छत्रपती शाहू महाराजानी दुसऱ्या कोणास जगद्गुरु न नेमता त्याचे सर्व अधिकार आपणच चालवावेत." यानंतर माझ्या मागून रा. भास्करराव जाधव यांचे भाषण झाले. त्यावर बराच वाद माजून सभेत गोंधळ उडाला. चांगली मारामारी झाली. सभा उधळली, शेवटी या सभेचा परिणाम माझ्या निवडणुकीवर झाला. कारण ज्या सर्व पक्षाच्या मराठ्यांनी मिळून मला उभे केले होते, त्यांच्यात भयंकर फूट पडली.

याच सुमारास अखिल राष्ट्रात महात्मा गांधीच्या कौन्सिलप्रवेशावर बहिष्काराची चळवळ मोठ्या जोरात चालली. म्हणून रा. नरसोपंत केळकर यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आणि अखेरीस मलाही या निवडणुकीत अपयश आले. तथापि माझे मित्र खासेराव जाधव ह्यांनी घरोघर हिंडून मते मिळवण्यासाठी जी अंगमेहनत केली आणि हजारो रुपयांची झीज सोसली त्याबद्दल त्यांचे उपकार मी कधी विसरणार नाही. 'विजयी मराठा' कार श्रीपतराव शिंदे, रा. रा. गंगारामबुवा काळभोर, रा. जेधेबंधु आणि लष्करातील माझे पारशी मित्र डॉ. मोदी यांनी जी निष्काम मदत केली त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

●●●

१०

दुष्काळ व इतर कामे

दुष्काळाची आपत्ती : निवडणुकीची दंगल संपते न संपते तोच दुसरी एक मोठी आपत्तीही येऊन पडली. पुणे येथील डी.सी. मिशन शाखेचे सेक्रेटरी श्री. कृ. गो. पाताडे यांनी १९२१-२३ सालचा जो अहवाल प्रसिद्धिला आहे, त्यात पान ४१ वर खालील मजूर आहे :--

"१९२० साली नगर व पुणे जिल्ह्यातील काही तालुक्यांतील दुष्काळामुळे कसेही करून प्राण वाचवावे ह्या हेतूने अस्पृश्यवर्गाची-मुख्यतः मातंग (मांग) जातीची सुमारे १००० मंडळी त्या सालच्या हिवाळ्यात आमच्या मिशनच्या मैदानात येऊन दाखल झाली. सदर मंडळीजवळ कपडालत्ता, खावयास अन्न किंवा राहण्यास जागा यांचा अभाव असून, कडक हिवाळ्यामुळे ते आजारी पडू लागले व काही मृत्यूही पावले. ही गोष्ट रा. वि. रा.शिंदे ह्यांच्या नजरेस येतोच त्यांनी व रा.जी.जी. ठकार यांनी या सर्व कुटुंबाची पाहणी करून प्रथमतः मिशनतर्फे अल्प मदत देण्यात सुरुवात केली.

पण तेवढ्याने भागणार नाही असे दिसताच पुणे शहर म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यात एक जाहीर सभा श्री. एल्. जी. आपटे (म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष) यांचे अध्यक्षतेखाली भरून त्यांचेच अध्यक्षतेखाली दुष्काळ-आपत्तिनिवारक कमिटी स्थापन करून तिच्या स्वयंसेवकांतर्फे धान्य, कपडे, पैसे जमवण्यास जोरात सुरुवात झाली. मदत जमविण्याचे निरनिराळे सहा सेंटर्स ठरविले होते. दुष्काळग्रस्तास राहण्यासाठी एक विस्तृत मांडव आणि कच्च्या भिंतीची एक चाळ बांधण्यात आली. धट्ट्याकट्ट्या माणसांसाठी सदर मांडवात दिवसा तागाच्या आणि वाखाच्या दोऱ्या वळण्याचा कारखाना सुरु करण्यात आला. मुले आणि वृद्ध माणसे ह्याना ज्वारी, बाजरी व तांदूळ फुकट देऊन अगदी अनाथांना तर स्वयंपाकही तयार करून वाटण्यात येत असे, औषधपाणी व कपडे मिळतील तसे दर दिवशी क्रमाने वाटण्यात आले. असि, कलेक्टर, श्री. जी. टी. गॅरेट. I.C.S. व मध्यभाग कमिशनर मि. प्रॅटसाहेब ह्यांनी दुष्काळग्रस्तांची कमिटीच्या विनंतीवरून समक्ष पाहणी करून मिशन पसंत करील त्या गरीब लोकांना आठवड्यातून दोन वेळा तांदूळ, बाजरी, ज्वारी फुकट वाटण्याचे (डोल) काम सुरू केले. गॅरेटसाहेबांच्या आज्ञेने शहरमामलेदार मि. देशपांडे हे स्वतः डोल वाटीत त्या वेळी मिशनचे अधिकारी समक्ष हजर राहून शिफारस करीत.

असोसिएटेड प्रेस व बॉम्बे क्रॉनिकलच्या बातमीदारांनी व मुंबईचे शेठ एल्. आर. तेरसी ह्यांनी वेळोवेळी सर्व प्रकार समक्ष येऊन पाहून कमिटीला फार उत्कृष्ट मदत केली.

तारीख १५/३/१९२१ रोजी कमिटीतर्फे मदत वांटण्याचे काम बंद करून त्याच दिवशी डॉ. एच. मॅन ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली जाहीर सभा करून कमिटीचा अहवाल वाचण्यात आला

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

ह्या सुमारास अशा अनेक अडचणी येऊन मी फार खंगून गेलो होतो. मुंबईत जनरल सेक्रेटरीचे काम आणि पुण्यास तेथील शाखेची सर्व जबाबदारी ही दोन्ही कामे चालविणे फार जड जाऊ लागले. ८ दिवस मुंबईस तर ८ दिवस पुण्यास अशा खेपा घालाव्या लागल्या. माझ्या मुंबईतल्या कार्यवाहकास वाटावे की, मी पुण्यास फार वेळ घालवितो. पुणेकराना वाटावे की मला मुंबईचा मोह सुटेना. अशा संधीत इमारतीचे काम जसजसे नावारुपाला येऊ लागले. तसतसे पुणे शाखेचे बूड मातृ शाखेहून जड होऊ लागले. स्थावर मिळकत म्हणजे भांडण्याचे मूळ, पुण्याच्या इमारतीच्या पायाखाली हे भांडणाचे मूळ रोवले गेले होते.

●●●

११

दुसऱ्या गटाची तयारी

१९२१ साल सुरू झाले. दुष्काळाच्या आपत्तीत सापडलेल्या हजारो माणसांचे प्राण वाचले आणि भोकरवाडीतील भव्य पटांगण दुसऱ्या इतारतीचा पाय खणण्यासाठी मोकळे झाले. पाया खणूनही तयार झाला. होळकर सरकारने २०,००० रु. दिले तेव्हा भावी आश्रमाला "अहल्याश्रम" हे नाव देण्याचे त्यांनी कबूल केले. म्हणून सर तुकोजीराव होळकर यांचेकडे 'पाया घालण्यास या ' असे आमंत्रण करण्यास मी इंदूरास गेलो. पण त्या वेळी श्रीमंत महाराजांवरच आकाश कोसळले होते. त्यांना पदच्युत करण्याची धामधूम चालली होती. माझे काम झाले नाही. मी इंदुराहून मातृसंस्थेच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीला माझ्या जनरल सेक्रेटरीशिपचा राजीनामा पाठवला. वाटेवरचे युद्ध घरी आले होते, आणि ज्यांच्यासाठी मी जिवाचे आणि घरादाराचे रान केले होते तेच माझ्यावर असंतुष्ट होते. कारण काय, तर आता मोठमाठ्या इमारती होऊ लागल्या, देशभर स्वराज्याची भाषा चालू लागली, मग ह्या मिशनमध्ये अस्पृश्यांना स्वराज्य का मिळू नये ? मातृसंस्थेतील लोक या वादाच्या मुळाशी जाईनात. या लोकांचे व्यर्थ लाड पूरवू नयेत असा वरवरचा उपदेश करून वेळीअवेळी ते मलाच दोष देऊ लागले.

विरोधक चळवळीत पुण्याचे शिवराम जानबा कांबळे यांचा हातखंडा असे. रा. हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी शिवराम जानबा कांबळे यांचे चरित्र लिहिले आहे. त्यात पान ४३ वर खालील मजकूर आहे :--

अस्पृश्योद्धारक मंडळी : रा. वि. रा. शिंदे ह्यांच्या नि. सा. मंडळीकडून अस्पृश्यात जितक्या जोराने विद्येचा प्रसार होईल अशी जी त्या समाजाची अपेक्षा होती ती निष्फळ होत चालली. अशा परिस्थितीत रा. किसन मुक्ताजी सोनवणे ह्या तरुण गृहस्थानी शिवराम जानबा कांबळे यांच्या घरी जाऊन त्यांना असे सुचवले की, आपण एक नवीन संस्था स्थापन करू आणि ह्या कामी श्री. वालचंद रामचंद्र कोठारी, बी. ए., संपादक ' जागरूक ' यांचा सल्ला घेऊ. ह्याप्रमाणे हे उभय गृहस्थ रा. कोठारी ह्यांना जाऊन भेटले. त्यांना हा विचार पसंत झाला आणि हे तीन गृहस्थ डॉ. मॅनसाहेबांच्या घरी जाऊन भेटले. डॉ. मॅनसाहेबांनाही हा विचार मान्य झाला आणि चौघांच्या संमतीने तारीख १६/४/१९२१ रोजी वरील संस्था स्थापली. डॉ. मॅनसाहेबांनी रा. कोठारी यांना अस्पृश्योद्धारकमंडळीची रचना कशी करावयाची यासंबंधाने एक मसुदा तयार करण्यास सांगितले. रा. कांबळे यांनी ता. १७/४/१९२१ रोजी डॉ. मॅनसाहेबांना एक पत्र पाठविले. त्यात वरील मंडळीसाठी ३००० रु.ची रक्कम जमवावी आणि तत्प्रीत्यर्थ १०० रु. रा. कांबळे यांनी आपल्यातर्फे आगाऊ दिले. डॉ. मॅननी कांबळे यास आभाराचे पत्र पाठविले."

भोकरवाडीत आमच्या मोठ्या इमारतीचा पाया एका बाजूस पडत होता तर दुसरीकडे मिशनला विरोधी संस्था अस्पृश्यवर्गाच्यातर्फे निघून तिचा पाया येणेप्रमाणे घातला जात होता. काही कारणामुळे डॉ. मॅन हे पुणे शाखेच्या कमिटीवर नव्हते. ही संधी साधून वरील अस्पृश्यमंडळीनी त्यांना आपल्याकडे खेचले. अस्पृश्यांच्या संस्थेने काय काम केले हे कळत नाही पण रा. शिवरामभाऊच्या चरित्राच्या प्रस्तावनेच्या आरंभी त्यांच्याच हस्ताक्षरांतील खालील पत्र प्रसिद्ध झालेले होते.

कामाठीपुरा, ५ वी गल्ली,
पुणे, तारीख २/४/१९२८.

रा. रा. वा. रा. कोठारी यांस :--

सा. न. वि. वि. आपला तारीख २७/३/१९२८ चा जोडकार्ड पोहचला. डिप्रेस्ड क्लासेस कमिटीच्या असलेल्या शिल्लक रक्कमेचा व्यय पुढे कसा करावयाचा असे डॉ. मॅन यांनी आपणांस विलायतेहून विचारले आहे, आणि त्याप्रमाणे आपण ही रक्कम अस्पृश्य विद्यार्थिगृहाला व येथील चांभार विद्यार्थी मंडळाला द्यावी असे आपले मत व्यक्त केले आहे. तरी आपण दोघांनीच या रक्कमेची विल्हेवाट लावणे हे मला बरे दिसत नाही.

आपली संस्था स्थापन होऊन आज सुमारे ७ वर्षे होऊन गेली आहेत. एवढ्या अवधीत जमा खर्चाची हिशोब कमिटीपुढे एकदाही ठेवण्यात आला नाही. तेव्हा आता आपणाला संस्था बंद ठेवायची असेल तर तिच्या सभासदांची मीटींग बोलावून ह्या गोष्टीचा विचार करावा अशी माझी सूचना आहे.

आपला
शिवराम जानबा कांबळे

ह्या सुमारास मिशनच्या वसतिगृहातून बरेच वरिष्ठ दर्जाचे शिक्षण घेतलेले दोन विद्यार्थी, वऱ्हाडातील रा. गणेश अक्काजी गवई व पां. ना. भटकर, अस्पृश्योद्धारार्थ स्वतः झटू लागले. पण अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणाच्या कामी हयगय करून विद्यार्थिगृहे व उद्योगशाळा काढण्यात मिशन वेळेचा व पैशाचा उगाच व्यय करीत आहे अशा तक्रारी वरील पुढाऱ्यांकडून येऊ लागल्या आणि अशा तक्रारीस मिशनच्या प्रचारकार्यातून रिकामे झालेले रा. जी. के. कदम ह्यांच्याकडून आश्चर्यकारक पाठिंबा मिळू लागला. ता. ३० मे. १९२० च्या सु. पत्रिकेत या प्रकरणी खालील मजकूर आहे.

"रा. पां. ना. भटकर १९१८ सालच्या युनिव्हर्सिटीच्या परीक्षेत नापास झाले, नंतर बोर्डिग सोडून मिशनच्याच प्रयत्नाने नोकरीस लागले. १९१९ मध्ये पुन्हा कॉलेजच्या पहिल्या परीक्षेस बसले व पास झाले. आपल्याला कॉलेजकोर्स पुरा करावयाचा असेल तर मिशन मदत करावयास तयार आहे. मग चार सोडून ८ वर्षे लागली तरी हरकत नाही. फक्त बोर्डिंगात राहून अभ्यास केला पाहिजे. (रा. भटकर यांना रा. शिंदे यांनी स्वतः श्रीमंत सयाजीराव महाराजांकडे नेऊन २५ रु. ची दरमहा स्क्रॉलरशिप देवविली; पण त्याचा काही उपयोग झाला नाही.)

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१२

निवेदन

प्रचारकांच्या बदल्या : १९१९ च्या सुमाराला सय्यद अबदुल कादर यांनी आपले काम सोडले. ते त्यापूर्वीच आपले नागपूर येथील काम सोडून असि. सेक्रेटरीचा चार्ज घेऊन आले होते. १९१८ तील अस्पृश्यतानिवारक परिषेचे काम, मुंबईस त्यांनी फार अंगमेहनतीने केले. बहुतेक मिशनच्या शाखांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला होता. त्यांच्या कामात त्याच्या पत्नीचे सहकार्य होते. रा. सय्यद यांच्यानंतर लौकरच रा. वामनराव सोहोनी यांनी आपल्या मुंबई शाखेचा चार्ज सोडला. ह्या दोघा आद्यप्रवर्तकांचा संबंध अशा रीतीने सुटल्याने मला फार वाईट वाटले. स्वतः माझ्या मानेवरचेच जू मी केव्हा ठेवावे या विचारात होतो. म्हणून हा सहकाऱ्यांचा वियोग मी कसाबसा सहन केला. बंगलोर शाखेतून रा. पाताडे यांनी १९२१ च्या सुमाराला मुंबई शाखेचा कारभार त्यांच्या स्वाधीन केला; पण १/२ महिन्यांतच त्यांना पुण्यास आणण्यात येऊन व त्यांचे जागी हुबळी शाखेचे दा. ना. पटवर्धन यास मुंबईस नेमले. अशा या तात्पुरत्या अदलाबदलीमुळे मिशनच्या कामाची फार आबाळ होऊ लागली.

निवेदन : अशा या कठीण प्रसंगी सर्व मिशनची पुनर्घटना निदान पुणे शाखेची तरी विशेष घटना करणे मला भाग पडले. त्याविषयी अगोदर माझे एक प्रांजल निवेदन वर्तमानपत्रातून जाहीर करणे इष्ट वाटले. त्याप्रमाणे ता. ३ एप्रिल, १९२३ रोजी केसरीत व ता. २९ मार्च, १९२३ रोजी ज्ञानप्रकाशात मी माझे जे निवेदन प्रसिद्ध केले त्यातील काही भाग देत आहे :--

" ही मंडळी स्थापण्याचे श्रेय ब्राह्म धर्माला आहे. प्राथमिक प्रयत्नास पूर्ण पाठिंबा मुं. प्रा. समाजातील प्रमुख सभासदांनी दिला; पण हे मिशन समाजाचे अंग म्हणून न चालवता, स्वतंत्रपणे एक राष्ट्रकार्य म्हणूनच चालवणे मंडळीस श्रेयस्कर वाटले. स्थापनेच्या वेळी वरवर विचार करणाऱ्या लोकांनी अनुकूल-प्रतिकूल भविष्ये वर्तवली अस्पृश्यवर्गात तादात्म्य पाहून त्यांचा उद्धार न होता स्पृश्य कार्यवाहकांचीच अवनीत होण्याचा संभव आहे असे प्रांजलपणाचे उद्‌गार एका सच्छील गृहस्थाने काढले पुढे पुढे तर हा प्रयत्न अस्पृश्यांस वर नेण्यापेक्षा ब्राह्मणादी वरिष्ठ लोकांस खाली ओढण्यासाठीच आहे असे उद्‌गार जाहीर सभांतून स्पष्ट निघू लागले. ह्या मिशनच्या कार्यवाहकांनी अस्पृश्यवस्तीत आपल्या कुटुंबासह त्यांच्या बायकामुलांस समान वृत्तीने मिसळून बिनबोभाट निरपेक्ष रीतीने काम करावे, हे ह्या मंडळाचे आद्य तत्त्व ठरले. ह्या तत्त्वाप्रमाणे ७ बंधू व २ भगिनी यांनी काम केले आहे. त्यांपैकी ५ मराठे, ३ ब्राह्मण व १ मुसलमान प्रार्थनासमाजिष्ट, अशी त्यांनी जातवारी आहे. हे बहुतेक ब्राह्म धर्मानुयायीच असल्यामुळे प्रथम जातिभेद टाकूनच ही मंडळी कार्यास लागली."

"ह्या मिशनचे काम पुढेमागे अस्पृश्यांनी स्वतःआपल्यावर घ्यावे म्हणून प्रत्येक प्रांतिक शाखेच्या मुख्य ठिकाणी अस्पृश्य-विद्यार्थीगृह चालवण्याचा आग्रह आजपर्यंत चालू आहे. त्याशिवाय ह्या

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१३

पुनर्घटना

ह्यापुढे तीन महिन्यांनी पुणे शाखेचे नवीन नेमलेले जॉइंट सेक्रेटरीज रा. कृ. गो. पाताडे (स्पृश्य), रा. डी. व्ही. गायकवाड व रा. रा. स. घाडगे (अस्पृश्य) यांनी पुणे शाखेचा ता. १ एप्रिल, १९२१ ते ८ जुलै, १९२३ पर्यंतचा सव्वादोन वर्षांचा मराठीत अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात पान ६ वर खालील मजकूर आहे.

" तारीख २९ मार्च, १९२३ रोजी व्ही. आर. शिंदे यांनी आपले एक सविस्तर निवेदन ज्ञानप्रकाश व केसरी इत्यादी पत्रांतून प्रसिद्ध केले. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे अस्पृश्य बंधूंना ह्या मिशनमध्ये स्वराज्याचे सर्व हक्क देऊन त्यांच्या आत्मोद्धाराची जबाबदारी त्यांच्याच खांद्यावर टाकणे हे या पुनर्घटनेचे मुख्य लक्षण आहे. तारीख २९ मार्च, १९२३ रोजी पुणे शाखेच्या सर्व वर्गणीदारांची साधारण सभा बोलावली. त्या सभेने पूर्वीच्या कमिटीत भर घालून तिजमध्ये अस्पृश्यवर्गाच्या सभासदांचे बहुमत राहील असे केले व तिजला नवीन नियमांची सनद करण्याचा अधिकार दिला. ह्या नव्या सदनेचा खर्डा तारीख १५ एप्रिल, १९२३ रोजी भरलेल्या साधारण सभेत पास केला. अशा रीतीने पुनर्घटनेचे काम चालले असता काही विघ्नसंतोषी मंडळीकडून अडथळे येऊ लागले. इतकेच नव्हे तर काही विद्वान सभासदांनी अस्पृश्यांपैकी काही सभासदांना चिथावून अडवणूकीचाही मार्ग पत्करला. सनदशीर प्रयत्न करण्याचे अंगवळण आमच्या लोकांत अगोदरच कामी, तशात ज्या वर्गासाठी हे मिशन आहे त्याच्यातच दुही माजवून दिल्यावर ह्या कामी अत्यंत हिरमोड करणारे अडथळे येऊ लागले. परंतु श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांनी निर्भीडपणे रेखाटलेले धोरण अस्पृश्य वर्गांना इतके प्रिय झाले की, महारमांग, चांभार, भंगी जातीचे पुढारी देखील आपसातील पुष्कळ दिवसांचे बखेडे विसरून आपला फायदा ओळखून झीज सोसून कामे करू लागले. बहुतेक दररोज रात्री कमिटीच्या सभा होऊ लागल्या. विरुद्ध पक्षाची कारवाईही काही वर्तमानपत्रातून चमकू लागली. मिशनमध्ये कधीच लक्ष न घातलेली माणसे आणि काही अस्पृश्यवर्गीय व्यक्तीही ह्या विरोधात दिसू लागल्या. तारीख २९ मार्च, १९२३ च्या सभेला ७७ सभासद नसलेले १२ गृहस्थ हितचिंतक म्हणून हजर हाते. तारीख १५ एप्रिल, १९२३ च्या सभेला (जीत नवीन घटना पास व्हावयाची होती) फक्त सभासदांनाच घेण्याचे ठरल्यामुळे ज्याना हजर राहण्याचा अधिकार नव्हता असे कित्येक लोक सभेच्या वेळेपूर्वीच अहल्याश्रमाच्या आजूबाजूला टेहळू लागले. हे डावपेच कार्यकारी मंडळींना ठाऊक असल्याने २५ स्वयंसेवकांची तुकडी बंदोबस्तासाठी ठेवली होती. नियमांची सनद मंजूर झाल्यावर २२ सभासदांचे नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. त्यात अस्पृश्यवर्गाचे दोनतृतीयांश सभासद असून महार, चांभार, मांग, भंगी, मुसलमान या वर्गाचे प्रत्येकी दोन आणि पारशी, मराठा, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या जातींचा प्रत्येकी एक असे जातवारीने कमिटीने १४ सभासद घेण्याचे ठरवले. ८ अधिकाऱ्यांपैकी ६ व तीन ट्रस्टीतील १ अस्पृश्यवर्गातील निवडण्यात आले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१४

ट्रस्टींचा गोंधळ

गुप्त कारस्थान : १२ नोव्हेंबर, १९२२ रोजी मातृसंस्थेच्या साधारण सभेने माझ्या ट्रस्टीशिपविषयी एक भानगड करून ठेवली होती. ती तिने मला कळवली नव्हती. ती अशी होती की, श्रीयुत बॅ. मुकुंदराव जयकर, रा. लक्ष्मणराव नायक आणि मी हे तिघे ट्रस्टी असता आमच्याऐवजी रा. जी. बी. त्रिवेदी मुंबई, जी. जी. ठकार, पुणे आणि रा. लक्ष्मणराव नायक, मुंबई हे नवीन ट्रस्टी नेमण्याचा ठराव केला होता. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी कदाचित आपल्या ट्रस्टीशिपचा राजीनामा दिला असेल म्हणून त्यांच्या ठिकाणी जी. जी. ठकार यांची नेमणूक झाली असेल; पण मी माझ्या ट्रस्टीशिपचा राजीनामा दिला नसतांही माझ्याऐवजी जी. बी. त्रिवेदी ह्यांना ट्रस्टी का नेमले हे कळले नाही. माझे नाव ट्रस्टीजमधून काढण्याचा जनरल बॉडीचा ठराव मला जवळ जवळ दोन वर्षे कळवण्यातही आला नाही ह्याचे गूढ तर मला मुळीच कळेना. पुढे मातृसंस्थेने माझ्याविरुद्ध हायकोर्टात फिर्याद केली आणि हायकोर्टाने मलाच ट्रस्टी ठेवावे असा अनुकूल निकाल दिला. त्यावर मातृसंस्थेचे जनरल सेक्रेटरी लक्ष्मणराव नायक यांनी ८ जुलै, १९२५ रोजी नं. ८६ चे सविस्तर खुलाशाचे पत्र पाठवले. त्यात असे लिहिले होते की, मी पुणे शाखा हीच सर्व मिशनचे मुख्य ठिकाण करू पहात होतो आणि मुंबई शाखा व बाहेरील सर्व कामे पुण्याहूनच चालवावयाची असा माझा प्रयत्न चालला होता इतकेच नव्हे तर मुंबई इलाख्याच्या विद्याखात्याच्या तत्कालीन पंचम वार्षिक अहवालात असा उल्लेखही होता, असे सांगून रा नायक त्याच पत्रात म्हणतात की, ह्या खोट्या विधानाबद्दल कोण जबाबदार आहे हे कळत नाही.

पण ही सर्व माझ्या उलट चाललेली कारवाई, मातृसंस्थेने १९२२ साली मला ट्रस्टीमधून कमी करण्याचा जो ठराव केला त्याच्यापूर्वी जर मला कळली असती, निदान झाल्यावर तरी लवकर कळवली असती तरी मी सलोख्यासाठी चालवलेले प्रयत्न मातृसंस्थेला कळून तिने माझ्याविरूद्ध हा ठराव केला नसता. १९२४ साली मी मिशन सोडून मंगलोरास ब्राह्म समाजाचे कामासाठी जाऊन राहिल्यावर मला ट्रस्टीमधून काढले आहे याची गुणगुण माझ्या कानावर आली. माझ्या उलट हायकोर्टमध्ये फिर्याद करून माझ्या जागी नवीन निवडलेल्या ट्रस्टीला कायम करून घेण्याबद्दलचा मातृसंस्थेचा प्रयत्न मला कळला. मी लागलीच जी. बी. त्रिवेदी यांस मित्रत्त्वाचे नात्याने तातडीच्या पत्राद्वारे कळवले की, माझ्या उलट केलेल्या फिर्यादीने मिशनला धोका आहे, आणि माझ्यावर तर अन्याय होत आहे. एखाद्या ट्रस्टीला ट्रस्टबोर्डवरून कमी करावयाचे असेल तर ट्रस्ट ॲक्टमध्ये सहा कारणे स्पष्ट सांगितली आहेत, त्यापैकी एकही कारण मजकडून घडले नसताना हा उपद्व्याप का करण्यात येत आहे? दुसरा एक स्पष्ट अन्याय असा होत होता की, हायकोर्टपुढील खटल्याचे स्वरूप एका बाजुला मिशनसारखी सन्मान्य संस्था ही वादी होती आणि दुसऱ्या बाजुला मजसारखी एक गरीब व्यक्ती

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१५

कार्यवाहकांची निवेदने

माझ्या स्वीकृत पवित्र राष्ट्रकार्याचे श्रेय ज्यांनी ज्यांनी मजबरोबर वाहून घेऊन स्वार्थत्याग केला, ज्यांनी सन्मान्य सेवा केली, ज्यांनी मधून मधून मदत केली, अशांचे थोडेबहुत तरी स्मरण मी येथे केले पाहिजे. काहीजणांनी आपल्या आठवणी स्वतंत्रपणे पाठवल्या आहेत. काहीच्या आठवणी माझे मित्र बी. बी. केसकर ह्यांनी लिहून पाठवल्या आहेत. काहीजण वृद्ध झालेले आहेत, तर काहीजण कालवश झालेले आहेत. त्यांच्याविषयी पुढे दिल्याप्रमाणे हकीकत आहे.

(१) रा. सय्यद अबदुल कादर लिहितात :--

माझा जन्म १० ऑक्टोबर, १८८९ मध्ये जमखंडी येथे झाला. माझे वडील जमखंडीत बुकबाइंडर होते. ते धार्मिक वृत्तीचे असून तेथील एका जमातीचे पुढारी होते. ते आपल्या नोकरीबाहेरचा वेळ धर्मप्रचारार्थ घालवीत. इस्लामी संस्कृतीला अनुसरून आपल्या समाजात सामाजिक सुधारणा करण्याकडे त्यांचे लक्ष असे. मुसलमानात लग्न लावण्याचा हक्क काजींचा व त्याबद्दल त्याला स्थानिक रिवाजाप्रमाणे फी द्यावी लागे. 'शरीयत' प्रमाणे लग्न लावण्याचे काम कोणलाही करता येते व त्याबद्दल फी देण्याची जरुरी नाही अशी चळवळ माझ्या वडिलांनी सुरू केली. हे प्रकरण पुष्कळ ठिकाणी कोर्टात जाऊन त्यात त्यांना यश आले. ह्याच वेळी माझ्या वडिलांची व गुरुवर्य अण्णासाहेब शिंदे यांच्या वडिलांची ओळख झाली. गुरुवर्य अण्णासाहेब त्यावेळी जमखंडी हायस्कूलमध्ये शिकत होते. लग्नाच्या प्रकरणासंबंधी लॉ रिपोर्टरमधून काही उतारे मराठीमधून करून देण्यात गुरूवर्य अण्णासाहेबांची फार मदत होत होती. तेव्हापासून गुरुवर्य अण्ण्णसाहेबांकडे माझे जाणे-येणे सुरू झाले. पुढे गुरुवर्य अण्णासाहेब प्रार्थनासमाजात गेल्यानंतर जमखंडीस जेव्हा-जेव्हा येत तेव्हा-तेव्हा त्यांच्या घरी उपासना होत. त्या मला फार आवडू लागल्या. पुढे अण्णासाहेब विलायतेला गेल्यावर त्यांच्या घरच्या मंडळीशी माझा स्नेह जडला. त्यांच्या मातोश्री फारच प्रेमळ असल्याने त्यांच्याविषयीचे पूज्य प्रेम अद्याप माझ्या मनामध्ये जागृत आहे. १९०३ साली गु. अण्णासाहेब विलायतेहून परत आल्यावर दौऱ्यावर ते जमखंडीस आले. त्या वेळी त्यांच्याबरोबर शिवरामपंत गोखले या नावाचे प्रचारक होते. त्या वेळी गुंडांनी त्यांचा जो छळ केला त्याचा परिणाम माझ्यावर उत्तम व्याख्यानापेक्षांही अधिक झाला. धर्मविषयक उदार विचार मनात येऊ लागले. १९०४ चे सुमारास कलकत्त्याचे पं. शिवनाथशास्त्री मुंबईस आले तेव्हा मी प्रा. समाजाचा सभासद झालो. त्याच वेळी संयुक्त प्रांतात एक मुसलमान गृहस्थ आर्य समाजात गेले, दुसरे एक मुसलमान उत्तर हिंदुस्थानात ख्रिस्ती झाले होते. मी मुंबई येथील अंजुमान इस्लाम हायस्कूलमधून मॅट्रिक झालो होतो. तेथेच मी हंगामी मास्तर होतो. तेथील अधिकाऱ्यांच्या ऐकण्यात वरील दोन मुसलमानांची धर्मांतरे आल्यावरून व मी प्रार्थना समाजिस्ट झाल्याचे नजरेस आल्यावरून वरील

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

(३) रा. दामोदर नारायण पटवर्धन लिहितात :--१९०९ ते १९१२ पर्यंत बरेच वेळा सहवासाचे प्रसंग आल्यामुळे रा. शिंदे ह्यांच्या कार्यात शिक्षक म्हणून नुसते वरवरचे काम न करता प्रत्यक्ष प्रचारक म्हणून वाहून घ्यावे असा निश्चय होऊ लागला. त्यामुळे हायकोर्ट वकिली किंवा सरकारी ट्रेनिंगकडे न जाता मी बराच वेळ ह्या संस्थेतच घालवू लागलो. १९१२ पासून १९२१ पर्यंत रा. शिंदे ह्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीच मी काम केले. ह्यामुळे विविध प्रसंगी त्यांचा स्वभावविशेषांचे जे दर्शन झाले त्याचा सारांश खाली देत आहे.

सर्वांशी समानतेची वागणूक : रा. शिंदे मराठा समाजातील प्रख्यात विद्वान असल्यामुळे त्यांच्याकडे श्रीमंत, सरदार, नामांकित विद्वान हे भेटीस येत. त्याचप्रमाणे पत्करलेल्या कामामुळे अस्पृश्यांतील अविद्वान व दरिद्री माणसेसुद्धा येत. अशा वेळी आपणाकडून करता येईल ती त्यांची कामगिरी करून त्यांना संतोषित करून वाटेला लावणे हे मोठे कौशल्याचे काम आहे. पण हे काम रा. शिंदे आपल्या गोड व सुविनीत वाणीने उत्तम प्रकारे पार पाडीत. अशिक्षितांच्या सभा असोत की सुशिक्षितांच्या परिषदा असोत. प्रत्येक प्रसंगी त्या त्या उपस्थित समाजास योग्य असा शब्दसमूह वापरून त्यांची व्याख्याने होत. आलेल्यांचे आदरातिथ्य आपल्या पदरास खार लावून व घरच्या मंडळीस कष्टवूनही ते करीत. आपल्या प्रोफेसर व श्रीमंत मित्रांप्रमाणेच अस्पृश्यांनाही ते वागवीत. यामुळेच श्रीमंत व गरीब यामधील संबंध जुळवणारा हा परोपकारी दुवा माझ्या सारख्यांना फार आवडे. त्यांचा हा वागणुकीचा कित्ता मी आपल्यापुढे ठेवला आहे.

राष्ट्रीय कार्याची तळमळ : रा. शिंदे प्रत्येक पक्षाच्या लहानथोर कार्यकर्त्यास आपला कार्यक्रम नीटपणे समजावून देत व आपल्या कार्यास सर्व पक्षांची जरुरी आहे व हे सर्व पक्षांनी करावयाचे राष्ट्रीय कार्य आहे अशी त्यांची खात्री करून देता. त्यामुळे त्यांचे पक्षातील धोरण संस्थेला फायदेशीरच झाले. आपण पत्करलेले काम सामाजिक व शिक्षणविषयक असले तरी वेळोवेळी होणाऱ्या राजकीय व सामाजिक कामातून इतर पक्षांबरोबर सहकार्य न भिता करीत. कामाची राष्ट्रीयता ओळखण्याची पात्रता व तळमळ ही मी बरेच प्रसंगी अनुभवलेली असल्यामुळे व मला तेच तत्त्व पटल्यामुळे माझी रा. शिंदे याजवरील निष्ठा वाढली. राष्ट्रीय चळवळीत सर्व पंथ, धर्म, वर्ग व पक्ष एकजीव होऊन झटले तरच यश मिळते. पण कधी कधी रा. शिंदे यांच्या या धोरणामुळे आमच्या संस्थेतील अधिकारी म्हणजे कै. डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती चंदावरकर इत्यादी सभासदांचा रोषही त्यांना सोसावा लागला.

(३) **सहकाऱ्यांशी बंधुत्वाचे वर्तन :** वयाने मी लहान असल्यामुळे माझ्याशी ते धाकट्या भावाप्रमाणे वागत व माझ्या कुटुंबातील मंडळीशीही तसेच वागत. त्यांच्या कुटुंबातील मंडळीशी म्हणजे सौ. वहिनीसाहेब व भगिनी जनाबाई ह्या आम्हाला वहिनी-भगिनीप्रमाणेच वाटत व वाटतात. डी. सी. एम्. सोडताना आमचा मतभेद व वादविवाद चांगलाच झाला, पण त्याचे कार्य झाल्यानंतर आता माझ्या मनात मागील स्नेहाचीच आठवण येते व पुण्यास मी जातो तेव्हा एकदा तरी त्यांचे भेटीस जाऊन येतो. अस्पृश्यतानिवारकांचे रा. शिंदे गुरू असल्यामुळे थोड्याशा मतभेदामुळे त्यांच्या गुणांची योग्यता कमी करणे कधीही अयोग्यच ठरेल.

दा. ना. पटवर्धन

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१६

लोकमताचे हेलकावे

लोकमताचे हेलकावे : आमच्या मिशनचा प्रसार सर्व देशभर झाल्याने मी निरनिराळ्या प्रांतात फिरत असतांना वेळोवेळी अनेक मानपत्रे मिळाली. त्यापैकी काहीचा खाली उल्लेख करीत आहे :--

(१) पालघाट, मलबार.

(२) हुबळी, कर्नाटक.

(३) २३ एप्रिल, १९२३ रोजी पुणे शाखेचे शिक्षक व विद्यार्थी यांजकडून ५१ व्या वाढदिवसानिमित्त.

(४) २३ एप्रिल, १९२३ रोजी पुणे शाखेच्या शिक्षकिणी व विद्यार्थिनी यांजकडून ५१ व्या वाढदिवसानिमित्त.

(५) २३ एप्रिल, १९२३ रोजी पुणे शाखेच्या शिक्षकिणी व विद्यार्थिनी यांजकडून भगिनी जनाबाईस.

(६) २३ एप्रिल, १९२५ रोजी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांतर्फे.

(७) १९२८ साली दौलतपूर (पूर्व बंगाल) कॉलेज विद्यार्थ्यांतर्फे.

(८) १९३३ डिसेंबर, २३ रोजी चोखा मेळा बोर्डिंग, आर्वी (नागपूर).

(९) १९३३ डिसेंबरमध्ये नागपूर अस्पृश्यवर्गातर्फे गणेश अक्काजी गवईकडून.

(१०) १९३४ जून, १८ रोजी मुंबईतील ४१ संस्थातर्फे.

१९२५ सालातील ब्राह्मणेतर पक्षाच्या मानपत्रास मी खालीप्रमाणे उत्तर दिले.

"मुंबई येथे ४१ संस्थातर्फे १९३४ साली, जो मानपत्रसमारंभ झाला तो सर्वांत मोठा होता. महात्मा गांधी हे या समारंभाचे अध्यक्षस्थान घेणार असे प्रसिद्ध झाल्याने संध्याकाळी परळच्या दामोदरदास ठाकरसी हॉलमध्ये अलोट गर्दी झाली होती, इतकी की काही वेळ ट्रॅमगाड्या बंद ठेवाव्या लागल्या. शेवटी श्री. मथुरादास बसनजी यांच्या अध्यक्षतेखाली समारंभ पार पडला. उत्तर देताना मी म्हटले, "हा मी माझा स्वतःचा सन्मान समजत नाही. हा माझ्या कार्यात साह्यकारी झालेल्या सर्वांना सन्मान आहे. मला हिंदु, मुसलमान, खिश्चन, पारशी, युरोपियन वेगैर सर्वांनी मदत केली आहे. पण ती त्यांनी माझ्यावर मेहेरबानी म्हणून केलेली नसून कर्तव्य म्हणून केलेली आहे. हिंदुस्थानातला अस्पृश्यतेसारखा

रा. रा. विठ्ठल रामजी शिंदे यास :--

एका सरकारी अंमलदाराच्या (आज सकाळी मला) गुप्त हेराकडून बातमी लागली की, आपण एक 'मराठा स्वराज्य संघ' स्थापन केला आहे. आपण केवढी मोठी भंयकर चूक करून बसला आहात हे अजूनही आपल्या लक्षात येत नाही. तेव्हा आपण अगदी मूर्खातले मूर्ख आहात असेच म्हटले पाहिजे. तुम्हाला हे ब्राह्मण लोक हरबऱ्याच्या झाडावर चढवीत आहेत. तुमच्या हातून ते मराठ्यांत फूट पाडीत आहेत. तेव्हा आपण समाजघातक, राष्ट्रघातक होणार काय ? तुम्ही केळकरांशी केलेला गेल्या आठवड्यातील सर्व गुप्त व्यवहार किंवा कट ही सर्व बातमी सी. आय. डी. च्या मार्फत सरकार व गव्हर्नरसाहेब यांजकडे कळविण्यात आली आहे. तर आपल्या मिशनचे चंबू गबाळे लवकरच आटोपून आपणांस कायमचा रामराम ठोकावा लागेल आणि मग खुशाल ब्राह्मण लोकांच्या पायांचे तीर्थ चाटीत बसा, ब्राह्मण लोकांनी फसवले आहे. तेव्हा लवकर शुद्धीवर या, नाही तर तोंडघशी पडाल. मागून बोंब मारण्यात अर्थ नाही. तेव्हा मराठा स्वराज्य संघ मोडून टाका व कोणासही मदत करू नका. तुमच्या मिशनशिवाय तुम्ही दुसरे कोणतेही कार्य करू नका. परंतु मिशनबद्दलची कळकळ आता सरकारास राहणार नाही. कारण तुम्ही जे मुख्य ते राजद्रोही आहात म्हणून.

हितचिंतक

अशा पत्राबद्दल काही लिहिण्याची जरुरी नाही. पण मराठे लोकांपैकी काहीनी राष्ट्रीय कामाबद्दल असा निषेध केला असता ब्राह्मणांतील काही विद्वान् व जबाबदार व्यक्तींनी माझी वृत्ती राष्ट्रीय नाही असा गैरसमज करून घेऊन उलट दिशेने कसा निषेध केला आहे हे खालील उताऱ्यावरून समजून येईल. सदर उतारा जानेवारी, १९२३ सालच्या 'चित्रमय जगता' तील रा. रा. महादेव राजाराम बोडस यांच्या 'अस्पृश्योद्धार' या लेखातील आहे.

"आपली सामाजिक व धार्मिक सुधारणांची तट्टे चोहोकडे नाचवण्याकरताच निराश्रितांचा कैवार घेणाऱ्यांचे हातून त्यांचा उद्धार कधीही व्हावयाचा नाही. कोणतीही चळवळ एकनिष्ठ असल्याशिवाय यशस्वी होत नाही. एका कामात दुसरी दहा खेकटी घुसडली की सर्वच कामे बिघडतात. अस्पृश्यतेच्या प्रश्नाला रोटीबेटीव्यवहार आणि सनातन धर्माची टवाळी चिकटविल्याने निराश्रित शिखंडीना पुढे करून सब गोलंकार करण्याचा या मंडळीचा बेत आहे अशी साधारण लोकांची समजूत झाली व त्यामुळेच कारण नसता सर्व जातीचा या चळवळीला विरोध होऊ लागला. पण तेच सन १९१८ साली लो. टिळकांनी सहानुभूती दाखवल्याबरोबर १९२० साली महात्मा गांधीनी हा प्रश्न हाती घेतला व १९२१ साली अहमदाबादच्या काँग्रेसमध्ये राजकीय व राष्ट्रीय करून टाकला. रा. विठ्ठलराव शिंद्याना १२ वर्षांत जे कार्य करता आले नसते ते गांधींनी दोन दिवसांत केले. म्हणजे शिंद्यांच्या कामाचे महत्त्व कमी होते असे नाही. उलट असेही म्हणता येईल की, शिंद्यांच्या १२ वर्षे नांगरणीमुळे गांधीना बीजारोपण करता आले. परंतु एकाच कार्याविषयी उभयतांचा दृष्टिकोन आणि कार्यपद्धती यातील भेद दाखवण्याकरताच ही तुलना केली. रा. शिंदे निराश्रितांना व्यक्तीशः सुखी करण्याकरता झटत असल्यामुळे समाजाला विशेष कळकळ वाटत नव्हती. समाजात सुखी व दुःखी दोन्ही प्रकारचे लोक असल्यामुळे वैयक्तिक सुखाविषयी लोकांना फारशी आस्था वाटत नाही. पण राष्ट्राच्या भवितव्यतेचा प्रश्न आला

१७

सुट्या आठवणी

लाला लजपतराय : मिशन नुकतेच सुरू झाले होते. सुरतेच्या काँग्रेसच्या बैठकीस (१९०७ साली) लाला लजपतराय आले होते. आमच्या मिशनच्या निराश्रित सेवासदनात माझे आईबाबा आणि घरची सर्व मंडळी राहून महारामांगाची सेवा करितात ही गोष्ट लालाजींच्या कानावर गेली. म्हणून ते हे सदर पाहण्यास आले. माझी वृद्ध आई सामोरी गेली. लालाजींनी एकदम तिच्या चरणावर मस्तक ठेवून दंडवत प्रणाम केला. आईने त्यांना उचलून उभे केले आणि त्यांच्या कपाळावर हात फिरवून आपल्या शिरावर कडकडून बोटे मोडली. हा कुरवाळण्याचा मराठी प्रकार पाहून लालाजींना अत्यंत आनंद झाला. It is one of the holiest thing that can be done by the religious and charitable societies of this country.

Lala Lajpatrai

सय्यद आणि शिंदे : कर्नाटक शाखेची घटना करीत असताना सय्यद आणि शिंदे या नावांचा मोठा गमतीदार घोटाळा होत असे. एके दिवशी मध्यरात्री बेळगांवच्या स्टेशनवर उतरलो. भूक लागली होती. संबंध बाजारात एकच चहाचे दुकान उघडे होते. सफरीवर असताना आम्हा दोघांची नावे वर्तमानपत्रांतून जाहीर झाली होती. आम्ही चहा घेण्यास दुकानात गेलो असता आम्हास चहा देण्यास दुकानदार मागेपुढे करू लागला. माझी दाढी पाहून मीच सैय्यद असावा, असा त्यास संशय आला. सय्यदला दाढी नव्हती म्हणून त्याच्या हिंदुत्वाविषयी संशय आला नाही. हा घोटाळा ओळखून सय्यद पुढे होऊन चहावाल्यास म्हणाले की, "अहो, दाढी असली म्हणून काय झाले? ते हिंदू आहेत!" पण खुद्द सय्यदविषयी प्रश्नच निघाला नाही. काही आढे-वेढे न घेता आम्हाला चहा मिळाला आणि काम झाले.

पुढे धारवाड व हुबळी येथील कामे आटोपून आम्ही गदग येथे गेलो. तेथील एका श्रीमंत व्यापाऱ्याने गावाबाहेरील आपल्या एका मोठ्या बंगल्यात उतरण्याची आमची सोय केली होती. पण जेवण्याची सोय आम्हासच करावयाची होती. कर्नाटकात लिंगायतांच्या मठात पैसे घेऊन भाकरी देण्याची सोय असते. एक दिवस तशी सोय झाली. पण आम्ही कुणीतरी महारामांगामध्ये काम करणारे विक्षिप्तराव आहोत असे ऐकून दुसरे दिवशी मठाधिकाऱ्यांनी भाकरी देण्याचे नाकारले. आमचा स्वयंपाक आम्हीच करू लागलो. बागेतल्या नळावर बसून मी भांडी घासावीत आणि सय्यदने आत बसून स्वयपाक करावा अशी वाटणी झाली. गावातून लहानमोठे गृहस्थ आम्हास भेटण्यास येत भांडी घाशीत बसलेला मीच सय्यद असे समजून शिंदेसाहेब कोठे आहेत असे मला विचारीत. "दिवाणखान्यात बसा, भेटतील तेथे" म्हणून त्यांना आत पाठवी. आत गेल्यावर सय्यदलाही तोच प्रश्न विचारीत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१८

मंगलोर ब्राह्मसमाज

डॉ. ड्रमंड : मी तारीख ४ फेब्रुवारी, १९२४ ला कलकत्त्याहून पुण्यास आलो. ठरल्याप्रमाणे डॉ. ड्रमंड देखील अहल्याश्रमात माझे पाहुणे म्हणून आले. ते आठ दिवस मजबरोबर होते. ह्या वेळी पुढील गोष्ट घडली. कर्नल एच. सी. स्टीन नावाचे एक लष्करी अधिकारी पुणे शाखेचे दरसाल १०० रु. देणारे प्रथमपासूनच मेंबर होते. पुणे शाखेचे मी काम सोडल्यावर ते त्या शाखेचे अध्यक्ष म्हणून अद्यापही काम करीत आहेत. माझे पाहुणे डॉ. ड्रमंड ह्यांचा कर्नल स्टीनशी परिचय होता म्हणून कर्नल स्टीननी डॉ. ड्रमंड यांना पुणे लष्कर येथील वेस्टर्न इंडिया क्लबमध्ये एक दिवस जेवायला नेले. रात्री जेवणाचे वेळी विवक्षित पोषाख घालायचा असा जो युरोपियन सभ्यतेचा प्रघात आहे तो पोषाक त्यावेळी ह्या दोघांच्याही अंगावर नव्हता. जो पोषाख होता तो सभ्य तऱ्हेचा होता. तथापि ठराविक आढ्यतेच्या साचाचा तो नव्हता. म्हणून क्लबच्या मॅनेजराने नेहमीच्या टेबलावर जेवणाची त्यांना परवानगी दिली नाही. दुसऱ्या एका खोलीत कोपऱ्यात ठेवलेल्या टेबलावर कसे तरी जेवायला घालून त्यांची बोळवण केली. हा फाजील गौरव पाहून डॉ. ड्रमंडना फार वाईट वाटले असे त्यांनी मला सांगितले. यःकश्चित् पोषाखाच्या बाबतीत जर अस्सल युरोपियनास अशी गचांडी बसते तर राजकीय हक्कासंबंधी भांडत असता अत्यंत प्रतिष्ठित हिंदू लोकांचा युरोपियनाकडून कसा उपमर्द होत असावा याची कल्पना डॉ. ड्रमंडली करावी असे मी त्यांना सूचवले. पुढे वेळोवेळी राजकारणाचा वाद निघे तेव्हा डॉ. ड्रमंडचे व माझे एकमत होईना साहजिकच आहे. ज्याच्या पायात जोडा त्याला खिळा टोचतो, म्हणून आम्ही राजकारणावर अतःपर बोलू नये असे ठरले. आम्ही धर्मबंधू असलो म्हणून राजकारणबंधू थोडेच होणार ! हिंदुस्थानातील आम्ही काळे लोक राजकारणात एक होऊ शकत नाही, मग नुकतेच बाहेरून आलेल्या गोऱ्यांशी आमचे एकमत कसे होणार ?

मंगलोरचे स्वागत : बंगलोर, मद्रास, कोकोनाडा, पीठापूर, कोइमतूर, कालिकत, मंगलोर वगैरे ठिकाणी फिरून तेथील परिस्थिती डॉ. ड्रमंडला कळवून त्यांना पाठवून देण्यात आले आणि मी मुंबईला आलो. मुंबईस माझे कनिष्ठ बंधू एकनाथराव यांचेकडे माझी पत्नी व दोन मुले यास ठेवून, भगिनी जनाबाई व धाकटा मुलगा चि. रवींद्र यास घेऊन एप्रिल महिन्यात १९२४ त मंगळूरला आलो. हिंदुस्थानच्या नैऋत्य किनाऱ्यावर कानडा भागात कानडी भाषा चालू आहे. मद्रास इलाख्याकडील हा शेवटचा कानडी जिल्हा होय. ह्या जिल्ह्याच्या दक्षिणेस ब्रिटिश मलबार (कालिकत जिल्हा) आणि त्याच्या दक्षिणेस त्रावणकोर व कोचीन ह्या दोन संस्थानाचा अस्सल मलबार प्रांत लागतो. याच्या पूर्वेस कोइमतूरपासून बंगलोर नेलोर ते तहत कारोमांडलच्या किनाऱ्यापर्यंत

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

१९

व्हायकोम सत्याग्रह

१९२४ चा पावसाळा सुरू झाला. तसाच त्रावणकोर या संस्थानच्या व्हायकोम या गावी मोठा सत्याग्रह सुरू झाला. व्हायकोम येथील देवळातच नव्हे तर देवळाला जाण्यायेण्याच्या वाटेवरही मोठमोठ्या प्रतिष्ठित पण अस्पृश्य मानलेल्यास जाण्यास कायदेशीर मनाई होती. म्हणूनच स्वामी विवेकानंदानी 'मलबार म्हणजे एक वेड्यांचे इस्पितळ' असे म्हटले होते. अशा देवळांच्या वाटेवर जाण्याला ख्रिस्ती, मुसलमान वगैरे कोणत्याही परधर्मीयाला केव्हाही मनाई नव्हती. इतकेच नव्हे तर देवळाच्या मंडपात व बाह्य मंडपात अशा परकीयांना प्रतिष्ठितपणे नेण्यात येत असे. हा विलक्षण अन्याय हाणून पाडावा म्हणून व्हायकोमला सत्याग्रह सुरू झाला. हा विषय मुख्यत: सामाजिक सुधारणेचा होता तरी गांधींच्या नवीन राजकारणामुळे त्यास उग्र राजकीय स्वरूप प्राप्त झाले होते. काही अस्पृश्यवर्गीय मंडळी ह्या सत्याग्रहापूर्वी कित्येक वर्षे आर्य समाज, ब्राह्य समाज व थिऑसफी वगैरे नवीन धर्मपंथातून सभासद म्हणून दाखल झाली होती. त्यांनादेखील रस्त्यावर जाण्यास अटक होऊ लागली. लाहोरचे स्वामी श्रद्धानंद आर्य समाजाचे वतीने, कालिकतचे मंजिरी रामय्या (ज्यानी कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये अस्पृश्यतेच्या विरुद्ध प्रथम ठराव आणला) थिऑसफीच्या वतीने वगैरे सुधारक मंडळी ह्याच सत्याग्रहात मोठ्या अटीतटीने भाग घेत होती.

साधु शिवप्रसाद : अशा वेळी मलबार प्रांतातील ब्राह्म समाजाचे सभासदच नव्हे तर एक प्रचारक, साधु शिवप्रसाद नावाचे तरुण व्हायकोमला गेले. ते पूर्वाश्रमीचे तिय्या जातीचे होते. म्हणून इतर अस्पृश्यांप्रमाणे त्यांनाही मनाई झाली. त्यांनी तो वृत्तांत कलकत्त्याच्या साधारण ब्राह्म समाजाच्या कमिटीकडे लिहून कळवला. साधारण ब्राह्म समाजाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. प्राणकृष्ण आचार्य यांनी त्रावणकोर दरबाराकडे जाहीर विनंतीपत्र पाठवून ह्या बाबतीत ताबडतोब दाद मागितली आणि ती साधारण ब्राह्म समाजाचा मंगलोर येथील प्रतिनिधी म्हणून पत्राची एक प्रत मजकडे पाठवून मी समक्ष व्हायकोम येथे जावे आणि शक्य असेल तो प्रयत्न करावा अशी सूचना मला करण्यात आली. मलबार प्रातांत ब्राह्म समाजाचा प्रचार करणारे साधु शिवप्रसाद यांचीही मला वेळोवेळी पत्रे येऊ लागली आणि व्हायकोम येथेच नव्हे तर त्या प्रांतात प्रचारकार्यासाठी मी मदत करावी म्हणून दक्षिण व उत्तर मलबारात दौरा काढावा असा त्यांचा तगादा लागला. मी हे प्रकरण मंगलोर समाजाच्या कमिटीपुढे ठेवले; पण कमिटीला नको म्हणण्याचे धैर्य होईना व हो म्हणण्याचेही आवडेना. पैशाचाच प्रश्न (दौऱ्याच्या खर्चाचा) असेल तर तो भाग मी पाहून घेतो, पण ज्या अर्थी अस्पृश्यसेवा हे माझ्या ब्राह्म प्रचाराचे मुख्य अंग आहे आणि ज्या अर्थी कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाच्या अध्यक्षांनी मी व्हायकोमला जावे म्हणून सुचवले त्या अर्थी हा दौरा काढणे माझे कर्तव्य आहे, आणि मंगलोर ब्राह्म समाज कमिटीला कोणतीही हरकत घेणे शक्य नाही.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

विवाह असे न म्हणता संबंधम् असे म्हणतात. एका नंबुद्री ब्राह्मणास अशा प्रकारे अनेक नायर स्त्रियांशी संबंध ठेवता येतो. नंबुद्री कुटुंबात वडील मुलानेच आपल्या नंबुद्री जातीच्या स्त्रियांशी विवाह करावा व बाकीच्या मुलानी नायर जातीच्या स्त्रियांशी संबंधम् लावावा असा प्रघात आहे. नंबुद्री जातीयाशी असा संबंध ठेवून घेणे नायर लोकात मोठे भूषणावह समजले जाते. वडील मुलांशीच नंबुद्री स्त्रियांनी लग्न लावावे ही चाल असल्याने नंबुद्री स्त्रिया पुरुषापेक्षा अधिक शिल्लक राहून बहुपत्नीकत्वाची चाल पडली आहे. नायर व नंबुद्रीचा संबंध नुसता बेटीव्यवहारापुरताच होतो; रोटीव्यवहार होत नाही. आणि बेटीव्यवहारसुद्धा पुष्कळ प्रसंगी नावापुरताच असतो. नंबुद्रीप्रमाणेच नायर लोकही आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीशी अशा प्रकारचा बेटीव्यवहार ठेवतात. नायर समाज मातृशासनपद्धतीचा (Matriarchy) आहे. आर्थिक मिळकतीचा वारसा व वहिवाट बायकांकडून चालवयाची. पुरुष मिळकतीचा नुसता व्यवस्थापक, एका बाईची मिळकत अशा प्रकारे तिच्या बहिणीच्या मुलीकडे जाते. वस्त्रप्रावरणाचे बाबतीतही नायर लोकात चमत्कारिक चाली आहेत. बेंबीपासून वरील भागावर कसलाही कपडा न वापरण्याची चाल त्यांच्यात आहे. स्त्रिया अर्धनग्न असतात. अर्थात् या बाबतीत कालमानेरून पुष्कळच सुधारणा झाली आहे. छातीवर एखादा लहानसा रुमाल किंवा तत्सम वस्त्र टाकले की झाला पोषाख; पण कोणी वडीलधारे माणूस सामोरे आल्यास त्याचा मान राखण्याकरिता तोही रुमाल काढून टाकण्याची पद्धत आहे. युरोपियन लोक जसे डोकीवरची टोपी उतरून सन्मान दर्शवतात त्याचप्रमाणे छातीवरचे वस्त्र काढण्याची ही स्त्रियांत पद्धत असे. नायरहूनही खालच्या जातीतील स्त्रिया राजरोसपणे रस्त्यांतून उघड्या छातीने हिंडत असल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. वरिष्ठ जातीपुढे छातीवर वस्त्र घेऊन जाणे म्हणजे त्यांचा उपमर्द करण्यासारखे आहे असे कनिष्ठ वर्गीय स्त्रिया समजत. मात्र नंबुद्री जातीच्या स्त्रिया पडद्यात असत. त्या कधी उघड्यावर दिसत नसत. कलावंतिणी व वाईट चालीच्या स्त्रिया मात्र अंगावर संपूर्ण पोषाख घालीत. त्या प्रांताच्या सेन्सस् रिपोर्टातून व डिस्ट्रिक्ट गॅझेटमधून अशा विलक्षण चालीसंबंधी तपशीलवार आणि चित्तवेधक वर्णने आहेत.

मंगलोरकडे कोर्वी नावाची एक जंगली जात आहे. त्या जातीच्या बायका रस्त्यातून अर्धनग्न स्थितीत हिंडत असत. तेथील डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे सेक्रेटरी रा. सा. के. रंगराव ह्यांनी त्या जातीच्या स्त्रियास सभ्य चालीरीती शिकावाव्यात असे मनात आणले. बरेचसे नवीन कापड आणून त्यांच्या चोळ्या शिवून त्या ह्या स्त्रियांस वाटण्यात आल्या. प्रथम हा नवीन पोषाख पाहून स्त्रियास आनंद वाटला. पण त्या घरोघर गेल्यावर त्यांच्या जमातीला हा भ्रष्टाकार पाहून इतका राग आला की, त्यांनी ह्या बायकास बेदम मारले. दुसरे दिवशी त्या बायकांनी नवीन पोषाखाचे गाठोडे परत आणून के. रंगरावांच्या अंगणात फेकून दिले व के. रंगरावास अत्यंत बीभत्स शिव्याशाप देत, त्रागा करीत त्या निघून गेल्या.

ह्या प्रांतात नायर लोकांचा मागील काळी इतका कडक अंमल असे की, एखाद्या खालच्या जातीच्या इसमास नायर माणसाने ठार केले तर त्याच्यावर काही खटला चालत नसे. ह्या प्रांतातील लोकांची स्वच्छतेविषयी फार-प्रसिद्धी आहे. प्रत्येकाच्या घरी परड्यामध्ये तळी असावयाची. जाता येता कित्येक वेळा तरी त्यात स्नान करून ओलेत्यानेच स्त्रीपुरुष हिंडत असल्याचे मी पाहिले. पावसाळ्यात मी स्वत: पुष्कळ तास भिजून चिंब झालो तरी सर्दी म्हणून कधी झाली नाही.

●●●

२०

बिल्लवांची तक्रार

दहाजणांची तक्रार : साधु शिवप्रसाद आणि मी त्या प्रांतातील निरनिराळ्या ब्राह्म समाजाची स्थिती पाहून व प्रचार करून आलो. प्रत्येक ठिकाणी अंतस्थ कलह आणि राजकारणाची अवास्तव धास्ती ही लक्षणे सर्वसामान्य दिसत होती. ज्यांनी उठावे त्यांनी नवीन समाज स्थापावा; पक्ष आणि तट वाढवावे; बाहेरून प्रचारक गेल्यास आपापली बाजू सांगून त्याचे कान भरवावेत. या प्रकारामुळे प्रचारकांची फार ओढाताण होई. कामात मोठा अडथळा होत असे. तारीख १८ जून, १९२४ रोजी मी मंगलोर शहरी परत आलो. येईपर्यंत मंगलोर ब्राह्म समाजात एक भयंकर वितुष्ट माजून राहिले. ब्राह्म समाजातील १० बिल्लव जातीय पुढाऱ्यांच्या सह्यांनी मला रजिस्टर पोस्टाने पत्र आले होते. ते मला २० जूनला पोचले. सही करणाऱ्यांची माझ्या उलट त्यात अशी तक्रार होती की, (१) त्यांनी पुष्कळ विनंती करूनही मी आपली गांधी टोपी घालावयाची सोडीत नाही. (२) व्हायकोमच्या दौऱ्यावर असतांना कालिकत येथे व दक्षिण मलबारात जाहीर सभातून मी राजकीय विषयावर भाषणे करून राजकीय चळवळीत भाग घेतला. (३) सही करणारे दहा गृहस्थ व इतरही कित्येक सभासद सरकारी नोकर आणि इतर युरोपियन कंपनीचे नोकर असल्याने माझ्या राजकारणापासून त्यांना मोठा धोका पोचणे संभवनीय आहे. (४) म्हणून मी अत:पर राजकारणात भाग घेणार नाही असा लेख माझ्या सहीनिशी लिहून ज्या वृत्तपत्रातून माझी राजकीय चळवळ प्रसिद्ध झाली होती त्यातून लेख प्रसिद्ध करावा. (५) असे लवकर न झाल्यास समाजाची जादा साधारण सभा बोलावून योग्य तो उपाय करावा लागेल.

मी ताबडतोब उत्तर दिले की, "मी मंगलोर येथे परत आल्यावर खुलासा घेऊन मग ही तक्रार केली असती तर चालले असते. दौऱ्यावर मी जी चळवळ केली व भाषणे केली त्यांचा विषय राजकारण मुळीच नसून समाजसुधारणा व धर्मसुधारणा हाच होता. अर्थात मी राजकारणात भाग घेणार नाही असे लिहून देण्यास मुळीच बांधलेला नाही. तो माझा व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न आहे. समाजाच्या हिताला बाध न आणता राजकारणाच्या मूल तत्त्वाबद्दल ऊहापोह करणे माझे पवित्र कर्तव्य आहे. आता तरी तक्रार करणाऱ्यांनी समक्ष भेटून तक्रार मिटवावी. ज्या कलकत्त्याच्या साधारण ब्राह्मसमाजाचा प्रतिनिधी म्हणून मी येथे कार्य करीत आहे त्यांच्या सांगण्यावरूनच मी व्हायकोमला गेलो आणि जे जे मी केले ते ते सर्व त्यांना पसंत पडेल अशी माझी खात्री आहे. " गांधी टोपीविषयी त्यांची तक्रार अगदीच पोरकटपणाची होती. पण त्याकाळी गांधी टोपीच्या उलट सरकारचा मोठा रोष होता हे मात्र खरे. एखाद्या घरी एखादा गांधी टोपीवाला पाहुणा आला तरीसुद्धा सरकार त्या घरावर नजर ठेवीत असे, असे मला कळले. गांधी टोपी घालावयाचा माझा आग्रहच असेल तर निदान तिचा रंग तरी काळा असावा असा ह्या दहाजणांचा आग्रह होता. पण ज्या अर्थी ही बाब मोठी

२१

कौटुंबिक उपासना मंडळ

१९२५ च्या एप्रिल महिन्यात मी मंगलोरहून पुण्यास आलो. त्यापूर्वी १० सप्टेंबर, १९२४ रोजी माझी पत्नी व चि. प्रतापराव व चि. विश्वास यांस घेऊन मुंबईहून पुण्यास अहल्याश्रमात राहण्यास आली होती. थोडे दिवस सर्वजण एकत्र राहून विश्रांती घेतल्यावर मी भावी धार्मिक कामाची योजना मनात आखू लागलो. अलीकडे बरेच दिवस ब्राह्म धर्मांचा प्रचार साधारणपणे बहुजनसमाजात आणि विशेषत: कुंटुंबात (बायकामुलात) कसा होईल याची विवंचना मनाला लागली होती. ब्राह्म समाजाची चळवळ म्हणजे सुशिक्षितात, शहरात राहणाऱ्यात आजवर गुंतून राहिली होती. या समाजाची उच्च आणि शुद्ध बुद्धिवादाची शिकवण साध्याभोळ्या बहुजनसमाजाला सहज कळण्यासारखी नव्हती. इंग्रजी आणि संस्कृत न जाणणाऱ्या आणि खेड्यात राहणाऱ्या लोकांसाठी ब्राह्मसमाजाकडून विशेष प्रयत्न होणे फार मुष्किलीचे होते; म्हणून आजपावेतो ते फार झाले नव्हते. मग अशा लोकांच्या बायकामुलांसाठी प्रयत्न होणे दूरच राहिले. म्हणून पुणे येथे तूर्त एक कौटुंबीय योजना मी करू लागली. याकामी भगिनी जनाबाईचे फार प्रोत्साहन मिळाले. शुक्रवार पेठत माझे मित्र श्री. बाबुराव जगताप हे जनतेस उच्च शिक्षण देऊन त्यांची उन्नती करण्यासाठी श्री. शिवाजी मराठा हायस्कूलचे काम आज बरेच दिवस करीत होते. ते आणि त्यांची इतर मित्रमंडळी रा. गणपतराव शिंदे, रामराव ज्योतीराव शिंदे, B.A., LL.B., जेधे, काळभोर वगैरे मराठा समाजाचे पुढारी धार्मिक बाबतीत प्रागतिक विचाराचे होते. बाबुराव जेधे तर पुणे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. ह्या मंडळीच्या घरी मी आणि भगिनी जनाबाई जाऊन रविवारी आणि इतर सुटीच्या दिवशी ब्राह्म धर्माच्या कौटुंबिक उपासना चालवू लागलो. बायकामुलास समजतील अशी सोपी भजने व भक्तिपूर्ण प्रवचने मंडळींना आवड लागली. हे काम सुमारे एक वर्ष झाल्यावर आम्ही आपली वस्ती अहल्याश्रमातून काढून शुक्रवार पेठेत श्री. शिवाजी मराठा हायस्कूलला लागूनच पश्चिमेस असलेल्या छपरबंद आळीतील माळवदकराच्या वाड्यात हलविली. ह्या कामात बरेच यश येण्याचा संभव दिसू लागल्यामुळे पुढील जाहीर विनंतीपत्र तारीख १६ जून, १९२६ रोजी निघाले. ते असे--

कौटुंबिक उपासना मंडळ

विनंतीपत्र

यं हि किच्चं अपविद्धं अकिच्चं पन कयिरती ।

उन्नलानं पमत्तनं तेसं वड्ढन्ति आसवा ।। धम्पपद अ. २१ श्लो. ३

अर्थ-- जे करावयास पाहिजे त्याचा चुथडा होत आहे. जे करू नये ते पण केले जात आहे. उनाड आणि प्रमत्त जे, त्यांच्या वासना वाढत आहेत.

आपल्या सुना-लेकीसह हजर असत. मंडळाचे उपासनेत किंवा कोणत्याही कामात जातीचा किंवा धर्माचा भेद मुळीच पाडण्यात येत नाही. अर्ध वर्ष येणेप्रमाणे ईश्वरकृपेने निर्विन्घपणे काम झाले. म्हणून मंडळाने २६ डिसेंबर, १९२६ रोजी रविवारी हा सर्व दिवस गावाबाहेर मुठा नदीचे काठी विठ्ठलवाडीजवळील आंबराईत आध्यत्मिक उत्सवात घालविला. तेव्हा सकाळी ६ पासून सायंकाळी ६ पर्यंत भजन, प्रार्थना, उपदेश, संभाषणे आणि सहल इत्यादी कार्यक्रम व्यवस्थेने पार पडला. त्यात लहानथोर स्त्री-पुरुष सुमारे ५० जणांनी भाग घेतला होता. गेल्या सहा महिन्यांतील कामाप्रमाणेच हा शेवटचा एक दिवसाचा उत्सवही श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांच्या नेतृत्वाखाली सुरळीतपणे साजरा झाला. अशा प्रसंगास वनोपासना म्हणण्यात येते. मंडळ ईश्वराचे आभारी आहे.

कोणत्याही जातीच्या व धर्माच्या कुटुंबाला मंडळाचे सभासद होता येते, आपले स्त्री-पुरुष आप्त असतांना एखाद्या स्त्रीस किंवा पुरुषास तुटकपणे व्यक्तिशः सभासद होता येत नाही. मंडळ व्यक्तीचे नसून कुटुंबाचे आहे. तथापि सहानुभूती असल्यास एखाद्या आप्त नसलेल्या व्यक्तीसही मंडळाचा आध्यात्मिक फायदा घेण्यास हरकत नाही.

पुणे, पेठ शुक्रवार, घ. नं. २९६, **गणपतराव बापूजी शिंदे**
तारीख १ जानेवारी, १९२७. सेक्रेटरी, कौ. उ. मंडळ

जिजाई ऊर्फ अवलाई : ता. २१ जुलै, १९२६ रोजी आषाढी एकादशी आली होती. त्या दिवशी रात्री ८ पासून १२ पर्यंत शिवाजी हायस्कूलमध्ये माझे हरिकीर्तन झाले. श्री तुकाराम महाराजांची पत्नी जिजाऊ ह्यांचे आख्यान लावण्यात आले होते. प्रपंचामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचे सहकार्य बिनबोभाट चाललेले असते. पुरुष ध्येयवादी असला तर बायका व्यवहारवादी असतात. मोठमोठे पुरुष कर्तबगारीने व्यावहारिक आणि अध्यात्मिक विषयात पुढे येतात; पण त्यांच्या बायका अशिक्षित म्हणून नावाजल्यामुळे त्यांनी केलेले सहकार्य जगाच्या नजरेत भरत नाही. तुकाराम महाराजाची पत्नी जिजाऊ ही कजाग होती, म्हणून तुकाराम महाराजांच्या तुलनेने जिजाऊची जो तो निंदा करीत असतो. ह्या अन्यायाचे निराकरण अंशतः तरी व्हावे म्हणून मी हे खालील पद मुद्दाम रचून त्याचे निरूपण आख्यानात केले.

अवलाईची नवलाई

(एक उपनिषद)

पद :-- (चाल-- चला चला गड्यांनो जाऊ चला)

अशी कशी तुक्याची अवलाई । ऐका हो तिची नवलाई ।। धृ।।

भजनी असतां भांडभांडते । संत आलिया वस्‌वस् करिते ।।
विठ्ला "काळ्या, वैरी" म्हणते । भली तिची ती मंगळाई ।।
काय ही नवलाई ।। १ ।।

खुद्द पुण्याचा अप्पा चुव्वा । अस्सल मराठा माणूस बरवा ।।
साहुकार जगजाहीर सर्वा । कन्या त्याची जीजाई ।।
की अवलाई ।। २ ।।

आम्ही तुकोब्बा सदैव वंदू । परि अवलाई कधी न निंदूं ।।
हा तियेचा ऋणानुबंधु ।। जगी पसरो आख्याई
मागणे लइ नाही ।। १४ ।।

प्रकृतिपासुन पुरुष जन्मला । भोगुनी तिजला जागा झाला ।।
पुन्हा निगुर्णी झोपी गेला । बाइल त्याची ती आई
संपली नवलाई ।। १५ ।।

श्रीशिवनेरी जीर्णोद्वार कमिटीतर्फे श्री. शिवरायाचे जन्मस्थान जुन्नर येथे शिवनेरी किल्ल्यावर श्री. जिजामाता स्मारक होत आहे. त्यात सर्व जातीच्या स्त्रियांनी विशेषतः महाराष्ट्रातील स्त्रियांनी आस्थेने भाग घ्यावा म्हणून कौटुंबिक उपासना मडळामार्फत मी प्रयत्न करावेत म्हणून कमिटीने विनंती केली. त्यासाठी तारीख १३ ऑगस्ट, १९२७ रोजी पुण्यातील सर्व जातीतील स्त्रियांची मोठी जाहीर सभा पुणे येथील श्री. शिवाजी हायस्कूलात भरविण्यांत आली. ज्यावेळी प्रथम माझे कीर्तन झाले. आख्यान जिजामातेचे लावले होते. शाळेचा ड्रॉइंगहॉल स्त्रियांनी चिकार भरून गेला. जागा नसल्यामुळे पुरुषांची निराळी सभा भरवावी लागली. स्मारकास मदत म्हणून आरतीमध्ये रुपये, नोटा टाकण्यासाठी बायकांची मोठी गर्दी झाली. रुपयांची पोच देण्यालाही कठीण पडू लागले. म्हणून देणग्या स्वीकारण्याचे काम बंद ठेवावे लागले. स्त्रियांची एक खास कमिटी करून वर्गणी जमविण्याचे काम पुढे ढकल्याण्यात आले. जागच्याजागी आरतीत २०० हून अधिक रक्कम जमली. या वेळी मी केलेला फटका म्हणण्यात आला.

फटका

ऐका हो साजणी बायांनो, नवलाचा गातो फटका ।
नऊ लाखाचा माझा फटका, घटकाभर लाविल चटका ।। धृ।।

जिकडे तिकडे म्लेंच्छ मातला, हिंददेवी विधवा झाली ।
स्वराज्यसौभाग्याचे कुंकूं, पुसिले अवकळा आली ।।
धर्म बुडाला, न्याय बुडाला, दुकाळ पडला दारुण ।
प्याया नसे पसाभर पाणी, कोठून दाणावैरण ।।
दुःख दैन्य दारिद्र्य पसरले, जुलुमाचे चहुदिशी रान ।
शत्रुमित्र सर्वत्र उदासिन, पुसे न कोणाला कोण ।।
महाराष्ट्राचा धर्म पुरातन, तोही झाला की लटका ।
नऊ लाखाचा फटका माझा, घटकाभर लाविल चटका ।। १।।

सह्यचलाच्या खाकेमध्ये, शिवनेरीचे वारूळ ।
त्यांत एक नागीण बैसली, पिलूं तिचे कर्दनकाळ ।।
काळाचा वरवंटा फिरला, नाग लागला देशधडी
परी धीराची ढाल जणू का, नागिण वारुळ ना सोडी ।।

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२२

ब्रह्मदेशाची यात्रा

ब्रह्मदेशाला जाण्याचा माझा मुख्य उद्देश, बौद्ध धर्मांचे जीवन प्रत्यक्ष पहावे आणि स्वत: अनुभवावे हा होता. मंगलोरहून परत पुण्यास आल्यावर १९२५-२६ साली मी बौद्धधर्मासंबंधी विशेष अभ्यास केला. विशेषत: पाली भाषेतील धम्मपद हे पुस्तक प्रो. चिं. वि. जोशी यांच्याजवळ वाचल्यापासून माझ्या मनाला मोठी शांती प्राप्त होऊन बऱ्याच अंशी माझा स्वभावही बदलत चालला होता. दुसरा हेतू ब्रह्मदेशची सामाजिक स्थिती पाहणे. त्या देशातील सामाजिक व कौटुंबिक स्थितीचे मला फार कौतुक वाटत असे. ब्रह्मदेशात जातिभेद तर नाहीत, पण स्त्री-पुरुषांत समानतेचे नाते किंबहुना स्त्रियांचा वरचष्मा आहे असे मी ऐकले होते. बौद्ध धर्माचे जीवन पाहण्यासाठी विशेषत: एकान्त विहारांत राहून त्या धर्माचे रहस्य अनुभवण्याचा विचार मनांत येऊन मी ही यात्रा करण्याचे ठरवले. प्रथमत: मी ह्या प्रवासाची तारीखवार तपशील देऊन नंतर कांही मुख्य मुख्य गोष्टींचे विवेचन करीन.

ब्रह्मदेशात गेल्यावर तेथे जातिभेद नसला ती अस्पृश्यता आहे असा मला शोध लागला. त्याविषयीची तपशीलवार माहिती माझ्या भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या पुस्तकात सविस्तर आली आहे. म्हणून तेवढा भाग मी येथे वगळतो.

तारीख २१ जानेवारी, १९२७ रोजी तिसरे प्रहरी पुण्याहून निघालो.

तारीख २४ जानेवारीला कलकत्त्याला पोचलो.

'मी बौद्ध आहे' : तारीख २४ जानेवारी पासून तारीख ६ फ्रेब्रुवारीपर्यंत कलकत्त्याच्या ब्राह्म समाजाचा माघोत्सव होता. त्यात एके दिवशी ब्राह्म समाजाच्या मिशनरीची परिषद झाली. तीमध्ये भाषण करताना मी म्हटले. "मी बौद्ध आहे" हे एकून माझ्या मिशनरी बंधूना आश्चर्य वाटले. आमच्या ब्राह्म समाजात निरनिराळ्या धर्मांतून माणसे येतात, हे खरे ना ? मग मी बौद्ध धर्मांतून आलो असलोतर काय चुकले? आज जर गौतम बुद्ध जिवंत होऊन आले आणि त्यांनी ब्राह्म समाजाचे औदार्य पाहून त्यात प्रवेश करण्याची इच्छा प्रदर्शित केली तर त्यांना तुम्ही ब्राह्म समाजात घेणार नाही काय? जेथे ख्रिस्ताला व बुद्धाला शिरकाव नाही तेथे मजसारख्या पामराची काय धडगत? ह्या विषयावर वाद माजू लागला हे पाहून अध्यक्षस्थानी गुरुदास चक्रवर्ती हे बौद्ध प्रचारक होते, त्यांनी उठून सांगितले, "रा. शिंदे ह्यांचा आध्यत्मिक भाव मनात आणा, शब्दावर वाद नको. ब्राह्म समाज सर्वसंग्राहक आहे आणि रा. शिंदे हे त्याचे नमुनेदार उदाहरण आहे. आता हे लवकरच ब्रह्मदेशात बौद्ध धर्म पहावयास जाणार आहेत. येथील लोकांना त्यांच्या ब्राह्म धर्माचा उदारभाव पाहून ते व ब्राह्म समाज या दोघांना फायदाच होईल."

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२३

शेतकरी चळवळ

१९२६-२७ च्या सुमारास गुजराथचे सरदार वल्लभभाई पटेल यांनी बार्डोलीस करबंदीची अपूर्व चळवळ काढली आणि विलक्षण धाडस व घटना करून ती सरकारविरुद्ध यशस्वी करून दाखवली. तीमुळे संबंध मुंबई इलाख्यांत शेतकऱ्यांमध्ये अपूर्व जागृती होत चालली होती. अशा मुहूर्तावर मुंबई कौन्सिलात सरकारपक्षाने दोन बिले आणली होती. एक सारावाढीचे व दुसरे तुकडे-बिलाचे. ही दोन्ही लोकांना अत्यंत अप्रिय होती. मुंबई इलाख्यांत विशेषतः महाराष्ट्रात मालकीच्या जमिनीचे वारसाहक्काने अगदी लहान लहान तुकडे इतके पडत चालले होते की, शेतकऱ्यांच्या वैयक्तिकदृष्टीने आणि राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने, पडत जाणाऱ्या शेतकीच्या जमिनीचे हे तुकडे अत्यंत अनिष्ट होते हे खरे; पण दुसऱ्या बाजूने मोठमोठे जमिनीचे भाग मोठमोठ्या भांडवलदार मंडळीनी विकत घेऊन साखरेचे कारखाने संयुक्त भांडवलाचे जोरावर चालवण्याचे सुरु केले होते. त्या व्यापाऱ्यांमध्ये परकीय भांडवलदारही पुष्कळ होते. म्हणून ह्या भांडवलदारांच्या कारवाईमुळे जनतेत मोठा संशय पसरत होता, अशा स्थितीत ही दोन बिले सरकारी रीतीने लोकांपुढे यावयास नको होती. १९२८ सालच्या पावसाळ्यात मुंबई सरकारचे कौन्सिल पुणे येथे आल्यावर ही दोन बिले सरकारास तातडीने पार पाडून घ्यावयाची होती. मुंबई सरकारचे जमाबंदीचे दिवाण सर सी. व्ही. मेहेता यांनी ह्या बिलांचा पुढाकार घेतला होता. म्हणून या इलाख्यातील प्रजापक्षाने ह्या परिषदेचे काम मोठ्या तातडीने व हिंमतीने चालवले होते.

पुणे येथील रे मार्केटात सुरू झालेल्या मुंबई इलाख्यांतील मराठी बोलणाऱ्या जिल्ह्यातील शेतकरीवर्गाची परिषद सुरू झाली. त्या परिषदेला महाराष्ट्र व कर्नाटक येथील निरनिराळ्या जिल्ह्यांतून सुमारे ५००० शेतकरी आले होते. सर्व पक्षांची आणि निरनिराळ्या मतांची पुढारी मंडळी हजर होती. दूरहून भाकरी बांधून आलेल्या शेतकरी मंडळीनी रे मार्केट चिक्कार भरून गेले होते. ह्या परिषदेसाठी मंडईतल्या भाजीवाल्या लोकांनी आपापली दुकाने बंद ठेवली होती. स्वागताध्यक्ष श्री. बाबूराव जेधे ह्यांचे भाषण झाल्यावर अध्यक्षस्थानी माझी योजना व्हावी असे सुचविले. अनुमोदन दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनी दिले.

अध्यक्षीय भाषण : "गेल्या आठवड्यांत मी बंगालच्या फिरतीवर निघालो होतो. कलकत्त्यास ब्राह्मसमाजाची शतसांवत्सरी असल्याने मला तिकडे जाण्याची निकड लागली होती. पण इतक्यात मुंबईत असताना ह्या परिषदेच्या स्वागताध्यक्षांकडून मला जरुरीची तार आली आणि पकडवारंटाने धरून आणून मला ह्या स्थानी बसविण्यात आले आहे. दलित अस्पृश्यांची आजपर्यंत यथाशक्ती ब्राह्मसमाजाने सेवा केली आहे. आता शेतकरीवर्ग दलित होऊ लागला आहे. अस्पृश्यांची अस्पृश्यता

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२४

ब्राह्मसमाजाचा शतसांवत्सरिक उत्सव

तारीख १६ गुरुवार ऑगस्ट, १९२८ रोजी हौरा स्टेशनवर पोचलो. १८ शनिवारी ब्राह्मसमाज शतसांवत्सरिक उत्सव सुरू झाला. सायंकाळी प्रतिनिधीच्या स्वागतार्थ सभा झाली. मुंबईतर्फे उत्तर देण्याचे काम मजकडे आले. तारीख १९ ला दुपारी २ पासून रात्री ८ पर्यंत सर्व धर्मीयांची मजलस झाली. पार्शी, हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती, मुसलमान व बहाई इतक्या धर्मांचे प्रतिनिधी पहिल्या अधिवेशनात बोलले. सर्वांत उत्तम भाषण मि. एस्. एच्. कोरेशी ह्यांनी बहाई धर्मावर केले. तारीख २० रोजी सायंकाळी सर पी. सी. रॉयचे अध्यक्षत्वाखाली ब्राह्म-समाजाचा संदेश ह्या विषयावर भाषणे झाली. सुरुवातीची प्रार्थना करणे मजकडे आले. ती मी इंग्रजीत केली. ती सतीशचंद्र चक्रवर्तीना फार आवडली असे ते मुद्दाम येऊन म्हणाले. पहिले भाषण माझेच झाले ते फार जोरात, थोडक्यात व निश्चित मुद्यांचे झाले. तारीख २१ सकाळी मीच उपासना चालवली. त्यात म्हटले, "प्रत्येकाने आपापला देव घडवला पाहिजे. पार्थिवपूजेत जशी नित्य नवी लिंगे करावी लागतात त्याप्रमाणे आम्ही आपला देव बनवावा. सत्य, ज्ञान, अनंत ही नावे आम्हीच देवास दिली आहेत. भक्तिविजयातील प्रथमाध्यायात देव भक्ताने कसा नावारूपास आणिला ते सांगितले आहे. "

कविसम्राट टागोर : तारीख २२ रोजी बंगाली भाद्रपद मासाची षष्ठी असल्याने हाच ह्या शतसांवत्सरिक उत्सवातील मुख्य दिवस होता. सकाळी ५।। वाजल्यापासूनच मंदिरात गर्दी जमू लागली. आज प्रसिद्ध कविवर्य डॉ. रवींद्रनाथ टागोर हे उपासना चालवणार होते. ८।। वाजता कविवर्य आले. मी त्यांना प्रथमच पाहिले. चेहरा अत्यंत सुंदर व गंभीर किंचित् औदासीन्याची छटा दिसली. प्राचीन ऋषिकालाची कल्पना मूर्त स्वरूपास आली. वेदी सर्व स्फूर्त झाली. वेदीभोवतीची मोठमोठी शुभ्र व लाल उत्फुल्ल गुलाबाची फुले विकसित होऊन कविवर्याचे उद्‌गार ऐकण्यास टपलेली होती असा भास झाला. खाली मान घालून कविवर्यांनी जे आसन घातले ते अर्धा तास वर पाहीचनात. आवाज अलगुजासारखा कोमल व हृदयप्रवेशी होता. मग पुढे विरल व अपांगदृष्टीने श्रोतृवृंदाकडे पाहात ते आपले प्रवचन वाचू लागले. त्यावेळी कमलनयन म्हणून काय चीज आहे ती अनुभवास आली. केशकलापांची शुभ्र शोभा गोधूमकांतीच्या भव्य कपाळावर विलसत होती. पिंगट रंगाचा रेशमी सैल सदरा असून त्यावर त्याच रंगाची चादर पसरली होती. सरल नासिका, विखुरलेली दाढी, पाणीदार दृष्टिविक्षेप, एकंदरीत एक दैवतचे पुढे दिसले. एक तास प्रवचन झाले. "ईश्वरी दयेला त्याच्या रौद्र स्वरूपाचे कोंदण लागते. विभूतीचे मोठेपण संकटाला सतत तोंड देण्यातच असते." हा प्रवचनाचा आशय होता. सर्व भाषण बंगालीत होते, तरी त्यात संस्कृत शब्दांची लयलूट असल्याने बरेच कळले. शेवटी लोकाग्रहास्तव कवींनी आपले एक लहानसे पद्य गाऊन दाखवले. हा प्रसंग शंभराव्या वाढदिवसाला शोभण्यासारखा झाला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२५

पूर्व बंगालची सफर

तारीख १ सप्टेंबर रोजी बाबू हेमचंद्र सरकारने मजसाठी पूर्व बंगाल, उत्तर बंगाल, बिहार, संयुक्त प्रांत आणि पंजाब ह्या पाच निरनिराळ्या भागात शतसांवत्सरिका निमित्त प्रचार करून ह्या वर्षअखेर पुण्यास जावे असे ठरवले. माझे उतारवय, आज तीन महिने इन्फ्लुएंझाच्या व्याधीमुळे आलेली अशक्तता वगैरे अनेक कारणामुळे मी किंचित नाखुष होतो. पण बंगाल्याबाहेर पडण्याला कोणी बंगाली मिशनरी तयार होत नाही हे पाहून नाइलाजाने ते कार्य मला पत्करावे लागले. तरी ते मला आत्मिकदृष्ट्या प्रिय होते. पूर्व बंगाल्यांत संततधार पावसाळा, नद्यांना आलेले महापूर, मलेरिया, मला न रुचणारे अन्न, न समजणारी भाषा, ह्यावरुन निदान बंगाल्यातील कामातून जरी सुटका झाली असती तरी बरे झाले असते. पण तसे न होता इतर सात प्रचारकांना बरोबर घेऊन पूर्व बंगाल्यातील चितगांगपासून उत्तर बंगाल्यांतील दार्जिलिंगपर्यंत जावे, असे ठरले. (१) रमेशचंद्र मुकर्जी (२) बारिसालचे राजकुमार घोष व त्यांचा मुलगा जतींद्रकुमार, (३) अनिलचंद्र चौधरी, (४) सुधीरकुमार बोस, (५) बभ्रुवाहन ठाकूर, (६) माधवचंद्र विश्वास आणि मी असे आठ जण श्रियाळदास स्टेशनवरून निघालो.

बंगाल्यांतील महापूर : जेसोर जिल्ह्यांतील मलिहाट, मशीहाट व राजापूर खुलना जिल्ह्यातील मदारतोली, रुच्चिददाहा, जालोकाटी व कुरीयाना वगैरे बंगाल बॅकवर्ड क्लास मियानच्या ठिकाणी ही सफर नेऊन आम्ही ब्राह्म समाजाचा संदेश पोचवला. भैरव नदीला मलिहाटजवळ मोठा पूर आला होता. प्रभात, नदीप्रवाह व नदीकिनारी यांचा सुंदर देखावा दिसला. भात, अंबाडी, आळू, कोचुरीची राने माजली होती. खेडी किंचित उंचवट्यावर असल्याने तेवढीच पाण्यावर होती. बाकी सर्व जलमय दिसले. एका ठिकाणाहून १०० यार्डावरील ठिकाणी जाण्यास पडावाची जरुरी लागे शेतातील पिकांवर दहा दहा फूट पाणी पावसाळ्यात सतत चार महिने राहात असते. पिके मार्च-एप्रिलमध्येच पेरावी लागतात. पूर ओसरून गेल्यावर ती आपोआपच वाढलेली दिसतात. एक गाव सोडून दुसऱ्या गावी जाईपर्यंत तेथील मंडळी बायका-मुलांसहित आमची वाट पाहात उभी असत. टाळ, खोल (मोठे मृदंग), बाजाची पेटी इत्यादी भजनाची साधने असत. मोठा झेंडा व लहान लहान निशाणे प्रत्येकाचे हाती फडकत असत. होडीतून प्रवास करताना सतत भजन चालू असे. किनाऱ्यावर उतरल्यावर ठिकाणावर पोचेपर्यंत नगरसंकीर्तन सुरू होई. ठिकाणी पोचल्यावर उपासनेला सुरुवात होई. नंतर भोजन, संभाषण व भेटी वगैरे होत. हे सर्व पावसात भिजतच चालू असे.

एक कोनशिला-समारंभ : ह्या प्रांती मी दुसऱ्यांदा आलो होतो. माझा डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कामाचा पुष्कळ परिचय ह्या प्रांती अगोदरच झाला होता. त्यामुळे मी जेथे जाई तेथे बंगाल्यातील

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२६

हिमाचल-निवास

कर्सिआँग : दार्जिलिंगहून रा. ब. शरच्चंद्र दास मला घेण्यास स्टेशनवर आले होते. स्टेशनजवळच ब्राह्ममंदिरात माझी उतरण्याची सोय केली होती. बाबू हेमचंद्र सरकार यांची पत्नी लावण्यप्रभा बोस (माहेरचे नाव), ही (प्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांची बहीण) हिचे हे घर होते. हे तिच्या मागे सुमारे रु. १४,००० किंमतीचे घर बाबू हेमचंद्रांनी कर्सिआँग येथील ब्राह्म समाजास दिले आहे. येथून खाली खोल दरीचा देखावा फारच सुंदर दिसतो. टीस्टा नदीचा आणि आमच्या पायाखालील मेघांचा विलास चांगला दिसतो. तिसरे प्रहरी बाबू हेमचंद्र व त्यांची मानसकन्या शकुंतला ही आली. तारीख १५ ऑक्टोबरला इंग्लडचे पाहुणे डॉ. ड्रमंड दार्जिलिंगहून आले. त्यांच्या व्याख्यानास २०/१५ माणसेच हजर होती. घरे लांब व वस्ती उपरी म्हणून ही अवस्था !

घूम : माझी गाडी सायंकाळी ५ वाजता घूम स्टेशनवर आली. हे जगातील अतिशय उंचीवरचे म्हणजे ७४०७ फूट उंचीवरचे आगगाडीचे स्टेशन होय. धुक्याने दिशा धुंद झाल्या होत्या. कडाक्याची थंडी पडली होती. ५।। वाजता दार्जिलिंगला पोचलो. देवदाराच्या झिपऱ्या झाडांनी भरलेला तो प्रशांत गंभीर देखावा मी कधी विसरणार नाही !

दार्जिलिंग ब्राह्म समाज : तारीख १६ ऑक्टोबर, काल संध्याकाळी रा. सा. शरच्चंद्र दास ह्यांचे घरी पाहुणा झालो. यजमानीण व मुलेमुली फार अगत्यशील होती. रायसाहेब बाहेरगावी गेले होते. आज सकाळी ब्राह्म समाजात पहिली उपासना मी चालवली.

दार्जिलिंग हा गाव बंगाली श्रीमंत आळशांचा व खुशालचंदाचा आहे. गव्हर्नराचे व इतर श्रीमंताचे हे उन्हाळ्यातील हवा खाण्याचे स्थळ आहे. अर्थात श्रीमंत ब्राह्मो समाजिस्ट येथे, ऐटदार घरे करून राहतात. ज्ञान, भक्ती व कर्म ही तिन्ही ब्राह्म समाजात पाणी भरीत आहेत, हे सर्व खरे; पण मोक्षाची गोष्ट निराळी, मोक्षधर्म पाहावयाचा असल्यास तो कोठे तरी बाहेरच पाहावयास पाहिजे. निदान तो दार्जिलिंगमध्ये तरी दुर्मिळ! पाश्चात्य आसुरी संस्कृतीने येथे हिमालय विटाळलेला आहे. केरळकन्येने मच्छिंद्रनाथास योगभ्रष्ट केले, मेनकेने विश्वमित्रास तपोभ्रष्ट केले तसे येथे पाश्चात्य सुधारणेने हिमालयास भ्रष्ट केल्याचा भास होत आहे.

तारीख १८ स तिसरे प्रहरी टाऊन हॉलमध्ये सामाजिक संमेलन झाले. सुमारे १०० निवडक स्त्रीपुरुष जमले होते. बनारसहून आलेले बाबू दुर्गाप्रसाद, ऑनररी मॅजिस्ट्रेट ह्यांची व ह्यांच्या पत्नीची ओळख झाली. ह्या दंपतीने मला बनारस शहरी येण्याचा फार आग्रह केला. तारीख १९ ला मी, हेमचंद्र व त्यांची कन्या शकुंतला पुन्हा कर्सिआँगला आलो. येथे सुमारे एक आठवडा विश्रांती निरीक्षण व चिंतन यात घालवला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२७

सत्याग्रह व तुरुंगवास

प्रसिद्ध दे. भ. श्री. बाळुकाका कानिटकर यांनी खालील टिपणे पाठवली आहेत :--

" (१) हरिभाऊ फाटक व बाळुकाका कानिटकर यांनी श्री. विठ्ठलरावांना भेटून १९३० च्या एप्रिल महिन्यात कायदेभंग चळवळीत पुढारीपण घेण्याची विनंती केली ती त्यांनी मान्य केली. लगेच श्री. केशवराव जेधे हे ही ह्या चळवळीत सामील झाले. (२) कर्मवीर शिंदे यांनी पुणे जिल्ह्यात खेडोपाडी पायी दौरा काढला. त्यांचे पथकाबरोबर श्री. हरिभाऊ पाठक, श्री. हरिभाऊ तुळपुळे, श्री. पोपटलाल शहा ही मंडळी मधूनमधून जात असत. ह्या दौऱ्याचा खेडेगावी फार परिणाम झाला. व्याख्यान, पोवाडे वगैरेंच्या साहाय्याने हा प्रचार झाला. खेडेगावातील मंडळींनी ह्या लोकांचे उत्साहाने स्वागत केले. जेवणखाण वगैरेंची सोय आपोआप न सांगता जागोजाग लोक स्वयंस्फूर्तीने करीत. (३) शिंदे आठवड्याचे शेवटी पुण्यास परत येऊन पुन्हा दौऱ्यावर जात. पुण्यास बाळूकाका कानिटकर हे चळवळीचे सर्वाधिकारी नेमले गेले होते. त्यांना सर्व प्रकारे उत्तेजन देऊन श्री. शिंदे व इतर पुढारी ह्यांनी महत्त्वाची मदत केली. पुण्याहून बाहेरगावी ठिकठिकाणी जाणाऱ्या सत्याग्रही तुकड्यांना निरोप देण्याचे समारंभ रा. शिंदे ह्यांचे अध्यक्षतेखाली अनेक वेळा होत असत. त्या वेळी श्री. शिंदे ह्यांच्या पत्नी समक्ष हजर राहून जाणाऱ्या सत्याग्रह्यांना नारळ व आशीर्वाद देत. (४) कानिटकर ह्यांचे वाड्यातच प्रथम सत्याग्रह शिबिरे होते. तेथे क. शिंदे, श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. हरिभाऊ फाटक, श्री. हरिभाऊ तुळपुळे, संगमनेरचे श्री. रामकृष्ण दास वगैरेंची बैठक होऊन महाराष्ट्रात जंगल सत्याग्रह करण्याचे ठरले. प्रभातफेरी जशी पुण्याने सुरू केली तशीच जंगल सत्याग्रहाची कल्पना पुण्यानेच उचलून धरली व ती सबंध बृहन्महाराष्ट्रभर कालांतराने, वणव्याप्रमाणे पसरली. कानिटकर यांनी हजार सत्याग्रही निरनिराळ्या युद्धक्षेत्रावर पाठवल्यानंतर त्यांना ३० एप्रिल १९३० रोजी सरकारने पकडले."

एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सोमवारी सकाळी मी हवेली तालुक्यातील पहिल्या दौऱ्यावर निघालो. बरोबर दहा पंधरा तरुण स्वयंसेवकांची तुकडी होती. सत्याग्रहाचा मोठा झेंडा पुढे फडकत होता. बाजाची पेटी, टाळ आणि प्रभातफेरीची पद्मावली प्रत्येकाच्या हाती होती. एक डफ-तुणतुण्यांसह पोवाडेवाल्यांचा ताफा बरोबर होता. पुण्याच्या हद्दीवर फर्ग्युसन कॉलेजच्या समोर प्रथम झेंडावंदन झाले.

दौरा : हा दौरा प्रथम पुण्याजवळील दापोडी गावी गेला. तेथून प्रत्येक खेडेगावात प्रथम प्रभातफेरी म्हणत उभ्याउभ्याच व्याख्याने देत पुढच्या गावी जात असू. दोन प्रहरी एखाद्या गावी जेवण्याचा बेत आधीच ठरलेला असे. स्नान वगैरे आटोपल्यावर जेवण्यास वेळ असेल तेव्हा पोवाडे सुरू होत. चिंचवड, देहू, आळंदी, चऱ्होली, लोणी, लोहगाव वगैरे लहानमोठी सर्व गावे करून

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

भास्करराव म्हणाले, "अहो, काय बाहेर वणवा पेटला आहे. शहरातून आणि खेड्यातून सारखीच धामधूम चालली आहे." "असे जर आहे तर आम्हाला येथेच राहू द्या" मी म्हटले. "मी येथे येण्यापूर्वी जर तुम्ही मनात आणले असते तर मी येथे आलोही नसतो. येथे आल्यावर मला बाहेर नेण्याचे मनात आणून काय उपयोग ?" असा एकमेकांच्या मनातला भाव एकमेकास कळल्यावर, मग ब्राह्मणेतर पक्षाविषयी बोलणे सुरू झाले. "ब्राह्मणेतर पक्षाची संघटना चांगली होत नाही, काम होत नाही" वगैरे वगैरे माझी स्पष्ट मते मी सांगितली. एकंदरीत हे संभाषण आणि ही भेट मला आंधळ्या कोशिंबिरीप्रमाणे वाटली.

तुरुंगातील दिनचर्या : 'सी' क्लास व 'बी' क्लास यातील फरक असा आहे. 'सी' क्लासच्या कैद्यांना सकाळी १ वाडगाभर जोंधळ्याची कांजी मिळते. मग १० वाजता १ किंवा २ बाजरीच्या भाकरी आणि मुगाची आमटी. संध्याकाळी ५ वाजता पुन्हा तेच जेवण मिळते. नेसावयास खादीचे दोन मांडचोळणे व दोन सदरे मिळतात. निजावयास एक काथ्याचे तरट व दोन कांबळी. 'बी' क्लासला कांजीच्या ऐवजी सकाळी ७ वाजता अर्धा शेर दूध, १० वाजता चपाती, भात, वरण, एक भाजी, लोणी व साखर. संध्याकाळी ५ वाजता तेच जेवण. दोन्ही क्लासला चटणी वगैरे काही तिखट मिळत नाही. 'बी' क्लासला नेसावयास ठराविक धोतराची पाने, अंगात दोन सदरे, डोक्यास खादीची गांधी टोपीसारखी टोपी. निजावयास एक गादी, एक चादर, एक उशी आणि अंथरावयास दोन कांबळी. भांडी 'सी' क्लासला १ उथळ वाडगा व १ कथलाचे टमरेल एवढीच भांडी मिळतात. 'बी' क्लासला ॲल्युमिनियमचे ताट, तांब्या, दोन वाडगे ही भांडी मिळतात. कैद्यांनी ही भांडी वरचेवर स्वच्छ ठेवावीत अशी ताकीद मिळे व त्याची तपासणी होत असे. रोज सकाळी डॉक्टर येऊन कैद्यांची तपासणी करीत असे. रोग्यास औषध आणून देत. 'बी' क्लासला खोलीतच औषध मिळे. 'सी' क्लासला दवाखान्यात जावे लागे. आजार गंभीर असल्यास रोग्याची तुरुंगातील हॉस्पिटलात रवानगी होई. दर आठवड्याला स्वत: जेल सुपरिटेंडेंट येऊन प्रत्येक कैद्याची तपासणी करून काही गरजा, अडचणी असल्यास ऐकत असे. त्याच्याबरोबर जेलर, असिस्टंट जेलर, वॉर्डर वगैरे असत. एक असिस्टंट जेलर रोज कैद्यास येऊन भेटून जात असे. ही सर्व बडदास्त राजकीय 'बी' कैद्यांसाठीच असे. 'बी' क्लासचे सगळे कैदी एकाच वॉर्डात ठेवण्यात आले होते. त्यांना एकमेकांच्या खोलीत जाण्यास मनाई असे ; पण व्हरांड्यात किंवा अंगणात बोलण्यास हरकत नसे.

तुरुंगातील कामे : 'बी' क्लासच्या सक्तमजुरीच्या कैद्यांना काथ्याची जुनी तरटे उकलणे आणि उकललेल्या काथ्याची पुन्हा नवीने दोरखंडे बनवणे हे काम सकाळी सातपासून १० पर्यंत व दुपारी १२ पासून ४ पर्यंत असे एकंदर ७ तास असे. 'सी' क्लासला बाहेरची कष्टाची कामे मिळत व धड्याकड्या माणसास चक्की मिळे. म्हाताऱ्या माणसांना सवलतीने काम मिळे. पण काथ्या वळण्याचे काम फार श्रमाचे नसल्याने माझे वय ५८ वर्षांचे होते तरी माझ्या आणि माझ्याबरोबरीच्या इतर तरुण कैद्यांच्या कामात काही फरक होत नसे. नित्य उठून ह्या प्रकाराशिवाय दुसरा कोणताही व्यवसाय नसल्याने कैद्यांच्या मनात उदासीनता येत असे. आमच्या दालनाच्या समोरील अंगणात पूर्व बाजूस एक कलमी आंब्याचे ठेंगणे झाड व पश्चिम बाजूस एक लिंबाचे झाड हिरव्यागार पालवीने वाकलेले दिसे. वरचेवर आम्ही त्याच्याजवळ जाऊन आमच्या मनाची उदासीनता घालवीत असू. दर पंधरवड्याने आमची वजने घेण्यात येत असत. ता. १०-८-३० रोजी माझे १४४ पौंड वजन भरले. तीन महिन्यात माझे १२ पौंड वजन कमी झाले.

आमच्या बोलण्यात राजकारण नसल्यामुळे आमच्या उपासनांकडे व व्याख्यानांकडे जेलर कानाडोळा करू लागले.

ॲडव्हायझरी कमिटी : प्रत्येक तीन महिन्यांनी एक ॲडव्हायझरी कमिटी तुरुंग पाहण्यास येत असे. जून व सप्टेंबर महिन्यात ही कमिटी आली. मि. मॅकी, कमिशनर व त्यांच्यासह सात-आठ युरोपियन व हिदी गृहस्थ बसले होते. ही माणसे आम्ही जणु काय प्राणिसंग्रहालयातील प्राणीच आहोत, अशा समजुतीने पाहून जात. कोणी काही व कसलीही विचारपूस करीत नाहीत. मग ह्या कमिटीचा उपयोग काय? दुसऱ्या कोणाजवळ न थांबता मजसमोर सर्वांना आणले. जणु काय संग्रहालयातील मी म्हणजे अतिशय प्रेक्षणीय प्राणी. हिस्ट्री तिकिट नावाचे लहानसे पुस्तक प्रत्येक कैद्याच्या नावे असते. त्यात त्याचे वर्तन, वजन, दिनचर्या नमूद केलेली असतात. माझे तिकिट कमिटीच्या मुख्य साहेबाने पाहिले. मंडळी मुक्याचे व्रत पाळून आली तशी गेली.

मी येथे ता. १२ मे रोजी आल्यापासून तुरुंगाधिकाऱ्याकडे लेखनसाहित्याची मागणी केली. एक महिन्याने मागणी सफल झाली. टाक असला तर दौत नाही, दौत असली तर शाई नाही, आणि हे सर्व असले तर दिवा नाही असा प्रकार नेहमी चालू असे. ता. २४ जुलै रोजी माझ्या खोलीत दिव्याची व्यवस्था करण्यात आली. अडीच महिन्यांनंतर मिळणाऱ्या दिव्याच्या प्रकाशाकडे पाहून मला आनंद झाला. तो इतका की लिहण्याचे सोडून मी दिव्याकडेच पाहात बसलो. त्या दिवसापासूनच मी माझी रोजनिशी व बाळपणीच्या आठवणी लिहू लागलो.

मुक्तता : ता. १३ ऑक्टोबर १९३० ला मी व बाळूकाका अंगणात शतपावली करीत असता आमचा वॉर्डर सखाराम तुकाराम धाकटे (एक मराठा जातीचा खुनी कैदी) एकदम मजकडे येऊन माझ्या पाया पडून रडू लागला. आपण वॉर्डर या नात्याने थोडेसे कडक वागवल्याबद्दल पश्चात्ताप झाला एवढेच तो म्हणत होता. मला मागाहून कळले की, माझी सुटका ता. १४ रोजी होणार होती हे त्याला आधी कळले होते. पण ते त्याला मला कळविण्याचा अधिकार नव्हता. ह्या शिस्तीमुळे मी त्यास पुन्हा भेटणार नाही म्हणून त्याचे हे रडे होते.

ता. १४ ऑक्टोबर १९३० रोजी सकाळी उठल्याबरोबर जमादारांनी येऊन मी सुटलो, म्हणून सामानाची तयारी करून लवकर ऑफिसात येण्याची वर्दी दिली. पुणे शहर काँग्रेस कमिटीचे चिटणीस श्री. जोशी हेही मजबरोबरच सुटले. माझी डायरी व लेख तपासून काही आक्षेप निघतील की काय अशी मला भिती होती ; पण तसे काही झाले नाही. ८ वाजण्याचे सुमारास आम्ही बाहेर पडलो.

एकंदरीत सर्व अधिकाऱ्यांनी माझ्या तुरुंगवासात मला बरे वागवले. मध्यंतरी एका तरुण युरोपियन जेलरने तुरुंगाच्या नियमांची सबब सांगून माझी दाढी व डोकीवरचे केस काढण्याचा घाट घातला होता. "पण ती कधी निघावयाची नाही" असा मी त्यास निक्षून जबाब दिला म्हणून ते प्रकरण कसेबसे निपटले.

मी सकाळी ९-१० च्या सुमारास घरी पोचलो. दुसरे दिवशी रे मार्केटात जाहीर सभा भरवून माझे अभिनंदन करण्यात आले. शेवटी माझ्या गळ्यात हार घालताना मी म्हटले, "आता कायदेभंग

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

२८

साहित्यसेवा

आतापर्यंत मी माझ्या क्रियात्मक सेवेच्या आठवणी दिल्या. साहित्यसेवेविषयी काही उल्लेख न केल्यास या ग्रंथास अपूर्णत्व येईल म्हणून या प्रकरणी त्याचा संक्षेपाने उल्लेख करणे भाग आहे. माझे सर्व आयुष्य परिश्रमाचे काम करण्यात गेल्यामुळे मोठमोठे ग्रंथ तयार करण्याकडे मला वेळच मिळाला नाही. तथापि प्रवासवर्णने, इतिहाससंशोधन, तत्त्वविवेचन, धर्मोपदेश वगैरे विषयावर माझी जी व्याख्याने झाली ती समग्र लिहून काढून तत्कालीन वर्तमानपत्रातून आणि मासिक पत्रातून प्रसिद्ध करण्यात आली आहेत. ह्याशिवाय निरनिराळ्या परिषदात आणि अध्यक्षपदावरून केलेली विस्तृत भाषणे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊन शिवाय पुस्तकरूपाने छापण्यात आली आहेत. विलायतेतील प्रवास, हिंदुस्थानातील प्रवचने आणि व्याख्याने ही सर्व एकत्र करून माझे मित्र रा. बी. बी. केसकर यांनी स्वतंत्रपणे पुस्तकरूपाने छापली. ती पुस्तके इंदुप्रकाशकारांनी आपल्या वर्गणीदारास १९३२ साली मोफत वाटली.

मराठा विद्यार्थी भ्रातृमंडळ पुणे, ह्या मंडळापुढे "सुशिक्षित मराठ्यांची कर्तव्ये" ह्या विषयावर माझे विस्तृत व्याख्यान झाले. ते इंदुप्रकाशात, जून १९१४ स ता. २३ ते २६ अखेर प्रसिद्ध झाले आहे. त्यात दिलेली आकडेवारी आणि केलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत. स्वतंत्र पुस्तकरूपानेही हे व्याख्यान प्रसिद्ध झाले आहे.

मी तरुण असताना ललितवाङ्मय लिहिण्याच्या विचारात होतो. एका सामाजिक कादंबरीची योजनाही मी करून ठेवली होती. पण कार्यबाहुल्यामुळे वेळ मिळाला नाही. माझा आवडीचा विषय इतिहास. त्यावर मात्र मी वेळोवेळी व्याख्याने दिली आहेत.

१९२३ साली डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कामातून मी निवृत्त झालो. त्यानंतर माझ्या साहित्यसेवेच्या इच्छेने उचल खाल्ली. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे आर्यांचा इतिहास. आर्यांच्या आगमनापासून हिंदुस्थानच्या इतिहासास सुरुवात झाली वगैरे वगैरे भ्रामक कल्पना जाड्या जाड्या विद्वानांमध्येसुद्धा अजूनही दिसतात. आर्यांच्या पूर्वीही हिंदुस्थानात द्राविड आले. ते पश्चिमेकडून आले. त्यांच्याही पूर्वी हिंदुस्थानात मोगल (कोल = कोळी वगैरे) आले. हिंदुस्थानभर त्यांनी वस्ती केली. त्या विषयावर निरपेक्ष रीतीने संशोधन करण्याची जरुरी आहे असे वाटल्यावरून आर्य-द्राविड वाद ह्या विषयावर १९२५ सालच्या सुमारास, नाशिक, कोल्हापूर वगैरे ठिकाणी जाहीर व्याख्याने दिली. ती विषयाच्या नाविन्यतेमुळे, सामान्य जनांस रुचत नसत. ता. २१ जाने. १९२५ च्या Indian Daily Mail ह्या इंग्रजी दैनिकात व त्याच सुमारास Indian Social Reforomer मध्ये व मद्रासच्या Justice ह्या इंग्रजी दैनिकात ह्या विषयावरील माझे संशोधनात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, समग्र वाङ्मय, खंड २ रा ~~~

"स्वार्थावर लाथ मारून गळयात झोळी अडकवून संस्थेकरिता-अर्थात आमच्या लोकांकरिता-संस्थेचे जे चालक भिक्षांदेही करीत दारोदार फिरतात व त्यांना त्यात कितीही अल्प यश आले तरी ते पर्वा न करता चंदनासारखे स्वतः झिजून दुस-यांना-आम्हाला सुख देण्याकरिता, आमची स्थिती सुधारण्याकरिता आपला प्रयत्न चालू ठेवतात त्या संतांची किंमत आजपर्यंत झालेल्या कोणत्याही संतांपेक्षा आम्हाला यात्किंचितही कमी वाटत नाही. कित्येकांना ती जास्त वाटेल."

गणेश आकाजी गवई

डी. सी. मिशनच्या महाराष्ट्र परिषदेत केलेले भाषण

"इतिहास असे सांगतो की, ज्यापासून राष्ट्राचा विकास होतो अशा सर्व प्रकारच्या चळवळीचा उगम थोड्याशा व्यक्तींच्या कार्यात सापडतो. प्रस्तुतच्या बाबतीत त्या व्यक्ती म्हणजे ज्यांची प्रथम प्रथम हेटाळणी झाली ते डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे गृहस्थ होते. त्यांच्या कार्याने प्रचंड अशा हिंदू समाजाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत झाली."

न्यायमूर्ती सर नारायणराव चंदावरकर

डी. सी. मिशनची अस्पृश्यतानिवारक परिषद

मुंबई, १९१८

"शिंद्यांचा जिला भरीव हातभार लागला नाही अशी लोकसेवेची व समाजोन्नतीची चळवळ दाखवून देणे कठीण आहे. राजकारण, समाजकारण, धर्मकार्य, शिक्षणकार्य, इतकेच नव्हे तर वाङ्मयसेवा आणि इतिहाससंशोधन या सर्वांत शिंद्यांचा भाग आहे. आणि फार महत्त्वाचा भाग आहे. ज्या काळी विधवाविवाहासारखे साधे प्रश्न सुटणे दुरापास्त होते अशा त्या घनदाट धर्मवेडाच्या काळात अस्पृश्योद्धाराची चळवळ सुरू करणे, डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था काढणे, इतकेच नव्हे तर अस्पृश्यांत जाऊन त्यांच्यापैकी एक झाल्याप्रमाणे त्यांच्यात वागणे या गोष्टींसाठी अतुल स्वमतधैर्याची, एवढेच नव्हेतर मूलमार्गी बुद्धीची व समाजाविषयी ख-या कळकळीचीही गरज होती. इतक्या व्यापक व सूक्ष्म दृष्टीच्या कार्यकर्त्याची दृष्टी सबंध देशाइतकी विशाल विस्तृत असावी लागते. म्हणूनच श्री. शिंदे सामाजिक चळवळीप्रमाणेच अनेक राजकीय चळवळीत भाग घेताना दिसत."

न्यायमूर्ती भवानीशंकर नियोगी

महाराष्ट्र साहित्य संमेलन

नागपूर, १९३३

"मला राहून राहून एका गोष्टीविषयी दुःख होते. अस्पृश्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला हात घातला रा. विठ्ठलरावांनी. त्या कामी कमालीचा स्वार्थत्याग करून त्यांनी त्यांच्या कुटुंबियांनी देशभर जागृती घडवून आणली. ह्या प्रश्नाला राष्ट्राची मान्यता मिळण्याचे श्रमही त्यांचेच. आपण अलीकडे अस्पृश्यांच्या उन्नतीच्या प्रश्नाचा जेव्हा जेव्हा उल्लेख करण्याचा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा ज्यांनी ह्या बाबतीत केवळ वाचिक कार्य केले आहे अशांनाच जागृतीचे श्रेय अर्पण करण्यांत येते व भारतीय निराश्रित सहाय्यकारी मंडळी व विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्यावर पद्धतशीर बहिष्कार घालून त्यांचा चुकूनही नामनिर्देश केला जात नाही. अशा संघटित बहिष्काराने सत्याचा अपलाप होतो."

वामन सदाशिव सोहोनी

आत्मनिवेदन, मुंबई, १९४०

"विठ्ठल रामजी शिंदे हे माझ्या चार गुरुंपैकी एक होते. माझ्या जन्मदात्यानंतर मी त्यांनाच मानतो. त्यांच्या पायांशीच मी सार्वजनिक कार्याचें धडे घेतले. माझ्यापेक्षा वयाने ते लहान असले तरी राष्ट्रहितासाठी करावयाच्या चळवळीबाबतच्या अभ्यासात त्यांची फार मोठी प्रगती होती. ही गोष्ट सर्वज्ञात आहे, की मुंबई प्रांताकडील अस्पृश्यवर्गाच्या सुधारणेचे ते जनक होते. पंजाब व उत्तरप्रदेश सोडला तर सर्व भारतातील या प्रकारच्या कार्याचा प्रारंभ करणारे ते पहिले पुरुष व या कार्याचे अग्रदूत होते.

अमृतलाल व्ही. ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा

इंडियन सोशल रिफॉर्मर

६ एप्रिल १९४४